# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

## मराठा सत्तेचा उदय

**(१६०० ते १७०७)**

**Rise of the Maratha Power (1600-1707)**

## मराठ्यांचे राज्य, समाज आणि अर्थव्यवस्था

**(१६०० ते १७०७)**

**Polity, Society and Economy under the Marathas (1600-1707)**

(शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून)

**इतिहास : ऐच्छिक पेपर १ व २**

**बी. ए. भाग-१**

**सेमिस्टर १ व २ करिता**

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१९
बी. ए. भाग-१ इतिहास पेपर १ व २ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : १,५००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-93-89327-32-8

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूरशिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II,
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
I/c संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. व्ही. टी. पाटील**
वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**■ अभ्यासमंडळ : इतिहास ■**

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भारतभुषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाने जून २०१३ पासून बी.ए.भाग-१ इतिहास विषयाचा अभ्यासक्रम सत्रपद्धतीनुसार व सुधारित स्वरूपात लागू केला आहे. त्यानुसार दूरशिक्षण केंद्रामार्फत बहिःस्थ विद्यार्थ्यांसाठी 'इतिहास' विषयाचा दोन्ही सत्राचा अभ्यासक्रम विचारात घेवून सदरच्या पुस्तकातील स्वयं अध्ययन साहित्य अनुभवी प्राध्यापकांकडून लेखन करून तयार करण्यात आले आहे. जून २०१९ पासून या वर्गासाठी तयार केलेल्या 'मराठी सत्तेचा उदय' या पुस्तकांत विद्यार्थ्यांना समजेल, उमजेल अशा भाषेत लिखान करण्यात आले आहे.

इ. स. १६०० ते इ. स. १७०० पर्यंतचा कालखंड मराठ्यांच्या इतिहासात अत्यंत महत्त्वाचा होता. ह्याच काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठा राज्याची स्थापना केली. पुढे छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम आणि महाराणी ताराबाई यांनी मुघल राजवटीच्या विरोधातील मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धाचे नेतृत्व केले. हा काळ एक परिवर्तनाचा काळ देखील होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी मराठा स्वराज्यामध्ये मुलभूत राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक बदल घडवून आणले होते. प्रस्तुत अभ्यासक्रमाचे दोन प्रमुख हेतू आहेत- १) विद्यार्थ्यांना महाराष्ट्राचे स्वातंत्र्य निर्माण करण्यासाठी व ते टिकवून ठेवण्यासाठी मराठा राज्यकर्त्यांनी आणि लोकांनी दिलेले योगदान समजून सांगणे आणि २) इ.स. १६०० ते इ.स. १७०० या काळातील महाराष्ट्रातील लोकांच्या राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाची ओळख विद्यार्थ्यांना करून देणे.

'मराठा सत्तेचा उदय' या सेमिस्टर-१ साठीच्या अभ्यासक्रमात छत्रपती शिवाजी महाराजांचे सन १६६४ पर्यंतचे कार्य, छत्रपती शिवाजी महाराजांची इ.स. १६८० पर्यंतची कामगिरी, मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध, मराठा इतिहास समजण्यासाठी साधनांचे महत्त्व या घटकांचा समावेश करण्यात आला आहे. सत्र २ साठी तयार केलेल्या अभ्यासक्रमात राजनीती, अर्थव्यवस्था, समाज आणि धर्म, छत्रपती शिवाजी महाराजांचे धोरण व योगदान इ. घटकांचा समावेश करण्यात आलेला आहे. या पुस्तकाची एकूण ८ घटकांमध्ये विभागणी करून मांडणी केली आहे. सर्व विद्यार्थी व शिक्षकांना सदरचे पुस्तक मार्गदर्शक ठरेल, असा आम्हास विश्वास वाटतो.

सदरहू पुस्तकाच्या लिखानाचे काम शिवाजी विद्यापीठ कक्षेतील विविध मान्यवर प्राध्यापकांनी वेळेत पूर्ण केल्याबद्दल, संपादक मंडळ त्यांचे आभारी आहे. या पुस्तकाचे प्रकाशन करण्यासाठी शिवाजी विद्यापीठ व दूरशिक्षण विभागातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल संपादक मंडळ त्यांचे मनापासून आभार मानत आहे.

**– संपादक**

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर



## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखक | घटक क्रमांक |
|---|---|
| **सत्र–१ : पेपर–१** | |
| **डॉ. तानाजी रामचंद्र हवालदार**<br>विश्वासराव नाईक कला, वाणिज्य आणि बाबा नाईक विज्ञान महाविद्यालय, शिराळा | १ |
| **डॉ. भारतभूषण माळी**<br>क्रांतीसिंह नाना पाटील महाविद्यालय, वाळवा | १ |
| **डॉ. सुरेश वसंत शिखरे**<br>शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | २ |
| **डॉ. मंजुश्री जयसिंगराव पवार**<br>यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय, वारणानगर | २ |
| **डॉ. अभय पाटील**<br>छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा. | ३ |
| **डॉ. अवनिश पाटील**<br>इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ४ |
| **सत्र–२ : पेपर–२** | |
| **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**<br>चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | १ |
| **प्रा. संदीप जाधव**<br>विठ्ठलराव पाटील महाविद्यालय, कळे, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | २ |
| **डॉ. कविता अशोक गगराणी**<br>न्यू कॉलेज, कोल्हापूर | ३ |
| **श्रीमती पूनम रमेश भुयेकर**<br>संशोधक विद्यार्थी, इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ |
| **डॉ. सुरेश वसंत शिखरे**<br>शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. अवनिश पाटील**

इतिहास विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | पेपर–१ : सेमिस्टर–१ | |
| १. | छत्रपती शिवाजी महाराजांचे सन १६६४ पर्यंतचे कार्य | १ |
| २. | छत्रपती शिवाजी महाराजांची इ.स. १६८० पर्यंतची कामगिरी | ३५ |
| ३. | मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध (१६८१–१७०७) | ७५ |
| ४. | मराठा इतिहास समजण्यासाठी साधनांचे महत्त्व | १०४ |
| | पेपर–२ : सेमिस्टर–२ | |
| १. | राजनीती | १३१ |
| २. | अर्थव्यवस्था | १६१ |
| ३. | समाज आणि धर्म | १८८ |
| ४. | छत्रपती शिवाजी महाराजांचे धोरण व योगदान | २१५ |

■ **विद्यार्थ्यांना सूचना**

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१८-१९ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# सत्र १ : घटक १

# छत्रपती शिवाजी महाराजांचे सन १६६४ पर्यंतचे कार्य


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ मराठा सत्तेच्या उदयाची पार्श्वभूमी

१.२.२ सन १६५९ पर्यंतच्या सुरूवातीच्या कारवाया, अफझलखान प्रकरण आणि पन्हाळागडचा वेढा

१.२.३ शाहिस्तेखानाची स्वारी व सुरतेची स्वारी

१.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

१.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ ग्रंथ


## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर खालील गोष्टींचे आकलन होईल.

- मराठा सत्तेच्या उदयापूर्वीची महाराष्ट्रातील पार्श्वभूमी समजून येईल.
- मराठा सत्तेच्या उदयाची कारणे स्पष्ट करता येतील.
- शिवाजी महाराज यांनी जावळी जिंकून का घेतली याची कारणे सांगता येतील.
- जावळी विजयामुळे स्वराज्य व आदिलशाहीवर झालेले परिणाम स्पष्ट करता येतील.
- अफजलखानाच्या स्वारीची माहिती सांगता येईल.
- पन्हाळगडच्या वेढ्याविषयी माहिती स्पष्ट करता येईल.

- शाहिस्तेखान स्वारीचा हेतू व सविस्तर वृत्तांत याची माहिती मिळेल.
- छ. शिवाजी महाराज यांच्या सुरत लुटीचा वृत्तांत स्पष्ट करता येईल.

## १.१ प्रास्ताविक

प्राचीन काळापासून महाराष्ट्राला मोठी वैभवशाली परंपरा आहे. सर्वच क्षेत्रात महाराष्ट्र अग्रेसर होता. यादवांच्या कालखंडात महाराष्ट्राची प्रगती झाली. यादव काळात महाराष्ट्रावर मुस्लिम सत्ताधिशांनी आक्रमण करून आपला अंमल प्रस्थापित केला. या मुस्लिम सत्ताधिशांनी येथील प्रजेवर अन्याय अत्याचार केले. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची स्थापना करून एक स्वतंत्र मराठा राज्य स्थापन केले ही मध्यकालीन भारताच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाची घटना आहे. प्रस्तुत प्रकरणात आपण मराठा सत्तेच्या उदयापूर्वीची पार्श्वभूमी, मराठा सत्तेच्या उदयाची कारणे व छत्रपती शिवाजी महाराजांचे इ.स. १६६४ पर्यंतचे कार्य पाहणार आहोत.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ मराठा सत्तेच्या उदयाची पार्श्वभूमी

### अ) मराठी सत्तेच्या उदयापूर्वीची पार्श्वभूमी

**१) महाराष्ट्राची भौगोलिक पार्श्वभूमी :**

विविध प्राचीन ग्रंथात महाराष्ट्राचा उल्लेख आढळून येतो. मध्य प्रदेशातील सागर जिल्ह्यातील एरण गावात आढळलेल्या शिलालेखात सर्वप्रथम महाराष्ट्राचा उल्लेख आढळतो. महावंश या पुराणग्रंथात 'मरहट्ट', 'महारट्ठ' असा उल्लेख आलेला आहे. इतिहासकार शं. बा. जोशी यांचे मते 'मरहठ्ठ' या कानडी शब्दापासून महाराष्ट्र असे नाव पडले आहे. रामायण, महाभारत या महाकाव्यातून व बृहदारण्यक या उपनिषदातून येथे असणाऱ्या घनदाट जंगलामुळे या प्रदेशाचा उल्लेख 'दंडकारण्य' असा आढळतो.

भौगोलिक दृष्टिने महाराष्ट्राचे कोकण, घाटमाथा व देश असे प्रामुख्याने तीन भाग पडतात. महाराष्ट्राला विस्तीर्ण समुद्र किनारा लाभला आहे. या समुद्र किनाऱ्यालगतचा प्रदेश कोकणचा प्रदेश म्हणून ओळखला जातो. परकीय सत्तांचा बंदोबस्त करण्यासाठी शिवाजी महाराजांनी याच कोकण किनारपट्टीवर आरमाराची उभारणी केली. महाराष्ट्रातील बहुतांश भाग प्रामुख्याने डोंगराळ, घनदाट जंगलानी व्यापला आहे. परिणामी येथील लोक शरीराने काटक होते. त्याचा उपयोग मुस्लिम सत्ता त्यांना आपल्या सैन्यात भरती करून घेऊन लढाईकरीता करून घेत. याच मावळ्यांच्या सहकार्याने शिवाजी महाराजांनी मराठा सत्तेची स्थापना केली.

## २) राजकीय परिस्थिती :

महाराष्ट्राचा सुसंगत इतिहास सम्राट चंद्रगुप्त मौर्याच्या कालखंडापासून प्राप्त होतो. सम्राट चंद्रगुप्ताने अपवादात्मक प्रदेश सोडला तर दक्षिणेतील संपूर्ण प्रदेश आपल्या ताब्यात घेतला होता. मौर्य सत्तेच्या ऱ्हासानंतर महाराष्ट्रात सातवाहन घराण्याचा उदय झाला. सातवाहनानंतर महाराष्ट्रात वाकाटक, चालुक्य व राष्ट्रकुटांच्या सत्ता उदयास आल्या. इ. स. ६ व्या शतकापर्यंत वाकाटक घराणे सत्तेवर होते. कल्याणच्या चालुक्यांची सत्ता १२ व्या शतकामध्ये कमजोर बनली व होयसळ, काकतीय, पांड्य, कदंब या मांडलिक सत्ता स्वतंत्र होवू लागल्या. भिल्लम याने या सर्व अस्थिरतेचा फायदा घेवून चालुक्य राजा सोमेश्वर चौथा याचा पराभव करून यादवांची सत्ता स्थापन केली. इ. सन १२९४ मध्ये अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीच्या राज्यावर आक्रमण केले व रामदेवरायचा पराभव करून देवगिरीची लूट केली. मलिक कपूर या खिलजी सरदाराने इ. सन १२९६ मध्ये दुसऱ्यांदा देवगिरीवर आक्रमण करून यादवांचा पराभव केला. पुढे हरपालदेव याने स्वतंत्र होण्याकरीता प्रयत्न केला. मात्र अल्लाउद्दीनचा मुलगा सुलतान मुबारक शहाने इ. स. १३१८ मध्ये हरपालदेवचा पराभव करून त्यास ठार मारले व देवगिरीचे राज्य नष्ट केले.

हसन उर्फ जाफरखान या सरदाराने इ. स. १३४७ मध्ये दक्षिणेत सुलतानाची सत्ता झुगारून स्वतंत्र बहामनी राज्याची स्थापना केली. त्याने आपले नाव बदलून 'अब्दुल मुजफर अल्लाउद्दीन बहमनशहा' अशी पदवी धारण केली. बहामनी राज्य दिडशे वर्षे अस्तित्वात होते. १५ व्या शतकाच्या शेवटी महमद गवान या कर्तबगार पंतप्रधानाचा वध झाला तर मुहम्मदशहाचा दुसऱ्याच वर्षी मृत्यू झाला. परिणामी बहामनी राज्याचे विघटन घडून आले. बहामनी साम्राज्याची पाच राज्ये निर्माण झाली. १) विजापूरची आदिलशाही, २) अहमदनगरची निजामशाही, ३) वऱ्हाडची इमादशाही, ४) गोवळकोंड्याची कुतूबशाही व ५) बिदरचे बरीदशाही अशा पाच शाह्या अस्तित्वात आल्या. त्यानंतर दक्षिणेतील इमादशाही, बरीदशाही ही राज्ये संपुष्टात आली. अहमदनगरची निजामशाही, विजापूरची आदिलशाही व गोवळकोंड्याची कुतूबशाही ही राज्ये पुढे सत्तेवर राहीलेली दिसतात. दक्षिणेतील या सत्तानी इ.स. १५६५ मध्ये तालिकोटच्या लढाईत विजयनगरचा राजा सदाशिवरायचा पराभव केला. यानंतर विजयनगर राज्याचा ऱ्हास फार झपाट्याने घडून आला. विजयनगरच्या हिंदू राज्यापासून शिवाजी महाराज यांनी प्रेरणा घेतलेली दिसते.

## ३) सामाजिक परिस्थिती :

मराठा सत्तेच्या उदयापूर्वी महाराष्ट्रामध्ये समाजात धर्मशास्त्राचा प्रचंड प्रभाव होता. समाजव्यवस्था चातुर्वर्ण्य व्यवस्थेत अडकली होती. ब्राम्हण, क्षत्रीय, वैश्य व क्षुद्र हे प्रमुख चार वर्ण होते. ब्राम्हणांना शिक्षणाचा अधिकार होता तर इतर वर्णांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. समाजामध्ये अनेक रूढी, परंपरा, श्रद्धा-अंधश्रद्धा वाढीस लागलेल्या होत्या. धर्माचे व धर्मपंडिताचे समाजावर असलेल्या वर्चस्वामुळे

जनतेची मोठ्या प्रमाणात पिळवणूक होत होती. वेठबिगारी, गुलामी यासारख्या प्रथा समाजामध्ये रूढ झाल्या होत्या. स्त्रियांना समाजामध्ये दुय्यम स्थान होते. मुस्लिम सत्तेचे प्राबल्य असल्यामुळे हिंदूवर अनेक अन्याय अत्याचार होत होते. मंदिरे उध्वस्त केली जात होती. शेती हा प्रमुख व्यवसाय होता. जमीनदार, सरदार यांच्या वर्चस्वामुळे जनतेची आर्थिक लुट होत होती. परिणामी समाजामध्ये मागासलेपण आले होते.

**४) धार्मिक परिस्थिती :**

मराठा सत्तेचा उदय होण्यापूर्वी समाजामध्ये वैदिक धर्माचे प्राबल्य होते. मात्र त्यातील अनेक दोषामुळे जैन व बौद्ध धर्माचा विकास झाला. जैन व बौद्ध धर्मात पुढे अनेक तात्विक मतभेद व संकुचित प्रवृत्ती वाढत गेली व त्यांचे अनेक पंथ, उपपंथ निर्माण झाले. पुढे महाराष्ट्रात इस्लाम धर्माचा प्रवेश झाला व परिस्थिती बदलत गेली. इस्लाम धर्म प्रसारामुळे सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रात अनेक बदल घडून आले. भाषा, चालीरीती, धार्मिक विचार एकमेकामध्ये मिसळत गेले. हिंदू समाजातील अनेक लोक इस्लामी साधू संताच्या प्रभावाखाली जाऊ लागले. याच कालखंडात भक्तिचळवळीने महाराष्ट्रात जोर धरला होता. शैव संप्रदाय, वैष्णव संप्रदाय व वारकरी संप्रदाय इत्यादी दक्षिण भारतात समाजसुधारणेमध्ये मोठ्या प्रमाणात कार्य करत होते. वारकरी संप्रदायाच्या कार्यामुळे मराठा स्वराज्य स्थापनेस मोठी प्रेरणा मिळाली.

**५) आर्थिक परिस्थिती :**

महाराष्ट्राचा बराचसा प्रदेश पर्वतरांगा, दऱ्या खोऱ्यांनी व्यापला आहे. शेती हा प्रमुख व्यवसाय निसर्गावर अवलंबून असल्याने सतत दुष्काळी परिस्थिती निर्माण होत असे. लहान शेतकरी व शेतीला पूरक व्यवसाय करून आपले जीवन व्यतीत करणारा बलुतेदार यांचा मोठा वर्ग होता. अनेकवेळा दुष्काळामुळे त्यांना ही स्थलांतर करावे लागत असे. सैन्यात भरती होणे व उपजीविकेचे साधन मिळविणे हा एक प्रमुख पर्याय त्यांच्यासमोर होता. ग्रामीण भागातून काही जमीनदार, वतनदार, देशमुख, सरदेशमुख हा वर्ग अत्यल्प होता. वैभवशाली प्रदेश असणाऱ्या येथील प्रदेशाची इस्लामी आक्रमकांनी लुट केली होती त्यामुळे येथील परिस्थिती बिकट बनली होती. अशा परिस्थितीमध्ये मराठ्यांचे राज्य उदयास आले.

## ब) मराठा सत्तेच्या उदयाची कारणे

मध्ययुगीन कालखंडात मराठी सत्तेचा उदय व विकास ही अत्यंत क्रांतीकारी घटना मानली जाते. या सत्तेच्या उदयासाठी अनेक राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कारणे कारणीभूत होती ती खालील प्रमाणे.

### १) भौगोलिक रचना :

मराठी सत्तेचा उदय होण्यामध्ये महाराष्ट्रातील विशिष्ट भौगोलिक घटक कारणीभूत आहे. महाराष्ट्राची विभागणी कोकण, घाटमाथा व देश अशा तीन प्रकारामध्ये होते. त्यामधील घाटमाथ्यावर स्वराज्याची मुहर्तमेढ रोवली गेली. सह्याद्रीच्या उंचच उंच पर्वतरांगामुळे येथील प्रदेश नैसर्गिकरित्या शत्रूपासून सुरक्षित बनला होता. अवघड डोंगर रांगा, दऱ्या खोऱ्यांनी वेढलेला प्रदेश व घनदाट जंगल यामुळे इतर सत्ताधिशांना हा प्रदेश अत्यंत अवघड होता. शत्रूला सहज या प्रदेशात प्रवेश करणे शक्य होत नसे. न्या. महादेव गोविंद रानडे यांनी 'द राईज ऑफ मराठा पॉवर' या ग्रंथात भौगोलिक रचनेचा स्वराज्य निर्मितीस फायदा झाल्याचे नमूद केले आहे.

### २) मराठ्यांची शरीररचना व स्वभाव :

महाराष्ट्रात वास्तव्य करणाऱ्या सर्वच जाती धर्माच्या लोकांना 'मराठे' या नावाने ओळखले जात असे. हे मराठे शरीराने मध्यम बांध्याचे, काटक, चपळ असे होते. चिवटपणा, कष्टाळूवृत्ती त्यांच्या अंगी मोठ्या प्रमाणात होती. मराठे बळकट, सहनशील व स्वाभिमानी वृत्तीचे होते. अवघड किल्ले ते सहजासहजी चढून जात असत. त्यांचा स्वराज्य निर्मितीस मोठा फायदा झाला. महाराष्ट्रातील या मराठा लोकांचे स्वभाव वैशिष्ट्य ही महत्त्वपूर्ण होते. या संबंधी प्राचीन काळी ह्युएनत्संग या चीनी प्रवाशाने महाराष्ट्राला भेट दिली होती. त्याने महाराष्ट्रातील लोकांच्या स्वभाव वैशिष्ट्यासंबंधी केलेले वर्णन महत्त्वपूर्ण मानले जाते. त्याच्या मते, ''या प्रदेशातील लोक स्वाभिमानी व भांडखोर वृत्तीचे असून उपकारकर्त्या बद्दल त्याग व विश्वास, घातकी कृतघ्न व्यक्तीचा सूड घेण्याची भावना बाळगतात. अपमान कर्त्यांचा बदला घेतांना देखील ते त्यास पूर्व सूचना देण्यास विसरत नाहीत''. एकूणच मराठा समाज हा कष्टाळू, धाडसी, स्वाभिमानी, सहनशील व पराक्रमी वृत्तीचा होता.

### ३) समान भाषा व सामाजिक ऐक्य :

मराठी भाषेचा उदय इ.स. १२ व्या शतकापासून झाल्याचे मानले जाते. कवी मुकुंदराज यांचा 'विवेक सिंधू' हा मराठी भाषेतील पहिला ग्रंथ संबोधला जातो. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मराठी ही भाषा बोलली जात होती. समान भाषेमुळे सामाजिक ऐक्य निर्माण होण्यास मोठी मदत झाली. समान भाषेच्या सामाजिक ऐक्याने मराठा राज्य उदयास येण्यास पूर्ण मदत झाल्याचे दिसते.

### ४) साधू संताचे कार्य :

स्वराज्य स्थापन होण्यापाठीमागे साधू संताचे कार्य महत्त्वाचे आहे. मराठा सत्तेचे वैचारिक अधिष्ठान या साधूसंतांनी निर्माण केले. समाजातील अनिष्ठ प्रथा, परंपरा, अंधश्रद्धा याच्यावर त्यांनी मोठ्या प्रमाणात टिका केली. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, संत नामदेव, संत एकनाथ यांनी भक्ती संप्रदायाची (वारकरी संप्रदाय) धार्मिक चळवळ उभारली. स्वधर्माभिमान व समतेची शिकवण दिली.

### ५) पराक्रमी मराठा सरदारांचा उदय :

मराठा स्वराज्य उदयास येत असताना दक्षिणेतील अनेक मराठा सरदार आदिलशाही व कुतुबशाही दरबारात नोकरीस होते. जाधव, भोसले, निंबाळकर, घाटगे, मोरे, शिर्के, सुर्वे, महाडिक यांचा यामध्ये समावेश होता. दक्षिणेतील आदिलशाही व कुतुबशाही दुर्बल बनल्या तेव्हा मराठा सरदारांनी आपली स्वतंत्र सत्ताकेंद्रे निर्माण केली. त्यांना शिवाजी महाराजांनी स्वराज्य स्थापनेच्या कामी स्वराज्यात आणले, त्यांचे सहाय्य मिळविले.

### ६) मराठ्यांची गनिमीकावा युद्ध पद्धती :

मराठ्यांनी गनिमीकावा ही युद्ध पद्धत विकसित केलेली होती. डोंगर, दऱ्या-खोऱ्यामध्ये गनिमीकावा युद्धपद्धत यशस्वी होत होती. शत्रूचे सैन्य हे सपाट प्रदेशात युद्ध करण्यात पटाईत होते. या सैन्याचा मराठा सैन्याच्या गनिमीकावा युद्ध पद्धतीमुळे टिकाव लागला नाही. ही बाब मराठा सत्तेच्या उदयामध्ये जमेची बाजू ठरली होती.

### ७) शहाजीराजे यांचे कार्य :

शहाजीराजे यांना स्वराज्य संकल्पक म्हटले जाते. त्यांनी स्वपराक्रमावर दक्षिणेत आपला प्रभाव निर्माण केला होता. त्यांच्या मनात मराठ्यांचे स्वतंत्र राज्य निर्माण करण्याची योजना होती. परंतु ते पूर्ण रूप देऊ शकले नाहीत. शहाजीराजे यांच्याकडून प्रतिष्ठा, जहागीरी, लष्करी सामर्थ्य, शौर्य, धाडस इ. बाबी शिवाजी महाराजांना मिळाल्या. शहाजीराजेंच्या प्रेरणेने व मार्गदर्शनामुळे शिवाजी महाराज मराठा स्वराज्य निर्माण करू शकले.

## ८) शिवाजी महाराजांचे नेतृत्व :

शिवाजी महाराजांचे नेतृत्वच मोठ्या प्रमाणात स्वराज्य निर्मितीस कारणीभूत ठरले. महाराजांकडे संघटन कौशल्य, चातुर्य, बुद्धिमत्ता, धाडसी वृत्ती हे गुण होते. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांनी आदिलशाही विरोधात बंड केले. आपण निर्माण केलेले स्वराज्य स्वत:साठी नाही तर जनतेसाठी करत आहोत हे त्यांनी मावळ्यांना पटवून दिले. विभागलेल्या व आपआपसात भांडण करणाऱ्या मराठा सरदारांना त्यांनी एकत्रीत करून एका छताखाली आणले. शिवाजी महाराजांच्या कुशल व कणखर नेतृत्वामुळेच मराठा स्वराज्य निर्माण होऊ शकले.

## क) शिवाजी महाराज : जन्म व बालपण

## १) शिवाजी महाराजांचा जन्म :

शिवाजी महाराजांच्या जन्माबाबत वेगवेगळ्या ग्रंथातून व कागदपत्रातून वेगवेगळ्या तिथी व तारखा आढळून येतात. इतिहासकारांमध्ये याबाबत मतभेद दिसून येतात.

१. कवी परमानंद यांनी 'शिवभारत' या ग्रंथात शिवाजी महाराजाचा जन्म फाल्गुन वद्य द्वितीया शके १५५१ रोजी झाला असे वर्णन केले आहे. त्यानुसार १९ फेब्रुवारी, १६३० ही जन्मतारीख ठरते.

२. मल्हार रामराव चिटणीस यांनी आपल्या 'चिटणीस बखरीत' वैशाख शुद्ध द्वितीया शके १५४९ ही जन्मतारीख दिली आहे. त्यानुसार ६ एप्रिल १६२७ ही तारीख येते. इतिहासाचार्य वि. का. राजवाडे व गो. स. सरदेसाई यांनी हीच तारीख ग्राह्य मानली आहे.

३. '९१ कलमी' बखरीमध्ये १० एप्रिल १६२७ ही तारीख देण्यात आली आहे. जदुनाथ सरकार यांनी या तारखेस पाठिंबा दिला आहे.

४. जेधे शकावलीमध्ये १९ फेब्रुवारी १६३० ही तारीख देण्यात आली आहे.

शिवाजी महाराजांच्या जन्माबाबत असे वेगवेगळे उल्लेख येतात, त्यामुळे महाराष्ट्र शासनाने जन्म तारखेचा वाद मिटवण्याकरिता एक समिती नेमली व त्यानुसार फाल्गुन वद्य तृतीया शके १५५१ म्हणजेच १९ फेब्रुवारी १६३० ही शिवजन्मतिथी उपलब्ध पुराव्यानुसार ग्राह्य धरण्यात आली आहे.

## २) शिवाजी महाराजांचे बालपण :

शिवाजी महाराजांचा जन्म पुणे जिल्ह्यातील जुन्नर जवळील शिवनेरी किल्ल्यावर १९ फेब्रुवारी १६३० रोजी झाला. शिवनेरी किल्ल्यावर असलेल्या 'शिवाई' देवीला नवस केल्यामुळे पुत्र प्राप्त झाला म्हणून मातोश्री जिजाबाई यांनी त्याचे नाव शिवाजी असे ठेवले. शिवाजी महाराज यांचे बालपण सुखासमाधानात गेले नाही. त्यांच्या बालपणाचा काळ हा राजकीय स्तरावर अत्यंत अस्थिरतेचा कालखंड होता. मातोश्री जिजाबाई यांना शिवाजी महाराजांना घेऊन अनेक ठिकाणी प्रवास करावा लागला. शहाजीराजे आदिलशाही पदरी नोकरीस असतांना त्यांना कर्नाटकात जाण्यासंदर्भात सूचना झाली. जाताना त्यांनी जिजाबाई व शिवाजी महाराजांना बरोबर नेले. पुढे काही कालावधीनंतर त्यांना काही निवडक लोकांसमवेत पुण्याच्या जहागिरीची व्यवस्था पाहण्यासाठी पाठविले. तेथून पुढे स्वराज्य निर्मितीचा प्रयत्न सुरू झाला. प्रारंभीच्या कालखंडात शिवाजी महाराजांचे शिक्षण व त्यांच्यावरील अन्य संस्कार घडविण्यामध्ये त्यांच्या मातोश्री जिजाबाई यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची होती.

## ३) मातोश्री जिजाबाई

मातोश्री जिजाबाई यांचा जन्म सिंदखेडचे प्रसिद्ध जहागिरदार लखुजीराव जाधव यांच्या पोटी इ.स. १५९६ मध्ये झाला. लखुजी जाधव हे सिंदखेडचे सरदार होते. इ.स. १६०५ ला शहाजीराजे व जिजाबाई यांचा विवाह झाला. महाराणी जिजाबई यांचे जीवन अत्यंत खडतर गेले. त्यांना अनेक संकटांना सामोरे जावे लागले. निजामशाही व मुघल संघर्षाच्यावेळी वडील मुघलांकडून व पती निजामशाहीकडून लढत होते, त्यावेळी त्यांना अनेक कठिण प्रसंगांना सामोरे जावे लागले. त्या धार्मिक वृत्तीच्या होत्या. हिंदू धर्मावर त्यांची अढळ निष्ठा होती. शिवाजी महाराजांना त्यांनी दिलेली प्रेरणा व मार्गदर्शन फार मोलाचे होते, त्यामुळेच मराठा स्वराज्याची निर्मिती होवू शकली. महाराणी जिजाबाई यांचा १८ जून १६७४ रोजी मृत्यू झाला. स्वराज्य निर्मितीमधील त्यांचे योगदान पाहता इतिहासामध्ये त्यांना फार मोलाचे स्थान आहे.

## ५) शहाजीराजे

शहाजीराजे यांचे पूर्वज उत्तर भारतातून दक्षिणेत आल्याचे सर्वच इतिहासकारांनी मान्य केले आहे. त्यांचे पूर्वज उत्तरेतील शिसोदिया घराण्यातील होते. वडील मालोजीराजे हे अहमदनगरच्या निजामशाहीच्या दरबारात सरदार होते. मालोजीराजे इंदापूरच्या लढाईत इ.स. १६२० मध्ये मारले गेले. तद्नंतर त्यांचा सांभाळ चुलते विठोजी व मातोश्री उमाबाई यांनी केला. विठोजी राजे यांच्या मृत्यूनंतर इ.स. १६२३ मध्ये शहाजीराजे यांना निजामशाहीच्या दरबारामध्ये मानाचे स्थान प्राप्त झाले. इ.स. १६२४ मध्ये त्यांनी भातवडीच्या युद्धात पराक्रम गाजवला व त्यांच्या प्रतिष्ठेत भर पडली. स्वकर्तृत्त्वावर दक्षिणेत एक कर्तबगार व श्रेष्ठ सरदार म्हणून त्यांनी प्रतिष्ठा मिळवली. शहाजीराजे यांची कारकीर्द १६२१ ते

१६६४ अशी मानली जाते. या कालावधीमध्ये त्यांनी काही काळ निजामशाहीच्या पदरी तर काही काळ आदिलशाहीच्या पदरी नोकरी केली. इ.स. १६०५ मध्ये जिजाबाई यांच्याबरोबर त्यांचा विवाह झाला. शहाजीराजे व जिजाबाई यांना संभाजी, शिवाजी असे दोन पुत्र होते. पराक्रमी, प्रामाणिक सरदार, मुत्सद्दी, धर्माभिमान बाळगणारा राज्यकर्ता या नात्याने शहाजीराजे यांचे कार्य फार मोठे आहे. शहाजीराजे यांचा २३ जानेवारी १६६४ रोजी मृत्यू झाला. शहाजीराजे यांना स्वराज्य संकल्पक म्हणून संबोधले जाते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १**

**रिकाम्या जागा भरा.**

१. 'द राईज ऑफ मराठा पावर' हा ग्रंथ ......... यांनी लिहिला आहे.

अ) गो. स. सरदेसाई ब) वि. का. राजवाडे

क) म. गो. रानडे ड) जदुनाथ सरकार

२. भौगोलिक दृष्टीने महाराष्ट्राचे ......... भाग पडतात.

अ) दोन ब) तीन

क) चार ड) पाच

३. ....... येथील शिलालेखात महाराष्ट्राचा प्रथम उल्लेख सापडतो.

अ) जुन्नर ब) ब्रम्हपुरी

क) ऐरण ड) नाशिक

४. यादव घराण्याची स्थापना ........ यांनी केली.

अ) भिल्लम ब) रामदेवराय

क) हरपालदेव ड) सदाशिवराय

५. 'विवेकसिंधू' हा ग्रंथ .......... यांनी लिहिला आहे.

अ) गो. स. सरदेसाई ब) वि. का. राजवाडे

क) कवी परमानंद ड) कवी मुकुंदराज

## १.२.२ अफझलखान वधापूर्वीच्या घटना व पन्हाळगडचा वेढा

## शिवाजी महाराजांचा आदिलशाही व मुघलांशी संघर्ष

### अ) शिवाजी महाराज आणि आदिलशाही संघर्ष

शिवाजी महाराजांना स्वराज्याची स्थापना करताना येथील दोन प्रस्थापित सत्तांशी संघर्ष करावा लागला, त्यामध्ये विजापूरची आदिलशाही व दिल्लीची मुगलशाही या दोन सत्तांचा उल्लेख होतो. या संघर्षाचा क्रम लावताना प्रथम आदिलशाहीशी व त्यानंतर मुगल सत्तेशी झालेला संघर्ष असा लावावा लागेल. विजापूरच्या आदिलशाही प्रकरणामध्ये शहाजी राजांना झालेली कैद, जावळी प्रकरण व सिद्धी जोहार यांच्याशी झालेला लढा अशा एकूण तीन भागात अभ्यास करावयाचा आहे.

### १) शिवाजी महाराज व आदिलशाही संघर्ष :

शहाजीराजे यांनी शिवाजी महाराजांना पुणे प्रांताची जहागिरी सांभाळण्यासाठी दिली होती. शहाजीराजे हे या वेळी आदिलशाही दरबारात सरदार होते. पुणे प्रांत हा जहागिरी म्हणून शहाजीराजांकडे असला तरी त्या भागातील महत्त्वाचे किल्ले म्हणजे रायगड, तोरणा, सिंहगड व पुरंदर हे किल्ले आदिलशाहीच्या ताब्यात होते. शिवाजी महाराजांनी हे किल्ले आपल्या ताब्यात घेतले. त्यामुळे सरदाराच्या मुलाने ही बंडखोरी केली आहे हे आदिलशाहीच्या लक्षात आले. त्यातून शहाजीराजांवर आदिलशाहीची नाराजी आली. यावेळी कर्नाटक मोहिमेतील मुस्तफाखान याने आदिलशाहाचे कान भरले त्यामुळे शहाजीराजे यांच्यावरील विश्वास कमी झाला आणि त्यांच्या जहागिरीवर जप्तीचे हुकूम सोडले व नंतर ते परतही घेतले. १६४६ मध्ये आदिलशाहा आजारी पडल्यामुळे दरबाराची सर्व सूत्रे बडी बेगम साहिबा हिच्या हाती गेली. शहाजीराजे यांची शिवाजीराजांच्या कृतीस फूस असावी असा संशय बळावल्याने शहाजीराजे बेसावध असताना त्यांना अटक करण्यात आली. शिवाजी महाराजांनी यावेळी मुगलांशी संधान बांधून राजकारण सुरू केले. याचा परिणाम शहाजी राजांची सुटका होण्यात झाला.

### २) जावळी जिंकण्यास कारणीभूत ठरलेल्या बाबी अथवा घटक :

जावळीच्या मोरे घराण्यास आदिलशाहाने 'चंद्रराव' हा किताब दिलेला होता. १६४८ मध्ये या जहागिरीचा प्रमुख दौलतराव हा निपुत्रिक मरण पावला. त्याच्या मृत्यूनंतर त्याच्या घराण्यात वारसा संबंधी वाद सुरू झाला. दौलतराव यांच्या विधवा पत्नीने शिवथरकर मोरे घराण्यांतील यशवंतरावास दत्तक घेतले. या दत्तक प्रकरणात शिवाजी राजांनी जावळीकराना सहाय्य केले होते. शिवाजी महाराजांना मोरे घराण्याने स्वराज्य कार्यात आपणास मदत करावी अशी अपेक्षा होती. याचवेळी वाई प्रांतांचा सुभेदार अफजलखानाला शिवाजी महाराजांनी मोरेना केलेली मदत आवडली नव्हती. अफजलखानाने चंद्रराव मोरे यास व त्यांचा कारभारी हणमंतराव यांना जावळी ताब्यात देण्याची तंबी दिली. त्यामुळे

चंद्रराव उर्फ यशवंतराव याने शिवाजी महाराजांच्या विरूद्ध अफजलखानाशी संगनमत केले व शिवाजी महाराजांच्या विरूद्ध कारवायास प्रारंभ केला. याशिवाय खालील कारणांचा समावेश होता.

**१) शिवाजी महाराजांच्या शत्रूंना सहाय्य :**

शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापना कार्याची सुरूवात आदिलशाही प्रदेशात सुरू झाल्याने आदिलशाहीने बाजी शामराज या सरदारास १० हजार फौज घेऊन शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यास पाठविले होते. त्या बाजी शामराज यास चंद्रराव मोरे यांनी आश्रय दिला. पार घाटात मराठ्यांचे सैनिक दबा धरून बसले होते. या सैनिकांनी बाजी शामराज यावर अचानक हल्ला करून पिटाळून लावले. त्या बाजी शामराजाला मोऱ्यांनी आश्रय दिला ही कृती शिवाजी महाराजांच्या विरूद्ध होती.

**२) मावळ प्रांतातील कटकटी :**

शिवाजी महाराजांनी प्रारंभीच्या काळात मावळ प्रांत काबीज केला होता. त्यामध्ये या चंद्रराव मोरेनी कटकटी निर्माण केल्या होत्या. मावळ प्रांतातील देशमुख घराणे हे मोरे यांचे नातलग होते. यातील गुंजन मावळचा हैबतराव सिलीमकर हा देशमुख शिवाजी महाराजांच्या बाजूने होता. तो चंद्रराव मोरे यांचा भाचा होता. हैबतराव हा शिवाजी महाराजांच्या बाजूस असल्याने चंद्रराव याने त्यांच्या देशमुखी वतनाबाबत वाद निर्माण केला व त्यास आपल्या बाजूने वळविण्याचा प्रयत्न केला. शिवाय जेधे वगैरे देशमुखांनाही आपल्या बाजूने वळविण्याचा खटाटोप चंद्रराव करू लागला होता. त्यामुळे शिवाजी महाराजांना त्याचा बंदोबस्त करणे गरजेचे होते.

**३) गुन्हेरागांना आश्रय :**

शिवाजी महाराजांच्या ताब्यात असलेल्या प्रदेशात काही गुन्हेगार गुन्हा करून जवळच असलेल्या जावळीच्या प्रदेशात पळून जात असत. अशावेळी चंद्रराव याने त्या गुन्हेगारांना पकडून देण्याचे टाळले व उघडपणे त्यांना आश्रय दिला. मुसे खोऱ्यातील रंगो त्रिमल वाकडे याने एका ब्राह्मण स्त्रीवर अत्याचार केला, त्यास चंद्रराव याने आश्रय दिला. चंद्ररावाने शिवाजी महाराजांच्या प्रदेशात घुसखोरी करण्यास सुरूवात केली होती. चिखलीचा पाटील रामजी वाडकर हा चंद्रराव यास जुमानत नसल्याने त्याचा पाठलाग करून शिवाजी महाराजांच्या प्रदेशात घुसून मारले. त्याच्या मुलाने रोहीडा खोऱ्यात आश्रय घेतला तेव्हा त्यासही तेथे जाऊन मारले. शिवाजी महाराजांच्या प्रदेशात झालेले हे केवळ गुन्हे नव्हते तर शिवाजी महाराजांच्या सार्वभौमत्वाला दिलेले आव्हान होते.

**४) चंद्रराव याचा उद्दामपणा :**

चंद्रराव व शिवाजी महाराज यांच्यातील वितुष्ट दिवसेंदिवस वाढत गेले. तरीही शिवाजी महाराजांनी त्यास समजून सांगण्यासाठी आपली ताबेदारी स्वीकारण्याबाबत निरोप दिला. हेतू हा की सर्व जहागिरदारांना

एकत्र करणे. पण त्या निरोपास उद्दामपणे चंद्रराव याने उत्तर दिले. ''तुम्ही कालचे राजे जाहला, तुम्हास राज्य कोण्ही दिधले''. न्या. रानडे म्हणतात, 'शिवाजी महाराजांचा हेतू या काळातही त्यांच्या जहागिरी नीरेच्या दक्षिणेस व कृष्णेच्या उत्तरेस होती; त्यांची जूट घडवून आणायची हाच होता. परंतु जहागिरदारांना शिवाजी महाराजांचे नेतृत्व मान्य नव्हते. त्यांनी शिवाजी महाराजांना विरोध सुरू केला. त्यात जावळीचे मोरे मुख्य होते. शिवाजी महाराजांकडे जावळी जिंकण्याशिवाय दुसरा पर्याय नव्हता.

### ५) जावळीचा प्रदेश राज्यवृद्धीस अनुकूल :

स्वराज्याच्या वायव्य व उत्तर दिशेला मुगली प्रदेश, पूर्व व आग्नेय दिशेला आदिलशाही प्रदेश होता. राज्यवृद्धीस तत्कालीन परिस्थितीत मुगल प्रदेश जिंकणे शिवाजी महाराजांना परवडणारे नव्हते. त्यामुळे जावळी हा प्रदेश अनुकूल होता. या दुर्गम प्रदेशाच्या सहाय्याने भविष्यात आदिलशाही व मुगल या दोन्ही सत्तांशी लढणे सोपे जाणार असल्याने जावळी हा प्रदेश राज्यवृद्धीस अनुकूल असा होता.

### ६) राजकीय अनुकूलता :

जावळीचा प्रदेश जिंकण्यास तत्कालीन राजकीय स्थिती अत्यंत अनुकूल होती. विजापूरात आदिलशाह हा अत्यंत आजारी असल्याने दरबाराची सर्व सूत्रे बडी साहिबा हिच्या हाती होती. त्याचवेळी विजापूर दरबारात कटकारस्थाने सुरू होती. आदिलशाही दरबाराचे लक्ष शिवाजी महाराजांच्या कारवायाकडे जाणे शक्य नव्हते. शिवाय वाई प्रांताचा सुभेदार अफजलखान हा १६५५ मध्ये कर्नाटकातील मोहिमेवर गेला होता. जावळीवर या काळात आदिलशाहीची नजर नव्हती. तर औरंगजेबाची नजर दिल्लीकडे होती. जावळी जिंकणे शिवाजी महाराजांना सहज शक्य होते.

### ३) जावळीचा ताबा :

स्वराज्य हे ध्येय साध्य करण्यासाठी राज्यवृद्धी करणे क्रमप्राप्त असल्याने जावळीवर ताबा मिळवणे आवश्यक बनले होते. चंद्रराव मोरेंना शिवाजी महाराजांनी समजावून सांगण्यासाठी निरोप पाठवला होता. 'तुम्ही आपणास राजे म्हणवता ते व्यर्थ आहे. आम्ही खरे राजे आहोत. श्री शंभूने आम्हास राज्य दिले आहे. आमच्या अंकित व्हावे.' या निरोपास मोरेनी अत्यंत उद्धटपणे उत्तर दिले होते. 'तुम्ही कालचे राजे जाहला, तुम्हास राज्य कोण्ही दिधले'. या नंतर परत शिवाजी महाराजांनी निरोप पाठविला की, 'बदफैली कराल तर प्राणास मुकाल' मोरेनी पुन्हा त्याच प्रकारे उत्तर दिले की 'जावळीस् येणार असाल तर जरूर यावे दारूगोळा मौजूद आहे'. अशा प्रकारे एकमेकाला जरब देण्याचा प्रकार झाला. याबाबत सभासद म्हणतो, 'चंद्रराव मोरे यास मारल्याच्या विरहित राज्य साधत नाही.'

शिवाजी महाराजांनी संभाजी कावजी व रघुनाथ बल्लाळ सबनीस यांचे सोबत मावळ प्रांतातील काही देशमुख जावळीवर आक्रमण करण्यासाठी पाठविले व १५ दिवसांनी जावळी ताब्यात आली. चंद्रराव मोरे आपल्या दोन मुलासह रायरीस (रायगड) पळून गेला. जावळीची व्यवस्था लावल्यावर शिवाजी महाराजांनी रायरीस वेढा दिला. तीन महिन्यानंतर चंद्रराव शरण आला, त्यानंतर त्यास ठार मारले. त्याची दोन मुले बाजी व कृष्णाजी यांना जीवदान दिले पण त्यानीही बदफैली केली म्हणून त्यांनाही ठार केले. अशा प्रकारे १६५६ मध्ये जावळी ताब्यात आली.

**४) जावळी विजयाचे महत्त्व :**

**१) स्वराज्याची पहिली मोठी मोहीम :**

स्वराज्य निर्मितीमध्ये जावळी विजयास महत्त्वाचे स्थान आहे. ही मोहीम म्हणजे स्वराज्य निर्मितीमधील पहिली मोठी मोहीम होती. त्याचा परिणाम म्हणून एक छोट्या जहागिरीचे रूपांतर एका राज्यात झाले होते.

**२) आर्थिक संपन्नत्ता :**

या मोहीमेतून स्वराज्य निर्मितीस लागणारा पैसा मोठ्या प्रमाणावर मिळाला. मोरे घराण्याची आर्थिक स्थिती भक्कम होती, तो खजिना शिवाजी महाराजांच्या हाती आला. त्याच्या जोरावर नवे किल्ले, लष्कर व आरमार याची उभारणी करता आली.

**३) लष्करवृद्धी :**

जावळीच्या विजयानंतर मोरेंचे सैनिक हे स्वराज्याचे सैनिक बनले. मोरेंचे सुमारे १२ हजार सैनिक स्वराज्याच्या कार्यात गुंतले. मुरारबाजी सारखा योद्धा याच प्रांतातून मिळाला. त्यामुळे लष्कराची वाढ दुप्पट झाली.

**४) जावळी भविष्य काळातील महत्त्वाचे स्थान ठरले :**

जावळीचा प्रदेश दुर्गम असल्याने येथील भागाची दोन गोष्टीत मदत झाली. एक म्हणजे याच भागातून काटक व शूर लष्कराची भरती झाली आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे या प्रदेशाच्या जोरावर अफझलखानाला नामोहरण करणे शक्य झाले.

**५) किल्ल्यांची प्राप्ती :**

स्वराज्य निर्माण करताना डोंगरी किल्ले हा महत्त्वाचा भाग होता. असे किल्ले स्वराज्यात असणे गरजेचे होते. या विजयाने रायगड, चंद्रगड, मकरंदगड, सोनगड शिवाय महत्त्वाचा किल्ला म्हणजे रायरी (राजगड) हाही किल्ला ताब्यात आला व पुढे प्रतापगड सारखा किल्ला बांधता आला.

### ६) सागरी सत्ता व शिवाजी महाराज :

या विजयाने शिवाजी महाराजांच्या राज्याच्या सीमा सागरास जाऊन भिडल्या. सागरावर यावेळी पोर्तुगीज, इंग्रज व सिद्धी यांची सत्ता होती. शिवाजी महाराजांनी त्याची दखल घेऊन स्वराज्यासाठी आरमाराची उभारणी केली.

### ७) आदिलशाही विलग प्रदेश प्राप्त केला :

आदिलशाहीच्या ताब्यात कल्याण व भिवंडी हे प्रदेश होते. जावळी विजयाने कल्याण व भिवंडी आदिलशाहीच्या राज्यापासून विलग झाले. याचा फायदा शिवाजी महाराजांनी घेतला व तो प्रदेश जिंकून घेतला.

### ८) आदिलशाहीला धक्का :

जावळी विजयाने आदिलशाही दरबारास मोठा धक्का बसला. पुढे शिवाजी महराजांच्या बंदोबस्तासाठी त्यांना अफजलखान या सरदाराची नियुक्ती करावी लागली.

## ब) अफजलखान प्रकरण

स्वराज्य निर्मितीच्या काळात शिवाजी महाराजांवर जे अनेक कठीण प्रसंग बेतले होते, त्यातील एक महत्त्वाचा प्रसंग म्हणजे अफजलखानाची भेट होय. सन १६५६ मध्ये शिवाजी महाराजांनी जावळी जिंकून घेतली. वाई पासून साताऱ्यापर्यंत आणि माहुलीपासून महाड तसेच कल्याण व भिवंडी हे प्रदेश ताब्यात घेतले. जावळीनंतर आदिलशाहीच्या प्रदेशाचा बराच भाग जिंकून घेतला होता, याची गंभीर दखल आदिलशाही दरबाराने घेतली. आदिलशाही दरबार यावेळी मोठ्या संकटातून जात होता. मुहंम्मद आदिलशाहाचा मृत्यू झाला असल्याने बडी बेगम साहिबाच्या हाती सर्व सत्ता गेली होती. तिने आपल्या मर्जीतील मुहंम्मद आदिलशाहाच्या अनौरस पुत्राला बादशहा बनविले होते. याचा राग दरबारातील अनेक सरदारांना होता. त्यामुळे विरोध करणाऱ्या अनेक सरदारांना तिने ठार केले. एकूण दरबारात कटकारस्थाने यांना ऊत येऊन बजबजपुरी माजली होती. दुसरीकडे मुगली सत्तेने आदिलशाही विरूद्ध मोहीम काढली होती पण औरंगजेब दिल्लीकडे गेल्याने ते संकट टळले होते. यामुळे थोडी स्थिरता लाभली असल्याने शिवाजी महाराजांच्या कारवायांवर लक्ष केंद्रीत झाले आणि त्यांच्या पारिपत्यासाठी १६५९ मध्ये अफजलखान या सरदाराची नेमणूक केली गेली.

### १) अफजलखानाचे पूर्वचरित्र :

अफजलखान हा विजापूर दरबारातील एक अनुभवी सरदार होता. त्याला मुलकी व सैनिकी या दोन्ही व्यवस्थेचा अनुभव होता. १६३८-३९ या काळात तो रणदुल्लाखान याचा विश्वासू नोकर होता.

कर्नाटकातील स्वारीत शहाजीराजांच्या बरोबरीने त्याने भाग घेतला होता. शिरे, बसवपट्टण, बेल्लूर, टूमकूर व जिंजी या लढाईत त्याने भाग घेतला होता. १६४९-५५ या काळात त्याने वाई प्रांताचा सुभेदार म्हणून काम पाहिले होते. या भागातील काही देशमुख, देशपांडे यांच्याशी त्याचा चांगलाच परिचय होता, याच बरोबर तो कपट कारस्थान करण्यातही पटाईत होता. शिऱ्याचा सुभेदार कस्तुरिरंगा याला त्याने विश्वासघाताने ठार मारले होते.

## २) भोसले घराण्याशी वैर :

अफजलखान व शहाजीराजे यांनी एकत्र लढाया केल्या असल्या तरी त्यांच्यामध्ये शत्रुत्वाची भावना होती. अफजलखान हा शहाजीराजेंच्या विरोधात होता. शहाजीराजेंचा त्यांच्या पराक्रमाने होत असलेला उत्कर्ष हा अफजलखानास खुपणारा होता. १६४८ साली मुस्तफाखान याने शहाजीराजेंना अटक केली तेंव्हा शहाजीच्या हातात बेड्या घालून त्यानेच विजापूरातून मिरवणूक काढली होती. अफजलखानाच्या कामातील कुचराईमुळे कनकगिरीच्या युद्धात शहाजीराजेंचा मोठा मुलगा संभाजी मारला गेला होता. अशी मानसिकता असणारा अफजलखान हा 'शिवाजीस चढे घोड्यानिशी जिवंत कैद करून आणतो' अशी प्रतिज्ञा करून स्वराज्यात आला होता.

## ३) अफजलखानाच्या स्वारीचे हेतू :

अफजलखानाच्या स्वारीचा उद्देश स्पष्ट करणारी तत्कालीन काही साधने उपलब्ध आहेत. त्यावरून शिवाजी महाराजांना पकडणे की ठार मारणे याची अधिक स्पष्टता होते. राजापूर येथील इंग्रज अधिकारी रेव्हिंग्टन म्हणतो की, शिवाजीवर बडी साहिबाने १० हजार घोडदळ व पायदळ देऊन पाठविले. एवढ्या सैनिकांनिशी लढा देणे अशक्य असल्याने तिने शत्रूशी मित्रत्वाचा बहाणा करण्यास सांगितले. यातून दोन उद्देश स्पष्ट होतात. एक म्हणजे लढाई करावी अन्यथा मैत्री करून त्यांचा नाश करावा. आदिलशाही दरबारातील तावरीखकार सय्यद नुरूल्ला तारीख-ई-अली आदिलशाही यामध्ये लिहितो, सुलतानाने अफजलखानास सांगितले की शिवाजीला निपटून काढले पाहिजे. तो शरण येण्याचे ढोंग करेल, पण त्याच्यावर विश्वास ठेवू नका.

## ४) खानाची लष्करी व्यवस्था :

अफजलखान हा एक मोठी प्रतिज्ञा करून आला असल्याने कामगिरी फत्ते होण्यासाठी त्याने आपली लष्करी व्यवस्था चोख ठेवली होती. सोबत येताना निवडक १२ हजार घोडदळ व पायदळ आणले होते. शिवाय सोबत अंबरखान, याकूतखान, मुसेखान पठाण, हसनखान, रणदुल्ला (दुसरा), त्यांच्या बरोबर काही नामांकित मराठा सरदार, ज्यामध्ये घोरपडे, पांढरे, भोसले, जाधव व घाटगे होतो. तसेच वाटेत अनेक आदिलशाहीचे देशमुख मिळाले होते. कॅप्टन मोडक यांच्या म्हणण्यानुसार 'वाई मुक्कामापर्यंत खानाच्या फौजेची संख्या ३४-३५ हजार किंवा त्याहून अधिक असावी.'

**खानाच्या स्वारीचा वृत्तांत :**

**१) खानाचे अत्याचार :**

अफजलखानाने आपली स्वारी १६५९ च्या पावसाळ्यानंतर सुरू केली होती. हिंदू मंदिरे लुटून काही पैसा निर्माण केला. अशा मार्गाने अफजलखान पैसा उभा करून फौजेचा खर्च भागवीत होता. मोहिमेच्या प्रवासात मावळ खोऱ्यातील खंडोजी खोपडे व सुलतानजी जगदाळे हे मराठा देशमुख खानास मिळाले तर जेधे व इतर काही देशमुख मात्र शिवाजी महाराजांच्या बाजूने राहिले.

**२) शिवाजी महाराजांचा निर्णय :**

अफजलखानाची स्वारी हे स्वराज्यावरील एक संकट होते. त्याच्या अत्याचाराने महाराष्ट्र हादरून गेला होता. महाराज यावेळी राजगडावर होते. खानाशी लढा कसा द्यावा याबाबत महाराजांनी आपले सेनानी व मंत्रीगण यांच्याशी चर्चा केली. खानाशी समेट करावा असेही एक मत आले पण त्यास महाराज तयार नव्हते. कारण खान कपटी आहे याची त्यांना कल्पना होती. त्यामुळे समेट केलाच तर खान आपणास जिवंत सोडणार नाही याची खात्री महाराजांना होती. शेवटी त्यांनी खानाशी मुकाबला करण्याचे ठरविले.

**३) रणक्षेत्राची निवड :**

अफजलखानाच्या स्वारीच्या वेळी महाराज राजगडावर होते. खान ज्या दिशेने येत होता तो प्रदेश सपाट मैदानी होता. पुणे भागातील सपाट मैदानावर लढणे हे कठीण असल्याचे महाराज जाणून असल्याने त्यांनी जावळी या दुर्गम प्रदेशाची निवड केली, म्हणजे खानास त्याच्या रणक्षेत्राची निवड करण्याची संधी महाराजांनी त्यास दिली नाही व जावळी प्रदेशातील प्रतापगड येथे आपला मुक्काम केला.

**४) खान वाई मुक्कामी :**

शिवाजी महाराजांना पुणे प्रांतात गाठावे आणि काटा काढावा अशी मानसिकता खानाची होती. पण महाराज प्रतापगडावर गेल्याने हा मनसुबा उधळला गेला. त्यास ही बातमी लागताच त्याने वाईच्या दिशेने प्रवास सुरू केला व आपला हेतू साध्य करण्यासाठी योजना आखू लागला.

**५) निरोपाचे राजकारण (वकिलांच्या भेटी-गाठी) :**

अफजलखान वाई मुक्कामी आल्यानंतर तो शिवाजी महाराजांना भेटीस बोलावून कैद करण्याची योजना आखू लागला. त्या मनसुब्यास मूर्त स्वरूप देण्यासाठी वकील कृष्णाजी भास्कर याची निवड

केली व त्याजकडून निरोप धाडला. 'तुमते वडील शहाजी व आमचा जुना स्नेह आहे. तुम्ही आम्हांस परके नाही. पुंडपणा न करता बादशहाच्या आज्ञेने चालाल तर तुम्हाला तुमच्याकडे आहे त्यापेक्षा जास्त सरंजाम मिळून देवू. काहीही अंदेश न धरता आम्हास येऊन भेटावे.' महाराजांनी कृष्णाजी भास्कर बरोबर आपला वकील पंताजी गोपीनाथ यास पाठवून निरोप धाडला. 'आपल्या पराक्रमापुढे आमचा काय पाड आहे ? आम्हास एवढी दया दाखविली हेच विशेष आहे. आम्ही भेट अवश्य घेऊ आपण जावळीला यावे'. यावेळी वकील पंताजी यांनी असेही खानास सांगितले की शिवाजी राजे आपल्या भेटीस येण्यास घाबरत आहेत. हेतू हा की खानाचा हेतू जाणून घ्यावा. पंताजीने ही कामगिरी चोख बजाविली. शिवाजी महाराज आपल्यास घाबरत असल्याच्या बातमीने खान उतावळा झाला आणि त्याने जावळीस येण्याचे मान्य केले.

### ६) खान जावळी खोऱ्यात :

शिवाजी महाराज आणि अफजलखान यांच्यातील निरोपाचे राजकारण रंगत होते. यामध्ये शिवाजी महाराजांचा मनसुबा सफल झाला आणि खानास जावळी खोऱ्यात येण्यास भाग पडले. खानाने दहा ते बारा हजाराची फौज घेऊन रणतोंडीचा घाट पार करून कोयना नदीच्या काठावरील पार या ठिकाणी मुक्काम केला. शिवाजी महाराजांनी पुन्हा त्यास निरोप धाडला की, छावणीत येऊन भेटण्याची भिती वाटते तेंव्हा छावणीतून दूर प्रतापगडाच्या पायथ्याशी यावे याही निरोपास खान तयार झाला. प्रतापगडाच्या पायथ्याशी शामियानात आपल्या बरोबर १० सैनिक आणावेत पण ते शामियानापासून बाणाच्या अंतरावर ठेवावे. दोन अंगरक्षक, एक खासबारदार व वकिल आणावेत असे ठरविण्यात आले.

### ७) महाराजांची तयारी :

शिवाजी महाराजांना खानाचा हेतू व त्याचे पूर्वचरित्र माहीत असल्याने त्यांनी राज्यात इतर भागात जुजबी सैन्य ठेवून बाकीचे सैन्य जावळी परिसरात पसरविले. नेताजी पालकर यांना रणतोंडी घाटावर तर मोरोपंत पिंगळे यांना पार घाटावर सैन्यासह ठेवले. जंगलातील लहान वाटा बंद करून एकच मार्ग खुला केला. छावणी परिसरातही सैन्याच्या तुकड्या लपविल्या. त्यांनी सांकेतिक इशारा मिळताच कामगिरी पार पाडण्याच्या सूचना दिल्या होत्या.

### ८) खानाची भेट व वध :

नियोजनाप्रमाणे अफजलखान शिवाजी महाराजांच्या भेटीस निघाला. सोबत १५०० सैनिक होते. पण पंताजीने एवढ्या सैनिकास शिवाजी घाबरतील असे खानास सांगितले म्हणून ठरलेले सैनिकच घ्यावे असे सांगितले. खान १० सैनिक, दोन अंगरक्षक, एक खासबारदार (सय्यद बंडा) वकिल कृष्णाजी भास्कर यांच्यासह शामियानात आला. बाणाच्या अंतरावर १० सैनिक व पालखीचे भोई ठेवले. अंगरक्षक सदरेबाजूस तर सदरेवर खान, कृष्णाजी भास्कर व सय्यद बंडा उभे होते. सभासदाने या भेट प्रसंगाचे वर्णन केले आहे.

'खासा राजियांनी स्नानी करून भोजन केले. जरीची कुडती घातली, डोईस मंदिल बांधले. त्यात तोडा बांधला. पायात चोळणा घालून कास कसली. एक बिचवा, वाघनखे चढविले आणि बरोबर जिव्हा महाला म्हणून मरदाना होता. त्याच्याजवळ एक पट्टा व फिरंग व ढाल असे दोघे मरदानी आपणा बरोबर भेटिस घेतले वरकड आसपास धारकरी (तलवार, बाण) जागो-जागी उभे केले आणि राजे यांनी सिद्ध होऊन (ते) गडाखाली भेटिस यावयास उतरले.'

गडावरून महाराज येत असताना त्यांना सय्यद बंडा हा खानासोबत आहे हे कळाले. त्यावेळी त्यांनी निरोप पाठवून आपणास सय्यद बंडाची भिती वाटते त्यास शामियानापासून दूर करण्यास सांगितले. या शिवाजी राजांच्या राजकारणाची कल्पना खानास नव्हती. त्यामुळे एकप्रकारे त्याची घमेंड वाढली व सय्यद बंडा दूर झाला. त्यामुळे सदरेवर कृष्णाजी भास्कर व खान हे दोघेच उरले. शिवाजी महाराज गडावरून उतरून आले. सोबत खासबारदार तानाजी मालुसरे, अंगरक्षक जिऊ महाला व संभाजी कावजी असे १० सैनिक बाणाच्या अंतरावर उभे होते. तानाजी मालुसरेलाही सय्यद बंडा प्रमाणे दूर केले. दोन अंगरक्षकासह महाराज सदरेवर आले. सदरेखाली अंगरक्षकांना उभे केले. महाराजांना विश्वास वाटावा म्हणून खानाने आपली तलवार कृष्णाजी भास्करकडे दिली. महाराजांनीही तसेच केले. दोघांकडे एक-एक बिचवा (लहान तलवार) व महाराजांच्या डाव्या हातात वाघनखे होते.

रिवाजाप्रमाणे आलिंगण देण्यासाठी खान पुढे आला. महाराजांनी त्यास जवळ घेतले. खानाने महाराजांची मान डाव्या बगलेत दाबून बिचवा महाराजांच्या पोटात मारला पण चिलखत असल्याने इजा झाली नाही. खानाची कृती महाराजांच्या लक्षात आली. प्रसंगावधानाने महाराजांनी वाघनखे खानाच्या पोटात खुपसली व खानाचा कोथळा बाहेर काढला. खानाची पकड ढिली पडली तसा तो दगा-दगा म्हणून ओरडू लागला. तसे महाराजांनी त्यावर दोन वार केले व सदरेखाली उडी मारली. खानाचे अंगरक्षक व सय्यद बंडा शिवाजीवर धावून आले. शिवाजींनी जिऊ महालाकडून पट्टा घेतला व सय्यद बंडाचे चार वार तटविले. पाचवा जबरदस्त वार महाराजांवर करणार इतक्यात जिऊ महालाने सय्यद बंडाचा हात वरचेवर उडविला. या झटापटीत खानाचे अंगरक्षक व कृष्णाजी भास्कर मारले गेले. खानाच्या पालखीच्या भोयांनी खानास पळविण्याचा प्रयत्न करत असतानाच संभाजी कावजीने भोयांचे पाय तोडले. खानाचे शिर धडावेगळे करून महाराजांजवळ आणले व ताबडतोब वेळ न दवडता महाराज गडावर आले.

### ९) खानाचे सैन्य पराभूत :

खानाबरोबर आलेल्या सैन्यासह खान मारला गेला व भोईही जखमी झाल्याने खान मारला गेल्याची खबर त्याच्या फौजेला नव्हती. महाराज गडावर पोहचताच सांकेतिक खुणेच्या तोफा उडविल्या तेव्हा दबा धरून बसलेल्या मराठा सैनिकांनी पार मुक्कामावर असलेल्या खानाच्या फौजेवर हला चढविला. कान्होजी जेधे, आप्पाजी पंत, त्रिंबक भास्कर यांनी खानाच्या फौजेची वाताहत केली. वाई येथील खानाच्या फौजेवर नेताजी पालकरने हल्ला केला. बेसावध असलेले खानाचे सैन्य भयभीत झाले व पळू लागले. त्यामध्ये अनेकजण मारले गेले. अनेकांना पाठलाग करून मारले गेले. मुसेखान, याकुतखान,

हसनखान, अंकुशखान, खानाचा मुलगा फाजलखान हे प्रतापराव मोरेच्या सहाय्याने पळाले. अंबरखान, खानाचे दोन पुत्र, रूस्तुमझमान, लंबाजी भोसले, झुंझार घाटगे इ. कैद झाले. यामध्ये काही सरदारही मारले गेले. एकूण खानाच्या सैन्याची दाणादाण उडाली.

**१०) युद्धोत्तर सन्मान, फित्तुरांना शासन :**

अफजलखान भेटीच्या या प्रसंगामध्ये जे युद्ध झाले त्यामध्ये अनेक लोक जखमी झाले त्यांच्या औषधपाण्याची सोय केली तसेच युद्धात कामी आलेल्या सैनिकांच्या मुलांना लष्करात सामावून घेतले. जखमींना १०० ते २०० होनापर्यंत मदत केली तर सेनापती, सेनाधिकारी यांचा बक्षिसे देऊन उचित सन्मान केला. सुलतानजी जगदाळे या फितूरास ठार केले तर खंडोजी खोपडेचा उजवा हात व डावा पाय तोडण्यात आला.

**विजयाची कारणमिमांसा :**

**१) शिवाजी महाराजांची उपस्थिती :**

शिवाजी महाराज स्वत: या रणांगणात सक्रिय असल्याने व त्यांनी आपला जीव धोक्यात घालून खानास गारद केल्याने सैनिकामध्ये उत्साह वाढला. यामुळेच हा विजय प्राप्त होऊ शकला.

**२) हिंदवी स्वराज्याची भूमिका :**

या लढ्यामागे हिंदवी स्वराज्याची कल्पना मोठी होती. ऐतद्देशीय लोकांचे राज्य हा हिंदवी स्वराज्याचा मूळ गाभा असल्याने सहकारी सैनिकात ही भूमिका उतरविली गेली. त्यामुळे हा विजय प्राप्त करता आला.

**३) खानाकडून धर्मयुद्धाचे स्वरूप :**

अफजलखानाने या लढ्यास धर्मयुद्धाचे स्वरूप दिले. तो मूर्तिभंजक प्रवृत्तीचा असल्याने त्याने मोहिमेच्या मार्गात आलेली अनेक हिंदू मंदिरे व तीर्थ क्षेत्राची विटंबना करणे हे प्रकार केले. त्यामुळे लोकांच्या भावना दुखावल्या व त्याचा परिणाम सैन्यावर झाला होता.

**४) रणक्षेत्राची निवड :**

रणक्षेत्राची निवड करणाऱ्या सेनानीस युद्ध जिंकण्याची संधी अधिक असते व ते रणक्षेत्र आपल्या व आपल्या सैन्याच्या सोयीचे तसेच शत्रुला त्रासदायक ठरावे अशी भूमिका काहींच बुद्धिवंत सेनानीकडे असते. शिवाजी महाराज त्यातील एक होते. त्यामुळे घमेंडखोर व फाजील आत्मविश्वास बाळगणाऱ्या खानास ही संधी मिळाली नाही किंबहुना त्याकडे त्याचे फारसे लक्ष गेले नाही. त्याचा परिणाम म्हणून या भेटीची व लढ्याची सूत्रे ही शिवाजी महाराजांकडे राहिली, त्यामुळे आपल्याला सोयीस्कर असे रणक्षेत्र निवडले व त्याची परिणती शत्रुच्या पराभवात झाली.

### ५) खानाचा फाजील आत्मविश्वास :

शत्रू पक्षास कमी लेखणे अथवा त्यास क: पदार्थ म्हणून पाहणे ही घमेंडखोर प्रवृत्ती खानाकडे होती. त्याचा फायदा शिवाजी महाराजांनी घेतला व नेहमी आपण घाबरत असल्याचे निरोप त्यास पाठविले. खान अधिकच गाफील राहिला. रणक्षेत्र कोणते, त्याचे परिणाम आपल्या बाजूने काय होतील किंवा सैन्याची लढण्याची सवय या कोणत्याही गोष्टी त्याने नगण्य मानल्या असाव्यात हा फाजील आत्मविश्वासाचा नमुना होता. याचा परिणाम म्हणून त्यास प्राणास मुकावे लागले.

### ६) महाराजांची सावधगिरी :

शिवाजी महाराजांना खानाचा पूर्वइतिहास माहीत असल्याने त्यांनी त्या खानास गाफिल तर ठेवलेच पण प्रसंगावधान राखून भेटीपूर्वीची व्यवस्था आपल्या बाजूने करून घेतली, तर प्रत्यक्षभेटीतही त्यांनी त्याच्यावरच डाव उलटवला.

## अफजलखानावरील विजयाचे महत्त्व :

### १) महाराजांची प्रतिष्ठा वाढली :

अफजलखानासारख्या सरदाराचे संकट मोठ्या युक्तीने व शक्तीने शिवाजी महाराजांनी संपविले हा त्यांच्या बुद्धिचातुर्याचा व मुत्सद्देगिरीचा नमुना होता. त्याचप्रमाणे कुशल सेनानीत्वाचे गुण सर्वांपुढे आले. स्वराज्यात व स्वराज्याबाहेरही महाराजांची प्रतिष्ठा वाढली.

### २) आत्मविश्वास वाढला :

खानावरील विजयामुळे हिंदवी स्वराज्यांतर्गत सामान्य माणसे, सैनिक व खुद्द शिवाजी महाराजांचा आत्मविश्वास वाढला. परकीय विजयी ठरू शकतात अशी मानसिकता अनेक काळ या समाजात होती ती नाहीशी झाली व आत्मविश्वास व आत्मसन्मान वाढला.

### ३) मराठी राज्याची स्थापना :

खानाच्या भेटीच्या व त्याच्या पराभवाच्या घटनेबाबत प्रसिद्ध इतिहासकार सेतु माधवराव पगडी म्हणतात, 'महाराष्ट्राचे राज्य खऱ्या अर्थाने अस्तित्वात आले. कारण खऱ्या अर्थाने स्वराज्याची स्थापना यावेळी झाली होती.'

### ४) राज्यविस्तार वाढला :

खानाच्या वधानंतर विजापूरी दरबार हतबल झाला याचा फायदा शिवाजी महाराजांनी घेतला व वाई, खटाव, मायणी, वाळवे, कराड, कोल्हापूर पर्यंतचा प्रदेश व पन्हाळा व विशाळगड हे किल्ले त्यांनी मिळविले.

## ५) आदिलशाही हतबल :

खानाच्या वधाने आदिलशाही हतबल झाली. त्यानंतर सिद्धी जोहर व रूस्तुमझमान याला पाठविले; त्यांनाही अपयश आले. मुगलांनी या सर्व प्रकरणाची दखल घेऊन स्वराज्यावर हल्ला करण्यासाठी शाहिस्तेखान या सरदारास पाठविले.

## क) पन्हाळगडाचा वेढा :

अफझलखानाचा वध (१० नोव्हेंबर, १६५९) ही शिवचरित्रातील अत्यंत महत्त्वाची घटना मानली जाते; या भयंकर प्रकरणात शिवाजी महाराज सहीसलामत वाचले. अफजलखानाच्या वधानंतर महाराजांनी आदिलशाही प्रदेशातील महत्त्वाची ठाणी व किल्ले ताब्यात घेतले. २८ नोव्हेंबर १६५९ रोजी पन्हाळा ताब्यात घेतल्याने आदिलशाहीची नामुष्की झाली. या प्रदेशातून कोकणात जाण्याच्या मार्गाची नाकेबंदी होऊ शकत होती. आदिलशाहाने महाराजांवर चढाईसाठी रूस्तुमझमान व अफजलखानाचा पुत्र फाजलखान यास पाठविले. पन्हाळगडाच्या पायथ्यांशी लढाई झाली व या दोहोंचाही पराभव झाला. नेताजी पालकर याने त्यांचा पाठलाग करून बेळगाव, धारवाड पर्यंत वसुली केली. खुद्द शिवाजी महाराज मिरजेपर्यंत चालून गेले. नेताजीने विजापूरच्या उपनगरावर हल्ला चढविला. खुद्द शिवाजी महाराज विजापूरावर हल्ला करेल अशी भीती आदिलशाही दरबारास वाटू लागली, त्यामुळे त्यांनी सिद्धी जोहर यास मोहिमेवर पाठविले.

### १) सिद्दी जोहर :

सिद्दी जोहर हा कर्नुलप्रातांचा सुभेदार होता. त्याने आपणास कामगिरी सोपवावी असे पत्र आदिलशाहास लिहिले होते. तो बंडखोर व स्वतंत्र प्रवृत्तीचा होता. आदिलशाहीसही त्याची गरज असल्याने त्यास या मोहिमेवर पाठविले. 'सलाबतखान' हा किताब देऊन त्यास मोठे सैन्य दिले, ३५ हजार पायदळ व २० हजार घोडदळ असे प्रचंड मोठे सैन्य घेऊन तो कर्नाटकातून निघाला. सोबत रूस्तुमझमान, सादतखान, फाझलखान यांनाही घेतले होते.

### २) पन्हाळगडास वेढा :

शिवाजी महाराज पन्हाळगडावर असल्याने त्याने पन्हाळगडास वेढा दिला. वेढा अधिक दिवस चालला तो उठावा यासाठी नेताजी पालकर यांचे हल्ले सुरू होते, मात्र त्याचा उपयोग झाला नाही. याचवेळी औरंगजेबाने आपला मामा शाहिस्तेखानाची नेमणूक मुघल सुभेदार म्हणून दक्षिणेवर केली. एका बाजूला आदिलशहा व दुसऱ्या बाजूला मुगलांचा सुभेदार शाहिस्तेखान याची दक्षिणेवर नियुक्ती हे प्रकरण गंभीर होते, त्यामुळे अधिक काळ वेढ्यात अडकणे हे महाराजांना सोयीस्कर नव्हते म्हणून त्यांनी सिद्धी जोहरशी राजकारण सुरू केले. सिद्धी जोहरशी राजकारण करताना सर्व प्रदेश व किल्ले आदिलशहाच्या

ताब्यात देण्याचे कबूल केले. इतकेच नव्हे तर गडाच्या पायथ्याशी सिद्धी जोहरची भेट घेतली व किल्ले ताब्यात देण्याचे मान्य असल्याचे सांगितले.

### ३) पन्हाळगडावरून सुटका व बाजी प्रभूंचे बलिदान :

१३ जुलै १६६० रोजी गडाच्या उत्तर बाजूस दिंडी दरवाज्यापासून रात्रीच्या वेळी अंधाराचा फायदा घेऊन कांही निवडक सैन्यासह शिवाजी महाराज विशाळगडाकडे निघाले. याची माहिती कांही वेळाने सिद्दी जोहरला मिळाली, त्याने विशालगडच्या रोखाने सिद्ध मसाऊद आणि फाजलखान यांना पाठलाग करण्यास पाठविले. महाराज गजापूरच्या खिंडीत होते, तेव्हा शत्रू पिछाडीवर होता. बाजीप्रभु व कांही मावळ्यांना खिंड लढविण्याची आज्ञा केली. आपण गडावर पोहोचताच तोफा उडविल्या जातील तेव्हा शत्रूस पुढे येऊ देऊ नका अशी आज्ञा केली. बाजीप्रभुने शत्रूची वाट रोखून धरली, पराक्रमाची शर्थ केली, शेवटी त्यास तोफेचा गोळा लागल्याने तो खाली पडला. अशा जखमी अवस्थेत तो सैनिकांना उत्तेजन देत विशाळगडावरील तोफेच्या आवाजाची प्रतिक्षा करीत होता. तोफा उडताच बाजीप्रभुने प्राण सोडले. मावळ्यांनी लढाई थांबविली व बाजीप्रभुचे प्रेत घेऊन निघून गेले. ही खिंड बाजीप्रभुंच्या हौतात्म्याने पावन झाली म्हणून ती 'पावनखिंड' म्हणून आजही ओळखली जाते.

यानंतर आदिलशाही फौजांनी विशालगडास वेढा दिला पण त्याचा उपयोग झाला नाही. त्यामुळे आदिलशाही सैन्य पुन्हा पन्हाळगडाकडे आले. महाराज मात्र रायगडी गेले. आदिलशहाला मात्र सिद्धी जोहरने शिवाजी महाराजांशी संधान साधल्याचा संशय आला व तो स्वत: महाराजांवरील स्वारीसाठी निघाला. तेंव्हा महाराजांनी रूस्तुम झमानच्या मध्यस्थीने पन्हाळगड आदिलशहास दिला. सिद्धी जोहर मात्र विजापूरी दरबाराच्या नजरेतून उतरला पुढे त्याने विष प्राशन करून आत्महत्या केली.

### स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २

**रिकाम्या जागा भरा.**

१. चंद्रराव मोरे आपल्या मुलांना घेऊन .......... किल्ल्यावर पळून गेला.

अ) रायरी ब) तोरणा क) प्रतापगड ड) शिवनेरी

२. बाजी शामराज या आदिलशाही सरदारास .............. ने आश्रय दिला.

अ) यशवंतराव ब) चंद्रराव क) जयसिंह ड) दौलतराव

३. ........... हा महत्त्वाचा किल्ला जावळी विजयाने स्वराज्यात आला.

अ) जंजिरा ब) भोपालगड क) रायरी ड) शिवनेरी

४. अफजलखान संघर्षात ...... शिवाजी महाराजांचा वकिल होता.

अ) पंताजी गोपीनाथ ब) कृष्णाजी भास्कर

क) काझी हैदर ड) हिरोजी फर्जंत

५. अफजलखान वधानंतर आदिलशाही दरबाराने ........... या सरदारास पन्हाळा घेण्यासाठी पाठविले.

अ) शाहिस्तेखान ब) सिद्धी जोहर क) बहलोलखान ड) जयसिंह

## १.२.३ शाहिस्तेखानाची स्वारी व सूरतेची लूट

### अ) शाहिस्तेखानाची स्वारी :

शिवाजी महाराजांनी अफजलखानाच्या वधानंतर पन्हाळा किल्ला जिंकून घेतला. सिद्दी जोहरने पन्हाळ्याला घातलेला वेढा यशस्वीपणे फोडला, त्यामुळे आदिलशहाने शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्याची मुघलांना विनंती केलेली होती. मुघल बादशहा औरंगजेबाने या सर्व बाबीचा विचार करून शाहिस्तेखानाची दक्षिणेचा सुभेदार म्हणून नेमणूक केली. शाहिस्तेखान मोठ्या सैन्यानिशी दक्षिणेत आला व पुण्यात ठाण मांडून बसला. यावर शिवाजी महाराजांनी छापा घालण्याची योजना हाती घेतली.

### १) शाहिस्तेखानाच्या स्वारीचे हेतू :

सन १६५३ पासून दक्षिण सुभ्यावर मुगलाचा सुभेदार म्हणून शहाजहान बादशहाच्या मुलगा औरंगजेब हा काम पाहत होता. परंतु १६५८ मध्ये शहाजहानच्या आजारीपणाची बातमी येताच तो वारसा हक्कासाठी दिल्लीस रवाना झाला. सर्व भावांना बाजूस काढून वडील शहाजहानला अटकेत टाकले व जुलै १६५९ रोजी औरंगजेबाने स्वत:चा राज्याभिषेक करून घेतला. त्यानंतर राज्यव्यवस्था सुरळीत करण्यासाठी त्याने कांही बदल केले. त्यामध्ये दक्षिण सुभ्यावर शाहिस्तेखान जो औरंगजेबाचा मामा होता त्याच्यावर शिवाजीच्या बंदोबस्ताची मोठी जबाबदारी टाकली. त्याच्या स्वारीचे हेतू पुढील प्रमाणे -

### अ) मराठी सत्तेचा नाश करणे :

दक्षिण सुभ्यावर मुगलांची सत्ता अबाधीत राखायची असेल तर त्यातील सर्वात मोठा शत्रू शिवाजी आहे हे तो जाणून होता. त्यामुळे या मराठी सत्तेचा नाश केल्यास भविष्यात दक्षिणेत राज्य करणे सोपे जाणार होते या उद्देशाने त्याने शाहिस्तेखानास दक्षिणेस पाठविले.

**ब) शिवाजी महाराजांच्या कारवायांना पायबंद घालणे :**

शिवाजी महाराजांचा बोलबाला अफजलखान वधानंतर वाढला होता. शिवाय आदिलशाही शिवाजी महाराजांना पायबंद घालू शकत नाही हे सिद्ध झाले होते. शिवाजी महाराजांच्या कारवायांना आळा घालणे आवश्यक होते. भविष्यात आदिलशाही प्रमाणे तो मुघल प्रदेशावरही हल्ले चढविण्याची शक्यता होती. त्यामुळे वेळीच पायबंद घालण्यासाठी त्याने ही दक्षता घेतली.

**क) आदिलशाहीवर वचक व मदत :**

मुगलांना दक्षिणेत दोन प्रतिस्पर्धी होते, एक आदिलशाही व दुसरे शिवाजी महाराज. यावेळी मुगलांनी आदिलशाहीस मदत करून शिवाजी महाराजांना आळा घालण्याचा मनसुबा आखला. आदिलशाहीवर वचक ठेऊन शिवाजी महाराजांना आळा घालता येणार होता.

**२) शाहिस्तेखानाच्या स्वारीचा वृत्तांत :**

**अ) पुण्याकडे वाटचाल :**

शाहिस्तेखान हा एक अनुभवी सैनानी होता. दक्षिणेच्या राजकारणाची त्याला माहिती होती. औरंगाबाद येथे तो असताना त्याची नेमणुक झाली होती. २८ जानेवारी १६६० रोजी त्याने औरंगाबाद सोडले. स्वत: बरोबर त्याने ७७ हजार घोडेस्वार, ३० हजार पायदळ, ४०० हत्ती, ५ हजार उंट, तोफखाना-शस्त्रे व प्रचंड युद्धसाहित्यासोबत अनेक मुस्लिम, रजपुत सरदार घेऊन १४ दिवसांत तो अहमदनगरला आला. त्यानंतर सोनवडी, सुपे घेऊन बारामतीकडे वळला, पुढे शिरवळला आल्यानंतर मराठ्यांनी त्यांच्यावर काही ठिकाणी हल्ले केले, मात्र परिणाम झाला नाही. खेड शिवापूर लुटून तो सासवडला आला व ९ मे १६६० रोजी पुण्यात दाखल झाला.

**ब) चाकण किल्ला काबीज :**

शाहिस्तेखान पुण्यात येण्यापूर्वीच मराठ्यांनी त्याची अडचण करण्यासाठी तेथील पिके, धान्य, गवत वगैरे गोष्टी संपविल्या होत्या. त्यामुळे रसद मिळविण्यासाठी खानास चाकणपासून अहमदनगर जवळ पडत असल्याने त्याने चाकणकडे जाण्याचा निर्णय घेतला व चाकणला वेढा दिला. (जुन १६६०) १४ ऑगस्ट पर्यंत चाकणचा किल्ला फिरंगोजी नरसाळे या किल्लेदाराने लढविला. शिवाजी महाराज सिद्धी जोहरच्या वेढ्यात पन्हाळ्यास अडकले होते पुढे ते विशाळगडावर कांही दिवस राहून पुढे राजगडावर गेले. शाहिस्तेखानास चाकणचा किल्ला घेताना खूप कष्ट पडले त्यामुळे सिंहगड, पुरंदर यासारखे किल्ले घेताना काय किंमत मोजावी लागेल अशी त्यास चिंता लागली होती. तो पुण्यात आला व तीन वर्षे तेथे तो राहिला. शिवाजी महाराजांनीही शाहिस्तेखानाच्या प्रचंड सामर्थ्याला तोंड कसे द्यायचे याचा विचार केला व आदिलशाहीशी तडजोडी करून पन्हाळा दिला व एका शत्रूला शांत करून शाहिस्तेखानाचा विचार करू लागले.

## क) उत्तर कोकणातील अपयशी स्वाऱ्या :

उत्तर कोकणातील मराठ्यांच्या ताब्यातील प्रदेश ताब्यात घेण्यासाठी शाहिस्तेखानाने सलाबत दख्खणी या सरदारास पाठविले, त्याला अपयश आले म्हणून १६६१ च्या जानेवारीत कारतलबखान याच्या नेतृत्वाखाली ३० हजार फौजे सोबत रजपुत सरदार, माहूरच्या जहागिरदाराची पत्नी 'रायबागीण' यांना पाठविले. पुण्यातून आलेल्या कारतलबखानास उंबर खिंडीत नेताजी पालकराने गाठले. कारतलबखानास या प्रदेशाची माहिती नव्हती. गनिमी काव्याच्या हल्ल्याने हे सैन्य हैराण झाले. प्यायला पाणी सुद्धा मिळेना. शेवटी कारतलबखानाने शरणागती पत्करली व पुण्यास परतला. शिवाजी महाराज स्वत: कोकणात उतरले व सिद्धी जोहरच्या वेढ्यात मदत करणाऱ्या मालवणच्या जसवंतराव दळवीचे राज्य व शृंगारपूरच्या सुर्यराव सुर्वेचे राज्य जिंकून घेतले. राजापूरची इंग्रजी वखार लुटली. त्यानंतर कल्याण भिवंडीवर चाल करून आलेल्या नामदारखानाचाही पराभव केला.

## ३) शाहिस्तेखानावर छापा (५ एप्रिल १६६३) :

मुघल सैन्यावर मराठ्यांचे हल्ले जरी चालू असले तरी शाहिस्तेखान पुण्यातून हालत नव्हता. त्याच्या लुटीला व त्रासाला जनता वैतागली होती. मराठा वतनदारही भित असल्याने खानाच्या बाजूस जात होते. म्हणूनच रात्रीचा छापा टाकण्याची योजना आखली. गुप्तहेरांच्या मार्फत खानाच्या छावणीची व वास्तवाची सर्व माहिती मिळवली. खानाच्या महालाभोवती पहारा होता. सिंहगडच्या वाटेवर जसवंतसिंह फौजेनिशी होता, तरीही ही मोहिम फत्ते करण्याचा निर्णय महाराजांनी घेतला.

आपल्याबरोबर ४०० सैन्य व बाबजी व चिमाजी मुदगल यांना सोबत घेतले. नेताजी व मोरोपंत यांचेकडे प्रत्येकी १ हजाराची फौज दिली व ५ एप्रिल १६६३ रोजी सिंहगडाहून पुण्याकडे प्रयाण केले. वाटेत भेटणाऱ्या मुघल सैन्यास आपण दक्षिणी सैन्य आहोत असे सांगत मध्यरात्री खानाच्या निवासाजवळ पोहोचले. हा दिवस रमजानचा उपवास असल्याने जेवण करून ही सर्व मंडळी झोपली होती. स्वयंपाकी मात्र स्वयंपाक घरात मग्न होते. स्वयंपाक घराशेजारी खानाचा जनानखाना होता. स्वयंपाक घर व जनानखान्यातील भिंतीचे दार विटा मातींनी बंद केले होते. मराठ्यांनी ते फोडण्यास सुरूवात केली. त्या आवाजाने कांही लोक जागे झाले. दरम्यान मराठ्यांनी नगारखाण्याकडे मोर्चा वळविला व कापाकापी सुरू झाली व स्वत:च मोठ्याने नगारे वाजवू लागले. तो आठवडा औरंगजेबाच्या जन्मोत्सवाचा असल्याने तसे वाजविने नित्याची गोष्ट होती. त्याचा फायदा मराठ्यांनी घेतला. भिंतीला भगदाड पाडून महाराज जनानखान्यात शिरले. आरडा ओरड सुरू झाली. खान शस्त्राला हात घालणार तेवढ्यात महाराज तिथे पोहोचले व खानावर वार केला. तो वार त्याने चुकविला पण त्याची बोटे तुटली. बेगमांनी दिवे विझविले व त्यास लपविले. अंधारात कोण स्त्री कोण पुरूष हे कळेना. एवढ्यात बाबजी २०० मावळ्यासह महालाच्या पुढील दरवाज्यातून पहारेकऱ्यांना कापत आत शिरला. या गोंधळात खानाचा मुलगा, जावई

व अनेक स्त्रिया मारल्या गेल्या. तेवढ्यात शिवाजी महाराज तेथून बाहेर पडले व सिंहगडावर पोहोचले. शेवटी ८ एप्रिलला खानाने आपली मोहीम आटोपती घेतली. आपल्या अपयशाचे खापर जसवंतसिंहावर फोडले. जसवंतसिंहाने सिंहगडाला वेढा दिला तोही त्याला उठवावा लागला. शेवटी औरंगजेब बादशहाने शाहिस्तेखानाची नेमणुक बंगाल सुभ्यावर केली.

## ४) विजयाची कारणमीमांसा :

शाहिस्तेखान १ लाख फौज घेऊन ३ वर्षे स्वराज्यात राहून धुमाकूळ घालत होता. त्यामुळे रयत त्रस्त झालेली होती. यावर शिवाजी महाराजांनी त्यावर छाप्याची योजना आखली व ती मोहीम यशस्वी केली त्या विजयाची कारणमीमांसा पुढीलप्रमाणे -

### १) आदिलशाहीशी राजकारण :

शिवाजी महाराजांपुढे दोन संकटे एकदम आली होती. पहिले सिद्धी जोहरचा वेढा तर दुसरे शाहिस्तेखानाची स्वारी. पन्हाळा वेढ्यातून निसटले तरी महाराजांवर आदिलशाही फौज चाल करून येत होती. त्यामुळे आदिलशाहीशी राजकारण करून पन्हाळा त्यांच्या ताब्यात देऊन एका संकटास थोपविले. त्यामुळे दुसरा शत्रू शाहिस्तेखान यांच्याशी लढताना अडचण आली नाही.

### २) जसवंतसिंहाशी राजकारण :

शाहिस्तेखानाने जसवंतसिंहाला १० हजार फौजेनिशी पुणे येथे सिंहगड मार्गावर ठेवले होते. महाराजांना ही एक मोठी अडचण होती. त्यामुळे महाराजांनी या जसवंतसिंहास आपल्याकडे वळविले. हा जसवंतसिंह शिवाजीला वश होण्याचे कारण म्हणजे मुघलाच्या वारसायुद्धात तो दाराशुकोह याच्या बाजूचा होता. त्यामुळे औरंगजेबाचे व त्याचे पटणे शक्य नव्हते. याचा फायदा महाराजांनी घेतला.

### ३) अतिकार्यक्षम हेर यंत्रणा :

शिवाजी महाराजांची  गुप्तहेर संघटना अत्यंत कार्यक्षम होती. त्याद्वारे त्यांनी महालाची सर्व माहिती मिळविली होती. खानाच्या शयनकक्षाची वगैरे माहिती अगोदरच मिळविल्याने त्यावर हल्ला करणे सोपे झाले होते.

### ४) चातुर्य व धाडसी गुण :

अत्यंत कडेकोट पहारा व त्या बाबी भेदून जाणे व खानावर हल्ला करणे ही साधी गोष्ट नव्हती. पण महाराजांचे धाडस व बुद्धिचातुर्य हे सर्वसामान्य माणसापेक्षा अधिक होते. त्यांच्या चपळाईने या गोष्टी ते साध्य करू शकले.

**ब) सुरतेची स्वारी (लुट) - १६६४**

शाहिस्तेखानावरील मोहीम फत्ते झाल्यानंतर शिवाजी महाराज दक्षिण कोकणात आले व लखम सावंताकडील कुडाळचा प्रदेश घेतला. त्यानंतर लगेच अतिशय सधन सुरत शहराची लुट केली. ९ महिन्यानंतर पुन्हा दुसऱ्यांदा सुरत लुटली.

**अ) सुरत स्वारीचा हेतू :**

**१) शाहिस्तेखानाच्या स्वारीचा सूड :**

१६६० पासून शाहिस्तेखानाच्या स्वारीने स्वराज्याची मोठी हानी झाली होती. जाळपोळ व लुटालुट केल्याने स्वराज्याची मोठ्या प्रमाणावर हानी झाली होती. त्याचा सूड घेण्यासाठी या सधन शहराची लुट केली.

**२) सुरत एक सधन शहर :**

पश्चिम किनाऱ्यावरील अत्यंत सधन शहर म्हणून सुरतेची ओळख होती. अरब-युरोपिय देशांशी या शहराचा व्यापार चालला होता. मुघलांना या शहरातून वर्षाला १२ लाख रूपयाची जकात मिळत होती. या शहरात सधन व्यापारी येत असत, असे शहर लुटले तर मुघलांच्या स्वारीने स्वराज्याची झालेली हानी भरून निघणार होती, म्हणून या शहराची निवड केली.

**३) असुरक्षित सुरत :**

सुरत एक सधन शहर असतानाही त्याच्या सुरक्षेची काळजी घेतली नव्हती. शहराच्या तटबंद्या पडल्या होत्या. खंदक मातीने भरले होते. त्यात तेथील अंमलदार इनायतखान हा अत्यंत भ्रष्ट होता. प्रत्यक्षात फौज नसतानाही ५०० फौजेचा हिशोब दाखवून तो पैसा लुटत होता. स्वराज्याच्या हेरांनी ही बातमी काढली होती. म्हणून सुरत लुटण्यास अनुकूल वातावरण होते.

**४) सामर्थ्याची जाणीव करून देणे :**

शाहिस्तेखानाची फजिती करून सामर्थ्याची जाणीव मुघलांना करून देण्यासाठी ही मोहीम आखली. शिवाय सुरत हे सधन शहर मुघल साम्राज्याच्या शेकडो मैल दूर होते. ती लुटण्याने बादशहाला मोठे आव्हान दिले जाणर होते. बादशहाची नाचक्की होणार होती. यासाठी ही मोहीम आखली होती.

**ब) स्वारीची पुर्वतयारी**

सुरतेच्या मोहीमेला जाण्याची एक वर्ष अगोदर तयारी केली होती. यासाठी त्यांनी आपली फौज नाशिकात पाठवून दिली. शिवाजीराजांनी आपल्या हेर यंत्रणेकडून सुरतेची सुरक्षा व्यवस्था, व्यापार, श्रीमंत व्यापारी, त्यांचे वाडे याची बारीक-सारिक माहिती गोळा केली होती. मुघलांना या मोहिमेचा संशय येऊ नये यासाठी त्यांना दंडराजापूरी, पेण व नाशिक येथे सैनिकीतळ उभा करून कोकणात सिद्धी

व पोर्तुगिजावर हल्ले करण्याची योजना असल्याचे जाहीर केले. त्यामुळे मुघल बेसावध राहिले. शत्रूला फसवीत ते राजगडातून सुरतेकडे रवाना झाले.

**१) गणदेवीस आगमन :**

नाशिकला गेल्यानंतर औरंगाबादवर हल्ला करण्याचे भासविले. मात्र मराठा सैन्य सुरतेजवळ असलेल्या गणदेवी या ठिकाणी पोहोचले. महाराज सुरत लुटण्यासाठी आले असल्याची बातमी समजताच लोकांमध्ये भीती निर्माण झाली. त्यांनी इनायतखान, इंग्रज व डचांकडे मदत मागितली होती. इनायतखानाने मात्र स्वत: सुरतेच्या किल्ल्यात आश्रय घेतला.

**२) खंडणीची मागणी :**

गणदेवीस मुक्काम असताना शिवाजी महाराजांनी आपला दूत पाठवून इनायतखान व सुरतेमधील श्रीमंत व्यापारी हाजी सय्यद बेग व हाजी कासम यांच्याकडे ५० लाखांची खंडणी मागितली. न दिल्यास सुरत लुटण्याचा इशारा दिला. इनायतखानाने या निरोपास उद्धट उत्तर दिल्याने महाराज स्वत: सुरतेकडे आले. शहराबाहेर एका बागेत ६ जानेवारीस सकाळी ११ वाजता पोहोचले.

**३) सुरतेची बेसुरत :**

सुरतेच्या लुटीचे वर्णन करताना रियासतकार गो. स. सरदेसाई यांनी सुरतेची बेसुरत केली असे म्हटले आहे. खंडणीच्या मागणीला प्रतिसाद मिळत नसल्याने लुटीची आज्ञा केली. ६ जानेवारी ते १० जानेवारी या काळात सुरत लुटून जाळपोळ केली. शेकडो वाड्यांच्या भिंती व जमिनी खणल्या, इनायतखानाने किल्ल्यातून शहरावर तोफांचा मारा केला. त्यामुळे शहरात अनेक घरे नष्ट झाली. एक इंग्रजी पाद्री म्हणतो, ''गुरूवार व शुक्रवार या दोन दिवशी तर शहरात लागलेल्या आगीमुळे रात्र दिवसा सारखी भासू लागली आणि धूराच्या मोठ्या लोटामुळे दिवस रात्री सारखा भासू लागला.'' डच वखारी शेजारील बहर्जी बोहरा याचा वाडा मराठ्यांनी घुसून साफ केला. इथे मराठ्यांना हिरे, माणके, मोती, सोने अशी लक्षावधी रूपयांची संपत्ती मिळाली. हाजी सय्यदबेग याचाही वाडा लुटला व संपत्ती हस्तगत केली. त्यावेळी शेजारच्या इंग्रज वखारवाल्यांनी मराठ्यांना अटकाव केला. त्यामुळे मराठे-इंग्रज यात वाद झाला. मराठ्यांनी इंग्रजांना कापून काढण्याची धमकी दिली पण इंग्रजांनी त्यास जुमानले नाही. यावेळी मराठ्यांनी वेळ दवडायचा नव्हता म्हणून त्याकडे लक्ष दिले नाही. त्यामुळे प्रकरण तिथेच थांबले.

७ जानेवारीस इनायतखानाने वाटाघाटी करण्याच्या दृष्टीने एका हस्तकास पाठविले. त्यास महाराजांनी इनायतखानाबद्दल खडे बोल सुनावले. त्यावेळी त्या हस्तकाने शिवाजीवर तलवार उपसून धाव घेतली, पण महाराजांच्या अंगरक्षकाने त्याचा हात उडवला. तो मारेकरी हस्तक महाराजांच्या अंगावर कोसळला, त्याचे रक्त महाराजांच्या अंगास लागले पण सैनिकांना वाटले की, महाराजांचे काही बरे वाईट

झाले आहे. त्यावेळी सैनिकांनी कांही कैद्यांच्या कत्तली केल्या. महाराज उठून उभे राहिले तेव्हा कत्तली थांबल्या. डच व्यापारी म्हणतो, 'आमचा हेर शहराबाहेर शिवाजीच्या छावणी पर्यंत गेला होता. शिवाजीच्या डोक्यावर बिन कनातीचे पाल होते. लोक लुट घेऊन एकसारखे त्याच्यापुढे ओतीत होते. सोने, रूपे बाजूला काढून बाकीचे जवळ उभे राहणाऱ्यांना लगेच वाटून टाकत होते. सुरतेच्या लुटीची बातमी मोगलांना लागताच त्यांच्या फौजा वेगाने सुरतेकडे येत असल्याची बातमी मिळाली तेंव्हा ९ जानेवारीस महाराज सोने, चांदी, माणके, मोती, रत्ने अशी कोटीची लुट असावी ती घेऊन बाहेर पडले व रायगडावर सुखरूप पोहोचले.

### क) सुरत लुटीचे परिणाम

### १) उद्दिष्ट पूर्ण झाले :

मुघलांच्या आर्थिक उत्पन्नाचे साधन असणारे सुरत शहर मराठ्यांनी लुटल्याने बादशहाची बेअब्रु झाली होती. मुघलांच्या स्वराज्यावरील आक्रमणामुळे जे आर्थिक नुकसान झाले होते ते त्यांच्याच प्रदेशातून मराठ्यांनी मिळवणे हे एक उद्दिष्ट या लुटीमागे असल्याने ते पूर्ण झाले होते.

### २) बेसुरत सुरत :

मराठ्यांनी सुरत शहर लुटल्याने आर्थिक परिणाम झाले होते. आर्थिक हानी झाली. व्यापार बुडाला, पूर्वीचे वैभव नष्ट झाले होते.

### ३) प्रचंड लुट मिळाली :

सुरतेच्या स्वारीतून मराठ्यांना किती लुट मिळाली असेल याबद्दल नक्की माहिती उपलब्ध नसली तरी रियासतकार सरदेसाई म्हणतात, ''लुट इतकी प्रचंड होती की, त्यांना मोजदाद करण्यास वेळ मिळाला नाही.'' या लुटीमुळे मात्र शाहिस्तेखानाने केलेल्या नुकसानीची भरपाई झाली.

### ४) मराठेशाहीचे बळकटीकरण :

सुरत लुटीचा परिणाम राजकीयदृष्ट्याही झाला. मराठी राज्याला बळकटी आणण्यासाठी या लुटीतील पैसा वापरला गेला. रायगडावरील नविन बांधकामे, सिंधुदूर्ग किल्ल्याची बांधणी, इतरही किल्ल्याची डागडुजी तसेच आरमार बांधणी यांना प्रोत्साहन दिले. त्यामुळे मराठेशाहीचे बळकटीकरण झाले.

### १) मुंबईचा विकास :

सुरतेच्या लुटीने सुरत या शहराचे पूर्वीचे वैभव व्यापारी दृष्ट्या कमी झाले. परकीय व्यापाऱ्यांना सुरत हे शहर सुरक्षित नसल्याचे ध्यानात आले, म्हणून त्यांनी मुंबई हे शहर व्यापारी केंद्र म्हणून निवडले, याचा परिणाम म्हणून मुंबईचा विकास झाला.

### ६) मराठ्यांचा आत्मविश्वास वाढला :

सुरतेच्या लुटीचा परिणाम म्हणून महाराज व सर्व सैनिकांमध्ये आत्मविश्वास वाढला. कारण शेकडो मैल आत असलेले मुघल साम्राज्यातील शहर लुटणे ही बाब तशी गंभीर होती. त्यामध्येसुद्धा यश प्राप्त झाल्याने आत्मविश्वास वाढला.

### ७) मिर्झाराजा जयसिंहाची स्वारी :

शिवाजी महाराजांनी शाहिस्तेखानाची केलेली फजिती व त्यानंतर अवघ्या ९ महिन्यातच सुरतेची केलेली लुट याबाबी मुघलांच्या दृष्टीने गंभीर होत्या. त्यामुळे मोंगल दरबारातील ज्येष्ठ, अनुभवी, मुत्सद्दी सरदार मिर्झाराजे जयसिंह याची नेमणूक मराठ्यांवर स्वारी करण्यासाठी झाली.

### ५) सुरत स्वारीनंतरच्या महत्त्वपूर्ण गोष्टी :

### १) शहाजीराजांचा मृत्यू :

शिवाजी महाराजांचे वडील शहाजीराजे हे शिकारीस गेले असताना घोड्यावरून पडले व १३ जानेवारी १६६४ साली मरण पावले ही बातमी महाराजांना सुरतेहून परत येताना समजली.

### २) बाजी घोरपडेस ठार केले :

बाजी घोरपडे हा आदिलशाहीचा सरदार होता, त्यानेच शहाजीराजांना कैद केले होते. सुरत लुटीनंतर महाराजांनी मोंगली प्रदेशात म्हणजे अहमदनगर ते औरंगाबाद पर्यंतचा प्रदेश लुटला. याचवेळी आदिलशाहीने दक्षिण कोकणातील कुडाळ घेण्यासाठी इखलासखान यास पाठविले. त्याच्या मदतीला वजीर लवासखान, मुधोळचा बाजी घोरपडे व व्यंकोजीला पाठविले. या सर्व फौजा एकत्र येण्यापूर्वीच महाराजांनी मुधोळवर आक्रमण करून बाजी घोरपडेस ठार केले व खवासखान व व्यंकोजीला पळवून लावले.

### ३) बकसर शहर लुटले (१४ फेब्रुवारी, १६६५) :

खवासखानास पळवून लावल्यानंतर शिवाजी महाराजांनी कारवार किनाऱ्यावरील बेदनुरच्या राज्यातील बकसर (बसरूर) या शहरावर आरमारी मोहीम काढली व लुटले, त्यामध्ये प्रमाणावर संपत्ती मिळाली.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३**

**रिकाम्या जागा भरा.**

१. ............ साली शिवाजी महाराजांनी पहिली सुरत लुट केली.

अ) १६६३ ब) १६६४

क) १६६५ ड) १६६७

२. ......... या शहराचा प्रमुख व्यापारी केंद्र म्हणूण विकास सुरत लुटीनंतर झाला.

अ) कोल्हापूर ब) मुंबई

क) पुणे ड) नाशिक

३. सुरत शहराचा अमंलदार ...... हा होता.

अ) इनायतखान ब) बहादूरखान

क) अफजलखान ड) बहलोलखान

४. दक्षिण कोकणात येऊन शिवाजी महाराजांनी ......... कडील कुडाळचा प्रदेश घेतला.

## १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१. चातुर्वर्ण्य : चार वर्ण, प्राचीनकाळी समाज ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य व क्षुद्र या चार वर्णात विभागला होता.

२. वेठबिगारी : किरकोळ मोबदल्यात मजूराकडून काम करून घेणे.

३. तवारिखकार : दरबारातील वृत्तांत लिहिणारा.

४. पातशहा : बादशहा

५. अंदेशा : शंका

६. खासा : विशेष विश्वासातील

७. शिबंदी : सैनिक

८. हिंदवी स्वराज्य : ऐतद्देशिय राज्य

## १.४ स्वयं-अध्ययन प्रश्न व उत्तरे

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -१**

**रिकाम्या जागा भरा.**

१) म. गो. रानडे

२) तीन

३) एरण

४) भिल्लम

५) कवी मुकुंदराज

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -२**

**रिकाम्या जागा भरा.**

१) रायरी

२) चंद्रराव

३) पंताजी गोपीनाथ

४) जावळी

५) सिद्धी जोहर

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न -३**

**रिकाम्या जागा भरा.**

१) १६६४

२) मुंबई

३) इनायतखान

४) बाजी घोरपडे

५) लखम सावंत

## १.५ सारांश

प्राचीन काळापासून वैभवशाली परंपरा असलेल्या महाराष्ट्रामध्ये देवगिरी साम्राज्याच्या अस्तानंतर उतरती कळा लागली. मुस्लिम सत्ताधिशांनी येथील प्रदेशाची प्रचंड लुट केली. जनतेवर अन्याय अत्याचार केले. त्याचा परिणाम म्हणजे येथील जनता मुस्लीम सत्तांधिशांना कंटाळली होती. शिवाजी महाराजांनी सर्वांना सोबत घेऊन जनतेच्या कल्याणाचे राज्य उभे केले. मराठा स्वराज्य निर्माण केले. मराठा स्वराज्य निर्मितीमध्ये त्यांना अनेक अडथळे आले, मात्र त्यांनी ते पार केले. स्वराज्य निर्मितीच्या कामात त्यांना त्यांचे वडील शहाजीराजे व मातोश्री जिजाबाई यांचे मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले.

हिंदवी स्वराज्याची स्थापना करत असताना शिवाजी महाराज यांना आदिलशाही व मुघल या दोन बड्या सत्तांबरोबर संघर्ष करावा लागला. प्रथम त्यांना आदिलशाही बरोबर संघर्ष करावा लागला. आदिलशाही प्रदेशातील व दरबारातील अस्थिरतेच्या व गोंधळाच्या परिस्थितीचा त्यांनी फायदा घेतला व आपला स्वराज्य विस्तार वाढविला. आदिलशाही दरबाराने शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी अनेक प्रयत्न केले, परंतु ते सर्व प्रयत्न शिवाजी महाराजांनी उधळून लावले.

मुघल सत्तेबरोबरही शिवाजी महाराजांना झगडावे लागले. मुघलांना मराठा सत्तेपासून धोका वाटत होता. मराठा स्वराज्य जिंकून घेण्यासाठी त्यांनी अनेक प्रयत्न केले. शाहिस्तेखानास पाठविले. मात्र ते सर्व प्रयत्न अपुरेच पडले.

शिवाजी महाराजांनी या दोन्ही सत्तांचा प्रतिकार मोडून काढून मराठा साम्राज्याची निर्मिती केली.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. मराठा सत्तेच्या उदयापूर्वीची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

२. मराठा सत्तेच्या उदयाची कारणे स्पष्ट करा.

३. शिवाजी महाराजांनी जावळी जिंकून घेण्याची कारणे व जावळी विजयाचे महत्त्व स्पष्ट करा.

४. अफजलखानाच्या स्वारीचा हेतू सांगून स्वारीचा सविस्तर वृत्तांत द्या.

५. अफजलखान विजयाचे महत्त्व स्पष्ट करा.

६. शाहिस्तेखानाच्या स्वारीची माहिती देवून विजयाची कारणे सांगा.

७. सुरतच्या पहिल्या लुटीची कारणे सांगून परिणाम स्पष्ट करा.

**ब) टिपा लिहा.**

१. मराठा सत्तेच्या उदयापूर्वीची राजकीय परिस्थिती

२. शिवाजी महाराज यांचा जन्म व बालपण

३. मातोश्री जिजाबाई

४. शहाजीराजे

५. सिद्धी जोहरचा पन्हाळगडचा वेढा

६. बाजीप्रभु देशपांडे

७. सुरत लुटीचे परिणाम

## १.७ संदर्भ ग्रंथ


१. कुलकर्णी अ. रा., शिवकालीन महाराष्ट्र, राजहंस प्रकाशन, पुणे, १९९७.

२. कुलकर्णी अ. रा., ग. ह. खरे (संपा). मराठ्यांचा इतिहास, खंड-०१, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ, नागपूर, १९८४.

३. बेंद्रे वा. सि., श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे चिकित्सक चरित्र, द्वि. आवृत्ती, मुंबई, १९७१.

४. भावे वा. कृ., शिवकालीन महाराष्ट्र, वरदा प्रकाशन, पुणे, १९९८.

५. रानडे म. गो., मराठ्यांच्या सत्तेचा उत्कर्ष, फाटक न. र. (अनु.), साहित्य आणि संस्कृती मंडळ, महाराष्ट्र राज्य, मुंबई, १९६४.

# सत्र १ : घटक २

# छत्रपती शिवाजी महाराजांची इ.स. १६८० पर्यंतची कामगिरी

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रस्तावना

२.२ विषय विवेचन

  २.२.१ पुरंदरचा तह व आग्रा भेट

  २.२.२ राज्याभिषेक

  २.२.३ कर्नाटक मोहीम

२.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

२.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सरावासाठी स्वाध्याय

२.६ सारांश

२.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर खालील घटकांचे आकलन होण्यास मदत होईल.

- शिवाजी महाराज व मुघल यांच्यातील संघर्षाच्या पार्श्वभूमीबाबत अभ्यास होईल.
- मिर्झाराजा जयसिंहाच्या स्वारीचा उद्देश व पुरंदरचा तह स्पष्ट करता येईल.
- पुरंदरच्या तहाचे मूल्यमापन करता येईल.
- शिवाजी महाराजांना आग्र्यास का जावे लागले याचे स्पष्टीकरण देता येईल.

- शिवाजी महाराजांनी आग्र्याहून कशा प्रकारे सुटका करून घेतली ते सांगता येईल.
- शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक का करून घेतला याचे महत्त्व सांगता येईल.
- शिवाजी महाराजांची कर्नाटक मोहीम स्पष्ट करता येईल.
- कर्नाटक मोहिमेचे परिणाम विशद करता येतील.

## २.१ प्रस्तावना

पहिल्या घटकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचे इ.स. १६६४ पर्यंतचे कार्य पाहिले. या घटकात आपण इ.स. १६८० पर्यंतचे कार्य पाहणार आहोत. यामध्ये मिर्झाराजा जयसिंहाची स्वराज्यावर झालेली स्वारी, पुरंदरचा तह, आग्रा भेट, शिवाजी महाराजांचा पहिला व दुसरा राज्याभिषेक, त्याची कारणमीमांसा, महत्त्व, परिणाम आणि महाराजांची कर्नाटक मोहीम, महत्त्व आणि परिणाम या प्रमुख घटनांचा समावेश आहे.

विजापूरच्या आदिलशहाकडून मराठा राज्य मोडून काढण्याचा अनेकदा प्रयत्न झाला, मात्र त्यांना यामध्ये यश प्राप्त झाले नाही. मराठा राज्याचा धोका ज्याप्रकारे आदिलशहाला होता, त्याच प्रकारे मुघलांनाही होता. मुघल बादशहा औरंगजेबाने शाहिस्तेखानाच्या माध्यमातून मराठा राज्य गिळंकृत करण्याचा अयशस्वी प्रयत्न झाला. शाहिस्तेखान आपला जीव वाचवून कसाबसा महाराष्ट्रातून निसटला. परिणामी औरंगजेब बादशहाला मिर्झाराजा जयसिंहाची मोहीम आखावी लागली. यातून मुघल-मराठा संघर्ष बराच टोकाला गेला व महाराजांना पुरंदरचा तह व तहाच्या अनुषंगाने आग्रा भेटीस जावे लागले. आग्रा प्रकरणातून महाराज सही सलामत सुटून आल्यानंतर त्यांनी स्वत:चा राज्याभिषेक करून सार्वभौम मराठा स्वराज्याची स्थापना केल्याचे जाहीर केले. त्याचा प्रत्यय पुढे कर्नाटक मोहीमेत दिसून येतो. कर्नाटक मोहीम मराठा राज्याच्या दृष्टिकोनातून फारच यशस्वी व स्वराज्याच्या सीमा अमराठी राज्यात विस्तारण्यात झाली.

## २.२.१ पुरंदरचा तह व आग्रा भेट

पहिल्या घटकामध्ये आपण शिवाजी महाराजांची इ.स. १६६४ पर्यंतची कामगिरी पाहिली. सुरतेवर शिवाजी महाराजांनी केलेला हल्ला मुघल साम्राज्याला हादरा देणारी घटना ठरली, तत्कालिक राजकीय परिस्थितीचा विचार करता मुघल बादशहा औरंगजेबाला हा फार मोठा धक्का होता. परिणामी औरंगजेबाने शिवाजी महाराजांच्या विरोधातील हालचाली अधिक तीव्र केल्या व मिर्झाराजा जयसिंहाची दक्षिणेच्या मोहीमेवर नियुक्ती केलेली दिसते. पुढे मिर्झाराजा जयसिंह व शिवाजी महाराज यांच्यात पुरंदरचा तह

घडून आला. तहाचा परिपाक म्हणजे महाराजांची आग्रा भेट. शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रातील महत्त्वाच्या आणि कलाटणी देणाऱ्या दोन घटना होत्या. प्रस्तुत घटकात आपण या दोन घटनांचा अभ्यास करणार आहोत. पुरंदरच्या तहाच्या अगोदर काही महत्त्वाच्या घटना घडलेल्या होत्या त्या खालील प्रमाणे.

### १) मिर्झा राजा जयसिंहाची स्वारी (१६६५) :

शिवाजी महाराजांनी मुघलांच्या विरोधात मोहीम उघडल्यामुळे औरंगजेबाला याची गंभीर दखल घ्यावी लागली. ३० सप्टेंबर, १६६४ रोजी औरंगजेबाने आपल्या वाढदिवसाचे औचित्य साधत मिर्झाराजा जयसिंह यांची नियुक्ती केली. मिर्झा राजा जयसिंह रणनीती व राजनीती मध्ये हुशार आणि निष्णात होता. यांच्या सोबत दिलेरखान, दाऊदखान कुरेशी, राजारायसिह सिसोदिया, राजा सुजनसिंह बुंदेला, जयसिह पुत्र किरतसिंह, कुबदारखान व इतर उमरावांचा समावेश होता. यांच्या सोबत १४ हजाराची फौज होती, शिवाय पुढे दक्षिणेतील मुघल फौज येऊन मिळणार होती. मिर्झा राजा जयसिंहाने महाराजांच्यावर जी स्वारी केली त्याची काही कारणे होती ती पुढील प्रमाणे.

१. शिवाजी महाराजांचा कायमचा बंदोबस्त करून शिक्षा करणे.

२. शिवाजी महाराजांनी मुघलांची केलेली नाचक्की.

३. आदिलशाही व कुतुबशाही घेण्याचा उद्देश.

४. दक्षिणेतील स्वतंत्र हिंदू राज्याचे उच्चाटन करणे.

### अ) मिर्झा राजा जयसिंहाच्या स्वारीचा वृत्तांत :

मिर्झा जयसिंह ९ जानेवारी १६६५ रोजी नर्मदा नदी ओलांडून १९ जानेवारी रोजी बऱ्हाणपूर येथे आला. १० फेब्रुवारी रोजी तो औरंगाबाद येथे दाखल. त्याठिकाणी त्यांने मुअज्जम व इतर अधिकाऱ्यांची भेट घेतली. राजकीय घडामोडीचा वृत्तांत घेऊन ३ मार्च १६६५ रोजी तो पुण्यामध्ये दाखल झाला.

### १) मिर्झा राजा जयसिंहाचे डावपेच :

शिवाजी महाराजांच्या राजकीय व लष्करी डावपेचाच्या संदर्भात जयसिंह पूर्णपणे जाणकार होता. त्यामुळे त्याने मराठा सैन्याशी टक्कर देण्यासाठी लष्करी डावपेच आखण्यास सुरुवात केली. याचाच एक भाग म्हणजे आदिलशाहीला आपल्या बाजूला घेण्यासाठी शिवाजी महाराजांनी घेतलेला प्रदेश पुन्हा प्राप्त करून देण्याचे आमिष दाखवले. शिवाय मुघलांना द्यावयाच्या खंडणीची रक्कमही कमी करण्याचे आश्वासन दिले. जावळीचे मोरे, अफजलखानाचा मुलगा फाझलखान व कल्याणच्या कोळी वतनदारांना मराठा बंदरावर हल्ले करण्यास सांगितले. पोर्तुगीज, सिद्दी, डच, इंग्रज व कर्नाटकातील नायकांना मुघलांना साहाय्य करण्यासाठी पत्रव्यवहार सुरू केला.

## २) पुरंदरला वेढा व मुरारबाजीचे हौतात्म्य :

शिवाजी महाराजांना नेस्तनाबूत करण्याच्या उद्देशाने जयसिंहाने मोठी व्यूहरचना आखली. मराठा सैन्य मुघल प्रदेशात शिरू नये यासाठी मोक्याच्या ठिकाणी चौक्या बसविल्या. पुण्याच्या आसपासच्या परिसरातील खेडी जाळून बेचिराख केली. दरम्यान दिलेरखानाने पुरंदराच्या किल्ल्यावर आक्रमण केले. तोफांच्या माऱ्यापुढे वज्रगड टिकू शकला नाही. दाऊदखानाने राजगड, सिंहगड, रोहिडा भागात प्रचंड धुमाकूळ घातला. मुघल सैन्याच्या धुमाकुळाला मराठा सैन्य रात्री-अपरात्री हल्ले करून प्रतिकार करत होते. मात्र त्याचा फारसा परिणाम होत नव्हता. दिलेरखानाने पुरंदरचा वेढा अधिक तीव्र केला. पुरंदरचा किल्लेदार मुरारबाजी देशपांडे यांनी नेटाने किल्ला लढविला, मराठा सैन्याने पराक्रमाची शर्थ केली. मात्र मुघल सैन्यापुढे मराठा सैन्याचा टिकाव लागला नाही. दिलेरखानाने मुरारबाजीला आपल्या बाजूला घेण्याचा प्रयत्न केला, त्यामध्ये त्याला यश आले नाही. खासा खानाने मुरारबाजीवर बाण सोडला त्यामध्ये त्यांना हौतात्म्य आले. परंतु मराठा सैन्य मोठ्या शर्थीने लढत राहिले.

## ३) शिवाजी महाराज - जयसिंह भेट व वाटाघाटी :

मराठा सैन्याने पुरंदरचा किल्ला मोठ्या पराक्रमाने लढविला. मात्र मुरारबाजीच्या हौतात्म्याने हा किल्ला फार काळ लढविणे शक्य होईल असे वाटत नव्हते. दिलेरखान पुरंदरचा एक-एक बुरूज काबीज करत होता. मुघल फौजांनी कोंढाणा किल्ला घेण्याच्या हालचाली सुरू केल्या होत्या. यामुळे शिवाजी महाराजांनी आपले वकिल रघूनाथ पंत यांचे माध्यमातून वाटाघाटी सुरू केल्या. जयसिंहाने प्रथम त्याला नकार दिला. मात्र शिवाजी महाराजांनी आदिलशाहीशी संधान बांधत असल्याचे जयसिंहाच्या लक्षात आल्यानंतर शिवाजी महाराजांनी बिनशर्त वाटाघाटीस यावे असे कळविले. ११ जून १६६५ रोजी पुरंदरच्या पायथ्याशी उभयंताची भेट झाली. महाराज जयसिंहाच्या तंबूत येताच नियोजनानुसार दिलेरखान व किरतसिंहाने पुरंदरवर जोरदार हल्ला केला, या हल्ल्यात मराठ्यांची मोठी हानी झाली. त्यामुळे महाराजांनी पुरंदर मुघलांना देण्याचे मान्य केले.

## ४) पुरंदरचा तह (१४ जून, १६६५) :

मुघलांच्या प्रचंड आक्रमणामुळे मराठा सैन्याचा फार काळ टिकाव लागणार नाही असे महाराजांना वाटू लागले, शिवाय स्वराज्याचे स्वप्न पूर्णत्वाच्या मार्गावर असताना तडजोड केलेली बरी असा विचार करून शिवाजी महाराजांनी १४ जून १६६५ रोजी मिर्झा राजा जयसिंह यांच्या बरोबर तह केला. तहाच्या या मसुद्यात खालील अटींचा समावेश होता.

१. शिवाजी महाराजांनी या तहानुसार तळकोकण व बालाघाटातील २३ किल्ले व त्याखालील ४ लक्ष होनाचा मुलूख मुघलांना द्यावा (मुघलांना द्यावयाचे किल्ले पुरंदर, रूद्रमाळ, रोहिडा, विसापूर,

कोंढाणा, लोहगड, तुंग, तिकोना, खंदकडा, माहुली, मुरंजन, कोहज, कर्नाळा, सोनगड, पळसगड, भांडरगड, खेडदुर्ग, नळदुर्ग, वसंतगड, नंगगड, माणगड, अंकोला, खईगड इत्यादी.)

२. शिवाजी महाराजांकडे १२ किल्ले व १ लक्ष होनाचा मुलूख ठेवावा व यापुढे यामुळे मुघल प्रदेशावर स्वारी करू नये (महाराजांकडे राहणारे किल्ले - रायगड, तोरणा, राजगड, सिंगाणा, पहाडगड, पाली, धोसाळा, अरोरी, पालगड, भोरप, कुबारीगड, उदयदुर्ग इत्यादी).

३. शिवाजी महाराजांनी दख्खनच्या सुभ्यात सोपविल्या जाणाऱ्या कोणत्याही बादशाही मोहिमेत मुघलांना मदत करावी. मुघलांच्या दख्खनेतील मोहिमेत शिवाजी महाराजांनी दिलेली कोणतीही जबाबदारी पार पाडावी.

४. शिवाजी महाराजांचे पुत्र संभाजी राजे यांना पाच हजारी मनसब मिळावी व त्यांनी दक्षिणेच्या सुभेदाराच्या हाताखाली मुघली चाकरी करावी.

५. विजापूरकरांचा तळकोकणातील ४ लाख होनांचा व बालाघाटातील ५ लाख होनांचा प्रदेश बादशहाने शिवाजी महाराजांना द्यावा, त्या मोबदल्यात राजांनी मुघलांना ४० लाख होन खंडणी, सालाना ३ लाख होनाच्या हप्त्याने द्यावी.

या तहाला औरंगजेबाची मान्यता मिळाल्याशिवाय काही एक अर्थ नव्हता, त्यामुळे १४ जून रोजी शिवाजी महाराजांना सन्मानाने निरोप दिला. मात्र तहात ठरलेले किल्ले मिळेपर्यंत संभाजी राजेना ओलीस ठेवण्यात आले. किल्ले ताब्यात येताच त्यांना परत पाठविण्यात आले.

### ब) पुरंदरच्या तहाचे महत्त्व आणि परीक्षण :

शिवाजी महाराज व मिर्झा राजा जयसिंह यांच्यामध्ये पुरंदरच्या पायथ्याशी हा तह झाला. मोठ्या पराक्रमाने व संकटांना तोंड देत साकारत आणलेले स्वराज्य या तहाने संकटात आले. महाराजांच्या जीवन चरित्रातील हा एक खूप मोठा पराभव होता, तरीही त्या स्थितीत महाराजांनी अत्यंत अवघड परिस्थिती कौशल्याने हाताळली. यासंबंधी सेतू माधवराव पगडी म्हणतात की, ''ती महान शोकांतिका होती, अगतिकता होती, अक्षरशः विषाने भरलेला प्याला होता'' त्यामुळे या तहाचे महत्त्व अथवा परीक्षण खालील प्रमाणे करता येईल.

### १) हा तह दोन्ही बाजूस हवा होता :

शिवाजी महाराज व मिर्झाराजा जयसिंह या दोघांनाही तहाची आवश्यकता वाटत होती. कारण महाराजांना युद्ध चालू ठेवून निष्कारण मनुष्य हानी करून घ्यायची नव्हती, तर जयसिंहाला शिवाजी महाराज व आदिलशाही आपल्या विरोधात एकत्र आले तर आपणास दोन्ही आघाड्यांवर लढावे लागेल याची भीती वाटत होती. कदाचित प्राप्त केलेले यशही गमवावे लागण्याची शक्यता वाटत होती.

## २) जयसिंहाच्या जमेची बाजू :

पुरंदरच्या तहाने मराठ्यांचे २३ किल्ले व ४ लाख होनांचा प्रदेश केवळ ३ महिन्यात मुघलांना प्राप्त झाला होता. याचबरोबर मुघलांच्या दक्षिण मोहिमेत महाराजांचे सहाय्य मिळणार होते. जसवंतसिंग, शाहिस्तेखान, मुअज्जम या मातब्बर सरदारांना जे जमले नव्हते ते जयसिंहाने करून दाखवले होते.

## ३) मुघलांना मोठी आर्थिक प्राप्ती :

पुरंदरच्या तहाने मुघलांना कोकण व विजापूरच्या बालघाटातील प्रदेशांच्या बदल्यात १३ वर्षात ४० लाख होन मिळणार होते. मुघलांसाठी ही फार मोठी आर्थिक प्राप्ती होती.

## ४) शिवाजी महाराजांच्या जमेची बाजू :

शिवाजी महाराजांनी मोठ्या मुत्सदीने व चतुराईने मराठा राज्य संपवू पाहत असलेल्या जयसिंहाच्या तावडीतून १२ किल्ले व १ लाख होनाचा प्रदेश स्वत:कडे ठेवण्यात यश प्राप्त केले. या किल्ल्यांच्या जोरावर गमावलेले सर्व किल्ले स्वराज्यात परत घेणे व स्वराज्य टिकवणे ही महाराजांची जमेची बाजू होती.

## ५) जयसिंहाच्या अपयशाची बाजू :

जयसिंह स्वराज्य पूर्णपणे नष्ट करू शकला नाही. १२ किल्ले व १ लाख होनाच्या प्रदेशाच्या जोरावर शिवाजी काही-एक करू शकणार नाही असे जयसिंहांना वाटत होते, परंतु प्रत्यक्षात तसे घडू शकले नाही. म्हणजेच हा तह एक तात्पुरती तडजोड होती.

## ६) शिवाजी महाराजांच्या अपयशाची बाजू :

शिवाजी महाराजांना या तहाने खूप मोठी किंमत अदा करावी लागली. २३ किल्ले व ३/४ प्रदेशावर पाणी सोडावे लागले. या सर्व किल्ल्यांसाठी व प्रदेशासाठी अनेक मावळ्यांनी आपले बलिदान दिलेले होते, रक्त सांडलेले होते. त्याच बरोबर खूप मोठा पैसाही खर्च केलेला होता. मात्र पुरंदरच्या तहात हे सर्व गमवावे लागले. तो महाराजांचा पराभव होता. हे जरी खरे असले तरी स्वराज्यावर आलेले हे संकट महाराजांनी लीलया पेलले, महाराजांची ही तात्पुरती तडजोड ठरणार होती.

## क) पुरंदरच्या तहानंतरच्या घटना :

मिर्झाराजा जयसिंहाचे मराठा राज्याबरोबर आदिलशाही व कुतुबशाही जिंकून घेण्याचे धोरण होते. त्यानुसार जयसिंहाने मराठा फौजेसह विजापूरवर आक्रमण केले. २४ डिसेंबर १६६५ रोजी मुघल व आदिलशाही फौजात युद्ध झाले, मात्र निर्णय झाला नाही. दिलेरखानाने याचे अपयश शिवाजी महाराजांच्या डोक्यावर फोडले व त्यांचा काटा काढण्याचा प्रयत्न करू लागला, तेव्हा जयसिंहाने महाराजांना

पन्हाळगडाच्या मोहीमेवर पाठविले. नेताजी पालकर व शिवाजी महाराजांनी नियोजन करून पन्हाळ्यावर स्वारी केली. त्यावेळी नेताजी वेळेत पोहचला नाही. मराठ्यांचे १००० सैन्य मारले गेले. याला महाराजांनी नेताजी पालकरला जबाबदार धरले, दोघांत मतभेद निर्माण झाले. नेताजीने महाराजांना उद्धटपणे उत्तरे दिल्याने महाराजांनी नेताजींची हकालपट्टी केली. नेताजी हा राग मनात धरून आदिलशाहीला जाऊन मिळाला. मात्र जयसिंहाने मोठ्या हिमतीने त्याला मुघलांकडे वळविण्यात यश मिळविले. नेताजीचे धर्मांतर झाले व तो कुलीखान झाला. मुघलांनी त्याला ५ हजारी मनसबदारी, जहागीर व ५० हजार रूपये बक्षिस दिले. पुढे १० वर्षांनी शिवाजी महाराजांनी त्यांचे हिंदू धर्मात धर्मांतर करवून घेतले व जावळीचा सुभेदार नेमले.

## २) शिवाजी महाराजांची आग्रा भेट (१६६६) :

शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्रामधील जे अनेक रोमहर्षक व चित्तवेधक प्रसंग आहेत त्यामध्ये आग्रा भेट व सुटका हाही एक आहे. न्या. एम. जी. रानडे यांनी 'मराठी सत्तेचा उत्कर्ष' या ग्रंथात शिवाजी महाराजांच्या आयुष्यातील चार आणीबाणीचे प्रसंग सांगितले आहेत. त्यामधील आग्रा भेट हा एक. महाराज अतिशय मुत्सद्दी, दूरदृष्टी असणारे, माणसाची अचूक पारख असणारे औरंगजेबाचे हे कटकारस्थान आहे हे माहीत असतानाही आग्रा भेटीला गेले. या संबंधी अनेक अभ्यासकामध्ये मत-मतांतरे आहेत.

### अ) आग्रा भेटीची कारणे अथवा हेतू :

### १) मिर्झाराजे जयसिंहाला वाटणारा धोका :

जयसिंहाला मराठ्यांच्या विरोधात यश मिळालेले असले तरी, शिवाजी महाराज विजापूरकर व कुतुबशहाच्या मदतीने मुघलांच्या विरोधात बंड करेल असे जयसिंहाला वाटत होते. त्यामुळे काहीही करून शिवाजीला उत्तरेत पाठविणे जयसिंहाला योग्य वाटत होते. औरंगजेबाला लिहिलेल्या पत्रात तो लिहितो की, आदिलशाही व कुतुबशाही एकत्र झाल्यास शिवाजी त्यांना मिळेल त्यामुळे हर-प्रयत्नाने मन वळवून आपल्या दर्शनास पाठवितो. त्यामुळे त्याने शिवाजी महाराजांना आग्रा भेटीस प्रवृत्त केले.

### २) दक्षिणेची सुभेदारी मिळविण्याचा हेतू :

जयसिंहाने शिवाजी महाराजांना अनेक प्रलोभने दाखविली होती. यामध्ये दक्षिणेची सुभेदारी मिळवून देणे हे एक होते. यासंदर्भात सभासदकार लिहितो की, जयसिंहाने जेव्हा महाराजांना आग्रा भेटीची विनंती केली, तेव्हा महाराज म्हणाले, बादशहाने आपणास दक्षिणेची सुभेदारी द्यावी, आपण बादशहासाठी आदिलशाही व कुतुबशाही जिंकून देतो. जयसिंहाने हे कबूल केले. परंतु बादशहाने ते कबूल करावयास हवे होते. त्यासाठी प्रत्यक्ष भेट घेणे आवश्यक होते. हे जरी खरे असले तरी महाराज केवळ सुभेदारीसाठी उत्तरेत गेले असावे असे वाटत नाही.

### ३) सिद्दीचा जंजिरा प्राप्त करण्याची इच्छा :

सिद्दी मराठ्यांचा हाडवैरी होता. जंजिऱ्याच्या आश्रयाने त्याने कोकणात थैमान घातलेले होते. सिद्दीचा बंदोबस्त करावयाचा असेल तर जंजिरा ताब्यात असणे आवश्यक होते. सिद्दी औरंगजेबाचा मांडलिक होता. त्यामुळे औरंगजेबाने सिद्दीस जंजिरा मराठ्यांच्या ताब्यात देण्यास सांगितले तर तो आपल्या हातात येईल असे महाराजांना वाटत होते.

### ४) मुघल दरबाराचे निरीक्षण :

आग्रा भेटी दरम्यान मुघल दरबाराचे निरीक्षण करावे असा उद्देश महाराजांचा असावा असे जी. एस. सरदेसाई म्हणतात. बादशहा व त्यांची राजधानी यांना भेटी दिल्यावर मुघल साम्राज्याच्या अंगभूत शक्तीची वास्तव कल्पना येणार होती. शिवाय त्या दरबारातील आपले शत्रू कोण व मित्र कोण होऊ शकतील याची कल्पना येणार होती. त्यामुळे त्यांनी आग्रा भेटीस जाण्याचे निश्चित केले.

### ५) उत्तरेकडील प्रदेशाची पाहणी करणे :

शिवाजी महाराजांच्या आग्रा भेटी संदर्भात कृष्णराव केळूसकर म्हणतात की, ''महाराज म्हणाले आमच्या पूर्वजांनी उत्तरदेशी राज्य केले. त्या जगाचे आम्हास अवलोकन घडेल व भागिरिथी, यमुना आदी करून महातीर्थांचे दर्शन घडेल.'' योगायोगाने हे दर्शनही घडणार होते. तसेच जयसिंहाने सर्व प्रकारच्या सुरक्षेची हमीही दिली होती.

### ६) औरंगजेब व छत्रपती शिवाजी महाराज यांची समेट होण्यासाठी :

शिवाजी महाराजांच्या आग्रा भेटीसाठी मिर्झाराजा जयसिंह जबाबदार होता. यासंदर्भात रियासतकार गो. स. सरदेसाई म्हणतात की, ''औरंगजेब बादशहा व दक्षिणेचा हा सेनानी यांच्या प्रत्यक्ष भेटीत समेट घडून आली तर दक्षिणेत दीर्घकालीन शांतता प्रस्थापित होण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल पडेल.'' यासाठी आग्रा भेट आवश्यक होती.

### ७) औरंगजेबाला ठार मारण्याचा हेतू :

शिवाजी महाराजांच्या आग्रा भेटीचा उद्देश मुघल बादशहाला ठार मारण्याचा होता असे वि. का. राजवाडे म्हणतात. ज्या प्रमाणे अफझल खानाला मारले त्या प्रमाणे औरंगजेबाचाही काटा काढावा हा हेतू असावा.

### ८) आग्र्यास जाणे अपरिहार्य :

जयसिंहा बरोबर झालेल्या पुरंदरच्या तहानुसार १ लाख होनाचा प्रदेश शिवाजी महाराजांना मिळणार होता, तो एका वर्षानंतर जमिनीची मोजणी झाल्यानंतर. दरम्यान आग्रा भेटीचे निमंत्रण आले. त्यामुळे त्यांना आग्रा भेटीस जाणे क्रमप्राप्त होते असे सेतू माधवराव पगडी म्हणतात. ते लिहितात की,

''महाराजांना आग्र्याचे आमंत्रण स्वीकारण्यावाचून गत्यंतरच उरले नव्हते. महाराजांनी स्वत:हून न जावे तर बादशहाची गैरमर्जी होऊन मुलूख प्राप्त होणार नाही. अशा विचित्र परिस्थितीत ही कोंडी फोडण्यासाठी त्यांनी आग्र्याला जाण्याचा धाडसी निर्णय घेतला''.

## ब) छत्रपती शिवाजी महाराजांची आग्रा भेट :

### १) आग्रा भेटीची पूर्व तयारी :

मिर्झाराजा जयसिंहाच्या आग्रहामुळे व पुरंदरच्या तहातील अटीस एक प्रकारची कायदेशीर मान्यता घेण्यासाठी शिवाजी महाराजांनी अग्र्याला जाण्याचा निर्णय घेतला. आग्रा भेटीची जबाबदारी जयसिंहाकडे असल्याने स्वराज्यातील प्रदेशाला मुघलांचा त्रास होणार नव्हता. तरीही त्यांनी स्वराज्याची व्यवस्था उत्तम प्रकारे केलेली होती. मातोश्री जिजाबाई, मोरोपंत पिंगळे, निळो सोनदेव यांच्या हाती सर्व कारभार सोपविलेला होता.

### २) शिवाजी महाराजांचे आग्र्याकडे प्रयाण :

स्वराज्याची सर्व चोख व्यवस्था केल्यानंतर शिवाजी महाराज ५ मार्च १६६६ रोजी राजगडाहून अग्र्यास निघाले. सोबत युवराज संभाजी राजे, ५ वरिष्ठ अधिकारी, शंभर नोकर व २०० घोडेस्वार होते. प्रवासातील खर्चासाठी दक्षिणेच्या खजिन्यातून जयसिंहाने १ लाख रूपये दिले होते व मार्गदर्शक म्हणून गाजीबेग हा अधिकारी होता. प्रवासाच्या मार्गातील अधिकाऱ्यांना महाराजांच्या मुक्कामाची उत्तम सोय करण्याचे हुकूम होते. जवळपास दोन महिन्याचा प्रवास करून ११ मे, १६६६ रोजी महाराज आग्रा हद्दीत पोहचले.

### ३) शिवाजी महाराजांचा अग्र्यात प्रवेश :

मुघल बादशहा औरंगजेब १२ मे, १६६६ रोजी आपला ५० वा जन्मदिवस साजरा करणार होता. त्यादिवशी भव्य दरबार भरणार होता व याच दिवशी महाराजांची दरबारात भेट होणार होती. ११ मे रोजी महाराज अग्रायाजवळील माणिचंद सराई जवळ पोहचले होते. त्यांच्या स्वागतासाठी जयसिंहाचा मुलगा रामसिंग जाणार होता. मात्र त्याच दिवशी त्याला बादशहाच्या निवासस्थानी पहारा असल्याने त्याच्याऐवजी मुन्शी गिरीधरला स्वागतासाठी पाठविले, मात्र महाराजांना तो आपला अपमान वाटला. दुसऱ्या दिवशी रामसिंग महाराजांच्या स्वागतासाठी गेला परंतु तेथेही त्यांची चुकामूक झाली. शेवटी शहराच्या मध्यभागी दोघांची भेट झाली.

### ४) शिवाजी महाराज मुघल दरबारात पोहचतात :

जयसिंह पुत्र रामसिंग शिवाजी महाराजांना घेऊन दरबारात पोहचला तेव्हा दिवाण-इ-आम मधील दरबार बंद झालेला होता व दिवाण-इ-खास मधील दरबार सुरू झालेला होता. शिवाजी महाराज आल्याचे

समजताच औरंगजेबाने असदखान या सरदारास त्यांना घेऊन येण्यास सांगितले. सिंहासनाजवळ येताच महाराजांनी १००० मोहरा, २ हजार रूपये नजराणा व ५०० निसार म्हणून पेश केला. युवराज संभाजी राजेनींही नजराणा पेश केला मात्र औरंगजेबाने न पाहिल्यासारखे केले, तो काही एक बोलला नाही. शिवाजी महाराजांना पंच हजारी रांगेत उभे केले. संभाजी राजेनाही त्याच रांगेत उभे केले. या सर्व घटनामुळे महाराज संतप्त झाले. रामसिंगास आपण कोणत्या रांगेत उभे आहोत याची विचारणा केली. त्यावेळी त्याने खुलासा केला. आपल्या पुढे जसवंतसिंह उभा आहे व आपण त्याच्या मागे आहोत हे पाहून महाराज पुन्हा संतापले. महाराजांनी रामसिंगाला या वागण्याचा खुलासा विचारला पण आपला जाणीवपूर्वक अपमान होत आहे असे बोलून सिंहासनाकडे पाठ फिरवून महाराज चालू लागले. रामसिंगाने त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. बादशहाने तीन सरदार पाठवून समजूत काढण्याचा प्रयत्न केला. शिवाजी महाराजांनी त्यांचे काही एक ऐकले नाही. औरंगजेबाने रामसिंगास शिवाजी महाराजांना डेऱ्यावर घेऊन जाण्यास सांगितले. महाराजांनी आपण परत दरबारात येणार नाही, युवराज संभाजी राजे येतील असे सांगितले. यानंतर संभाजीस मानाचा पोषाख दिला.

### ५) शिवाजी महाराजांना आग्र्यात कैद :

शिवाजी महाराज दरबारातून निघून गेल्यानंतर दरबारात शिवाजी महाराजांच्या विरूद्ध कटकारस्थानास उधाण आले. कारण मुघल दरबारात शिवाजी महाराजांना विरोध करणारा एक गट होता. त्यामध्ये औरंगजेबाची बहीण जहाँआराबेगम, वजीर जाफरखानाची बायको म्हणजे शाहिस्तेखानाची बहीण व महाराजा जसवंतसिंह इत्यादींचा समावेश होता. त्यांनी शिवाजीच्या विरूद्ध बादशहाचे कान भरले. शिवाजी महाराजांना ठार मारावे की, कैदेत ठेवावे याबद्दल खल झाला. शेवटी महाराजांना रणअंदाजखानाच्या स्वाधीन करण्याचे ठरले. रणअंदाजखान म्हणजे मृत्यू हे रामसिंगाच्या लक्षात आल्यानंतर त्याने बादशहाला त्याच्या हवाली न करण्याबाबत विनंती केली. तेव्हा शिवाजी महाराज पळून जाणार नाही अथवा काही गडबड करणार नाही याबद्दल जामीनपत्र घेतले. मात्र बादशहाने रामसिंहाची नियुक्ती काबूल मोहिमेवर केली. सोबत महाराजांना घेऊन जाण्याचा आदेश दिला. या मोहिमेत रणअंदाजखान येणार होता. ही घटना रामसिंहाला धोक्याची घंटा वाटत होती. त्यामुळे रामसिंहाने महाराजांना सावध केले. वजीर जाफरखानाला मोठी लाच देऊन काबूल मोहिमेवरील आपली नियुक्ती रद्द करून घेतली. दरम्यान महाराजांनी दरबारातील उमीर-उमराव व सरदारांना मौल्यवान नजराणे पाठवून त्यांच्या मनात सहानुभूती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मुहमंद अर्मानखानामार्फत महाराजांनी बादशहाकडे अर्जी केली की, पुरंदरच्या तहानुसार बादशहाला दिलेले किल्ले परत केले तर आपण बादशहाला २ कोटी रूपये देण्यास तयार आहोत. शिवाय संभाजी राजेना बादशहाच्या नोकरीस ठेवण्यास तयार असून आपणास दक्षिणेत जाण्याची परवानगी द्यावी. या अर्जाचा काही एक फायदा झाला नाही, उलट बादशहाने महाराजांची नजर कैद अधिक कडक केली. अगदी रामसिंहाला भेटण्यास मनाई केली. महाराजांच्या डेऱ्यावर फौलादखानाचा पहारा बसवला.

## ६) शिवाजी महाराजांची आग्र्याहून सुटका :

फौलादखानाचा पहारा बसविल्यानंतर शिवाजी महाराजांना पुरते कळाले होते की, आपण औरंगजेबाच्या कैदेत सापडलो आहोत. मात्र महाराजांनी हार न मानता अनेक युक्त्या लढवून या बिकट प्रसंगातून स्वत:ची सुटका करून घेतली. प्रथम त्यांनी औरंगजेबाकडून स्वत: बरोबर आणलेल्या लोकांची दक्षिणेत जाण्याची व्यवस्था करण्यासाठी त्यांना परवाने प्राप्त करून दिले. स्वत:बरोबर काही निवडक लोकच ठेवले. रामसिंगास सांगून त्यांची जामिनकी रद्द केली. आपण आजारी आहोत अशा अफवा पसरवल्या. आपल्या प्रकृतीला आराम मिळावा यासाठी ब्राह्मण, फकीर, साधूसंत, दरबारी लोक, गोरगरीब यांना मिठाईचे दान देण्यास सुरूवात केली. याचा फायदा घेऊन १६ ऑगस्ट १६६६ रोजी एका पेटाऱ्यात स्वत: महाराज व दुसऱ्या पेटाऱ्यात युवराज संभाजी राजे बसले व सुखरूप बाहेर पडले. खरेतर नेमके महाराज पेटाऱ्यातून बाहेर पडले की अन्य मार्गाचा अवलंब केला याबाबत अभ्यासकामध्ये मतमतांतर आहेत.

शिवाजी महाराज जेव्हा आग्र्यातून बाहेर पडले तेव्हा त्यांच्या जागी हिरोजी फर्जद महाराजांच्या गादीवर झोपले होते व मदारी मेहतर त्यांची सेवा करत आहे असे सोंग आणले होते. पुढे हे दोघेही १८ ऑगस्ट १६६६ रोजी आग्र्यातून निसटले. मात्र बराच काळ लोटूनही महाराजांच्या डेऱ्यात काहीच हालचाल होत नाही हे पाहून फौलादखान खात्री करण्यासाठी आत गेला असता शिवाजी महाराज तेथून निसटल्याची खात्री झाली. या संदर्भात फौलादखानाने औरंगजेबास वर्तमान सांगितले की, ''राजा कोठडीत होता. वरचेवर जाऊन पहात असता एका एकी गायब जाहला. पळाला की जमिनीमध्ये घुसला की आस्मानात गेला हे न कळे. आम्ही जवळच आहोत. देखत नाहीसा झाला, काय हुन्नर जाहाला न कळे'' हे वर्तमान ऐकताच औरंगजेबाचा संताप अनावर झाला. तात्काळ दक्षिणेच्या सर्व मार्गावर सैनिक पाठवून वाट रोखून धरण्याचे आदेश दिले.

## ७) शिवाजी महाराजांचे स्वराज्यात आगमन :

आग्र्याच्या कैदेतून बाहेर पडल्यानंतर शिवाजी महाराजांनी आपल्या साथीदारांसह वेशांतर केले, साधू बैरागी बनून मथुरेला गेले. तेथे मोरोपंत पिंगळे यांच्या मेहुण्याकडे युवराज संभाजी महाराजांना ठेवले. त्यानंतर ते बुंदेलखंड, अलाहाबाद, गोंडवान, गोवळकोंडा मार्गे १२ सप्टेंबर १६६६ रोजी राजगडावर पोहचले. महाराजांनी हा प्रवास केवळ २५ दिवसामध्ये केला. राजगडावर आल्यानंतर युवराज संभाजी राजे मृत्यू पावल्याची खोटी बातमी पसरवली, कारण ते जर जिवंत आहेत याचा सुगावा मुघल सैन्याला लागला असता तर त्यांनी संभाजी राजेना शोधण्याचा कसोशीने प्रयत्न केला असता. असे करण्यात संभाजी राजांच्या जिवितास धोका पोहोचू नये, हा उद्देश होता. पुढे कृष्णाजी विश्वासराव या विश्वासू नोकराने संभाजी राजांना २० नोव्हेंबर १६६६ रोजी राजगडावर आणले.

## क) आग्रा भेटीचे महत्त्व :

### १) शिवचरित्रातील क्रांतीकारी घटना :

शिवाजी महाराजांची आग्रा भेट, कैद व सुटका ही घटना एक क्रांतीकारी घटना आहे. अत्यंत कडेकोट बंदोबस्त, औरंगजेब बादशाहाची करडी नजर, कट-कारस्थान करणाऱ्यांचा चोहोबाजूंनी वेढा असताना महाराजांनी अत्यंत शिताफीने स्वत:ची सुटका करून घेतली.

### २) औरंगजेब बादशहाचा कट उधळला :

शिवाजी महाराजांची आग्रा भेट ही औरंगजेबाच्या राजकीय कट-कारस्थानाचा एक भाग होता. बाहेरून स्नेह व आतून कपट अशी औरंगजेबाची ख्याती होती. बादशहाच्या कट-कारस्थानाचा कुटील डाव महाराजांनी स्वत:ची सुटका करून लीलया उधळून लावला. शिवाजी महाराज म्हणजे एखादे किरकोळ व्यक्तिमत्व नाही, ही गोष्टही औरंगजेबाच्या ध्यानात आली.

### ३) शिवाजी महाराजांचा आत्मविश्वास वाढला :

मुघल बादशहाच्या कैदेतून स्वत:ची सुटका करून घेतल्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढला. त्याचबरोबर औरंगजेबाच्या लष्करी सामर्थ्याबद्दल जो भ्रम होता तोही नाहीसा झाला. उत्तरेतील राजकीय परिस्थितीची माहिती मिळाली. मुघल दरबाराचे अवलोकन करता आले.

### ४) कार्यक्षम कारभार यंत्रणेची खात्री :

शिवाजी महाराज आग्र्याच्या कैदेत असताना परत येण्याची खात्री नव्हती. स्वराज्यातील महत्त्वाचे किल्ले, मुघलांच्या ताब्यात असतानाही स्वराज्यातील कोणतीही व्यक्ती शत्रूच्या आमिषाला बळी पडली नाही अथवा राजद्रोह केला नाही. महाराज परत आल्यानंतर त्यांना सर्व व्यवस्था उत्तम वाटली आणि आपल्या कारभार यंत्रणेची खात्री पटली.

### ५) पुरंदरचा तह संपुष्टात आला :

पुरंदरच्या तहामध्ये ज्या अटी-शर्थी घातलेल्या होत्या त्याची पूर्ती आग्राभेटीच्या निमित्ताने होणार होती, मात्र औरंगजेब बादशहाने विश्वासघात करून महाराजांना कैद केले. त्यामुळे पुरंदरच्या तहातील अटी फेटाळून लावण्याची संधी मिळाली. ज्याप्रकारे महाराजांनी स्वत:ची सुटका करून घेतली त्याच प्रमाणे पुरंदरचा तह संपुष्टात आला.

### ६) औरंगजेबाच्या मनात धास्ती निर्माण झाली :

शिवाजी महाराजांनी ज्या प्रकारे आग्र्यामधून स्वत: व आपल्या सहकाऱ्यांची सुटका करवून घेतली, त्याची मुघलांना पुढे फार मोठी किंमत मोजावी लागली. शिवाजी महाराजांच्या धाडसाची औरंगजेबाने एक प्रकारे धास्तीच घेतली. शिवाजी महाराजांची सुटका म्हणजे एक प्रकारची घोडचूक होती हे औरंगजेबाने मान्य केले.

या संदर्भाची खंत त्याने आपल्या मृत्युपत्रात लिहिलेली आढळते. ''सर्व राज्यातील घडामोडीची बित्तंबातमी राज्यकर्त्याला असणे आवश्यक आहे. थोडाही हलगर्जीपणा हा जन्मभर पश्चाताप करावयास लावतो. पहा माझ्या हलगर्जीपणामुळे शिवाजी निसटला आणि त्यामुळे पुढे आयुष्याच्या अखेरीपर्यंत मला मोहिमात रखडावे लागले.'' अशी घोडचूक पुन्हा करावयाची नाही असे त्याने ठरविले. म्हणूनच पुढे त्याने संभाजी महाराजांची हत्या केली.

## ड) आग्रा भेटीनंतरच्या प्रमुख घटना :

### १) मुघलांशी सलोख्याचे धोरण :

आग्रा सुटकेनंतर शिवाजी महाराजांनी दुसऱ्या सुरत लुटीपर्यंत (१६७०) शांततेचे धोरण स्वीकारले होते. २२ एप्रिल १६६७ रोजी औरंगजेबाला पत्र पाठवून आपण मित्रत्वाचे संबंध ठेवू इच्छित असल्याचे कळविले होते. १८ ऑगस्ट १६६७ रोजी मिर्झाराजा जयसिंहाचा मृत्यू झाला व त्याच्या जागी दक्षिणेचा सुभेदार म्हणून मुअज्जमची नियुक्ती झाली. त्याने दक्षिणेत येताच शिवाजी महाराजांशी सलोखा ठेवला, महाराजांना राजेपद व संभाजी राजेना पंचहजारी मनसब मिळवून दिली.

### २) मुघल-मराठे संघर्ष :

आग्रा सुटकेनंतर मराठे व मुघलांना तात्कालिक स्वरूपाच्या मैत्रीची गरज होती. मात्र शहजादा मुअज्जम मराठ्यांना सामील झालेला आहे अशी तक्रार दिलेरखानाने औरंगजेबाकडे केल्याने औरंगजेबाने औरंगाबाद मधील मराठ्यांचे प्रतिनिधी प्रतापराव गुजर व निराजी रावजी यांना पकडण्याचा आदेश दिला. मुअज्जमने त्यांना सावध करून पाठवून दिले. या कारणामुळे मुघल मराठे संघर्ष पुन्हा सुरू झाला. याच काळात ९ एप्रिल १६६९ रोजी औरंगजेबाने हिंदू मंदिरे व शिक्षण केंद्रे उद्‌ध्वस्त करण्याचा आदेश दिला, त्यानुसार सप्टेंबर १६६९ मध्ये काशी मधील विश्वनाथ मंदिर पाडून तेथे मशिद बांधण्यात आली. या कारणाने मुघल मराठा संघर्ष पुन्हा सुरू झाला. पुरंदरच्या तहाने गेलेले किल्ले पुन्हा जिंकण्याची संधी निर्माण झाली.

### ३) कोंडाणा (सिंहगड) परत घेतला :

पुरंदरच्या तहाने मुघलांकडे २३ किल्ले गेलेले होते. त्यातील कोंडाणा हा महत्त्वपूर्ण किल्ला होता. या किल्ल्यावर उदयभान हा मुघल किल्लेदार होता. तानाजी मालुसरे या मराठा सरदाराने केवळ १००० मावळ्यांच्या साथीने ४ फेब्रुवारी १६७० रोजी कोंडाण्यावर हल्ला केला. झालेल्या संघर्षात उदयभान व तानाजी मालुसरे मारले गेले. मात्र कोंडाणा मराठ्यांच्या ताब्यात आला. महाराजांनी तानाजीचा भाऊ सुर्याजी याला कोंडाणा उर्फ सिंहगडाची सुभेदारी दिली.

### ४) राजाराम महाराजांचा जन्म :

शिवाजी महाराजांच्या दुसऱ्या राणीसाहेब सोयराबाई यांच्या पोटी दि. २४ फेब्रुवारी १६७० रोजी राजाराम महाराज यांचा रायगडावर जन्म झाला.

### ५) सुरतेची दुसरी स्वारी :

शिवाजी महाराज सुरतेवर पुन्हा हल्ला करणार असल्याची अफवा उठल्यानंतर गुजरातचा सुभेदार बहादूरखान ५००० सैन्यासह सुरतमध्ये मुक्कामास राहीला, मात्र शहाजादा मुअज्जम व दिलेरखानांच्या अंतर्गत संघर्षामुळे बहादुरखान सुरतेहून निघून गेला. याचा फायदा घेत शिवाजी महाराजांनी ३ ते ५ ऑक्टोबर १६७० रोजी सुरतेवर हल्ला केला. यामध्ये महाराजांना ६६ लाख रूपयांची लूट मिळाली. मराठा सैन्य परत येताना मुघल सरदार दाऊदखान कुरेशी याने नाशिक जवळील वणी-दिंडोरी येथे पाठलाग करून गाठले, भयंकर युद्ध झाले. मराठ्यांचा विजय झाला. सुरत लुटीचा परिणाम म्हणजे औरंगजेबाच्या विश्वसनीयतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले, सुरत हे जगप्रसिद्ध व्यापारी शहर मोडकळीस आले. सुरत स्वारीनंतर महाराजांनी पुढे मुघलांचा अनेक ठिकाणी पराभव केला. यामध्ये बागलाण, बहादूरपूरा, कारंजा, साल्हेर इत्यादीचा समावेश होता.

### ६) पन्हाळा स्वराज्यात :

अली आदिलशहाच्या मृत्युमुळे आदिलशाही दरबारात अंतर्गत गोंधळ सुरू झाला, याचा फायदा घेत अण्णाजी दत्तो व कोंडाजी फर्जद यांच्यावर पन्हाळा किल्ला जिंकण्याची कामगिरी दिली. कोंडाजी फर्जद याने केवळ ६० सैनिकांच्या मदतीने अतिशय शिताफीने ७ मार्च १६७३ रोजी पन्हाळा जिंकून घेतला.

### ७) प्रतापराव गुजरांचा पराक्रम :

मराठ्यांनी पन्हाळा जिंकून घेतल्यामुळे आदिलशाहाला मोठा धक्का बसलेला होता व मराठ्यांचा बंदोबस्त करण्यासाठी बहलोलखानाची नियुक्ती केली. बहोलोलखानाचा बंदोबस्त करण्याची जबाबदारी प्रतापराव गुजर व आनंदराव मकाजी यांच्याकडे होती. अमराणी येथे उभयतामध्ये तुंबळ युद्ध झाले, जेव्हा बहोलोलखान शरण आला, त्याला गुजरांनी सोडून दिले. मात्र बहोलोलखानाने पुन्हा सैन्याची जमाव जमव करून मोहीम सुरू केली. याचा महाराजांना राग आला. बहोलोलखानाचा बिमोड केल्याशिवाय तोंड दाखवू नका अशी प्रतापराव गुजरांना आज्ञा केली. प्रतापराव गुजरांना चूकीच्या निर्णयाबद्दल पश्चाताप झाला, ही गोष्ट त्यांच्या फारच मनाला लागलेली होती. त्याचा बदला घेण्यासाठी त्यांनी बहोलोलखानावर नजर ठेवली, तो नेसरी खिंडीत आल्याची बातमी समजताच बहोलोलखानावर तुटून पडले, यामध्ये प्रतापरावासह सहा जण मारले गेले (२४ फेब्रुवारी १६७४) या घटनेने महाराजांना अतिव दुःख झाले. प्रतापराव गुजर यांच्यानंतर महाराजांनी आनंदराव मकाजी यांना सेनापतीपद दिले.

## (अ) स्वयं-अध्ययन प्रश्न :

**रिकाम्या जागा भरा.**

१. मिर्झाराजा जयसिंहाची ......... मध्ये दक्षिणेवर मोहीम सुरू झाली.

२. ......... रोजी शिवाजी महाराज व जयसिंह यांच्यात पुरंदरचा तह झाला.

३. शिवाजी महाराजांनी ......... रोजी आग्र्याकडे प्रयाण केले.

४. आग्र्यामध्ये शिवाजी महाराजांच्या डेऱ्यावर ....... चा पहारा होता.

५. ......... मधील लढाईत प्रतापराव गुजर मारले गेले.

## २.२.२ शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक :

शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ही केवळ शिवचरित्रातील नव्हे तर अखिल महाराष्ट्राच्या गेल्या दोन हजार वर्षांच्या इतिहासातील एक अनन्यसाधारण अशी घटना मानली जाते. शिवराज्याभिषेकाचा हा प्रसंग मध्ययुगीन भारताच्या इतिहासात सुवर्ण अक्षरांनी नोंदविला जावा इतका महत्त्वाचा आहे. म्हणूनच कृष्णाजी अनंत शिवाजी महाराजांचा आद्य चरित्रकार या घटनेचे यथार्थपणे वर्णन करताना म्हणतो, ''.... मऱ्हाटा पातशहा एवढा छत्रपती जाला. ही गोष्ट काही सामान्य जाली नाही.'' खरोखरच या घटनेने महाराष्ट्रातील लोक जीवनात एक प्रकारची क्रांतीच घडून आली.

चौदाव्या शतकात इ.स. १३१७ साली दिल्लीच्या मुबारक खिलजी या सुलतानाने देवगिरीच्या यादवांचे मराठा साम्राज्य कायमचे नष्ट केल्यावर महाराष्ट्र साडेतीनशे वर्षे गुलामगिरीच्या शृंखलांनी जखडला गेला होता. सर्वत्र पारतंत्र्याचा, गुलामीचा व अवहेलनेचा हाहाकार माजला होता. या युगात केवळ मुसलमान राजे होऊ शकतात. एतद्देशीयांना राजेपद मिळवताच येणार नाही; या न्यूनगंडाने सर्व हिंदवी समाज पछाडलेला होता. अशा काळात या न्यूनगंडाला व गुलामी मानसिकतेला छेद देऊन महाराजांनी राज्याभिषेक करवून या मृतवत समाजात नवचैतन्य निर्माण केले आणि एत्तद्देशीयांच्या अस्मितेला घटनात्मक स्वरूप प्राप्त करून दिले. महाराजांचा हा राज्याभिषेक ६ जून १६७४ रोजी त्यांची नूतन राजधानी रायगड येथे झाला. या अद्वितीय अशा राज्याभिषेक सोहळ्याची महाराजांना का आवश्यकता भासली; त्यामागे त्यांचा कोणता उद्देश होता, हे समजून घेणे गरजेचे आहे.

### अ) राज्याभिषेकाची आवश्यकता :

### १) स्वतंत्र व खऱ्याखुऱ्या राजपदाची गरज :

देवगिरीच्या यादवांच्या साम्राज्यनाशानंतर हिंदू समाजात राज्याभिषेक झाला नव्हता. निजामशाही व आदिलशाही या दक्षिणेतील शाह्या तसेच उत्तरेतील मोगल बादशाही त्यांच्या पदरी असणाऱ्या अनेक

पराक्रमी मराठा सरदारांना 'राजा' हा किताब देत असत. पण ते सर्व नावाचेच 'राजे' असत. खरी सत्ता या मुस्लिम शाह्यांचीच चालत असे. जावळी, पालवण, शृंगारपूर, मुधोळ अशा ठिकाणांच्या जाहगिरदारांनाही 'राजे' असे संबोधले जाई. खुद्द महाराजांचे आजोबा व वडीलही 'राजे' हे पद लावत. पण तरीही ते मुस्लिम सत्ताधिशांचे चाकरच होते. खरेखुरे स्वतंत्र राजे नव्हते. महाराजांना असे दुसऱ्यांनी बहाल केलेल राजेपद नको होते. त्यांना खरेखुरे, स्वतंत्र व सार्वभौम असे राजेपद हवे होते. हे अधिकृत राजेपद प्राप्त होण्यासाठी त्यांना राज्याभिषेकाची आवश्यकता वाटली.

**२) बंडखोर जहागिरदार या प्रतिमेचा नाश / भंग :**

शिवाजी महाराजांचे वडील आदिलशाहीचे जहागीरदार होते. त्यामुळे आदिलशाहाच्या दृष्टीने महाराज म्हणजे जहागीरदाराचा एक बंडखोर पुत्रच होता. आदिलशाहाबरोबरच कुतुबशहा, मुघल व पोर्तुगीज, इंग्रज यांच्यासारख्या परकीय सत्ता यांचाही महाराजांकडे पाहण्याचा दृष्टीकोन तोच होता. इतकेच नव्हे तर महाराष्ट्रातील शिर्के, मोरे, घोरपडे, निंबाळकर यांच्यासारखे मराठे सरदार स्वत:प्रमाणे महाराजांनाही आदिलशाहाचे चाकरच समजत होते. त्यामुळे महाराजांना हे दाखवून द्यायचे होते की, ते जरी मुळात जहागीरदार पुत्र असले तरी प्रस्थापित मुस्लिम राजवटी विरूद्ध बंडखोरी करण्याची पायरी त्यांनी ओलांडली आहे आणि आता त्यांच्या उद्देशाची व कार्याची व्याप्ती वाढली आहे. त्यांचे कार्य म्हणजे आता केवळ बंडखोरी राहिली नसून त्यांनी स्वतंत्र मराठी राज्याची स्थापना केली आहे, आणि ते आता स्वतंत्र राज्यकर्ते बनले आहेत.

**३) मुस्लिम सत्तांना इशारा :**

अभिषिक्त राजा होण्यामागे महाराजांचा आणखी एक उद्देश होता. तो म्हणजे हिंदुस्थानातील तत्कालीन जुलमी मुस्लिम सत्ताधीशांना इशारा देणे. या राज्याभिषेकाच्या सोहळ्याने महाराजांना समस्त मुस्लिम सत्ताधिशांना इशारा द्यायचा होता की, आता एत्तद्देशियांना एक अभिषिक्त राजा मिळाला आहे. त्यामुळे येथून पुढे हिंदूंवरच नव्हे तर अन्य कोणत्याही धर्माच्या प्रजेवरील अन्याय व छळ सहन केला जाणार नाही. आणि तसा जर अन्याय झाला तर त्या जुलमी सत्तेस शासन करण्यासाठी या हिंदवी स्वराज्याचा छत्रपती कटिबद्ध असेल.

**४) कायदेशीर अडचणीचे निवारण :**

महाराजांनी आपल्या जहागिरीचा बराच विस्तार केला होता. अनेक प्रदेश जिंकले. अनेक गडकोट ताब्यात घेतले. सैन्य वाढविले, आरमार उभारले, स्वतंत्र राज्यकारभार यंत्रणा उभारली. खजिन्यात अगणित संपत्ती जमा केली. अशी सर्वार्थाने आपल्या राज्याची शक्ती वाढवली असली तरी, कायदेशीरदृष्ट्या ते एक सामान्य जहागिरदारच होते. आदिलशहाचे चाकर होते. एक राज्यकर्ता म्हणून आपल्या प्रजेवर ते घटनात्मक अधिकार चालवू शकत नव्हते. कायदेशीररित्या देणग्या, वृत्तपत्रे, इनामपत्रे ते देऊ शकत

नव्हते. त्यांनी केलेल्या करारमदारांना कायदेशीरपणा प्राप्त होऊ शकत नव्हता. तसेच कर वसूल करणे, नवे कर जाहीर करणे, न्यायदान करणे, शिक्षा करणे या राज्यकारभाराच्या बाबींनाही महाराज अभिषिक्त राजे नसल्यामुळे अडचणी येत होत्या. त्याकाळच्या चातुर्वर्ण्य पद्धतीत तर फक्त राजाच ब्राह्मणाला शिक्षा देऊ शकत असे. त्यामुळे महाराजांना ही प्रकरणे न्यायदानासाठी ब्राह्मणाकडे सोपवावी लागत. या सर्वच कायदेशीर अडचणींचे निवारण करण्यासाठी आणि राज्याचा नैतिक व शास्त्रीय हक्क प्राप्त करण्यासाठी महाराजांना राज्याभिषेकाची आवश्यकता भासली.

**५) पृथ्वी नि:क्षत्रिय कल्पनेचा नाश :**

तत्कालीन हिंदु समाजातील धर्ममार्तंडांनी समाजात असा समज रूढ केला होता की, परशुरामाने २१ वेळा पृथ्वी नि:क्षत्रिय केली आहे. त्यामुळे आता जगात कोणीही क्षत्रिय राहिलेला नाही. तसेच कोणी हिंदुराजा होऊ शकत नाही. पण धर्ममार्तंडांचा हा सिद्धांत अत्यंत आत्मघातकी होता. जे या सिद्धांताचा पुरस्कार करत होते त्यांना आदिलशहा, सिद्धी, मुघल हे 'राजा' म्हणून चालत होते. त्यांना ते क्षत्रियत्वाचा निकष लावत नव्हते. पण आपल्या धर्माच्या राजास मात्र ते क्षत्रिय मानायला तयार नव्हते. महाराजांना या मूर्ख कल्पनेचाच नाश करायचा होता. तसेच जगात क्षत्रिय आहेत, आपण क्षत्रिय आहोत, आणि आपण राजा होऊ शकतो, हेही त्यांना राज्याभिषेकाच्या निमित्ताने सिद्ध करायचे होते.

**६) राज्याभिषेक एक संस्कार :**

राज्याभिषेक हा जसा एक सार्वभौमत्व सिद्ध करणारा प्रसंग होता तसेच तो एक धार्मिक सोहळाही होता. हिंदु राजनीतीमधील हा धार्मिक वाटणारा सोहळा, एक प्रकारे राजनैतिक संस्कार करणारा सोहळा होता. त्यामुळे महाराजांच्या राज्यकारभाराला एक धर्मशास्त्रीय बैठक मिळणार होती. या संस्काराचे महत्त्व सांगताना प्रा. न. र. फाटक म्हणतात. ''कोणत्याही प्रकारच्या अभिषेकादि संस्काराशिवाय जशी सिंहाची मृगेंद्रता विक्रमार्जित म्हणून स्वयंसिद्ध असते; तसेच महाराजांचे राजस्व स्वयंसिद्ध असले तरी खाणीतून काढलेल्या सोन्याला त्याच्या मुळ सोनेपणात कसलीच उणीव नसूनही अग्निसंस्काराने त्याचा चमकदारपणा वाढविला जातो, त्याच न्यायाने महाराजांच्या राज्याभिषेकाचा विचार करणे चांगले.'' अशाप्रकारे या संस्काराने महाराजांचे राजेपण अधिकच उजळणार होते.

**७) प्रजाजनांवर छाप :**

महाराजांनी आपल्या कर्तबगारीने जहागिरीचे रूपांतर स्वराज्यात केले होते. प्रजेची गुलामी व अन्याय यातून मुक्तता केली होती. आता आपल्या सामर्थ्याला वैभवाची व समृद्धीची जोड देण्याची वेळ आली होती. आपल्या प्रजाजनांवर छाप पाडण्यासाठी आणि परकीयांवर दरारा निर्माण करण्यासाठी एक भव्य दिव्य अशा सोहळ्याची आवश्यकता होती. अशाप्रकारच्या सोहळ्यातून वैभवाचे प्रदर्शन करणे राजनीतीसाठी गरजेचे असते. महाराजांच्या या प्रचंड उद्योगाची सांगता राज्याभिषेकानेच व्हावी आणि ही घटना जनतेच्या अंत:करणावर कायमची ठसावी यासाठी महाराजांनी राज्याभिषेकाची आखणी केली होती.

## ८) स्वतंत्र व सार्वभौम कल्पना :

हिंदुस्थानात एतद्देशियांचे एकही सार्वभौम राज्य शिल्लक राहिले नव्हते. सर्व पराक्रमी हिंदु सरदार आदिलशाही, कुतुबशाही व मुघल बादशहाचे चाकर बनले होते. खुद्द आदिलशाही व कुतुबशाही यांनीही मुघलांचे मांडलिकत्व स्वीकारले होते. उत्तरेतील रजपूत राजेही मुघलांचे मांडलिक बनले होते. त्यामुळे त्यांची राज्येही सार्वभौम राज्ये राहिली नव्हती. अशा पार्श्वभूमीवर महाराजांनी स्वतंत्र व सार्वभौम राज्याची कल्पना मांडली आणि राज्याभिषेकाने ती प्रत्यक्षात उतरवली. या राज्याभिषेकाने महाराजांनी सर्व जगास दाखवून दिले की दक्षिणेत एतद्देशियांची एक नवी सत्ता उदयास आली आहे. आणि ही सत्ता स्वतंत्र व सार्वभौम आहे. रियासतकार सरदेसाई याबद्दल म्हणतात, ''महाराजांचे हे कृत्य म्हणजे नूतन राज्याची जाणीव उत्पन्न करण्यासाठी केलेला भरीव व यशस्वी प्रयत्न होय.''

## ब) महाराजांचा राज्याभिषेक सोहळा :

### १) महाराजांच्या क्षत्रियत्वाचा प्रश्न :

आपण मागे पाहिल्याप्रमाणे हिंदू समाजात पृथ्वीच्या नि:क्षत्रियत्वाची कल्पना रूढ होती. अकबराच्या काळातील धर्मपंडित कृष्ण नृसिंह शेष याने आपल्या 'शुद्राचार शिरोमणी' या ग्रंथात ही संकल्पना मांडली होती. त्याचाच प्रभाव समस्त हिंदु प्रजेवर पडला होता. त्यामुळे महाराजांच्या राज्याभिषेकाचा विचार पुढे आल्यावर तत्कालीन धर्मपंडितांनी दोन प्रश्न उपस्थित केले. पहिला, या जगात क्षत्रिय आहेत काय ? आणि दुसरा, असतील तर महाराज क्षत्रिय आहेत काय ? आता, हा सामाजिक व धर्मशास्त्रीय प्रश्न सत्तेचा धाक व बळाचा वापर करून महाराज सोडवू शकले असते. पण त्यांना या प्रश्नाच्या मुळाशी जाऊन 'पृथ्वी नि:क्षत्रिय' या सिद्धांतावरच प्रहार करायचा होता. महाराज स्वत:ला सिसोदिया या रजपूत वंशातील मानत होते. पण त्यासंबंधी सबळ पुरावा मिळवण्याच्या उद्देशाने त्यांनी आपल्या पदरी असणाऱ्या बाळाजी आवजी, केशवभट पुरोहित, भालचंद्र भट अशा पंडितांचे एक शिष्टमंडळच उत्तरेतील उदयपूर, अंबर, काशी इत्यादी ठिकाणी पाठवले. या शिष्टमंडळाने उदयपूरच्या घराण्यातून सिसोदिया कुळाची महाराज त्याच वंशातील आहेत हे सांगणारी वंशावळ प्राप्त केली. तसेच या घराण्यातील राज्याभिषेकाच्या विधीची शास्त्रीय माहितीही मिळवली. अशाप्रकारे महाराजांचे क्षत्रियत्व सिद्ध करणारे पुरावे घेऊन हे शिष्टमंडळ काशीला गेले.

### २) गागाभट्टास पाचारण :

काशीला आलेले महाराजांचे शिष्टमंडळ तेथील हिंदू जगतात प्रसिद्ध असलेल्या गागाभट्ट या अध्वर्युत्व महापंडिताला भेटले आणि त्यांनी त्याला महाराजांच्या वतीने राज्याभिषेकाचे अध्वर्युत्व

स्वीकारण्याची विनंती केली. त्यांनी ती मान्य केली. गागाभट्ट हा खरे तर मूळचा महाराष्ट्रातील पैठण गावचा. पण १६ व्या शतकात अनेक विद्वान ब्राह्मणांनी मुस्लिम सत्ताधीशांच्या अत्याचाराला कंटाळून पैठण सोडून काशीत वास्तव्य केले. त्यात ते भट्ट घराणे होते. गागाभट्ट हिंदू धर्मशास्त्र व तत्त्वज्ञानाचा प्रकांड पंडित समजला जात होता. त्यामुळे त्याला 'कलीयुगाचा ब्रह्मदेवच' म्हटले जात होते. तो धर्मशास्त्राच्या निर्णयासाठी अनेकदा महाराष्ट्रात येऊन गेला होता. तेव्हा त्याचा महाराजांशी परिचयही झाला होता.

अशा महापंडिताला महाराजांनी राज्याभिषेकासाठी निमंत्रित केले आणि गोविंद भट्ट खेडकर यास गागा भट्टाला उत्तरेतून आणण्यास पाठविले. गागा भट्टाने आल्यानंतर आपल्या अलौकिक बुद्धिमत्तेने व ज्ञान प्रभुत्वाने राज्याभिषेकास विरोध करणाऱ्या सर्व मंडळींच्या शंकांचे निरसन केले आणि मग राज्याभिषेकाची तयारी सुरू झाली.

### ३) राज्याभिषेकपूर्व तयारी व विधी :

महाराजांच्या राज्याभिषेकाची तयारी त्यांनी नूतन राजधानी रायगड येथे सुरू केली. राज्याभिषेकाला आवश्यक असणाऱ्या राजमंदिर, मंत्रसभा, धर्मसभा, चित्रसभा, राज्याचे महाल, गजशाळा, पाकशाळा, कोठ्या, सरकारकूनांचे वाडे, बाजारपेठा इत्यादी इमारती बांधून तयार केल्या गेल्या. हिरोजी इंदूलकरने जगदिश्वराचे मंदिर व राजसभा सारखी बांधकामे केली. आबाजी सोनवदेवाने महाराजांचे निवासस्थान बांधले. रायगडावरील गंगासागर, हत्ती तलाव, हनुमान टाके, बारा टाकी, कुशावर्त तलाव, अधिक नेटके केले. बालेकिल्ल्याच्या मध्यभागी महाराजांच्या सिंहासनाची जागा निवडण्यात आली.

रायगड ही राजधानी म्हणून महाराजांनी का निवडली हे सांगताना सभासद म्हणतात, 'गड बहुत चकोट, चौतर्फी गडाचे कडे ताशिल्याप्रमाणे दिड गाव उंच, पर्जन्यकाली कडियावरी गवत उगवत नाही. आणि धोंडा ताशीव एकच आहे. असे देखोन बहुत संतुष्ट झाले. आणि बोलिले तख्तास जागा हाच गड करावा.''

राजधानीला सुसज्ज करण्याबरोबरच महाराजांनी राज्याभिषेकापूर्वी काही विधी करून घेतले. सुरुवातीला त्यांनी आपल्या राज्यातील देवदेवतांचे दर्शन घेतले. प्रतापगडावर तुळजाभवानीच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करून तेथे मंदिर बांधले. देवीचे दर्शन घेऊन ते रायगडावर परतले. मग २९ मे, १६७४ रोजी गागा भट्टाने भोसले कुळात लुप्त होत चाललेला उपनयन संस्कार महाराजांवर क्षत्रिय पद्धतीने केला. त्यानंतर महाराजांचा तुलादानविधी झाला. यावेळी त्यांची तुला करण्यासाठी १६००० होन लागले असे या सोहळ्यास उपस्थित असलेल्या हेन्री ऑक्झिंडेन या इंग्रज वकीलाने नमूद केले आहे. त्यानंतर महाराजांचे त्यांच्या राण्याशी समंत्रक विवाह आदी अनेक वैदिक विधी करण्यात आले. राज्याभिषेकाच्या दिवसांपर्यंत रोज अनेक प्रकारचे विधी व दानधर्म अखंडपणे चालू होते.

## ४) राज्याभिषेक समारंभ :

महाराष्ट्राला शेकडो वर्षांच्या गुलामगिरीतून सोडवणारा आणि मराठी प्रजेची अस्मिता व स्वाभिमान जागवणारा दिवस उजाडला. जेष्ठ शुद्ध १२, शनिवार ता. ६ जून, १६७४ रोजी रायगडावर महाराजांना राज्याभिषेक झाला. मध्ययुगातील हिंदुस्थानच्या इतिहासाला कलाटणी मिळाली. या राज्याभिषेक समारंभाची सुरुवात ५ जूनच्या सायंकाळपासूनच झाली होती. शुक्रवारी सायंकाळी सुरू झालेला समारंभ शनिवारी सकाळी संपला. या राज्याभिषेकाचे वर्णन अनेक बखरीत व परकीयांच्या कागदपत्रांत केलेले आढळते.

शुक्रवारी सायंकाळी प्रथम गणेशपूजन, स्वस्तिकपूजन व मातृकापूजन झाले. महाराज सोयराबाईंसोबत राज्याभिषेक मंडपात आल्यावर मंडपपूजन झाले. मंडपाच्या महावेदीभोवती प्रत्येक दिशेस चार कुंभ स्थापन केले. पूर्वेस सुवर्ण कुंभ, दक्षिणेस रजतकुंभ, पश्चिमेस ताम्रकुंभ आणि उत्तरेस मृत्तिकाकुंभ ठेवण्यात आले. त्या प्रत्येकात तुप, दूध व जल भरले होते. तसेच अनेक पवित्र नद्यांच्या व सागरांच्या जलांनीही भरलेले कुंभ ठेवले होते. विधींना प्रारंभ झाल्यावर महावेदीवर अग्नी व ग्रहांची प्रतिष्ठापना करून वेदमंत्राच्या घोषणांत होमहवन झाले. यानंतर महाराजांनी समंत्र स्नान व पंचामृतस्नान केले. शुभ्र वस्त्र परिधान केल्यावर महावेदीवरील आरूंदीवर विधीपूर्वक आरोहण केले. नंतर अग्निपूजा केल्यावर महाराज अभिषेक शाळेत गेले. अभिषेक व सिंहासनारोहण असे राज्याभिषेकाचे दोन प्रमुख विधी होते. आधी अभिषेक शाळेत मंत्रघोषात अभिषेकाला सुरूवात झाली.

## ५) महाराजांवर अभिषेक :

अभिषेकासाठी महाराजांसाठी सोन्याचे आसन तयार केले होते. त्या आसनावर महाराज, पट्टराणी सोयराबाई व युवराज संभाजीराजे विराजमान झाले. महाराजांच्या आठही दिशांना त्यांचे अष्टप्रधान कलश धरून उभे होते. पूर्वेला तुपाने भरलेला सोन्याचा कलश घेऊन महाराजांचे पंतप्रधान मोरोपंत पिंगळे, आग्नेयेस छत्र धरून आण्णाजीपंत सचिव तर दक्षिणेस सेनापती हंबीरराव मोहिते दुधाने भरलेला कलश घेऊन उभे होते. नैऋत्येस त्र्यंबकपंत सुमंत, पश्चिमेस रामचंद्रपंत अमात्य, वायव्येस दत्ताजीपंत मोर्चेल घेऊन तर ईशान्येस निराजीपंत असे अनेक प्रधान अभिषेकासाठी सज्ज होते. याशिवाय अनेक अधिकाऱ्यांच्या हाती पवित्र नद्यांच्या जलांनी भरलेले कलश होते. या सर्वांनी वेदमंत्राच्या घोषात महाराज, महाराणी व युवराजावर अभिषेक केला. त्याबरोबर चहूबाजूंनी चौघडे, तुताऱ्या निनादू लागल्या. वाद्यांचा गजर झाला. महाराजांना पंचारत्यांनी ओवाळण्यात आले. यानंतर महाराजांना पुन्हा स्नान घालण्यात आले. त्यांच्या स्नानविधी नंतर तुपाने भरलेल्या कास्यपात्रात महाराजांनी आपले मुखदर्शन केले. नवी वस्त्रे परिधान केली. हिरे व सोन्याचे अलंकार घालून डोईस मंदिल बांधला. त्यांनी ढाल-तलवार, धनुष्यबाण व रथ यांची पूजा करून ही शस्त्रे धारण केली. मग आई जिजाबाई, वडीलधारी मंडळी, गागा भट्ट व इतर विद्धान यांना नमस्कार करून त्यांच्यासह महाराज सिंहासनारूढ होण्यास राजसभेकडे निघाले.

## ६) महाराजांचे सिंहासनारोहण :

महाराजांचे सिंहासनारोहण ज्या राजसभेत होणार होते, ती राजसभा अत्यंत सुशोभित करण्यात आली होती. महाराजांसाठी अत्यंत मौल्यवान असे सिंहासन तयार केले होते ज्याच्या आठ दिशांना आठ रत्नजडीत स्तंभ होते. या सिंहासनावर महाराज बसल्यावर त्यांच्या मस्तकावर धरायचे छत्र जडावाचे व मोत्यांच्या झालरीचे होते. या सिंहासनाचे वर्णन करताना सभासद म्हणतो की, ''महाराजांनी ३२ मण सोन्याचे हे सिंहासन तयार करून कोषातील मौल्यवान रत्ने त्यामध्ये जडविली होती.'' सर जदुनाथ सरकार म्हणतात, ''बत्तीस मण म्हणजे चौदा लक्ष रूपयांचे सोने झाले रत्नांची किंमत त्याशिवाय हे सिंहासन तयार करीत असता दिल्लीचे मयूर सिंहासन शिवाजीच्या दृष्टीपुढे असावे.''

महाराजांच्या सिंहासनारोहणाचे वर्णन अत्यंत यथार्थपणे हेन्री ऑक्झिंडन याने केले आहे. तो म्हणतो, ''सिंहासनाच्या दोन्ही बाजूला सुवर्णांकित भाल्याच्या टोकावर अनेक अधिकारदर्शक व राजसत्तेची चिन्हे असल्याचे आम्ही पाहिले. उजव्या हाताला दोन मोठ्या दातांच्या मत्स्यांची सुवर्णाची शवे होती. डाव्या हाताला अनेक अश्वपुच्छे व एका मौल्यवान भाल्याच्या टोकावर सम पातळीत लोंबणारी सोन्याच्या तराजूची पारडी न्यायचिन्ह म्हणून तळपत होती.'' या राजसभेच्या भिंतीवर शुभ लक्षणी चिन्हे व चित्रे रेखाटण्यात आली होती. छत मोत्याच्या झालरींनी शृंगारले होते. राजसभेच्या प्रवेशद्वारावर सुवर्णालंकारांनी सुशोभित असे दोन हत्ती झुलत होते.

अशाप्रकारे सर्व राजसभा राज्यारोहणासाठी सज्ज झालेली असतांना महाराजांनी आपले अष्टप्रधान, अधिकारी, विद्वान व मातोश्री यांच्यासह राजसभेत प्रवेश केला. सिंहासनाजवळ येताच महाराजांनी त्यास वंदन करून त्यास पदस्पर्श न करता, वेदमंत्राचा घोष चालू असताना सिंहासनारोहण केले. युवराज, युवराज्ञी, मातोश्री आणि सर्व अधिकारी आपापल्या स्थानावर आसनस्थ झाले. महाराज सिंहासनावर आरूढ होताच नगारखान्यातील वाद्ये दूमदूमू लागली. रायगडावरून तोफा दणाणू लागल्या. त्याच बरोबर स्वराज्यातील सर्वच किल्ल्यांवरून तोफा कडाडू लागल्या. त्यांनी सर्वदिशांना गर्जून सांगितले की, मराठ्यांचा राजा 'छत्रपती' झाला. सिंहासनावर बसला. उपस्थितांनी लाह्या व सुवर्णपुष्पे उधळली. महाराजांच्या जयजयकाराने वातावरण भारून गेले. पंतप्रधान मोरोपंत यांनी महाराजांना मुजरा करून ८००० होनांची उधळण त्यांच्या मस्तकावर केली. त्यानंतर प्रत्येक प्रधानाने महाराजांना असाच होनांचा अभिषेक केला. इतर अधिकाऱ्यांनीही मुजरे केले. सोन्याच्या ताटांतून महाराजांना पंचारत्यांनी ओवाळण्यात आले. आणि मग गागा भट्टांनी मोत्यांचा तुरा वर लावलेला भरजरी राजमुकुट स्वहस्ते महाराजांच्या मस्तकी ठेवला. आणि मोत्यांची झालर लावलेले रत्नजडित राजछत्र महाराजांच्या मस्तकावर धारण करून उच्च स्वरात शिवाजी महाराज हे छत्रसिंहासनाधिश्वर व संस्कारयुक्त राजे झाल्याचे घोषित केले.

## ७) आशीर्वाद, नजराणे व दानधर्म :

महाराज आता अभिषिक्त छत्रपती झाले. यानंतर आई जिजाबाई, गागा भट्ट, इतर वडीलधारी मंडळींचे महाराजांनी आशीर्वाद घेतले. मग महाराजांची स्वारी गडावरील देवदेवतांचे दर्शन घेण्यासाठी सुवर्णालंकारांनी सजलेल्या गजराजावर आरूढ झाली. या गजराजाचे माहूत होते खुद्द महाराजांचे सेनापती हंबीरराव मोहिते. अंबारीत महाराजांच्या मागे पंतप्रधान मोरोपंत पिंगळे यांनी मोर्चेल धरले होते. मंगल वाद्यांच्या गजरात मिरवणूकीने महाराजांनी गडावरील सर्व देवदेवतांचे दर्शन घेतले. मार्गावर त्यांच्यावर फुलांची वृष्टी करण्यात येत होती. पंचारत्या होत होत्या. देवदर्शनानंतर महाराज पुन्हा राजसभेकडे आले.

यावेळी इंग्लिश, डच, पोर्तुगीज या परकीय सत्तांचे वकील उपस्थित होते. या वकीलांनी महाराजांना प्रणाम करून अनेक प्रकारचे नजराणे दिले. महाराजांनी या सोहळ्यात अपार दानधर्म केला. संत, महंत, दीनदुबळे, अनाथ, नट, नर्तक, विद्वान पंडित अशा सर्व थरांतील लोकांना दान व दक्षिणा दिल्या. महाराजांनी २४ हजार होन केवळ या दान दक्षिणेवर खर्च केले. दि. ७ जून १६७४ पासून सुरू झालेला दानधर्म पुढे १२ दिवस चालू होता. गागा भट्टास ७ हजार होनांची दक्षिणा देण्यात आली. रोज अन्नदानही मोठ्या प्रमाणावर होत होते. रायगडावरून तेव्हा कोणीही रिक्त हस्ते परत गेला नाही. सभासदांच्या म्हणण्याप्रमाणे या समारंभास 'एक करोड बेचाळीस लाख होन' खर्च झाला.

अशाप्रकारे महाराजांचा राज्याभिषेक सोहळा 'न भूतो न भविष्यती' असा साजरा झाला. महाराज सार्वभौम राजे झाले. पण या राज्याभिषेकानंतर लगेचच दहा-बारा दिवसांनी १८ जून १६७४ रोजी महाराजांच्या मातोश्री जिजाबाई मृत्यू पावल्या. शिवजन्मापासून या मातेने या भूमीला गुलामीतून मुक्त करण्याचे व शिवरायास एतद्देशियांचा सार्वभौम राजा बनवण्याचे जे स्वप्न उराशी बाळगले होते ते स्वप्न पूर्ण होताच या माऊलीने आपले प्राण सोडले. पण त्यांना आपला पुत्र सिंहासनाधिष्ठित झाल्याचे, शककर्ता झाल्याचे आणि मराठ्यांचे सार्वभौम राज्य निर्माण झाल्याचे पहायला मिळाले. सर जदुनाथ सरकारांनी जिजाबाईंची तुलना आंध्र राजा सातकर्णी यांच्या गौतमी या मातेशी केली आहे.

## क) महाराजांच्या राज्याभिषेकाचे महत्त्व :

### १) ऐतद्देशियांना राजा मिळाला :

हिंदुस्थानातील सर्व ऐतद्देशिय प्रजा अनेक शतके मुस्लिम सत्तेच्या जुलमी वरवंट्याखाली भरडली जात होती. त्यांना कोणीच वाली नव्हता. अशावेळी शिवाजी महाराजांनी रायगडावर स्वत:ला राज्याभिषेक करून घेतला आणि आपण एक अभिषिक्त राजे असल्याचे जाहीर केले. या राज्याभिषेकाने ते केवळ दक्षिणेतील मराठ्यांचे राजे किंवा केवळ हिंदूचे राजे झाले नाहीत, तर समस्त हिंदूवासियांचे राजे झाले. सर्वच हिंदूवासियांना, ऐतद्देशियांना, आपला स्वतंत्र अभिषिक्त राजा मिळाला. विजयनगरचे साम्राज्य नष्ट झाल्यानंतर पहिल्यांदाच महाराजांनी जुलमी सत्तांना नमवून भूमिपुत्रांचे प्रभुत्त्व सिद्ध केले.

## २) पृथ्वी नि:क्षत्रिय या कल्पनेचा नाश :

कृष्ण नृसिंह शेष या पंडिताने परशुरामाने पृथ्वी २१ वेळा नि:क्षत्रिय केल्याचा सिद्धांत मांडला होता. या सिद्धांतानुसार जगात जर क्षत्रियच उरले नसतील तर मग ऐतद्देशियांमध्ये राजा निर्माण होऊ शकत नाही, असा न्यूनगंड सर्व समाजात पसरला होता. हा न्यूनगंड आणि समाजात पसरलेला अपसमज महाराजांना नष्ट करायचा होता. म्हणून त्यांनी स्वत: क्षत्रिय असतांनाही, आपण क्षत्रिय असल्याचे पुरावे शोधून काढून आपले क्षत्रियत्व या राज्याभिषेकाच्या प्रसंगी सिद्ध केले. त्यासाठी त्यांना तत्कालीन धर्ममार्तंडांशी झगडावे लागले. पण त्यात ते यशस्वी झाले. त्यांनी केलेल्या राज्याभिषेकामुळे हे सिद्ध झाले की, जगात क्षत्रिय आहेत. महाराज क्षत्रिय आहेत. यामुळे 'पृथ्वी नि:क्षत्रिय या सिद्धांताला मूठमाती मिळाली. ही गोष्ट केवळ हिंदू समाजालाच नव्हे तर हिंदवासीयांना दिलासा देणारी होती.

## ३) मुस्लिम सत्तांना आव्हान :

महाराजांनी आपल्या राज्याभिषेकामुळे हिंदुस्थानातील सर्व मुस्लिम सत्तेपुढे एक आव्हान उभे केले. विजयनगरच्या साम्राज्याच्या नाशानंतर ऐतद्देशीय समाजास अवकळा प्राप्त झाली होती. चैतन्यहीन बनलेल्या या समाजातील लोकांची गुलामगिरीत पिचलेली मने महाराजांनी स्वातंत्र्याच्या विचाराने पुन्हा जिवंत बनवली. आणि राज्याभिषेकामुळे तर त्यात चैतन्य निर्माण झाले. मुस्लिम राज्यकर्त्यांच्या अनियंत्रित सत्तेला हादरा बसला. याबाबत बखरकार मल्हार रामराव चिटणीसाचे उद्‌गार बोलके आहेत. तो म्हणतो, ''महाराजांचा राज्याभिषेक होऊन तख्त केले हे कळोन विजापूरकर भयभीत होऊन ब्राह्मात्कारे संतोष दाखवून वस्त्रे, जवाहीर, हत्ती, घोडे, महाराजांस पाठविले. दिल्लीचे पातशहा बहुत खपा होऊन दिलगीर जाले.''

## ४) स्वतंत्र, सार्वभौम राज्याची निर्मिती :

राज्याभिषेकामुळे महाराष्ट्रात महाराजांनी एका स्वतंत्र व सार्वभौम राज्याची निर्मिती केली. ज्या काळात आदिलशाही व कुतुबशाही सारख्या बलाढ्य शाह्यांनी मुघलांचे मांडलिकत्व स्विकारले होते त्या काळात महाराजांचे राज्य हे कुणाचेही स्वामित्व मान्य न करणारे सार्वभौम असे ठरले.

## ५) धर्मसिद्ध राज्यसंस्थेची उभारणी :

राज्याभिषेकापूर्वीच महाराजांनी राज्याची निर्मिती केली होती. त्यांची प्रशासकीय व लष्करी यंत्रणा ही सुस्थापित होती. घोडदळ, पायदळ, आरमार, खजिना, किल्ले, राज्ययंत्रणा अशी राज्याची सर्व महत्त्वाची अंगे यापूर्वीच तयार होती. पण विधिपूर्वक राज्याभिषेकामुळे महाराजांच्या या राज्यास एक धार्मिक व सांस्कृतिक अधिष्ठान प्राप्त झाले. या सोहळ्याने त्यांच्या राज्य व्यवस्थेवर कलश चढवला गेला. धर्मसिद्ध राज्यसंस्थेची उभारणी होऊन महाराजांनी या घटनेने राष्ट्रीय संस्कृतीचे पुनरूज्जीवन केले.

### ६) सुराज्याची ग्वाही :

आपण स्थापन केलेल्या स्वराज्याचे 'सुराज्य' व्हावे ही महाराजांची तळमळ होती. असे सुराज्य एक सार्वभौम सत्तेचा राजाच निर्माण करू शकत होता. त्यामुळे राज्याभिषेक प्रसंगी त्यांनी असे जाहीर आश्वासन दिले की, आपण न्यायाने व धर्माने राज्यकारभार करू. या आश्वासनाबद्दल इतिहासकार प्रा. रा. वि. ओतुरकर म्हणतात, ''या समारंभ प्रसंगी शिवाजीने धर्माप्रमाणे म्हणजे कायद्यावर अधिष्ठित अशा न्यायाने राज्य करीन असे, देव, गुरू अग्नी यांना साक्ष ठेवून वचन दिले आणि अशारितीने राजकीय स्वातंत्र्याबरोबरच जनतेस सुराज्याचे वचन दिले. हे या राज्याभिषेक समारंभाचे विशेष आहे. हे करण्यास शिवाजीस कोणी सक्ती केली नव्हती. त्याने स्वत:च हे करावयाचे ठरविले.''

### ७) शासनबद्ध समाजाची निर्मिती :

महाराजांच्या राज्याभिषेकाने केवळ धर्मसिद्ध राज्यसंस्थेचीच स्थापना झाली असे नाही तर शासनबद्ध समाजही निर्माण झाला. त्यामुळे राजांचा अधिकार हा समाजातील सर्व थरांतील वर्गावर स्थापन झाला. आता ब्राह्मण गुन्हेगारास धर्मशास्त्रीय दृष्टीने शिक्षा होऊ शकत होती. तसेच धर्माबाबतीतील पेचप्रसंगात ते न्यायदान करू शकत होते. अशाप्रकारे सर्व कायदेशीर अडचणी राज्याभिषेकाने दूर झाल्या. आता एक राजा म्हणून त्यांच्या अधिकार कक्षेत ब्राह्मणासह सर्व वर्ग, जाती व जमाती आल्या. त्यांच्या अधिकारास धर्मशास्त्रीय नैतिक व कायदेशीर अधिष्ठान प्राप्त झाले आणि सर्व समाज शासनबद्ध झाला.

### ८) राज्याभिषेकाचे घटनात्मक मोल :

राज्याभिषेकामुळे महाराजांच्या राज्यकारभारास घटनात्मक मोल प्राप्त झाले. त्यांच्या राज्याची स्वतंत्र व सार्वभौम अशी घटना तयार झाली. अष्टप्रधान मंडळ व त्यांची कार्ये हे या घटनेचे मुख्य अंग होते. काही अष्टप्रधानांच्या नेमणुका राज्याभिषेकापूर्वीच झाल्या असल्या तरी या प्रसंगी सर्व अष्टप्रधानांची कर्तव्ये व अधिकार ठरवण्यात आले. त्यांच्या पदांना संस्कृत नावे देऊन मराठीवरील फारसी भाषेचे अतिक्रमण दूर केले. खुद्द स्वत:साठी 'विक्रमादित्य' अशा प्रकारचे प्राचीन हिंदु राजांचे पारंपारिक बिरूद न घेता 'छत्रपती' असे नवे बिरूद निवडले. यातून त्यांनी त्यांच्या छत्राखाली सर्व जातिधर्माच्या प्रजेला न्यायाने वागविले जाईल, त्यांचे संरक्षण केले जाईल असे आश्वासन दिले. यामुळे त्यांचे हे बिरूद घटनात्मकदृष्ट्या अधिक मोलाचे होते.

### ९) नव्या पर्वाला सुरूवात :

महाराजांच्या राज्याभिषेकाने मध्ययुगीन हिंदुस्थानात एका नव्या पर्वाला सुरुवात झाली. या समारंभाचे महत्त्व चिरकाल टिकावे यासाठी त्यांनी राज्याभिषेकापासून 'राज्याभिषेक शक' सुरू केला. शक सुरू करणे ही काही सर्वसामान्य राजाची गोष्ट नव्हती. शकाचा प्रारंभ करणे म्हणजे नव्या युगाचा प्रारंभ करणे असे होते. यामुळे अखिल हिंदी समाजात व राजकारणात एक नवे युग सुरू झाले. तसेच महाराजांनी आपल्या या नवीन, स्वतंत्र राज्याचे स्वतंत्र चलनही सुरू केले. तांब्याची 'शिवराई' व

सोन्याचा 'होन' अशी नवी नाणी सुरू केली. महाराजांनी काही नवे कायदे करून त्यांचे स्वरूप मुलकी, लष्करी, धर्मविषयक व न्यायविषयक असे केले. तसेच त्याकाळातील लेखन पद्धतीवर मुस्लिम धाटणीचा प्रभाव होता. ती बदलून महाराजांनी मराठी धारणेची लेखन पद्धती निर्माण केली. त्यासाठी त्यांनी बाळाजी आवजी चिटणीस या आपल्या हुशार चिटणीसास 'लेखन प्रशस्ती' हा ग्रंथ लिहिण्याची आज्ञा केली व त्याचबरोबर मराठी भाषेवरील फारसी भाषेचे झालेले आक्रमण दूर करण्यासाठी रघुनाथ पंडीत या विद्वान व्यक्तीकडून 'राज्यव्यवहारकोषां'ची निर्मिती करून घेतली. त्यानुसार आपल्या राज्यकारभारातील सर्व फारसी नावांच्या ऐवजी संस्कृत आधारीत नावे रूढ केली. तसेच राज्यकारभाराची मराठी भाषा अधिकाधिक शुद्ध केली. यावरून असे दिसून येते की, महाराजांनी या राज्याभिषेकामुळे केवळ राजकीय स्वातंत्र्यावरच कळस चढवला असे नाही, तर सामाजिक, धार्मिक तसेच सांस्कृतिक स्तरांवरही स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून एक नवे युगच सुरू केले.

### ड) छत्रपती शिवाजी महाराजांचा दुसरा राज्याभिषेक (२४ सप्टेंबर १६७४) :

छत्रपती शिवाजी महाराजांचा पहिला राज्याभिषेक संपन्न झाल्यानंतर स्वराज्यात काही शुभ-अशुभ घटना व काही राजकीय घडामोडी घडल्या आणि शिवाजी महाराजांना रायगडावर तांत्रिक पद्धतीने दुसरा राज्याभिषेक करावा लागला. या राज्याभिषेकांचे पौरोहित्य निश्चलपूरी यांने केले. गोविंद बर्वे यांनी लिहिलेल्या, 'शिवराज्याभिषेक कल्पतरू' या संस्कृत ग्रंथात निश्चलपूरी संबंधी व त्यांच्या तांत्रिक विधीची माहिती दिलेली आहे. शिवदिग्विजय बखरी मध्ये निश्चलपूरी गोसावी हा मुळचा काशी (वाराणसी) इथला होता व तो नाशिकमध्ये स्थायिक झालेला होता. त्याने पहिल्या राज्याभिषेकावर टिका केल्याने त्यांच्या हातूनच शिवाजी महाराजांनी दुसरा राज्याभिषेक केला. त्यांची कारणे पुढील प्रमाणे.

#### १) वैदिक पद्धतीच्या विधीला विरोध :

निश्चलपुरी हा तंत्रमार्गाच्या पद्धतीचा पुरस्कर्ता असल्याने त्यांने वैदिक पद्धतीने केलेल्या राज्याभिषेकाला विरोध केला. गागाभट्टाने ज्या पद्धतीने व ज्या देवतांची पूर्जा अर्चा केली ती परिपूर्ण नव्हती असे त्याचे मत होते. त्यामुळे शिवाजी महाराजांच्या अंगी राजशक्ती व सिंहासनाच्या ठिकाणी, 'देवी शक्ती' प्रतिष्ठीत करण्यासाठी तांत्रिक पद्धतीने राज्याभिषेक होणे गरजेचे आहे असे निश्चलपूरीचे मत होते.

#### २) गागाभट्टाने राज्याभिषेकाच्या वेळी केलेल्या चुका :

गोविंद बर्वे यांनी लिहिलेल्या 'शिवराज्याभिषेक कल्पतरू' या ग्रंथामध्ये गागाभट्टाने केलेल्या राज्याभिषेकांत केलेल्या चुकांचा पाढाच वाचलेला आहे. चुकीचा मुहर्त, वेताळ, भूत, हनुमान यांची पूजा केली नाही, द्वारपाल भूतप्रेतपिशाच्यांना त्यांने बळी दिला नाही. त्यामुळे अनेक अनिष्ठ गोष्टी

घडल्याचा तो आरोप करतो. त्या टाळण्यासाठी तांत्रिक पद्धतीने दुसरा राज्याभिषेक करणे आवश्यक आहे असे निश्चलपूरीचे म्हणणे होते.

### ३) राज्याभिषेक प्रसंगी व नंतर झालेले अपशकून :

पहिल्या राज्याभिषेकाची तयारी सुरू असल्यापसून ते राज्याभिषेक पूर्ण होईपर्यंत व पूर्ण झाल्यानंतर अनेक अपशकुन व चूका झाल्याचे निश्चलपूरीचे म्हणणे होते. उदा. प्रतापराव गुजरचा मृत्यू, राणी काशीबाईंचा मृत्यु, प्रतापगडावरील देवीच्या मंदिरास आग, संभाजी महाराजांच्या गळ्यातील कंठ्यातून मोती गहाळ झाले, महाराज तलवारीची पूजा करत असता ती म्यानातून खाली पडली, मातोश्री जिजाबाईंचा मृत्यू या सर्व घटना केवळ गागाभट्टाने केलेल्या चुकामुळे झाल्या व अपशकून घडून आले असे निश्चलपूरीचे म्हणणे होते.

### ४) निश्चलपूरीचा स्वार्थी हेतू :

पहिल्या राज्याभिषेक प्रसंगी गागाभट्टाला व त्याच्या अनुयायांना महाराजांनी खूप मोठ्या प्रमाणात दान-दक्षिणा दिलेली होती. या प्रसंगी निश्चलपूरीच्या शिष्यांना तेथील ब्राह्मणांनी पिटाळून लावले होते हाही राग त्याच्या मनात होता. त्यामुळे त्यांनी महाराजांच्याकडे दुसऱ्या राज्याभिषेकाचा आग्रह धरला. शिवाजी महाराज निश्चलपूरीची स्वार्थी भूमिका जाणून होते. शिवाय त्यांना कोणालाही दु:खवायचे नव्हते. त्यामुळेच त्यांनी या राज्याभिषेकास मान्यता दिला.

### दुसरा तांत्रिक राज्याभिषेक सोहळा :

निश्चलपूरीने २४ सप्टेंबर १६७४ हा दिवस राज्याभिषेकासाठी निश्चित केला. त्या दिवशी त्यांने शिवाजी महाराजास पंचामृतांनी स्नान घालून कुलदेवता, ग्रामदेवता, स्नानदेवता इत्यादींचे विधीवत पूजन केले. त्यानंतर सिंहासनारोहणाचा कार्यक्रम पूर्ण केला. या राज्याभिषेकाच्यावेळी मोठ्या प्रमाणात अन्नदान करण्यात आले व शिवाजी महाराजांना 'राज राजेश्वरी' ही विद्या दिली. हा संपूर्ण विधी त्यांने एका दिवसात पूर्ण केला.

### (ब) स्वयं-अध्ययन प्रश्न :

**रिकाम्या जागा भरा.**

१. 'शुद्रशिरोमणी' हा ग्रंथ ......... यांनी लिहिला आहे.

२. ................ रोजी शिवाजी महाराजांचा पहिला राज्याभिषेक झाला.

३. शिवराज्याभिषेक कल्पतरू हा ग्रंथ ...... यांनी लिहिला आहे.

४. शिवराज्याभिषेक प्रसंगी ............ हा इंग्रज वकील उपस्थित होता.

५. शिवाजी महाराजांच्या दुसऱ्या राज्याभिषेकांचे पौरोहित्य ......... यांनी केले.

### २.२.३ कर्नाटक मोहीम :

शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीतील सर्व मोहीमांत सर्वात यशस्वी व त्यांची कीर्ती वाढवणारी मोहीम म्हणजे कर्नाटक मोहीम होती. सन १६७७ मध्ये त्यांनी काढलेली ही मोहीम त्यांना मोठी फलदायी ठरली. महाराजांनी राज्याभिषेक करून जे छत्रपतीपद मिळवले त्या छत्रपतीपदाचे महत्त्व व श्रेष्ठत्व सर्व जगाला या कर्नाटक मोहीमेमुळेच कळाले. या मोहीमेला शिवचरित्रामध्ये एक आगळे स्थान आहे.

राज्याभिषेकानंतर शिवाजी महाराजांनी कर्नाटकची मोहीम काढली. या मोहीमेमुळे त्यांचा स्वराज्यविस्तार पश्चिम सागरी किनाऱ्यापासून ते तेलगु, तामीळ व कानडी अशा तीन अमराठी प्रदेशांवर पसरला. रायगडपासून शेकडो कोस दूर असलेल्या पूर्व-दक्षिण किनाऱ्यापर्यंत महाराजांनी धडक मारून अद्वितीय यश मिळवले. त्यामुळे त्यांची तुलना युरोपमधील अलेक्झांडर, सीझर यांच्याशी केली जाते.

### अ) कर्नाटक मोहिमेमागील महाराजांचे उद्देश :

### १) विजयनगरच्या साम्राज्याची पुनर्स्थापना :

इस्लामी आक्रमणामुळे विजयनगरचे हिंदू साम्राज्य नष्ट झाले होते. तालिकोटच्या लढाईत झालेला जबरदस्त पराभव आणि त्यानंतर या हिंदू साम्राज्याचा झालेला नाश दक्षिणेतील हिंदू समाज विसरला नव्हता. विजयनगरचे हे साम्राज्य नष्ट झाल्यावर कर्नाटकात जिंजी, तंजावर, बेदनूर, म्हैसूर अशी अनेक नायकांची राज्ये निर्माण झाली. त्यांना एखादा प्रबळ नेता न मिळाल्यामुळे ते आपली शक्ती एकमेकांशी लढण्यात वाया घालवत होते. ही सर्व हिंदू राज्यांची शक्ती एकवटून इस्लामी सत्तेला कर्नाटकात टक्कर देण्याचा शिवाजी महाराजांचा विचार होता. याबद्दल इतिहासकार शेजवलकर म्हणतात, ''शिवाजीचा हेतू स्वत:स राज्याभिषेक करून घेतल्यापासून असा होता की, पूर्वीच्या नष्ट झालेल्या विजयनगरच्या साम्राज्याचे पुनरुज्जीवन आपण केले आहे असा भास दक्षिणेतील सर्व हिंदूत निर्माण करावा. म्हणजे त्याचा उपयोग आपणास उत्तरेकडून येणाऱ्या मुघलांशी लढताना अवश्य होईल..... श्रीरंगाची (विजयनगरचा शेवटचा वारसदार) अखेरची राजधानी जी वेलूर ते तेथील सिंहासनासहीत ताब्यात घेण्यास व्यंकोजीला शिवाजीने सुचविले होते ते इष्ट काम व्यंकोजीने शिरावर घेतले नाही, तेव्हा शिवाजीने ते स्वत: तडीस नेण्याचे योजून प्रस्तुत कर्नाटक स्वारी काढली.''

## २) वडिलोपार्जीत जहागिरीचा हिस्सा :

शहाजी महाराजांच्या जहागिरीचा मोठा भाग कर्नाटकात होता. महाराष्ट्रातील पुणे प्रांतात व कर्नाटकातील बेंगळूर प्रांतात अशा त्यांच्या दोन जहागिऱ्या होत्या. पुण्याची अगदी तीन-चार परणगण्यांची छोटी जहागीर महाराजांकडे आली होती. महाराजांनी स्वकर्तृत्वाने त्यात बरीच वाढ केली होती. पण शहाजी महाराजांनी आपल्या मृत्यूपर्यंत बंगळूर प्रांतातील कोलार, होस्कोट, चिकाबाळपूर, दोड्डबाळापूर, सिरा, चिकनायकान्हाली व कनकगिरी या प्रदेशावर मोठी जहागिरी निर्माण केली होती. हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे या जहागिरीचा निम्मा हिस्सा महाराजांना मिळावयास हवा होता. पण शहाजी राजांच्या मृत्यूनंतर अनेक वर्षे होऊनही व्यंकोजी या हिस्स्याच्या मागणीला दाद देत नव्हता. त्यामुळे आता आपल्याला जर आपल्या वडिलोपार्जित जहागिरीचा हिस्सा मिळवायचा असेल तर कर्नाटकची मोहीमच काढावी लागेल हे महाराजांनी जाणले.

## ३) कर्नाटकातील मराठा मुलखाच्या संरक्षणासाठी :

शहाजी राजांनी कर्नाटकात आपल्या कारकिर्दीत सर्व हिंदु राजांना एकत्र करून तेथे मराठी अंमल बसवण्याचा प्रयत्न केला होता. त्यांनी आपली राजधानी  बंगळूर येथे केली होती. पण नंतर व्यंकोजीने ती बंगळूरहून तंजावरला हलवली. त्यामुळे म्हैसूरच्या नायकाला उत्तर कर्नाटकामध्ये आपले राज्य वाढवण्यास मोठी संधी मिळाली. असेच हळूहळू व्यंकोजीच्या हातून उत्तर कर्नाटकातील अनेक प्रदेश निसटू लागले आणि शहाजी राजांच्या जहागिरीचा प्रदेश हळूहळू कमी होत चालला. यावर काहीतरी उपाययोजना करणे महाराजांना गरजेचे वाटले. म्हणून त्यांनी कर्नाटकवर स्वारी करून उत्तर व मध्य कर्नाटकातील शहाजीराजांच्या जहागिरीतील प्रदेश जिंकून घ्यायचे ठरवले.

## ४) खजिना भरून काढण्यासाठी :

महाराजांच्या अत्यंत वैभवशाली अशा राज्याभिषेकाच्या सोहळ्यामुळे त्यांचा खजिना रिकामा झाला होता. त्यांना या सोहळ्यास लक्षावधी होनांचा खर्च आला होता. हा खर्च महाराज अतिरिक्त महसूल वसुलीतून किंवा सक्तीच्या करांमार्फत वसूल करू इच्छित नव्हते. तसेच महाराजांचे राज्यही लहान होते. महाराष्ट्राचा प्रदेशही म्हणावा तसा सुपीक नव्हता. त्यामुळे सहाजिकच महाराजांचे लक्ष अत्यंत सधन व समृद्ध असणाऱ्या कर्नाटकच्या किनाऱ्याकडे गेले. प्राचीन काळापासून अनेक आक्रमकांनी त्या प्रदेशातून प्रचंड लूट मिळवली होती. मद्रासचा किनारा तर 'सोन्याचा प्रदेश' म्हणून ओळखला जात होता. तेथे सोन्याच्या व हिऱ्याच्या खाणीही होत्या. त्या प्रदेशातील लोकांनी तेथे प्रचंड संपत्ती पुरून ठेवली होती. ही सर्व संपत्ती शिवाजी महाराजांसारख्या एखाद्या शूर व धाडसी राजाचीच वाट पाहात होती. त्यामुळे या प्रदेशातून संपत्ती प्राप्त करून आपला रिकामा झालेला खजिना भरून काढणे हा एक महाराजांचा यामागील हेतू होता.

## ५) नवे राज्य निर्माण करण्यासाठी :

महाराजांच्या कर्नाटक मोहीमे मागील प्रमुख हेतू केवळ संपत्ती मिळवणे हाच नव्हता तर महाराष्ट्राच्या बाहेर कर्नाटकात नवेच राज्य निर्माण करणे हाही होता. महाराष्ट्राच्या उत्तर सीमेवर मोगल उभा होता. पूर्व व दक्षिण बाजूवर आदिलशाही राज्य होते. या दोन्हीही सत्तांचा जेवढा प्रदेश जिंकता येईल तेवढा महाराजांनी सह्याद्रीच्या आश्रयाने जिंकलाच होता. आणि आणखीन प्रदेशविस्तार करायचा म्हणजे विजापूरच जिंकून त्या राज्याचा सर्व प्रदेश काबीज करावा लागणार होता. पण ही गोष्ट फार अवघड असल्यामुळे महाराजांनी ज्या भूमीवर आदिलशाहीचे नाममात्र वर्चस्व होते त्या मद्रासच्या किनाऱ्याकडे आपले लक्ष वळवले. आणि तेथेच आपल्या नूतन राज्याची निर्मिती करावी असे ठरवले. तसेच रियासतकार सरदेसाईंच्या म्हणण्यानुसार, राज्याभिषेकानंतर राजाने 'दिग्विजयास' निघावे अशी पूर्वापार परंपरा होती. म्हणून राज्याभिषेकानंतर महाराज दक्षिण दिग्विजयास निघाले.

## ६) आदिलशाहीला शह देण्यासाठी :

महाराष्ट्रात महाराजांना स्वराज्याचे रक्षण व विस्तार करताना उत्तरेकडून मुघल व दक्षिणेकडून आदिलशाही अशा दोन आघाड्यांवर लढावे लागत होते. यातील एकतरी आघाडी कमकुवत करणे आवश्यक होते. त्यामुळे आपण जर कर्नाटकातील आदिलशाहीचा प्रदेश काबीज करून तेथे त्याच्या विरूद्ध दुसरी आघाडी उघडली तर त्यांची बाजू दुबळी पडेल असा महाराजांचा कर्नाटक मोहीमेमागील हेतू होता, असे इतिहाससंशोधक वा. सी. बेंद्रे म्हणतात. त्यांच्या म्हणण्यानुसार, 'विजापूरकरांना कायमचा पायबंद घालावयाचा तर त्यांना कर्नाटकात प्रबळ शत्रू उत्पन्न करणे व अशा तऱ्हेने (महाराष्ट्रातील) आघाडीवरून मराठ्यांचे हल्ले व पिछाडीवरून कर्नाटकातून हल्ले झाल्यास विजापूरकरांचा कोंडमारा होऊन आदिलशाहीच्या समाप्तीला फारसा विलंब लागणार नाही, ही गोष्ट स्पष्ट दिसत होती.'' यावरून आदिलशाहीला शह देण्यासाठी महाराजांनी ही मोहीम काढली असे म्हणावे लागेल.

## ७) भविष्यकालीन तरतूद :

कर्नाटकची मोहीम काढण्यामागे महाराजांचे द्रष्टेपण दिसून येते. कारण त्यांना याची पुरेपूर जाणीव होती की, आपल्या स्वराज्याचा खरा शत्रू मुघल बादशहा आहे. पुढेमागे तो स्वत: महाराष्ट्रावर चाल करून येण्याचा धोका संभवतो. तेव्हा भविष्यात जर काही आणीबाणीची परिस्थिती निर्माण झाली आणि महाराष्ट्रातील स्वराज्य मुघलांनी जिंकून घेतले, तर मराठ्यांच्या राजाला आपल्या संरक्षणासाठी महाराष्ट्राच्या बाहेर सुरक्षित राहता यावे, आपल्या राज्याचे व जीविताचे संरक्षण करता यावे आणि याच दूरदृष्टीने महाराजांनी महाराष्ट्रापासून पाचशे मैल दूर असणाऱ्या मद्रास किनाऱ्यावरील प्रदेश जिंकायचे ठरवले. महाराजांची ही दूरदृष्टी किती अचूक होती हे संभाजी महाराजांच्या वधानंतरच्या महाराष्ट्रातील परिस्थितीने दाखवून दिले. आणि खरच राजाराम महाराजांना महाराष्ट्र सोडून कर्नाटकात जिंजी किल्ल्यात आश्रय घ्यावा लागला. त्याचप्रमाणे आणखीन एक भविष्यातील तरतूद महाराजांना करायची होती, ती म्हणजे,

दोघा पुत्रांसाठी दोन राज्यांची निर्मिती. धाकटा पुत्र राजारामाला महाराष्ट्रातील राज्य द्यावे आणि कर्नाटकातील जिंकलेले राज्य संभाजीने घ्यावे अशाप्रकारे दोन्ही पुत्रांची सोय योग्यरित्या व्हावी असा महाराजांचा उद्देश होता, असे सभासद आपल्या बखरीत म्हणतो.

## ब) कर्नाटक मोहीम :

### १) कर्नाटकातील राजकीय अंदाधुंदी :

विजयनगरच्या हिंदू साम्राज्याच्या अस्तानंतर कर्नाटकात त्या साम्राज्याची शकले पडली होती. त्यातून हिंदू नायकांची अनेक छोटी-छोटी राज्ये निर्माण होऊन अनेक प्रांतिक सुभेदार स्वतंत्र झाले. आदिलशहा व कुतुबशहाला देखील या नायकांवर पूर्णपणे अधिराज्य गाजवता आले नाही. या शाह्यांचा रणदुल्लाखान, मुस्तफाखान, शहाजीराजे यांच्या सारख्या सेनानींनी या नायकांचा बराचसा प्रदेश ताब्यात घेतला होता. पण अजूनही त्यांचा एकछत्री अंमल निर्माण झाला नव्हता. त्यामुळे अनेक नायक कर्नाटकात आपले अस्तित्व टिकवून होते. पण त्यांची सर्व शक्ती आपापसात झगडण्यात खर्ची पडत होती. याचवेळी आदिलशाही दरबारात त्यांच्या अंमलदारांमध्ये व सरदारांमध्ये यादवी चालू झाली होती, याचा फायदा घेऊन आदिलशहाचा कर्नाटकातील मुलूख घेण्याचे राजकारण कुतुबशहा आखत होता. खरे पाहता, आदिलशहाचा कर्नाटकातील प्रदेश जिंकून घ्यावा या कल्पनेचा पाठपुरावा कुतुबशहाचा हिंदू वजीर मादण्णा करत होता. मादण्णा व त्यांचा बंधू कुतुबशहाचा सेनापती आकण्णा हे हुशार व कर्तबगार होते.

### २) रघुनाथ पंडिताची भूमिका :

आदिलशहाचा कर्नाटकातील प्रदेश घेण्याचा मनसुबा कुतुबशाही दरबारात चालू असतानाच तेथे व्यंकोजीचा कारभारी रघुनाथ पंडित येऊन पोहोचला. रघुनाथ पंडित हा नारो त्रिमल हणमंते या शहाजीराजांच्या सेवकाचा पुत्र होता. पुढे तो व्यंकोजी राजाचा मुख्य कारभारी बनला. पण रघुनाथ पंडित व व्यंकोजी राजे यांचे पटेनासे झाल्यामुळे रघुनाथ पंडिताने व्यंकोजीच्या दरबाराचा त्याग केला आणि काशीयात्रेचे निमित्त काढून तो आदिलशाही दरबारात विजापूरी आला. आदिलशाही दरबारातील यादवी व गोंधळाची परिस्थिती पाहून तेथे न थांबता तो कुतुबशाहाच्या दरबारात हजर झाला. खुद्द कुतुबशाह व त्याचा वजीर मादण्णा यांनी त्यांचे चांगले स्वागत केले. मग मादण्णाने आपला आदिलशाहीचा कर्नाटक जिंकण्याचा मनसुबा रघुनाथ पंडितास बोलून दाखवला. तेव्हा या राजकारणात रघुनाथ पंडितही सामील झाला. पण एकतर कुतुबशहाच्या अंगी कर्नाटक जिंकण्याएवढी कर्तबगारी नव्हती, आणि तरीही जर कुतुबशहाने स्वत: अशी स्वारी काढली तर मोगल बादशहा स्वस्थ बसणार नाही अशी भीती मादण्णाने बोलून दाखवली. मग महाराष्ट्रातील हिंदूचा राजा शिवाजी महाराज यांच्या कडूनच हे काम तडीस जाईल अशी मादण्णा व रघुनाथ पंडिताला खात्री पटली. कुतुबशाहीलाही ही योजना पसंत पडली. मग असे

ठरले की, शिवाजी महाराजांनी कर्नाटकातील आदिलशाही प्रदेशावर मोहीम काढावी, त्यास कुतुबशहाने मदत करावी, जिंकलेला प्रदेश कुतुबशहास मिळावा आणि मिळालेली लुट महाराजांनी घ्यावी. ही योजना महाराजांना सांगण्यासाठी रघुनाथ पंडित कुतुबशाही दरबारातून महाराष्ट्राकडे रवाना झाला.

### ३) रघुनाथ पंडिताचा उपयोग :

रघुनाथ पंडित महाराजांची भेट घेण्यासाठी महाराष्ट्रात आला तेंव्हा महाराज पन्हाळगडावर होते. ते नुकतेच आजारपणातून उठले होते. पण पन्हाळ्यावर विश्रांती घेत असतानाच त्यांच्या डोक्यात राज्याभिषेकानंतर करावयाच्या दिग्विजयी मोहिमेचे विचार घोळत होते. अशावेळी रघुनाथ पंडित महाराजांना भेटला. हा एक दुग्धशर्करा योग होता. आपल्या भेटीत रघुनाथ पंडिताने महाराजांना कर्नाटकातील एकूण राजकीय परिस्थिती, कुतुबशहाचे राजकारण, मादण्णाचे कुतुबशाही दरबारातील स्थान अशा अनेक मोहीमेस अनुकुल गोष्टींची माहिती पुरविली. तसेच या मोहीमेतून महाराजांना सधन प्रदेश व प्रचंड संपत्तीही प्राप्त होईल असे सांगितले. महाराजांना ही कर्नाटकातील राजकारणात पारंगत असणारा असाच एखादा मुत्सद्दी जाणकार हवा होता. त्यामुळे त्यांनी आता रघुनाथ पंडिताच्या या अनुभवाचा व ज्ञानाचा चांगला उपयोग करून घ्यायचे ठरवले.

### ३) देशातील परिस्थिती महाराजांना अनुकूल :

कर्नाटकातील स्वारी सारखी महत्त्वाकांक्षी मोहीम हाती घेत असताना महाराजांनी आपल्या प्रतिस्पर्धी सत्तांचा व देशातील एकंदर राजकीय परिस्थितीचा अंदाज घेतला. त्यावेळी ही परिस्थिती त्यांना अतिशय अनुकूल होती. मुघल बादशहा औरंगजेब दिल्लीत असला तरी त्याचे मोठे सैन्य अजूनही वायव्य सरहद्द प्रांतातच गुंतून पडले होते. दक्षिणेचा मुघल सुभेदार बहादूरखान हा महाराजांशी दोन वर्षे संघर्ष करत होता. त्यामुळे आता तोही या संघर्षाला त्रासला होता आणि त्याने आदिलशाही विरूद्ध मोहीम हाती घेतली होती. त्यामुळे त्याला महाराजांशी वैर पत्करणे परवडणारे नव्हते. तसेच इकडे आदिलशाही दरबारात पठाण व दक्षिणी मुसलमान यांच्यात यादवी उसळली होती. त्यात बहादुरखानाने दक्षिणी मुसलमानांचा पक्ष उचलून धरला होता. अशावेळी आदिलशाही दरबारालाही शिवाजी महाराजांचे शत्रुत्व अधिकच संकटात टाकणारे ठरले असते. अशा परिस्थितीत महाराजांनी जर कर्नाटकातील आदिलशाही मुलूख जिंकला तरी आदिलशाही दरबार त्याचा प्रतिकार प्रभावीपणे करू शकणार नव्हता. या सर्व आपणास अनुकूल अशा परिस्थितीचा अंदाज घेऊनच महाराजांनी ही मोहीम आखली. त्यांनी मुघलांकडे यापूर्वीच राजकारण लावले होते. आता आपल्या निराजी रावजी या अत्यंत हुशार मंत्र्यास बहादूरखानाकडे पाठवले आणि खानास मोठी लाच देऊन त्यास आपल्या बाजूस वळवून घेतले. त्यामुळे स्वराज्याची उत्तरेकडील आघाडी सुरक्षित राखण्यात महाराज यशस्वी झाले. या यशस्वी प्रयोगानंतर महाराजांनी प्रल्हाद निराजीस कुतुबशहाशी वाटाघाटी करण्यास पाठवले. त्याने कुतुबशहाशी यशस्वी वाटाघाटी करून कुतुबशहा महाराजांच्या मोहीमेस अतिअनुकूल असल्याचे महाराजांना कळविले.

## ४) महाराज - कुतुबशहा भेट :

शिवाजी महाराजांनी कर्नाटकच्या मोहीमेवर जाण्यापूर्वी आपल्या दरबारात यावे असे निमंत्रण कुतुबशहाने महाराजांना पाठवले. महाराजांनीही मोहीमेच्या सुरूवातीस गोवळकोंड्यास जाऊन शहास भेटण्याचे ठरविले. या मोहीमेवर निघण्यापूर्वी महाराजांनी स्वराज्याचा कारभार आपले विश्वासू मंत्री मोरोपंत पिंगळे व आण्णाजी दत्तो यांच्यावर सोपवला आणि जानेवारी १६७७ च्या प्रारंभी महाराज २५,००० सैन्यासह कुतुबशहाच्या भेटीस निघाले. या स्वारीत कोप्पलचा किल्ला काबीज करून सेनापती हंबीरराव मोहिते आपल्या सैन्यानिशी महाराजांना मिळाले तेंव्हा मराठ्यांच्या सैन्याची संख्या ५०,००० झाली. इतकी प्रचंड संख्या असूनही महाराजांच्या लष्करात इतकी शिस्त होती की, गोवळकोंड्याचा प्रदेशात काडीचाही त्रास मराठी लष्कराने कुतुबशहाच्या प्रजेस दिला नाही. ही शिस्त पाहून खुद्द कुतुबशहासही आश्चर्य वाटले.

महाराज कुतुबशहाची राजधानी भागानगर जवळ (हैद्राबाद) येताच कुतुबशहा त्यांचे स्वागतासाठी नगराबाहेर यायला निघाला. पण महाराजांनी त्याला निरोप पाठविला की, ''आपण वडील भाऊ, मी धाकटा भाऊ, आपण पुढे न येणे.'' महाराजांचा हा विनय पाहून कुतुबशहा भारावून गेला. मग कुतुबशहाचा वजीर मादण्णा याने महाराजांचे स्वागत नगराबाहेर येऊन केले आणि मोठ्या सन्मानाने कुतुबशहाच्या राजधानीत प्रवेश केला. याबद्दल सभासद म्हणतो, ''पातशहानी कुल नगर शृंगारले. चौफेरी बिदीस कुंकम केशराचे सडे, रंगमाळा घातल्या, गुडिया, तोरणे, पताका, निशाणे नगरात लाविली. नगर, नागरिक लोक कोट्यानकोटी राजा पहावयास उभे राहिले. नारींनी मंगल आरत्या अगणित उजळून राजियास् वंदिले. सोने रूपियांची फुले राजियावरी उधळली.''

कुतुबशहाने महाराजांना आलिंगन देऊन भेट घेतली. शहा व महाराज एकाच आसनावर बसले. त्याप्रसंगी महाराजांनी शहास रत्नजडित अलंकार व वस्त्रे देऊन त्यांचा सन्मान केला. या भेटीबद्दल अधिक माहिती देताना सभासद म्हणतो, ''पातशहाच्या स्त्रिया झरोकियातून राजा पाहाता बहूत थक्क झाल्या''. खुद्द कुतुबशहाने महाराजांच्या तोंडून अफजलखान वध, शाहिस्तेखानावरील छापा, सुरतेची लूट, आग्रा भेट या अद्‌भूत प्रसंगाचे वर्णन ऐकले, यावेळी महाराजांबरोबर रघुनाथ पंडित, त्याचा बंधू जनार्दन पंडित, हंबीरराव मोहिते, येसाजी कंक, सूर्याजी मालुसरे, सोनाजी नाईक, मानाजी मोरे, प्रल्हाद निराजी असे अनेक मुत्सद्दी व सेनानी होते. या सर्वांचा सत्कार कुतुबशहाने वस्त्रालंकार देऊन केला. या भेटीनंतर महाराज व कुतुबशहा यांच्यात कर्नाटक मोहीमेसंबंधीच्या कराराच्या वाटाघाटी झाल्या. या कराराप्रमाणे असे ठरले की,

- कुतुबशहाने महाराजांना या मोहीमेच्या खर्चासाठी रोज ३००० होन द्यावेत आणि ५००० सैन्य व तोफखाना महाराजांसोबत द्यावा.

- याच्या बदल्यात महाराजांनी जिंकलेला प्रदेश कुतुबशहास द्यावा. फक्त शहाजीराजांचा प्रदेश महाराजांनी स्वत:च्या ताब्यात ठेवावा.
- मुघलांविरूद्ध लढण्यासाठी परस्परांनी साहाय्य करावे.
- कुतुबशहाने दर वर्षी १ लाख रूपये खंडणी महाराजांना द्यावी आणि त्याने महाराजांचा वकील त्याच्या दरबारात ठेवून घ्यावा.

**५) कोप्पलचा किल्ला काबीज :**

शिवाजी महाराज कर्नाटक मोहिमेवर जाताना पहिल्यांदा कुतुबशहाच्या भेटीस जात असताना महाराजांच्या सेनानींची एक तुकडी कर्नाटकातील कोप्पलचा किल्ला घेण्यासाठी गेली होती. हा किल्ला म्हणजे कृष्णा व तुंगभद्रा या नद्यांच्या दरम्यान असणाऱ्या प्रदेशाची किल्लीच होती. त्यामुळे तो किल्ला ताब्यात असणे कर्नाटकातील सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक होते. म्हणून महाराजांनी सेनापती हंबीरराव मोहिते व धनाजी जाधव यांना हा किल्ला घेण्यासाठी पाठवले. या किल्ल्याचे अंमलदार हुसेन खान मियाणा व अब्दुल रहिम खान हे पठाण बंधू होते. त्यापैकी अब्दुल रहिमखानास ठार मारून व हुसेन खानास कैद करून मराठ्यांनी कोप्पलचा किल्ला जानेवारी १६७७ मध्ये हस्तगत केला आणि मग मराठ्यांची ही तुकडी महाराजांना गोवळकोंड्याकडे जाणाऱ्या मार्गात येऊन मिळाली.

**६) जिंजीचा किल्ला काबीज :**

श्रीशैल्य मल्लिकार्जुन व तिरूपती या दोन दक्षिणेतील प्रसिद्ध तीर्थस्थानांचे दर्शन घेऊन महाराज मद्रास किनाऱ्यावरील पोड्डापोलम येथे आले. तेथून त्यांनी मद्रासकर इंग्रजांशी पत्रव्यवहार केला. याप्रसंगी इंग्रजांनी काही वस्तू व विषबाधेवरील औषधे महाराजांना भेट म्हणून दिली. या पोड्डापोलममधूनच महाराजांनी आपली ५००० घोडदळाची फौज जिंजी किल्ला घेण्यासाठी पाठवली. हा किल्ला आदिलशाही अंमलदार नासीर महंमद खान याच्या ताब्यात होता. किल्ल्याजवळ येताच मराठा सेनानींनी नासीर महंमदास किल्ला आपल्या हवाली करण्यास सांगितले. खुद्द या नासीर महंमदाचे आदिलशाही दरबाराशी बिनसले असल्यामुळे किल्ला मराठ्यांच्या ताब्यात देण्यास तो लगेच तयार झाला. मग मराठ्यांनी त्याला काही रोख रक्कम व पन्नास हजारांची जहागिर दिली. १३ मे १६७७ या दिवशी मराठ्यांनी हा अत्यंत महत्त्वपूर्ण किल्ला ताब्यात घेतला.

जिंजीचा किल्ला ताब्यात आल्याची बातमी कळताच महाराज त्वरेने जिंजीस आले. लगेचच त्यांनी तेथील सर्व व्यवस्था जातीने लावून दिली. किल्ल्यावर काही नवी तटाची बांधकामे सुरू केली. नव्या इमारती बांधल्या आणि किल्ल्याला चांगलीच बळकटी आणली. हा किल्ला तीन किल्ल्यांचा मिळून बनलेला असून हे तिन्ही किल्ले एका मजबूत तटबंदीने एकमेकांस जोडलेले आहेत. या किल्ल्यांचे भौगोलिक

व राजकीय महत्त्व इतके होते की ज्याच्या ताब्यात हा किल्ला त्याच्या ताब्यात मद्रास किनाऱ्यावरील प्रदेश असे समीकरण बनले होते. त्यामुळे हा किल्ला घेतल्यावर मद्रास किनारपट्टीवरील प्रदेश ताब्यात घेण्यास मराठ्यांना वेळ लागला नाही. महाराजांनी रायाजी नलगे याची जिंजीचा किल्लेदार म्हणून तर विठ्ठल पिळदेव अत्रे यांची जिंजी प्रांताचा सुभेदार म्हणून नेमणूक केली. आणि अशाप्रकारे कर्नाटकातील जिंजी येथे मराठ्यांचा कारभार सुरू झाला.

**७) वेलोरचा किल्ला ताब्यात :**

जिंजीप्रमाणेच वेलोरचा किल्लाही कर्नाटकातील महत्त्वाचा किल्ला होता. हा किल्ला ताब्यात घेण्यासाठी महाराज स्वत: ससैन्य गेले. आदिलशाही अंमलदार अब्दुलखान याच्या ताब्यात हा होता. महाराजांच्या हे लक्षात आले की, हा किल्ला सहजासहजी मिळण्यासारखा नाही. तसेच या किल्ल्यावर हल्ला करण्यासाठी आवश्यक असणारी युद्धसामुग्री महाराजांनी बरोबर आणली नव्हती. म्हणून किल्ल्याला वेढा घालायचे महाराजांनी ठरवले. याप्रमाणे नरहार रूद्र या अधिकाऱ्यास महाराजांनी २००० घोडदळ व ५००० पायदळ देऊन वेढा चालू ठेवण्यास सांगितले. आणि आपण स्वत: शेरखान या आदिलशाही सरदाराशी लढण्यासाठी निघून गेले. किल्लेदार अब्दुलाखान याने सतत १४ महिने हा किल्ला लढवला. शेवटी उपासमारीनी व रोगराईने त्याचे सैनिक मरू लागले आणि शेवटी जेंव्हा त्याच्या २३०० सैनिकांपैकी फक्त ३०० सैनिकच जिवंत उरले तेव्हा तो नाईलाजाने मराठ्यांना शरण आला आणि त्याने किल्ला मराठ्यांना देऊन टाकला. मग महाराजांनी त्यास बक्षीस म्हणून एक छोटी जहागीर व ३०,००० होन बक्षीस म्हणून दिले.

**७) शेरखान लोदी पराभूत :**

जिंजी प्रांताच्या दक्षिणेकडील प्रदेशावर शेरखान लोदीची सत्ता होती. पांडेचरीचे फ्रेंच त्याला साहाय्य करत असत. शेरखानच्या पाठिंब्यामुळेच फ्रेंचांनी पांडेचरीस आपली वखार काढली होती. हा शेरखान ३००० घोडदळ व ४००० पायदळ जवळ बाळगून होता. तर महाराजांजवळ १२,००० घोडदळ व कित्येक हजार पायदळ होते. तरीही शेरखान महाराजांना पराभूत करण्याची आकांक्षा बाळगून होता. त्याच्या सैन्याचे मात्र महाराजांच्या आगमनाने नीतिधैर्य खचले होते. पण सल्लागारांच्या म्हणण्यास भरीस पडून तो महाराजांशी युद्ध करण्यास प्रवृत्त झाला. त्यामुळे शेवटी तिरूवाडी जवळ शेरखान लोदी व महाराज यांच्या लढाई झाली. यात शेरखानाच्या सैन्याचा पूर्ण पराभव होऊन शेरखान आपल्या सैन्यासह पळून गेला. खानाची शेकडो घोडी व सामान मराठ्यांच्या ताब्यात आले. शेवटी मराठ्यांना तो शरण आला. त्याने त्याच्या ताब्यातील सर्व प्रदेश व ठाणी महाराजांना दिली. तसेच २० हजार होनाचा दंड देण्याचेही कबूल केले. अशा तऱ्हेने शेरखान लोदीचा प्रदेशही महाराजांच्या राज्यात समाविष्ट झाला.

## ८) शिवाजी महाराज - कुतुबशहा कराराचा भंग :

कर्नाटक मोहीमेवर निघताना शिवाजी महाराज व कुतुबशहा यांच्यात करार झाला होता. या करारानुसार महाराजांनी जिंकलेले किल्ले व प्रदेश कुतुबशहाला देणे गरजेचे होते. त्यामुळे मराठ्यांनी जिंजीचा किल्ला जिंकताच कुतुबशहाच्या अधिकाऱ्यांनी तो आपल्या ताब्यात देण्याची विनंती महाराजांना केली. पण कर्नाटकातील एवढा महत्त्वाचा किल्ला कुतुबशहाच्या ताब्यात देणे महाराजांना धोकादायक वाटले. त्यामुळे त्यांनी हा किल्ला देण्यास नकार दिला. अशाप्रकारे महाराज व कुतुबशहा यांच्यातील कराराचा महाराजांनी भंग केला. त्यामुळे कुतुबशहाने महाराजांना द्यावयाचे ३००० होनांचे सहाय्य बंद केले. मग महाराजांनी आपल्या फौजेचा खर्च, मद्रास किनाऱ्यावरील श्रीमंत लोकांकडून लक्षावधी होनांची वसुली करून तसेच कावेरीच्या दक्षिणेला असलेल्या मदुरेच्या नायकाकडून २५ लाखांची खंडणी घेऊन भरून काढला.

## ९) शिवाजी महाराज व व्यंकोजी राजे :

कर्नाटकातील प्रदेश ताब्यात घेत असतानाच महाराजांचे बंधू व्यंकोजी राजे यांच्याशी पत्रव्यवहार चालू होता. व्यंकोजी राजांनी जहागिरीचा वाद सामोपचाराने मिटवावा असे महाराजांचे म्हणणे होते. यासाठी त्यांना भेटीस येण्याचे निमंत्रणही दिले. स्वत:च्या सुरक्षिततेची हमी मिळाल्यावर व्यंकोजीराजे आपल्या २००० घोडदळानिशी महाराजांना भेटायला आले. महाराजांनी व्यंकोजीराजांचे स्वागत करून त्यांना आपल्या छावणीत आणले. उभयतांच्या भेटी झाल्यावर महाराजांनी जहागिरीच्या वाटणीचा प्रश्न काढला आणि शहाजीराजांच्या मृत्यूच्यावेळी त्यांच्या जवळ जेवढा मुलूख व खजिना होता, त्यातील निम्मी वाटणी मागितली. याला उत्तर म्हणून व्यंकोजीराजानेही महाराजांच्या महाराष्ट्रातील राज्याची अर्धी वाटणी मागितली. तेंव्हा महाराजांनी त्यास समजावले की पुण्याची ४० हजार होनांची वडिलार्जीत जहागीर सोडल्यास बाकीचे सर्व राज्य त्यांनी स्वत: मिळविले आहे. त्यामुळे त्यातील वाटणी व्यंकोजीराजांस मागता येणार नाही. पण व्यंकोजीराजे वाटणीचा प्रश्न काही सामोपचाराने सोडवायला तयार होईनात. मग महाराजांनी त्यांच्या हालचालीवर थोडी नजर ठेवली. यामुळे व्यंकोजीराजांना असे वाटू लागले की महाराज आपणास कैद करण्याचा विचार करत आहेत. या भीतीने त्यांनी महाराजांच्या छावणीतून पलायन केले. महाराजांना हे समजताच त्यांना या घटनेने अतिशय दु:ख झाले. 'अति धाकटे ते धाकटे, बुद्धीही धाकटेपणा योग्य केली.' असे त्यांनी उद्‌गार काढले. कारण महाराजांनी कर्नाटकातील कोलेरून नदीच्या उत्तरेचा जवळपास सर्व प्रदेश ताब्यात घेतला असला तरी या नदीच्या दक्षिणेकडचा व्यंकोजीराजांचा प्रदेश जिंकण्याचा त्यांचा इरादा नव्हता.

## १०) व्यंकोजीराजे व मराठे संघर्ष :

महाराजांच्या छावणीतून निसटल्यावर व्यंकोजीराजांनी मदुरा व म्हैसुर येथील नायकांचे साहाय्य घेऊन महाराजांच्या विरोधात संघ स्थापन करण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्यांना यश आले नाही. महाराज कर्नाटकातून महाराष्ट्रात यावयास निघाले होते. या दरम्यान मद्रास-कर्नाटकात असलेल्या मराठी

सैन्याने कोलेरून नदी पार करून दक्षिणेकडील व्यंकोजीराजांच्या प्रदेशावर स्वारी केली. व्यंकोजीराजेही प्रतिकारास सज्ज झाले. मराठ्यांचे सैन्य १२ हजार होते, तर व्यंकोजीराजांचे सैन्य १४ हजार होते. मराठी सैन्याचे नेतृत्व संताजी भोसले हा सेनानी करत होता आणि आपल्या सैन्याचे नेतृत्व खुद्ध व्यंकोजीराजे करत होते. १६ नोव्हेंबर १६७७ रोजी उभयपक्षांची लढाई झाली. दिवसभराच्या भयंकर संघर्षानंतर मराठे हरले व पळून गेले. पण व्यंकोजीराजांनी त्यांचा पाठलाग केला नाही. पण दिवसभराच्या संघर्षामुळे दमून व्यंकोजीराजांचे सैन्य जेंव्हा रात्री विश्रांती घेत होते तेंव्हा मराठ्यांनी अचानक त्यांच्यावर हल्ला केला आणि व्यंकोजीराजांच्या सैन्याचा पूर्ण पराभव केला. त्यांचे शेकडो सैनिक कापले गेले. तीन सेनानी, १००० घोडी, तंबू  आणि साधनसामुग्री मराठ्यांच्या हाती सापडली. व्यंकोजीराजे कसेबसे कोलेरून नदी ओलांडून आपल्या राज्यात गेले.

या प्रसंगाबद्दल सांगताना सभासद म्हणतो की, शिवाजी महाराजांना ही वार्ता समजताच त्यांनी कर्नाटकातील रघुनाथ पंडित व हंबीरराव मोहिते यांना निरोप पाठवला. ''व्यंकोजीराजे आपले धाकटे बंधू आहेत. मूलबुद्धी केली. तोही आपला भाऊ, त्यास रक्षणे, त्याचे राज्य बुडवू नका.'' महाराजांचा हा आदेश आल्यावर मराठा सेनानींनी व्यंकोजीराजांशी तह केला. या तहानुसार असे ठरले की, कोलेरून नदीच्या दक्षिणेकडचे राज्य आणि त्या नदीच्या उत्तरेकडील काही किल्ले महाराजांनी व्यंकोजीराजांना द्यावेत. तसेच त्यांनी ६ लाखांची खंडणी महाराजांना द्यावी. तर जिंजी प्रांत व म्हैसूर प्रांतातील शहाजी राजांच्या जहागिरीतील महाराजांनी जिंकलेला प्रदेश महाराजांकडेच राहावा.

### ११) शिवाजी महाराजा परतीच्या मार्गावर :

महाराजांचा इरादा व्यंदोजीराजांचा कोलेरून नदीच्या दक्षिणेकडचा प्रदेश घेण्याचा नसल्यामुळे त्यांनी या नदीच्या तीरावरूनच आपला परतीचा प्रवास सुरू केला. या परतीच्या मार्गावर असताना तंदुमर्ती या ठिकाणी महाराजांचा मुक्काम असताना थेवणापट्टणम येथील डच वखारीचा वकील त्यांना भेटण्यास आला आणि त्याने अनेक मौल्यवान वस्तु त्यांना भेट म्हणून दिल्या. पुढे वनिकामवाडी येथे महाराजांची छावणी असताना त्यांनी इंग्रजांकडे त्यांचे स्थापत्यविशारद व तंत्रज्ञ मागितले. पण आपण व्यापारी असून ऐतदेशीयांच्या राजकारणात पडत नाही. हे कारण सांगून इंग्रजांनी महाराजांची मागणी पूर्ण केली नाही. यानंतर महाराजांनी मद्रास किनाऱ्यावरील दक्षिण अर्काट व उत्तर अर्काट हे प्रदेश जिंकले आणि तेथे मराठी अंमल सुरू केला. याच दरम्यान महाराजांच्या कर्नाटक मोहीमेचा व कुतुबशहाने त्यांना केलेल्या सहाय्याची बातमी मुघल बादशहा औरंगजेबापर्यंत पोहोचली. शिवाजीसारख्या बंडखोरास कुतुबशहाने मदत केलेली पाहून औरंगजेबाने रागाने कुतुबशहा विरूद्ध मोहीम उघडली. आता मुघल फौजा महाराष्ट्रातही स्वस्थ बसणार नाहीत, हे जाणून महाराजांनी नोव्हेंबरच्या सुरुवातीस मद्रास किनारा सोडला आणि ते म्हैसूरच्या प्रदेशात आले. तेथील कोलार, होस्कोट, बेंगलोर, बाळापूर, सिरा अशी शहाजीराजांच्या जहागिरीतील अनेक ठाणी महाराजांनी या परतीच्या प्रवासात पुन्हा जिंकून घेतली. मग

त्यांनी धारवाड प्रांतात प्रवेश करून तेथील लक्ष्मणेश्वर, बंकापूर इत्यादी ठिकाणे काबीज केली आणि ते बेळगाव परगण्यात आले. मग बेळगावरून महाराज थेट एप्रिल १६७८ च्या सुरुवातीस स्वराज्यात पन्हाळगडावर येऊन दाखल झाले.

### १२) कर्नाटक मोहिमेचे महत्त्व :

शिवाजी महाराजांच्या या कर्नाटक मोहीमेचे महत्त्व म्हणजे महाराष्ट्रात निर्माण केलेल्या राज्यासारखे मोठे राज्य त्यांनी या मोहीमेत कर्नाटक प्रांतात अवघ्या २ ते ९ महिन्यांत स्थापन केले. यामुळे हिंदवी स्वराज्याची पाळेमुळे थेट कावेरीच्या खोऱ्यात दक्षिण किनाऱ्यापर्यंत पक्की रूजली. या मोहीमेमुळे महाराजांचे राजकारण पटुत्व, मुत्सद्देगिरी, युद्ध कौशल्य, अध्यात्मिक दृष्टिकोन असे अनेक गुणविशेष उजळून निघाले. या मोहीमेत महाराजांनी २० लाख होन उत्पन्नाचा मुलुख आणि या मुलुखातील १०० लहान-मोठे किल्ले जिंकून, स्वराज्यात सामील करून घेतले. मद्रास किनाऱ्यावरील सुपीक प्रदेशावर व म्हैसूरच्या प्रदेशावर मराठी अंमल बसवला आणि विजयनगरच्या साम्राज्याचे एक प्रकारे पुनरूज्जीवन केले. या मोहीमेत मिळवलेल्या प्रचंड संपत्तीच्या जोरावर महाराजांनी मोठमोठ्या फौजा उभारल्या. कर्नाटकात अनेक नवे किल्ले बांधले, जुन्या किल्ल्यांची डागडुगी केली आणि या जोरावरच पुढे मुघलांशी टक्कर दिली. कर्नाटकात नव्याने जिंकलेल्या या प्रदेशाच्या मुलकी प्रशासनासाठी अनेक मराठी कुटुंबे या भागात आली आणि कायमची तेथेच वसली. त्यामुळे बृहन्महाराष्ट्राच्या संकल्पनेचा विस्तार झाला. अशाप्रकारे ही कर्नाटक मोहीम म्हणजे महाराजांच्या राजकीय जीवनातील एक तेजस्वी पर्वच आहे.

### (क) स्वयं-अध्ययन प्रश्न.

**रिकाम्या जागा भरा.**

१. शिवाजी महाराजांनी ......... मध्ये कर्नाटक मोहीम हाती घेतली.

२. शिवाजी महाराज व कुतुबशहाची भेट ......... मध्ये झाली.

३. मराठ्यांनी ............ रोजी जिंजीचा किल्ला जिंकून घेतला.

४. शिवाजी महाराजांनी जिंजीचा किल्लेदार म्हणून ............ ची नियुक्ती केली.

५. शिवाजी महाराज कर्नाटक मोहीमेवरून परत ............ किल्ल्यावर आले.

## २.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

| | | | |
|---|---|---|---|
| १) | खासा | : | विशेष, विश्वासातील |
| २) | दिवाण-ई-आम | : | जनतेचा दरबार |
| ३) | दिवाण-ई-खास | : | खास लोकांचा दरबार |
| ४) | नजराणा | : | भेट |
| ५) | दिग्विजय | : | सर्व दिशांवर विजय |
| ६) | सार्वभौमत्व | : | सर्वश्रेष्ठ अधिकार |
| ७) | मांडलिकत्व | : | सर्वश्रेष्ठ सत्तेच्या अंकित असणारे स्थान |

## २.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

| | | | |
|---|---|---|---|
| (अ) | १) १६६५ | २) १४ जून १६६५ | ३) मार्च १६६६ |
| | ४) फोलादखान | ५) नेसरी | |
| (ब) | १) कृष्णनृसिंहशेष | २) ६ जून १६६७ | ३) गोविंद बर्वे |
| | ४) हेन्री ऑक्झिडन | ५) निश्चलपूरी | |
| (क) | १) १६७७ | २) १६७७ | ३) १३ मे १६७७ |
| | ४) रायाजी नलगे | ५) पन्हाळा | |

## २.५ सरावासाठी स्वाध्याय

**(अ) टिपा लिहा.**

१) मिर्झा राजा जयसिंह

२) पुरंदरचा तह

३) गागाभट्ट

४) दुसरा राज्याभिषेक

५) व्यंकोजी महाराज

**(ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. पुरंदरच्या तहाची सविस्तर माहिती द्या.

२. शिवाजी महाराजांच्या आग्रा भेटीची माहिती सांगा.

३. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे महत्त्व सांगा.

४. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचे वर्णन करा.

५. शिवाजी महाराजांची कर्नाटक मोहिम विशद करा.

## २.६ सारांश

शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले हिंदवी स्वराज्य मोडून काढण्याचे अनेक प्रयत्न विजापूरच्या आदिलशहाने केले, मात्र त्यांना यामध्ये यश आले नाही. ही गोष्ट मुघलांना फारच धोकादायक वाटत होती. शिवाजी महाराजांचा दक्षिणेतील सत्ता विस्तार मुघल बादशहा औरंगजेबाच्या चिंतेची गोष्ट होती. यातून पुढे मुघल-मराठा संघर्ष सुरू झाला. शाहिस्तेखानाच्या अपयशानंतर बादशहाने मिर्झा राजा जयसिंहाची दक्षिणेत नेमणूक केली. मुघल-मराठा संघर्ष अधिक तीव्र होऊन पुरंदरचा तह घडून आला. या तहाच्या परिणामस्वरूप शिवाजी महाराजांना आग्र्याला जावे लागले. औरंगजेबाने विश्वासघात करून महाराजांना कैद केली. अतिशय बिकट व कठीण प्रसंगातून महाराजांनी स्वत:सह साथीदारांची सुटका करून घेतली, ही घटना औरंगजेबाला जबर धक्का देणारी होती. महाराजांनी मुघलांना धडा शिकवल्यानंतर स्वराज्याला कायदेशीरपणा प्राप्त करून घेण्यासाठी स्वत:चा राज्याभिषेक करून घेतला. या राज्याभिषेकाच्या निमित्ताने महाराजांनी स्वत:चे क्षत्रियत्व सिद्ध केले. शिवराज्याभिषेक ही घटना अत्यंत महत्त्वाची होती. राज्याभिषेक करून महाराजांनी स्वतंत्र व सार्वभौम राज्याची स्थापना केली. राज्याभिषेकानंतर महाराजांनी अतिशय धाडसाने दक्षिण दिग्वजय मोहीम हाती घेतली. यामध्ये २० लाख होनाचा प्रदेश व अनेक लहान-मोठे किल्ले स्वराज्यात सामील झाले. कर्नाटकात नवीन राज्यच निर्माण केले. अतिशय कमी कालावधीत स्वराज्या इतकाच प्रदेश कर्नाटकमध्येही प्राप्त करण्यात यश मिळविले.

## २.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठी पुस्तके

१. प्रा. सदाशिव आठवले, शिवाजी आणि शिवयुग, मेहता प्रकाशन, पुणे.

२. चंद्रशेखर शिखरे, प्रतिइतिहास, जिजाई प्रकाशन, पुणे.

३. डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), छत्रपती शिवाजी महाराज स्मृतिग्रंथ, महाराष्ट्र शासन.

४. डॉ. जयसिंगराव पवार, मराठी सत्तेचा उदय, फडके बुक हाऊस, कोल्हापूर.

५. केळुसकर कृ. अ., छत्रपती शिवाजी महाराज, पुणे.

६. पगडी सेतुमाधवराव, शिवचरित्र - एक अभ्यास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

❋ ❋ ❋

# सत्र १ : घटक ३

# मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध (१६८१-१७०७)


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

 ३.२.१ छत्रपती संभाजी महाराज (१६८१-८९)

 ३.२.२ छत्रपती राजाराम महाराज (१६८९-१७००)

 ३.२.३ महाराणी ताराबाई (१७००-१७०७)

३.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

३.४ स्वयं अध्ययन प्रश्न व उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक माहितीसाठी संदर्भ पुस्तके


## ३.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हांस -

- संभाजी महाराजांच्या कारकिर्दीची ओळख होईल.
- संभाजी महाराजांच्या काळातील मुघल मराठे संघर्ष लक्षात येईल.
- संभाजी महाराज व परकीय संबंधाची माहीती होईल.
- राजाराम कालीन मुघल-मराठे संघर्ष माहीत होईल.

- स्वराज्याचे अस्तित्व कोणत्या परिस्थितीत टिकविले गेले तसेच जिंजी संघर्ष माहीत होईल.
- सेनापती संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांचे योगदान समजेल.
- महाराणी ताराबाईकालीन मराठा स्वातंत्र्य युद्धाची माहीती करून घेता येईल.

## ३.१ प्रास्ताविक

इ.स. १६८१-१७०७ हा कालखंड मराठा इतिहासात 'स्वातंत्र्य युद्धाचा कालखंड' म्हणून ओळखला जातो. जुलमी अत्याचारी राजवटी विरोधात प्रथम बंड करण्याचे धाडस शिवाजी महाराजांनी केले. त्यांनी स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. स्वराज्य जिवापाड जपले, रयत सांभाळली, लोककल्याणकारी शासन केले. पुढे स्वराज्याचे रक्षण करण्याची जबाबदारी संभाजी महाराजांवर येऊन पडली. त्यांनी आपल्या शक्तीनिशी ही जबाबदारी पेलली. त्या प्रेरणाशक्तीमुळे स्वराज्य नष्ट करण्याचे स्वप्न उराशी बाळगून आलेल्या औरंगजेब बादशहाला महाराष्ट्राच्या भूमीत अंतिम श्वास घ्यावा लागला. संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि महाराणी ताराबाई यांनी केलेल्या पराक्रमामुळे स्वराज्य व त्याचे अस्तित्व कायम राहिले. संभाजी महाराजांच्या बलिदानानंतर मराठा सैन्याने दिसेल त्या व मिळेल त्या शस्त्रांने मोठा प्रतिकार केला. राजाराम महाराज, महाराणी ताराबाई यांच्या काळात मुघल सैन्यास सळो की पळो करून सोडले. संभाजी महाराजांच्या बलिदानामुळे सर्व मराठा समाजात संतापाची लाट उसळली व त्या लाटेमध्ये मुघल साम्राज्य विनाशाच्या चक्रामध्ये फिरू लागले. यांचे श्रेय संभाजी महाराजांच्या पराक्रमास व बलिदानास आहे. इ.स. १६८१ ते इ.स. १६८९ या ९ वर्षाच्या कार्यकाळात संभाजी महाराजांनी पराक्रम, स्वराज्य रक्षण, स्वधर्मप्रेम, स्वाभिमान, जागृत ठेवण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले.

या वर भाष्य करताना वा. सी. बेंद्रे म्हणतात, 'एकट्या संभाजी महाराजांनी अखिल हिंदुस्थानातील शक्ती सामर्थ्यांनिशी हिंदवी स्वराज्यासाठी सुसंघटितपणे दिर्घकाळ दिल्या गेलेल्या झगड्याचा विचार करता महाराष्ट्राची अखिल हिंदुस्थानात व परदेशात गाजलेली खरी कर्तबगारी, उज्ज्वल संस्कृती व तेजस्वी राष्ट्रीय संघटन यांच्या खऱ्या कसोटीचा आदर्श संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत दिसून येतो. तरी राजाराम व ताराबाई यांचे कार्य तेवढेच महत्त्वाचे आहे'.

या घटकामध्ये संभाजी महाराज ते महाराणी ताराबाई कारकिर्दीतील अनेक घटनांचा अभ्यास करावयाचा आहे.

## ३.२ विषय विवेचन

### ३.२.१ छत्रपती संभाजी महाराज (१६८१ ते १६८९)

#### अ) बालपण आणि शिक्षण :

संभाजी महाराज हे शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ चिरंजीव होते. त्यांचा जन्म ज्येष्ठ शु. १२ शके १५७९ म्हणजे गुरूवार दि. १४ मे, १६५७ रोजी पुरंदर किल्ल्यावर झाला. संभाजी महाराजांच्या आई सईबाई या होत्या. संभाजी महाराजांच्या जन्मानंतर दोनच वर्षामध्ये त्यांचा मृत्यू झाला. आईच्या अचानक मृत्युमुळे पोरका झालेल्या संभाजी महाराजांच्या पालनपोषणाची जबाबदारी राजमाता जिजाबाई यांनी पार पाडली. आईची उणीव त्यांना भासू दिली नाही. केशव भट आणि उमाजी पंडित यांनी संभाजी राजांना विविध विषयांचे शिक्षण दिले. राजकारण, युद्धनीतीचे धडे स्वत: शिवाजी महाराजांनी द्यावयास सुरुवात केली, ती सन १६६६ पासून. शिवाजी महाराजांनी आग्रा भेटीसाठी संभाजी महाराजांना बरोबर नेले होते. निराजी रावजी, प्रतापराव गुजर व संभाजी महाराज यांनी मुघल दरबारात मराठ्यांचे प्रतिनिधित्व अनेक वेळा केल्याचे दाखले मिळतात. सन १६७१ पासून संभाजी महाराज राज्यकारभार विषयक कामे करीत असत. शिवराज्याभिषेकावेळी संभाजी महाराजांना 'युवराजपद' देण्यात आले होते. परकीय व्यापारी मंडळीच्या बरोबर चर्चा होत असताना त्यामध्ये संभाजी महाराज सहभागी होत असत. सुरतेच्या इंग्रज व्यापारी लोकांचे अभिप्राय तसे दिसतात.

#### १) विवाह समारंभ :

संभाजी महाराजांचा पहिला विवाह सन १६६१ साली शिर्के-देशमुख घराण्यातील येसूबाई शिर्के यांच्याशी झाला होता. तर दुसरा विवाह दुर्गाबाई यांचेशी झाला होता. पण या दुसऱ्या विवाह समारंभाची फारशी माहिती उपलब्ध होत नाही. संभाजी महाराजांना राणी येसूबाई पासून भवानीबाई व शिवाजी अशी दोन अपत्ये झाली. संभाजी महाराजांचे पुत्र शिवाजी हेच पुढे शाहू (सातारकर) या नावाने प्रसिद्ध झाले.

#### २) राजकीय परिस्थिती आणि गृहकलह :

शिवाजी महाराज यांनी राज्याभिषेक समारंभ झाल्यानंतर कर्नाटक मोहीम हाती घेतली, तेव्हा त्यांना 'शृंगारपूर' याठिकाणी घेऊन आले व ते पुढे स्वारीवर निघून गेले. शृंगारपूर येथील वास्तव्यात संभाजी महाराजांनी 'बुधभूषण' हा संस्कृत ग्रंथ लिहिला. त्यानंतरच्या पुढील काळात शिवाजी महाराज, सोयराबाई व संभाजी महाराज यांच्या मध्ये परस्पर गैरसमज निर्माण झाले. शिवाजी महाराजांनी संभाजी महाराजांना पन्हाळगडावर ठेवले. त्यातुन पुढे संभाजी महाराज मुघलाकडे गेले. त्यांनी दिलेरखान या मुघल सेनापतीसह भूपालगड, मंगळवेढे, जालगिरी तिकोटे, होनवाड या ठिकाणी मोहीमा केल्या.

मुघल सरदार दिलेरखाना बरोबर संभाजी महाराज काम करीत होते. परंतु त्यांचे स्वराज्याबद्दलचे धोरण संभाजी महाराजांच्या लक्षात येताच ते पुन्हा स्वगृही परतले. पन्हाळगडावर शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांची भेट झाली. शिवाजी महाराजांनी खुल्या मनाने संभाजी महाराजांची समजूत घातली. कमल गोखले म्हणतात, ''वातावरण सुधारत असताना शनिवार दि. ३ एप्रिल, १६८० रोजी शिवाजी महाराजांचे निधन झाले. परिणामी सर्व वातावरण बदलण्यास सुरुवात झाली.''

### ३) अंतर्गत संघर्ष :

शिवाजी महाराजांच्या निधनानंतर अंतर्गत संघर्ष सुरू झाला. सोयराबाई व संभाजी महाराज या दोघांमध्ये हा संघर्ष झाल्याचे संदर्भ मिळतात. सोयराबाई या महत्त्वकांक्षी होत्या. मराठा स्वराज्य आपला मुलगा राजाराम यांना मिळावे यासाठी प्रधान मंडळातील सदस्यांना हाताशी धरून हालचाली केल्या. शिवाजी महाराजांच्या निधनाची बातमी संभाजी महाराजांना समजू दिली नाही. संभाजी महाराज या समयी पन्हाळगडावर होते. मोरोपंत पिंगळे, अण्णाजी दत्तो यांनी राजाराम महाराज वारस राहावेत यासाठी सोयराबाईंना साथ दिली. परिणामी गैरसमज वाढले. संभाजी महाराजांना नजरकैद करण्याचा प्रयत्न झाला. संभाजी महाराजांच्या हालचालीवर लक्ष ठेवण्यासाठी गुप्तहेर पाठविण्यात आले. अशा वातावरणामध्ये २१ एप्रिल, १६८० रोजी आण्णाजी दत्तो यांनी राजाराम महाराजांना स्वराज्याचा वारसदार म्हणून गादीवर बसविले.

### ४) संभाजी महाराज यांचे राज्यारोहण :

मराठा राज्यात सरळ अंतर्गत सत्ता संघर्ष सुरू झाला. तत्कालीन प्रजा आणि सैन्य संभाजी महाराजांच्या पाठिशी उभे राहिले. संभाजी महाराजांनी प्रथम गुप्तहेरांना पकडून त्यांचा अण्णाजी दत्तो व मोरोपंत पिंगळे यांचेशी असणारा संपर्क तोडून टाकला. परिणामी संभाजी महाराजांना कैद करण्यासाठी मोरोपंत व अण्णाजी दत्तो आले. मात्र सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या मदतीमुळे संभाजी महाराजांनी त्या दोघांनाही कैद करून टाकले. पुढे १८ जून, १६८० रोजी संभाजी महाराजांनी रायगडचा ताबा घेतला. आपल्या विरोधात असलेल्या लोकांना त्यांनी उदार अंत:करणाने माफ केले. यानंतर त्यांनी विधीयुक्त राज्यारोहण समारंभ माघ शु. ७ शके १६०२ म्हणजे १६ जानेवारी, १६८१ रोजी करून घेतला.

## ब) संभाजी महाराज - मुघल संघर्ष :

शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठे-मुघल संघर्ष संभाजी महाराजांच्या काळात आणखी तीव्र झाला. मुघल फौजा रजपूत संघर्षामध्ये मग्न आहे हे लक्षात येताच संभाजी महाराजांनी मराठी फौजा मुघल प्रदेशात पाठविल्या.

### १) बुऱ्हाणपूरची लूट :

संभाजी महाराजांनी पावसाळा संपताच मराठी फौजा मुघल प्रदेशात पाठविल्या. त्यापैकी एक खानदेश मध्ये व दुसरी बुऱ्हाणपूरच्या प्रदेशात चालून गेल्या. या मराठी सैन्याचे नेतृत्व सेनापती हंबीरराव मोहिते यांनी केले. बुऱ्हाणपूर परिसर तीन दिवस लुटण्यात आला. यामध्ये मराठी सैनिकांना मोठी लुट मिळाली. ही लुट साल्हेरच्या किल्ल्यामध्ये व्यवस्थित ठेवण्यात आली.

### २) औरंगाबाद परिसरात मराठे सैनिकांच्या हालचाली :

मराठे सैनिक यानंतर पुन्हा औरंगाबाद परिसरात आले. त्यांनी या प्रदेशात धुमाकूळ घातला. भिमसेन सक्सेना हा इतिहासकार म्हणतो, अहमदनगर, नाशिक ते गोवळकोंडा सीमा भागापर्यंत व नंतर वऱ्हाड-खानदेश या मुघल प्रदेशात धुमाकूळ घालीत होते. यामुळे खानदेश-वऱ्हाड प्रदेशावर तसेच औरंगाबाद मध्ये मराठी दहशत निर्माण झाली.

### ३) राजपुत्र अकबर दक्षिणेकडे :

रजपूत राजा जसवंतसिंह (जोधपूर) इ.स. १६७९ मध्ये मरण पावल्यावर रजपुतानाचा प्रदेश जिंकण्यासाठी मुघल फौज तेथे पाठविली. रजपूतांनी मोठ्या हिंमतीने मुघल फौजेचा सामना केला. निर्णायक विजय कोणालाही मिळाला नाही. युद्ध दीर्घकाळ रेंगाळत गेले. त्यामुळे राजपुत्र अकबर यांने औरंगजेब बादशहाला सल्ला दिला की, 'राजपूतांना जिंकणे सोपे नाही. रजपूताबरोबर सामोपचार व सहिष्णु धोरण स्वीकारण्यात यावे.' राजपुत्र अकबराचा हा सल्ला औरंगजेब बादशहाला मानवला नाही. दोघांत मतभेद झाले. पुढे त्याचे रूपांतर अकबराच्या बंडात झाले. अकबर रजपूतांना जाऊन मिळाला. दक्षिणेत जाऊन संभाजी महाराज यांचे सहकार्य घेऊन औरंगजेब बादशहा विरोधात लढावे अशी महत्त्वाकांक्षा मनात ठेऊन रजपूत सेनानी दुर्गादास राठोडसह अकबर दक्षिणेत आला. सन १६८१ पासून राजपूत, अकबर यांचे वास्तव्य पाली, लांजा, साखरपा, विशाळगड व मलकापूर इत्यादी ठिकाणी होते. संभाजी महाराजांच्या तळ कोकणातील मोहीमांमध्ये तो सहभागी झाला होता. आपला मुलगा अकबर संभाजी महाराज यांचे आश्रयास गेला, या गोष्टीचा बादशहाला फार राग आला होता. त्यामुळेच बादशहा सर्व शक्तीनिशी दक्षिणेत आला.

संभाजी महाराजांनी राजपूतांना अनेक पत्रे पाठवून अकबरास मदत करावी या संबंधी चर्चा चालू असताना मुघल बादशहा सर्व शक्तीनिशी दक्षिणेत आला. त्यामुळे संभाजी महाराजांना अकबराच्या समस्येकडे फार लक्ष देता आले नाही. इ.स. १६८३ नंतर राजपुत्र अकबर प्रथम पोर्तुगिजांकडे गेला.

मुघल सैन्य पाठलागावर असल्याने त्याची फार दमछाक झाली. आपण आता उत्तरेकडे जाऊ शकत नाही यामुळे तो निराश झाला. १६८५ नंतर समुद्रामार्गे तो अरबस्थानातील मस्कत या ठिकाणी गेला. पुढे मरेपर्यंत त्याचे वास्तव्य 'इराण' मध्ये राहिले. इ.स. १७०४ मध्ये निधन झाले.

**४) औरंगजेबाची दक्षिण स्वारी :**

मुघलांचे शत्रू मराठे यानांच राजपुत्र अकबर जाऊन मिळाल्यामुळे, मराठे व अकबर यांचा बिमोड करणे या प्रमुख हेतूने बादशहा दक्षिण स्वारीवर निघाला. नोव्हेंबर १६८१ ते १७०७ पर्यंत तो दक्षिणेत होता. या कालखंडात मुघल-मराठे संघर्षाचा जो स्फोट झाला. त्याला 'मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध' असे म्हणतात.

**५) कोकणातील संघर्ष :**

मुघल सैन्य दक्षिणेत येताच ते मराठी प्रदेशावर तुटून पडले. मुअज्जम, बहादूरखान, चिनकिलीजखान, हसनखान इ. सेनापती स्वराज्यावर चारी दिशांनी तुटून पडले. त्यात भर म्हणून सिद्धीने कोकणातील मराठा ठाण्यावर हल्ले केले. संभाजी महाराजांनी सिद्धीवर मोहीम काढली, मात्र त्यांना यश मिळाले नाही. कारण उत्तर कोकणात हसनखान सैन्य घेऊन आला. त्याने कल्याण-भिवंडी जिंकली. बहादूरखानाने 'शिवापूर' लुटले. दादाजी रघुनाथ यांचेकडे सिद्धीवरील स्वारीची सूत्रे देऊन संभाजी महाराज तातडीने रायगडी परतले (१६८२).

**६) रामसेज किल्ला संघर्ष :**

नाशिकजवळ हा किल्ला होता. तो जिंकण्यासाठी औरंगजेब बादशहाने प्रथम शहाबुद्दीन, नंतर बहादुरखान, पुन्हा कासीमखान या तीन अव्वल सेनापतीना पाठविले. परंतु रामसेज किल्ला जिंकता आला नाही. रूपाजी भोसले आणि मानाजी मोरे यांनी मोठा पराक्रम करून तिन्ही मुघल सेनानींना परतवून लावले (१६८२).

**७) कल्याण - भिवंडी संघर्ष :**

कल्याण-भिवंडी ही ठाणी इसनखान यांने जिंकलेली होती. परंतु ती ठाणी त्याच्याकडे जास्त काळ राहिली नाहीत. म्हणून बादशहा औरंगजेबाने प्रथम रणमस्त खान व नंतर रूहुल्लाखान यांना पाठविले, मात्र यश मिळाले नाही. एप्रिल १६८३ च्या अखेरीस मुघल सैन्यांने या प्रदेशातून माघार घेतली. रूपाजी भोसले आणि मोरे निळेश्वर यांनी मराठा सैन्याकडून मोठा पराक्रम केला.

## ८) इ.स. १६८१ ते १६८४ काळातील संघर्ष :

या काळात मुघल-मराठा संघर्ष हा भीमा नदी परिसर, सोलापूर (टेंभूर्णी), नळदूर्ग, धारूर, उद्‌गीर, सांरगपूर, सोनगांव, अहमदनगर, जालना, पेडगांव व पाटोदा या ठिकाणी झाला. हंबीरराव मोहिते, विठोजी चव्हाण, स्वत: संभाजी महाराज, धनाजी जाधव, तिमाजी पवार यांनी मोठा पराक्रम केला. चौथाई वसूल केली. माणको बल्लाळ यांनी मोठी लूट मिळविली. वरील ठिकाणी ज्या लढाया झाल्या त्यामध्ये कधी मुघलाना तर कधी मराठ्यांना विजय मिळाले. १६८५ मध्ये चाकण, लोहगड, विजापूर, कोल्हापूर, सातारा, मिरज या भागात मराठे-मुघल यांच्यात मोठा संघर्ष झाला. कोणत्याही पक्षास मोठे यश मिळाले नाही व कोणीही माघार घेतली नाही. १६८४-८५ मध्ये मामूदखान आणि शहाबुद्दीनखान यांनी सुपे, बारामती, इंदापूर परिसरात मोठ्या हालचाली केल्या. या परिसरात मराठी सैन्याने मुघल सैनिकांना जोरदार प्रतिकार केला. एकाच वेळी मराठे-मुघल यांच्यात अनेक ठिकाणी लढाया सुरू झाल्या. त्यामुळे सर्व आघाड्यावर संभाजी महाराजांना लक्ष देता आले नाही.

## ९) राजपुत्र मुअज्जमची दक्षिण कोकणातील स्वारी - १६८३-८४ :

आता पर्यंतच्या संघर्षामध्ये मुघलांना मोठे यश मिळाले नाही. याची जाणीव औरंगजेब बादशहाला झाली होती. निर्णायक यश मिळविण्यासाठी तो स्वत: औरंगाबादहून अहमदनगर या ठिकाणी आला. सैन्य संचलन स्वत:कडे घेतले. स्वराज्याच्या प्रदेशात चार बाजूकडून मुघल सैन्य घुसविण्याची योजना तयार केली. या योजनेनुसार -

| | | |
|---|---|---|
| आझमशहा आणि बेदरबख्त | : | नाशिक विभागाकडून |
| सरबुलंदखान | : | बहादूरगड मार्गे |
| रूहुल्लाखान | : | निरा नदीकडून |
| बरामंदखान | : | आष्टीच्या प्रदेशातून |
| मामूदखान | : | बारामती, इंदापूरकडून |
| शहाबुद्दीनखान | : | पुणे बाजूकडून |

मुआज्जम- बेळगांव बाजूकडून स्वराज्याचा प्रदेश जिंकत एकत्र यावे.

संभाजी महाराजांची कोंडी करण्यासाठी मुअज्जम मोठे सैन्य घेऊन कोकणात उतरला. मराठी सैन्याने गनिमी कावा युद्ध पद्धतीचा अवलंब करून अनेक ठिकाणच्या रसदी मारल्या. मालवण, वेंगुर्ले, कुडाळ, सावंतवाडी परीसरात अनेक चकमकी झाल्या. स्वत: संभाजी महाराजांनी कोकणातील पराक्रमी मराठा सरदारांना मदतीला घेऊन मोठा पराक्रम केला. 'मुअज्जमचे कोकणात मोठे हाल झाले. गनिमीकावा, उपासमार, रोगराई यामुळे मुघली सैन्याचा भयंकर संहार झाला. १/३ सैनिक याला बळी पडले. हत्ती, घोडे, उंट, खेचरे रोगराईला बळी पडली.' असे वर्णन खाफीरखानाच्या इतिहासामध्ये सापडते. मोठे सैन्य, तोफखाना, संपत्ती, यानिशी द. कोकणात उतरलेला राजपुत्र मुअज्जम अपयश घेऊन मे, १६८४ मध्ये औरंगाबादेत परतला.

**१०) आदिलशाहीचा शेवट :**

इ.स. १६८१ ते ८४ पर्यंत मराठा स्वराज्य औरंगजेब बादशहाला जिंकता आले नाही. म्हणून त्याने आपले लक्ष आदिलशाहीकडे वळविले. स्वत: बादशहा अहमदनगरहून सोलापूर या ठिकाणी आला. तेथून त्याने बहादूरखान व रूहुल्लाखान यांना मोठी फौज देऊन विजापूरकडे पाठविले. त्यांनी एप्रिल १६८५ मध्ये विजापूरच्या भूईकोट किल्ल्यास वेढा घातला. संभाजी महाराजांनी विजापूरकरांच्या मदतीला एक मराठा सैनिकांची तुकडी पाठविली व विजापूरकरांना धीर देण्याचा प्रयत्न केला. बादशहा स्वत: १४ जून, १६८५ रोजी विजापूरला आला. त्यामुळे विजापूरकरांचा धीर संपला. १२ सप्टेंबर १६८६ रोजी विजापूरचा भूईकोट किल्ला मुघलांनी जिंकला. आदिलशहा शरण आला. बहामनी सत्तेच्या विघटनातून निर्माण झालेली दक्षिणेकडील एक सत्ता कायमची संपली. तिचा शेवट झाला.

**११) कुतूबशाहीचा शेवट :**

सन १६८५ मध्ये विजापूरचा वेढा चालू असताना गोंवळकोंडा या कुतूबशाहीच्या प्रदेशावर आक्रमण करण्यात आले. विजापूरची आदिलशाहीची सत्ता नष्ट केल्यावर बादशहाने कुतुबशाहीवर आपले लक्ष केंद्रीत केले. कुतुबशाहीने मोठ्या धिराने मुघलांचा सामना केला. पण फुटीरवृत्तीमुळे त्यांचे अनेक सरदार मुघलांना मिळाले. परिणामी त्यांची बाजू दुबळी बनली. ती मुघली आक्रमणाला बळी पडली. कुतुबशहाचा पराभव झाला. मुघल सैन्याने कुतुबशहास कैद केले. २१ सप्टेंबर १६८७ रोजी कुतुबशाही नष्ट झाली. अशा पद्धतीने औरंगजेब बादशहाने दक्षिणेकडील मुस्लिम राज्ये नष्ट केली.

याच दरम्यान सातारा-वाई-कराड प्रदेशात मुघल-मराठे यांचे तुंबळ युद्ध चालू होते. वाईजवळ मुघल सरदार शारजाखानबरोबर लढत असताना मराठा सेनापती हंबीरराव मोहिते धारातीर्थी पडले. त्यामुळे संभाजी महाराज व स्वराज्य पुढील काळात अडचणीत आले.

**क) संभाजी महाराज आणि परकीय संबंध :**

**१) संभाजी महाराज व पोर्तुगीज संबंध :**

स्वराज्याच्या सीमा गोव्यापर्यंत असल्याने संभाजी महाराजांच्या काळात संघर्ष झालेले आढळतात. त्याची कारणे याप्रमाणे -

- पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी मुघल धार्जिणे धोरण स्वीकारले.
- मराठा सुभेदार मोरोबा दादाजी यांचे विषयी आलेल्या तक्रारी.
- डिचोली प्रदेशात पोर्तुगीजांनी केलेली घुसखोरी.
- कोकणचा प्रदेश औरंगजेब बादशहाने घ्यावा व तो मदतीच्या बदल्यात पोर्तुगीजांना तो मिळावा अशी विनंतीपत्रे पोर्तुगीजांनी औरंगजेब बादशहाकडे पाठविली होती.
- पोर्तुगीजांनी 'फोंडा किल्ला' मिळविण्याचा केलेला प्रयत्न.

वरील कारणामुळे संभाजी महाराजांच्या काळात संघर्ष झाला. हे संघर्ष अंजदीव बेट (१६८२), चौल-फोंडा, गोवा या ठिकाणी झाले (१६८४ ते १९८६). या संघर्षामध्ये निर्णायक विजय कोणासही मिळाले नाहीत. इ.स. १६८४ मध्ये मराठे-पोर्तुगीज करार झाला. राजपुत्र अकबर, कवी कलष यांनी यामध्ये भाग घेतला. प्रदेश, जहाजे, कैदी, दमणची चौथाई या बाबत करार झाला.

सन १६८७ ते ८९ या काळात मराठे-पोर्तुगीज संबंध पुन्हा बिघडले. साखळी डिचोली, पेडणे, फोंडे, कारवार इ. प्रदेशात देसाई सरदारांच्या मदतीने पोर्तुगीजांनी पुन्हा गोंधळ घातला. खेम सावंत, लखम देसाई, राम दळवी, दुलबा नाईक या देसाई सरदारांनी पोर्तुगीज-मुघल मदतीवर कोकणच्या प्रदेशात धुमाकूळ घातला. संभाजी महाराजांच्या कारकिर्दीमध्ये मराठे-पोर्तुगीज संबंध कधीही मैत्रीपूर्ण राहिले नाहीत.

**२) संभाजी महाराज व सिद्दी संबंध :**

सिद्दी बरोबरचे संघर्ष शिवाजी महाराजांच्या काळापासून चालत आले होते. त्यांची प्रमुख

कारणे याप्रमाणे -

- सागरी परवाना इतर सत्तांनी पोर्तुगीजांकडून घ्यावा यासाठी सिद्दीसत्ता प्रयत्न करीत.
- कोकणातील बंडखोर सरदारांना पोर्तुगीज मदत करीत असत. त्यास सिद्दीसत्ता पाठिंबा देत असत.
- स्वराज्यावर इतर सत्तांच्या स्वाऱ्या होताच, कोकणच्या प्रदेशात सिद्दी गोंधळ करीत.
- स्वराज्यातील प्रदेशातून सिद्दीसत्ता सक्तीने चौथ वसूल करीत असत.
- औरंगजेब बादशहा दक्षिणेत आल्यानंतर त्याने फरमान पाठवून सिद्दी सरदारांना संभाजी महाराज यांचे विरोधात आक्रमण करण्याच्या सूचना दिल्या.

या प्रमुख कारणांमुळे संभाजी महाराजांच्या काळात मराठे-सिद्दी संघर्ष झाला.

सिद्दी बरोबर इ.स. १६८० ते १६८७ पर्यंत संघर्ष झाला. त्यामध्ये ऑगस्ट १६८० मध्ये उंदेरी बेटावरील सिद्दी सरदारांनी मराठा प्रदेशात लूटालूट केली. संभाजी महाराजांनी त्यामुळे उंदेरी मोहीम काढली. ती पुढे जुलै १६८१ पर्यंत चालू होती. निर्णायक विजय कोणासही मिळाला नाही. डिसेंबर १६८१ मध्ये संभाजी महाराजांनी मोठी फौज घेऊन सिद्दीचे प्रमुख लष्करी ठाणे 'जंजिरा' या ठिकाणावर जोरदार हल्ला केला. दंडा-राजापूरी हे ठाणे मराठ्यांनी जिंकले. परंतु जंजिरा जिंकता आला नाही. या मोहीमेत राजपुत्र अकबर, दादाजी रघुनाथ हे संभाजी महाराजांबरोबर होते. दरम्यान हसन खान उत्तर कोकणात आल्यामुळे ही मोहीम अर्धवट राहिली.

सन १६८२ मध्ये सिद्दी सरदारांनी दाभोळ, नागोठाणे येथील मराठा आरमारी दलावर हल्ला केला. त्यामध्ये मराठा आरमारास माघार घ्यावी लागली. तर सन १६८७ मध्ये सिद्दी सरदार कासिम याने कोलवा प्रदेशात धुमाकूळ घातला. औरंजेबाच्या मोहीमेमुळे संभाजी राजांना सिद्दी सरदारांकडे लक्ष देता आले नाही. सिद्दीच्या बाबतीत मराठे फारसे यशस्वी ठरू शकले नाहीत. सिद्दी सरदारांच्या जंजिरा, दंड राजापूरी, उंदेरी या ठिकाणांवर संभाजी महाराजांच्या कालखंडात हल्ले करण्यात आले, पण त्यामध्ये मराठ्यांना यश मिळाले नाही. सिद्दी मराठ्यांना शेवटपर्यंत प्रचंड त्रासदायक ठरले.

### ३) संभाजी महाराज व इंग्रज संबंध :

भारताच्या राजकीय इतिहासामध्ये इंग्रज स्थानिक सत्तांच्या संदर्भात अत्यंत धूर्तपणे वागले. त्यांनी कधी मराठे, कधी पोर्तुगीज तर कधी सिद्दी सत्तांचा वापर आपल्या राजकीय स्वार्थासाठी

केल्याचे दिसते. इंग्रजांनी मराठा छत्रपतींच्या बाबतीत दुटप्पी धोरणाचा स्वीकार केला होता. मराठ्यांचे कट्टर शत्रू मुघल व सिद्दी यांना अंतर्गत मदत व आश्रय देण्याचे धोरण त्यांनी स्वीकारलेले होते.

संभाजी महाराजांच्या काळात इंग्रजांनी सिद्दीला मदत करू नये व मुंबईच्या नैसर्गिक बंदरात सिद्दीच्या जहाजांना प्रवेश देऊ नये असे पत्र पाठवून इंग्रजांना कळविण्यात आले होते. तरी सुद्धा मुद्दाम इंग्रज या सिद्दींना आश्रय व मदत करीत असत. त्यामुळे संभाजी महाराजांनी आपले वकील आवजी पंडित, नंतर निराजी यांना इंग्रजांशी चर्चा करण्यासाठी पाठविले होते. झालेल्या चर्चेतून निष्पन्न काहीच झाले नाही. पुढील काळात सन १६८४ मध्ये मराठ्यांनी मुंबई जवळचा प्रदेश जिंकून घेतला. इंग्रजांमध्ये भिती निर्माण झाली. त्यातूनच मे, १६८४ मध्ये इंग्रज-मराठे करार झाला. या करारानुसार -

- इंग्रजांना धर्मप्रसार करता येणार नाही.
- मराठी प्रदेशातून गुलाम खरेदी-विक्री करता येणार नाही.
- मराठा प्रदेशात इंग्रजांनी केवळ व्यापार करावा.
- छत्रपतींची परवानगी घेऊनच वखारी स्थापन कराव्यात.
- इंग्रज जो माल आयात करतील त्यावर २.५% जकात मराठ्यांना द्यावा.
- निर्यात मालावर जकात घेतली जाणार नाही.
- एकमेकांकडे असलेला माल, जहाजे, वस्तू अथवा साहित्य ज्याचे त्याला परत करावे.

या करारामुळे संभाजी महाराजांच्या काळात अखेरपर्यंत इंग्रज-मराठे संबंध मैत्रीचे राहिले.

### ड) संभाजी महाराजांचे बलिदान :

इ.स. १६८५ ते १६८९ हा कालखंड मराठा राज्याच्या दृष्टीने अत्यंत कठोर परीक्षा घेणारा कालखंड ठरला. याचवेळी मराठा सरदारांच्यात आपआपसात गैरसमज, झगडे सुरू झाले. संभाजी महाराजांनी अनेक सरदारांना पत्रे पाठवून त्यांना शांत करण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रकार्याचे महत्त्व पटवून सांगितले. अशा बिकट परिस्थितीत संभाजी महाराज मुघलांना तोंड देत होते. औरंगजेब बादशहाने अनेक सेनापतीच्या नेतृत्वाखाली आपल्या फौजा मराठी प्रदेशात पाठविल्या. मातब्बरखान नाशिक, बागलाण प्रदेशात मराठी प्रदेश व किल्ले जिंकत होता. मुअज्जम चाकणवरून कोकणचा प्रदेश जिंकत

पुढे येत होता. रायगड प्रदेशावर फिरोजजंग, झुल्फीकारखान चालून येण्याच्या योजना करीत होते. तर 'शेख निजाम (मुकर्रबखान) हा करवीर, पन्हाळा प्रदेशात पोहचला होता. अशा स्थितीत मराठे सरदार स्वराज्याला विसरून मुघलांना जाऊन मिळू लागले. संभाजी महाराजांच्या काळात सन १६८८ च्या उत्तरार्धात दोन वाईट घटना घडून आल्या. पहिली घटना शिर्के सरदारांचे बंड, दुसरी घटना रायगडावर प्रल्हादपंत व इतराकडून झालेली फंदफितूरी. यातून मार्ग काढण्यासाठी सामोपचारातून कवी कलष याने प्रयत्न केले. गैरसमज, मतभेद यामुळे शिर्के व कवी कलष यांच्यात वितुष्ट आले. रायगडावरील प्रल्हादपंत निराजी व इतर मंडळींचे बंड मोडून संभाजी महाराज पन्हाळा, विशाळगड, संगमेश्वर परिसरातील देशमुख, देशपांडे वतनदार मंडळीच्या अडचणी सोडविण्यात दंग राहिले. शिर्के सरदारांना समजविण्याचा प्रयत्न केला. पण यश आले नाही. तेथून ते रायगडाकडे जानेवारी १६८९ मध्ये निघाले. संगमेश्वर मुक्कामी असताना 'शेख निजाम' याने संभाजी महाराज, कवी कलष यांना पकडले. येथे छोटी चकमक झाली. संभाजी महाराज, कवी कलष व इतर कांही मंडळी यांना शेख निजाम याने जलदगतीने स्वराज्याच्या प्रदेशाबाहेर काढले. यावेळी औरंगजेब बादशहा बहादूरगडावर छावणी टाकून होता. पुढे संभाजी महाराज व कवी कलष यांच्यावर अनन्वीत अत्याचार करण्यात आले. इस्लामचा स्वीकार करावा, स्वराज्याच्या खजिन्याचे ठिकाण सांगावे, स्वराज्याचे किल्ले ताब्यात द्यावेत, यासाठी त्यांचा छळ करण्यात आला. संभाजी महाराजांनी कोणत्याही प्रश्नाचे उत्तर दिले नाही. उलट औरंगजेबाची निंदा केली. संतापलेल्या बादशहाने संभाजी महाराजांच्या शरीराचे तुकडे तुकडे केले (११ मार्च, १६८९). कवी कलष याचीही अशाचप्रकारे हत्या केली. या घटनेने स्वराज्यावर शोककळा पसरली. एका पराक्रमी, धाडसी, तेजस्वी मराठा छत्रपतीचा शेवट अत्यंत वाईट पद्धतीने झाला. संभाजी महाराजांनी मोठ्या शौर्याने आक्रमणाशी ९ वर्षे लढा दिला. साधन सामुग्री कमी असताना, लष्करी शक्ती कमी पडत असताना, स्वकीयांनी फंदफितुरी केली असताना जो तेजस्वी लढा दिला त्यास मराठ्यांच्या इतिहासात तोड नाही.

### इ) संभाजी महाराजांची योग्यता :

संभाजी महाराजांची कारकीर्द १६८१ ते १६८९ अशी झाली. इतर मराठा छत्रपतींच्या कारकीर्दीपेक्षा अत्यंत धावपळीची, सर्व युद्ध आघाड्यावरची, धामधूमीची आहे. स्वराज्यरक्षण, स्वकीय शत्रूचा बंदोबस्त करणे, मुलकी व लष्करी कारभार सांभाळणे, युद्ध संचलन करणे, राजपुत्र अकबरास आश्रय देऊन त्याच्या प्रश्नांकडे लक्ष देणे, परकीय सत्ता पोर्तुगीज, सिद्दी व इंग्रज यांच्या कारवाया

मोडून काढणे, दक्षिणेकडील स्वकीयसत्तांना मदत करणे. मुघल सैन्याला सर्व युद्ध आघाड्यावर तोंड देणे इ. बाबी सामान्य नव्हत्या. संभाजी महाराजांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्य व स्वधर्म रक्षण कार्य केले. त्यासाठी त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. आपल्या हौतात्म्याने त्यांनी स्वातंत्र्य देवतेचे होमकुंड प्रज्वलित केले. सर्व स्वराज्य जिंकण्याच्या महत्त्वकांक्षेने पछाडलेल्या आलेल्या औरंगजेब बादशहालाही आपली कबर महाराष्ट्रातच खोदायला लागली.

संभाजी महाराज तेजस्वी, शुर, पराक्रमी व साहसी होते. त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचे हे खास पैलू आहेत. औरंगजेब पुत्र अकबर याला राजाश्रय देऊन आपल्या दूरदृष्टीचा परिचय दिला. मुघल सत्ता खिळखिळी करणे हा त्यामागील हेतू होता. औरंगजेब दक्षिणेत आल्यावर शिवाजी महाराजाप्रमाणे संभाजी महाराजांनी आदिलशाही, कुतुबशाही यांना सहकार्य केले. आरमार दलाकडे जातीने लक्ष दिले. संभाजी महाराजांनी जसे युद्ध भूमीवर कार्य केले. तसेच साहित्य क्षेत्रात देखील कार्य केलेले दिसून येते. त्यांनी बुधभूषण, नायिकाभेद, सातसतक इ. ग्रंथ लिहिले. त्यांनी असंख्य मराठ्यांना राष्ट्र, स्वराज्य, स्वधर्म हितासाठी आपल्या प्राणाची आहुती देण्यास प्रेरीत केलेले दिसून येते.

**१) सेतुमाधावराव पगडी :**

''संभाजी महाराजांच्या हौतात्म्याने महाराष्ट्रात प्रचंड शक्ती निर्माण केली. मराठ्यांनी पुढे अठरा वर्षे मुघलांशी निकराची झुंज देऊन औरंगजेबाची स्वप्ने धुळीस मिळविली. धाडसी, शूर, स्वाभीमानी राजा संभाजी राष्ट्राचे दैवत बनावा यात कांही आश्चर्य नाही.''

**२) एच. एन. सिन्हा :**

''संभाजी महाराज यांच्या जिवंत राहण्याने जे कार्य साधले नाही ते त्यांच्या मृत्यूने झाले.''

**३) डॉ. कमल गोखले :**

''हिंदवी स्वराज्य नष्ट करण्यासाठी औरंगजेबाने मराठा संभाजीस हाल हाल करून मारले. तरी नियतीने मात्र हिंदवी स्वराज्य नष्ट करू दिले नाही.''

**४) प्रा. सदाशिव आठवले :**

''संभाजी राजास औरंगजेबाने हालहाल करून मारल्यावर औरंगजेब बाबत भयंकर द्वेष निर्माण झाला.''

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १**

१. शृंगारपुर येथील वास्तव्यात संभाजी महाराजांनी ......... हा ग्रंथ लिहीला.

२. बुऱ्हाणपूरच्या परिसरात मिळालेली लुट ....... च्या किल्ल्यात व्यवस्थित ठेवण्यात आली.

३. औरंगजेब पुत्र अकबर हा राजपूत सेनानी ........... बरोबर दक्षिणेत आला.

४. ......... साली कुतुबशाही नष्ट झाली.

५. ......... दक्षिणेत आल्यावर शिवाजी महाराजांप्रमाणे संभाजी महाराजांनी आदिलशाही कुतुबशाहीला सहकार्य केले.

## ३.२.२ छत्रपती राजाराम महाराज (१६८९ ते १७००)

संभाजी महाराजांनी स्वराज्य रक्षणासाठी हौतात्म्य पत्करले. औरंगजेब बादशहाने मराठा छत्रपतीची निर्घृणपणे हत्या केली. स्वराज्यावर शोककळा पसरली. ज्या पद्धतीने संभाजी महाराजांना ठार मारले त्यामुळे स्वराज्यातील मराठे पेटून उठले. संभाजी राजांच्या मृत्यूमुळे स्वराज्य नष्ट होणार ! असा समज औरंगजेबाचा होऊन त्याने स्वराज्याचा प्रदेश व किल्ले घेण्याचा सपाटा लावला. औरंगजेबाने मराठ्यांचा एक नेता मारला. पण त्या नेत्याच्या हौतात्म्यातून अनेक मराठा सरदार निर्माण झाले. त्यांनी मुघल सत्तेविरूद्ध जीवन-मरणाचा लढा चालू केला. आपले स्वातंत्र्य, धर्म, संस्कृती टिकविण्याचा निश्चय केला व त्यातून त्यांनी मुघल सत्तेस मोठे धक्के दिले. या धक्यामुळे मुघल सत्ता मोडकळीस आली. या काळात मराठा सरदारांना मार्गदर्शन नव्हते. पैसा, शस्त्रे, मनुष्यबळ नव्हते. गनिमी कावा युद्धनीतीमुळे मराठ्यांना आपले स्वातंत्र्य दीर्घकाळ टिकविता आले. म्हणूनच मराठ्यांच्या इतिहासात या स्वातंत्र्य संग्रामाला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. सन १६८९ ते १७०७ पर्यंत हा प्रदीर्घ लढा चालला. या कालखंडात मराठ्यांचे नेतृत्व राजाराम, महाराणी ताराबाई यांनी केले.

### १) राजाराम महाराजांचे बालपण :

राजाराम महाराज हे छत्रपती शिवाजी महाराजांचे द्वितीय चिरंजीव. त्यांचा जन्म २४ फेब्रुवारी १६७० रोजी रायगडावर झाला. महाराणी सोयराबाई ही राजाराम महाराजांची माता. सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली राजाराम महाराजांचे राजकीय व लष्करी शिक्षण पूर्ण झाले. सेनापती प्रतापराव गुजर यांची कन्या 'जानकीबाई' यांचेशी त्यांचा विवाह १५ मार्च, १६८० रोजी झाला.

## २) राज्यारोहण :

संभाजी महाराजांना पकडल्याची बातमी रायगडावर जाताच जुना जाणकार मुत्सद्दी 'येसाजीकंक' यांनी राजाराम महाराजांना नजर कैदेतून बाहेर काढले व ९ फेब्रुवारी १६८९ रोजी सर्वांच्या विचाराअंती स्वराज्याच्या गादीवर बसविले. त्यावेळी रायगडावर महाराणी येसूबाई, राजपुत्र शाहू, संताजी घोरपडे, खंडो बल्लाळ, मानाजी मोरे, चांगोजी काटकर व प्रल्हादपंत निराजी इ. मंडळी होती. या सर्व लोकांनी राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखाली लढण्याचा निर्धार व्यक्त केला. यावेळी स्वत: राणी येसूबाईंनी अत्यंत नि:स्वार्थी भूमिका घेऊन, दूरदर्शीपणे शाहू ऐवजी राजारामाला स्वराज्याच्या गादीवर बसवून संभाव्य गोंधळ, दुही टाळली. त्यांच्या धाडसीपणामुळेच अशी योजना निश्चित केली गेली. ती योजना या प्रमाणे होती.

- स्वत: राणी येसूबाईंनी रायगडावर राहून राजधानीचे रक्षण करावे.
- राजारामाने राजधानीबाहेर पडून युद्ध कार्यक्षेत्र वाढवावे.
- मराठा सैनिकांनी गनिमी काव्याने मुघल फौजांबरोबर लढावे.
- राजारामाने प्रसंगी कर्नाटकच्या प्रदेशात जावे. तेथून मुघलांशी दुसरी आघाडी सुरू करावी.

राणी येसूबाईंच्या सल्ल्याची योजना ही लष्करी कूटनीतीची होती. यामुळे मराठे सरदार एकत्र आले. या संदर्भात गो. स. सरदेसाई म्हणतात 'संभाजी महाराजांना जे काय जिवंतपणी जमले नाही ते त्यांच्या मृत्यूने घडवून आणले.' मराठा सरदारामधील स्वराज्य भक्ती पुन्हा एकदा निर्माण झाली.

## ३) रायगड मराठा राजधानी मुघलाकडे :

संभाजी महाराजांना क्रूरपणे मारल्यावर औरंगजेब बादशहाने मराठा राजधानी किल्ले रायगड जिंकण्यासाठी आपला मावस भाऊ झुल्फीकारखान यास प्रचंड फौजेनिशी पाठविले. राणी येसूबाईंच्या योजनेनुसार ५ एप्रिल, १६८९ रोजी राजाराम महाराजांनी रायगडावरून प्रतापगडाकडे प्रयाण केले. मुघल सैन्याने मराठ्यांचे अनेक किल्ले या काळात जिंकले होते. झुल्फीकारखान याने रायगडास वेढा घातला. येसूबाईंनी रायगड निर्धाराने लढविला. मात्र पुढे आपण हा किल्ला फार काळ लढवू शकणार नाही याची जाणीव त्यांना झाली होती. राजपरिवार, मंत्रीपरिषदेतील सदस्य यांच्या विषयीच्या चर्चेतून सूज्ञविचार करून विपरीत हानी होण्यापेक्षा रायगड शत्रूकडे देणे अधिक बरे असा विचार करून त्यांनी रायगड मराठा राजधानी मुघलाकडे दिली. झुल्फीकारखानाने रायगडाचा ताबा घेतला. राणी येसूबाई, राजपुत्र शाहू, राजपरिवारातील सदस्य, मंत्रीगण यांना कैद केले. ३ नोव्हेंबर १६८९ रोजी स्वराज्याची राजधानी मुघलांनी ताब्यात घेतली.

## ४) राजाराम महाराज जिंजीकडे :

५ एप्रिल, १६८९ रोजी राजाराम महाराज रायगडावरून प्रतापगडाकडे निघाले. मुघलांनी त्यांचा पाठलाग केला. प्रतापगडाजवळ मुघल-मराठे यांच्यात लढाई झाली. मुघलांनी प्रतापगड घेतला. मात्र राजाराम महाराज पुढे निघून गेले. सातारा, परळीवरून ते पन्हाळगडावर आले. रूहुल्लाखानाने पन्हाळगडास वेढा घातला. आपण जिवंत असलो तर स्वराज्यासाठी कांहीतरी करता येईल. जीव वाचविणे महत्त्वाचे असल्याने वेळ न घालवता राजाराम महाराज पन्हाळगडावरून कर्नाटकातील जिंजीकडे निघाले. रस्त्यामधील अनेक मुघल ठाणी चुकवत, प्रसंगी वेषांतर करून बेदनूर, शिमोगा, बोरे, अडुवली कळस, अंबूर येथे गेले. तेथे मराठा सरदार बाजीराव काकडे यांनी त्यांना प्रथम वेल्लोरे व नंतर जिंजी किल्ल्यावर २ नोव्हेंबर, १६८९ रोजी सुखरूप नेऊन पोहोचविले. जिंजीचा किल्ला राजाराम महाराजांसाठी सुरक्षित ठिकाण होते. तेथूनच त्यांनी मराठ्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाचे नेतृत्व केले.

## ५) प्रशासन व्यवस्थेची पुनर्रचना :

राजाराम महाराज जिंजीमध्ये गेल्यानंतर स्वराज्यातील उर्वरित प्रदेशाचे प्रशासन सुलभ व्हावे यासाठी प्रशासनाची पुनर्रचना केली. आपल्या मंत्रीमंडळाची फेरबांधणी केली. आपले अष्टप्रधान मंडळ नियुक्त केले. ते याप्रमाणे होते.

| | | | |
|---|---|---|---|
| ♦ निळो मोरेश्वर: | पेशवा | ♦ महादजी गदाश्वर : | सुमंत |
| ♦ जनार्दनपंत : | अमात्य | ♦ बाळाजी सुंदर : | न्यायमूर्ती |
| ♦ शंकराजी मल्हार : | सचिव | ♦ खंडो बल्लाळ : | चिटणीस |
| ♦ रामचंद्रपंत : | मंत्री | ♦ प्रल्हाद निराजी : | प्रतिनिधी |

यानंतर पुढे कांही प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या नेमणूका राजाराम महाराजांनी केल्या त्या अशा -

| | | |
|---|---|---|
| ♦ परसोजी भोसले (सेनासाहेब सुभा) | : | गोंडवन ते वर्धा प्रदेश |
| ♦ सिंधोजी निंबाळकर (सरलष्कर) | : | गोदावरी नदी प्रदेश |
| ♦ खंडेराव दाभाडे (सेना धुरंधर) | : | गुजरात ते बागलाण प्रदेश |
| ♦ तिमाजी पिंगळे (जिंजी सुभेदार) नियुक्त केले. | | |

राजाराम महाराजांच्या या प्रशासन पुनर्रचना कार्यामुळे स्वराज्यात व कर्नाटकात उत्साही वातावरण निर्माण झाले. स्वराज्य अजूनही शिल्लक आहे यांचा लोकांना मोठा दिलासा मिळाला. तर महाराष्ट्रीयन जनतेला नवसंजीवनी मिळाली.

**६) झुल्फीकारखान जिंजीस वेढा (१६९०-९२) :**

सन १६९० मध्ये झुल्फीकारखानाने जिंजीस वेढा घातला. राजाराम महाराज जिंजीमध्ये असल्याने औरंगजेब बादशहाने आपली छावणी विजापूर परिसरात नेली व तेथून त्यांने युद्ध नेतृत्व केले. झुल्फीकारखानास तेथूनच त्याने मार्गदर्शन केले. परंतु जिंजी जिंकता आली नाही. या काळात महंमद सादिक, याचप्पा नाईक व लक्ष्मी नायक इ. मुघलांकडील सरदार, निळो मोरेश्वर यांच्या प्रयत्नातून राजाराम महाराजांकडे आले. तंजावरचे राजे शहाजी दुसरे यांनी राजाराम महाराजांना मदत केली.

झुल्फीकारखान यास यश मिळत नसल्याचे पाहून औरंगजेब बादशहाने असदखान व राजपुत्र कामबक्ष यांना जिंजीकडे पाठविले. पावसाळा आल्याने या तीन मुघल सेनानींना यश मिळाले नाही. त्यात स्वराज्यातून संताजी घोरपडे, धनाजी जाधव यांनी वेढा घालून बसलेल्या मुघल सैन्यावर छुपे हल्ले केले. त्यांनी इस्माईलखान व अलिमर्दानखान यांना पराभूत करून कैद केले. यामुळे मुघल सैन्यात अस्वस्थता पसरू लागली. सेनापती मध्ये गैरसमज, भांडणे होऊ लागली.

वजीर असदखान व राजपुत्र कामबक्ष यांच्यात वाद सुरू झाला. नजीर अहमदखान यांने कामबक्ष यास कैद केले व त्याच्या कारवाया औरंगजेब बादशहाला कळविल्या. संताजी-धनाजीच्या गनिमी काव्याच्या नीतीमुळे मुघल सैनिक हतबल ठरले. मुघलांनी जिंजीचा वेढा उठविला. वाँदीवॉश पर्यंत माघारीची परवानगी राजारामाने मुघलाना दिली. भावीकाळातील राजकारणावर दृष्टी ठेऊन राजाराम महाराजांनी ही परवानगी दिली. याबदल्यात सोने व जडजवाहीर मराठ्यांना देण्यात आले. अशाप्रकारे झुल्फीकारखान, असदखान यांना जिंजीच्या वेढ्यामध्ये अपयश आले.

**७) जिंजीवर दुसरी स्वारी :**

वाँदीवास येथे येऊन सेनापती झुल्फीकारखानाने छावणी टाकली. वजीर असदखान कर्नाटकातील 'सगर' प्रांतात निघून गेला. यामुळे मराठी सैन्यास कर्नाटकात मोकळीक मिळाली. त्यांनी मुघल प्रदेशातून खंडणी वसूल केली. सन १६९४ च्या शेवटी झुल्फीकारखानाने जिंजीस पुन्हा वेढा घातला. 'पण तो केवळ देखावा होता'. असे तत्कालीन कागदपत्रावरून समजते. जिंजीतील मुघल फौजेने या काळात कोणतीही महत्त्वाची कामगिरी केली नाही. झुल्फीकारखान व त्याच्या फौजेने तंजावर, मद्रास विभागात कांही किरकोळ चकमकी केल्या. झुल्फीकारखान याने 'अर्काट' या ठिकाणी आपला मुक्काम हलविला. त्यांचा फायदा घेऊन संताजी व धनाजी यांनी सुभेदार कासीम खान यांचा पराभव केला. जिंजीच्या दुसऱ्या स्वारीत मुघलांना अपयश आले.

## ८) जिंजीवर तिसरी स्वारी व राजाराम महाराष्ट्राकडे परत :

या काळात मराठा सेनापती संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव या दोघात मतभेद झाले. राजाराम महाराज आणि झुल्फीकारखान यांच्यातील अंतस्थ संबंधाच्या बातम्या औरंगजेबाच्या कानावर गेल्या होत्या. त्याने आतापर्यंत केवळ वेळकाढू धोरण अवलंबिले होते. औरंगजेबाने झुल्फीकारखानाची फरमान पाठवून कान उघडणी केली. 'किल्ला ताब्यात घ्या, नाहीतर ! परिणामास तयार राहा'. तेव्हा जिंजी किल्ला आता ताब्यात घेतल्याखेरीज आपली सुटका नाही हे झुल्फीकारखानाच्या लक्षात आले. राजाराम महाराज यांचे बरोबर बोलणी करून, जिंजी सोडून जावे याचे संकेत त्याने महाराजांना दिले. त्याप्रमाणे ३० डिसेंबर, १६९७ रोजी आपल्या सर्व सहकाऱ्यासह राजाराम महाराजांनी जिंजी सोडली.

राजाराम महाराजांनी जिंजी सोडल्यानंतर झुल्फीकारखान याने जिंजी जिंकली (२ जानेवारी, १६९८), राजाराम महाराजांना पकडणे व स्वराज्य नष्ट करण्याचे औरंगजेब बादशहाचे स्वप्न भंग पावले. वेल्लोर मार्गे राजाराम महाराज मार्च, १६९८ मध्ये महाराष्ट्रात परतले. आठ वर्षे परिश्रम करून औरंगजेब बादशहाच्या पदरात काहीच पडले नाही.

## ९) मराठा स्वातंत्र्य युद्धातील संताजी घोरपडे यांचे योगदान :

राजाराम महाराज जिंजीकडे गेल्यानंतर स्वराज्याची सूत्रे रामचंद्रपंत अमात्य व शंकराजी नारायण या दोघांकडे होती. त्यांच्या हाताखाली संताजी व धनाजी हे दोन सेनापती दिले होते. त्यांनी या काळात मोठा पराक्रम केला. या दोघांचे योगदान या प्रमाणे -

- पाटण ते विशाळगड पर्यंतचा प्रदेश काबीज करून पुन्हा तो स्वराज्याच्या अंमलाखाली आणला.
- शेखनिजाम (मुर्करबखान) याचा पराभव करून त्यास पळवून लावले.
- बेदनुर येथील राणीने राजारामांना जिंजी प्रवासात मदत केली. त्याचा बदला घेण्याच्या उद्देशाने बादशहाने मतलखान, जाननिस्सार खान व तहब्बूरखान यांना बेदनुरकडे रवाना केले होते. सेनापती संताजीने या तिघांचा मोठा पराभव केला.
- सन १६९० पर्यंत धनाजी व संताजी यांनी वाई, महाड, प्रतापगड हा प्रदेश मुघलांकडून परत जिंकून घेतला. ईस्माईलखान व अलिमर्दान यांना कैद केले. सातारा या ठिकाणी छावणी टाकून बसलेल्या सर्जाखानास कुटुंबासह त्यांनी पकडले. सातारा-खटाव येथील मुघलांचा अंमल मराठ्यांनी उडवून लावला. सन १६९५ मध्ये कर्नाटकात जाऊन वेढा देऊन बसलेल्या झुल्फीकारखानाच्या सैन्यावर बाहेरून जोरदार हल्ले केले. कासीम खानाचा मोठा पराभव त्यांनी केला व दोड्डेरीचा प्रदेश मिळविला.

सन १६९६ मध्ये हिंमतखानास बसवपट्टण येथे ठार केले. अनेक ठिकाणी मुघल सैन्याशी त्यांनी मुकाबला करून पराभूत केले. संताजी-धनाजी जवळ आले आहेत असे समजताच ''नामांकित मुघल उमरावांचे अवसान गळून जाई. त्यांची बोबडी वळे, भीतीने कापरे भरे. संताजी-धनाजी या मराठा सेनापतींनी मुघल सैनिकांच्यात प्रचंड भीती, धास्ती, निर्माण केली होती.''

या सेनापतीमध्ये पुढील काळात मतभेद झाले. त्याचे पर्यावसन संताजी घोरपडे यांच्या खून होण्यामध्ये झाले. संताजी सारख्या पराक्रमी, शूर, धाडसी सेनापतीचा आपसातील संघर्षात खून व्हावा ही घटना मराठा इतिहासामध्ये खेदजनक आहे. पुढील काळात धनाजी जाधव यांचेकडे सेनापती पदाची सूत्रे आली. महाराणी ताराबाईंच्या काळात मोठा पराक्रम केला.

### १०) राजाराम महाराजांचा मृत्यू :

मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध चालू ठेवण्यामध्ये राजाराम महाराजांचे योगदान महत्त्वाचे होते. मुघल बादशहास त्यांनी ११ वर्षे चांगली झुंज दिली. कर्नाटकातील जिंजी या प्रदेशांतून व स्वराज्याच्या प्रदेशातून अशा दोन युद्ध आघाड्या स्थापन करून बादशहाला चांगले हैराण केले, जेरीस आणले. सन १६९९ मध्ये महाराष्ट्रात परत आल्यावर त्यांनी मुघल फौजेविरूद्ध मोहीम सुरू केली. राजाराम महाराजांनी आपल्या मनमिळाऊ स्वभावाने अनेक मराठा सरादारांना एकत्र आणले व स्वराज्य वाचविण्यासाठी त्यांचा उपयोग करून घेतला. तत्कालीन राजकीय परिस्थिती पाहता ही गोष्ट महत्त्वाची समजली पाहिजे. जुन्या जाणकार लोकांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी स्वराज्याचे नेतृत्व केले. परंतु सतत प्रवास, पाठलाग, दगदग यामुळे त्यांची तब्येत बिघडली. विश्रांतीसाठी सिंहगडावर आले असतानाच २ मार्च, १७०० रोजी त्यांचा अकाली मृत्यू झाला. त्यावेळी त्यांचे वय ३० वर्षाचे होते.

### ११) राजाराम महाराजांच्या विषयी विविध विचारवंतांचे विचार :

१) ''संभाजी महाराजांनंतर त्यांचे पुत्र शाहू हेच खरे राज्याचे वारस होते, महाराणी येसूबाईंनी शाहूंच्या ऐवजी राजाराम महाराजांना राजगादीवर बसविले व आपली दूरदृष्टी सिद्ध केली.''

- सेतु माधवराव पगडी

२) ''संभाजी महाराजांनंतर सुदैवाने छ. राजारामास रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी नारायण, संताजी घोरपडे, धनाजी जाधव, परशुरामपंत, हणमंतराव निंबाळकर व नेमाजी शिंदे यांच्या सारखे सहकारी मिळाले. या पराक्रमी सेनानी यांनीच खरा स्वराज्याचा इतिहास घडविला.''

- सेतू माधवराव पगडी

३) ''राजाराम महाराजांनी 'वतनदारी पद्धती' परत सुरू केली. वतन व जहागिरीसाठी अनेक मराठा सरदारांनी आपली स्वत:ची सेना उभारून मुघलांविरोधात प्रखर लढा चालू केला.''

४) ''स्वराज्यात मुघलांचा धुमाकूळ चालू असताना राजाराम महाराजांनी जिंजी किल्ल्यावर मराठा राजगादी स्थापन करून मराठा स्वराज्याचे नेतृत्व केले. स्वराज्याचा कारभार जिंजीवरून चालविला. स्वराज्याचे रक्षण व जतन केले.''

५) ''राजाराम महाराज हा माणसे जोडणारा आणि सांभाळणारा एक चांगला संघटनकुशल राज्यकर्ता होता.''

- प्रा. सदाशिव आठवले.

### १२) राजाराम महाराजांची योग्यता :

अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत स्वराज्याचे नेतृत्व सन १८८९ ते १७०० या काळात केले. प्रल्हादपंत निराजी, खंडो बल्लाळ, मानाजी मोरे, निळो मोरेश्वर, जनार्दन हणमंते, शंकराजी, तिमाजी पिंगळे, विठोबा चव्हाण, बहिर्जी व मालोजी घोरपडे, सेनापती संताजी घोरपडे व धनाजी जाधव इ. मराठा सरदारांच्या मदतीने स्वराज्याचे रक्षण केले. अनेक मराठा सरदारांना किताब, मानसन्मान देऊन त्यांना लढण्याची प्रेरणा दिली. राजाराम महाराजांनी वतनदारी पद्धती परत सुरू केली. वतन व जहागिरीसाठी अनेक मराठा सरदारांनी आपली स्वत:ची सेना उभारून मुघल बादशहा विरूद्ध प्रखर लढा चालू केला. वतनदारी पद्धतीमुळे स्वातंत्र्य लढ्यात नवा उत्साह, जोम संचारला. ज्या परिस्थितीत राजाराम महाराजांनी ही पद्धत चालू केली ती विचारात घेतल्यास त्यांनी घेतलेला निर्णय योग्य ठरतो. शिवाजी महाराजांनी बंद केलेली ही पद्धत अपरिहार्य म्हणून स्वीकारण्यात आली. मराठा सरदारांत उत्साह, जोम, जिद्द व ईर्षा निर्माण करून त्यांना मुघलांविरूद्ध लढण्यास प्रवृत्त करणेसाठीच ही पद्धत नाईलाजास्तव त्यांनी स्वीकारली.

राजाराम महाराजांजवळ मोठा पराक्रम नव्हता. कारण त्यांना त्या पद्धतीचे शिक्षण मिळाले नव्हते. त्यांची प्रकृती मुळात नाजूक होती. अचानकपणे स्वराज्याचे नेतृत्व त्यांना करावे लागले. स्वराज्यात मुघलांचा धुमाकूळ चालू असताना जिंजी ही नवीन मराठा राजधानी स्थापन केली. स्वराज्याच्या कारभार त्यांनी जिंजीहून चालविला. त्यामुळे शत्रूने जिंकलेला प्रदेश व किल्ले परत जिंकता आले. म्हणून मराठा स्वातंत्र्य युद्धातील राजाराम महाराजांचा कालखंड महत्त्वाचा आहे.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २**

**रिकाम्या जागा भरा**

१. ....... याने राजाराम महाराजांना कैदेतून बाहेर काढले.

२. राजाराम महाराज पन्हाळगडावरून ........... कडे निघाले.

३. जिंजीला मुघल सरदार ......... याने वेढा घातला.

४. संताजी घोरपडे यांच्या नंतर सेनापती पदाची सूत्रे ......... यांच्याकडे आली.

५. ......... साली रायगडावर असताना राजाराम महाराजांचा अकाली मृत्यू झाला.

### ३.२.३ महाराणी ताराबाई (१७०० ते १७०७) :

महाराणी ताराबाई या छत्रपती राजाराम महाराजांच्या पत्नी होत्या. त्यांचा जन्म सन १६७५ मध्ये झाला. राजाराम महाराजांबरोबर त्यांचा विवाह सन १६८३ मध्ये झाला. राजाराम महाराजांच्या स्वराज्यातील व जिंजी येथील वास्तव्यात त्या बरोबर होत्या. मराठा सेनापती हंबीरराव मोहिते यांच्या त्या कन्या होत. वडिलांचे सर्व गुण ताराराणी मध्ये होते. राजकारणातील डावपेच यांचे प्रत्यक्ष अनुभव त्यांनी घेतले होते.

राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर अत्यंत खंबीरपणे मराठ्यांच्या नेतृत्वाची जबाबदारी स्वीकारली. आपला पुत्र शिवाजी (दुसरा) यांस गादीवर बसवून त्यास 'मराठा छत्रपती' घोषित केले व मुघल बादशहा औरंगजेब यांचे बरोबर अंतिम लढा सुरू केला. हा तिसरा कालखंड मराठा इतिहासातील तेजस्वी पर्व मानले जाते.

**अ) औरंगजेब बादशहाचे आक्रमक धोरण :**

**१) वसंतगड किल्ला जिंकला :**

सेनापती हंबीरराव मोहिते यांचे हे मजबूत ठाणे होते. सेनापती हंबीररावानंतर सुद्धा त्यांच्या निष्ठावान सैनिकांनी ते तेवढेच अभेद्य ठेवले होते. कऱ्हाड, पाटण परिसरावर या किल्ल्यामुळे लक्ष ठेवता येत होते. तसेच पश्चिम घाटमार्गावर लक्ष ठेवणारे ठिकाण होते. यामुळे या किल्ल्यांचे महत्त्व बादशहा जाणून होता. २५ नोव्हेंबर १६९९ रोजी मोंगल सैनिकांनी वसंसगड जिंकला.

**२) अजिंक्यतारा किल्ला ताब्यात घेतला :**

मराठ्यांचे किल्ले सहज जिंकू असा आत्मविश्वास बादशहाला वसंतगड जिंकल्यामुळे वाटू लागला. त्याने अजिंक्यताऱ्यास वेढा घातला. हा वेढा दीर्घकाळ चालला. वाटाघाटीच्या माध्यमातून अजिंक्यतारा किल्ला मराठे सैनिकांनी बादशहाच्या ताब्यात २१ एप्रिल १७०० मध्ये दिला.

**३) सज्जनगड ताब्यात घेतला :**

अजिंक्यतारा ताब्यात येताच सज्जनगड किल्ला ताब्यात घेण्यासाठी स्वत: औरंगजेब ३० एप्रिल १७०० रोजी आला. ४ जून १७०० पर्यंत मराठ्यांनी हा किल्ला लढविला. किल्ला ताब्यात येत नाही असे दिसताच वाटाघाटीच्या माध्यमातून ९ जून १७०० मध्ये सज्जनगड मुघलांनी ताब्यात घेतला. पुढे पावसाळा आल्याने औरंगजेब बादशहा भूषणगडाकडे गेला. सज्जनगड ते भूषणगड या प्रवासात मुघल सैन्याचे प्रचंड हाल झाले. सातारा, कऱ्हाड, खटाव प्रदेशात गनिमी कावा युद्ध पद्धतीने मराठा सैन्याने मुघलांचे मोठे नुकसान केले.

४) **पन्हाळगडाचा वेढा :**

मुघल सैन्याने मार्च १७०१ मध्ये पन्हाळगडास वेढा दिला होता. बेदारबत व झुल्फीकारखान पन्हाळगड जिंकण्याचा प्रयत्न करीत होते. पण त्यांना यश येत नव्हते. म्हणून स्वत: बादशहा पन्हाळा परिसरात आला. तेव्हा धनाजी जाधव, राणोजी घोरपडे आणि हणमंतराव निंबाळकर हे आष्टा, शिराळा व इस्लामपूर परिसरातील मुघल छावण्यावर प्रखर हल्ले करीत होते. पन्हाळगड प्रत्यक्ष जिंकणे अशक्य आहे असे दिसताच वाटाघाटी सुरू होऊन औरंगजेब बादशहाकडून रोख रक्कम घेऊन पन्हाळगड मराठा सैनिकांनी त्यांच्या स्वाधीन केला. २८ मे, १७०१ पासूनच मुघल-मराठे यांच्यात पाठशिवणीचा खेळ सुरू झाला.

५) **विशाळगड संघर्ष :**

औरंगजेबाने यानंतर विशाळगडास वेढा घातला. तो स्वत: फत्तेउल्लाखानास मार्गदर्शन करू लागला. चार महिने वेढा सुरू होऊन झाले तरी मुघलांच्या हाती काहीच आले नाही. पुढे रोख रक्कम घेऊन मराठ्यांनी विशाळगडचा किल्ला मुघलांकडे दिला. यानंतर मुघल बादशहा पन्हाळगडाहून बहादुरगडाकडे निघून गेला. पाऊस, प्रचंडवारा, अन्नटंचाई आणि रोगराई याशिवाय मराठा सैनिकांचे छुपे हल्ले यांनी मुघल सैन्याला सळो की पळो करून सोडले.

६) **मुघल विरोधात महाराणी ताराबाईंचे आक्रमक धोरण (१७०२) :**

महाराणी ताराबाईंनी या काळात मुघला विरोधात अत्यंत आक्रमक धोरण स्वीकारले. मराठे सरदार मुघलांच्या दक्षिणेकडील कर्नाटक, आंध्रप्रदेश, तामिळनाडू व उत्तरेकडील माळवा, गुजरात या प्रदेशात धुमाकूळ घालू लागले. परिणामी तेथे मुघल प्रशासन कोलमडले. अशांतता-अराजके निर्माण झाली. व्यापार-वाणिज्य, कर बुडाले. उत्तरेकडील प्रदेशाचे कसे रक्षण करावे हा यक्ष प्रश्न बादशहापुढे उभा राहिला. तर दक्षिण प्रदेश त्यास असुरक्षित वाटू लागला.

एक-एक किल्ला ८ ते ९ महिने लढविणे, पावसाळा येताच मुघलांकडून मोठी रोख रक्कम घेऊन तो किल्ला ताब्यात देण्याचे धोरण मराठा सरदार व ताराबाईंनी स्वीकारले होते. वर्षातून एकच किल्ला मुघलांना अशाप्रकारे मिळत असे. पावसाळा संपताच तो किल्ला मराठे परत जिंकून घेत असत. सन १७०२ ते १७०४ पर्यंत सिंहगड, राजगड आणि तोरणा हे किल्ले अशाच प्रकारे मुघलांनी घेतले. मराठा फौजा यावेळी माळवा, बुऱ्हाणपूर, गुजरात, बागलाण, वऱ्हाड येथे धुमाकूळ घालीत होत्या. हैद्राबाद, गोवळकोंडा या प्रदेशाची लुट मराठा सरदारांनी केली. मराठ्यांनी कर्नाटकातून खंडणी वसूल केली. मुघल बादशहा यामुळे गोंधळून गेला.

७) **औरंगजेबाची वाकिणखेडा मोहिम :**

सन १७०४ मध्ये कृष्णा आणि भीमा नदीच्या दुआबातील बेरडांनी मुघलाविरोधात मोठे बंड केले. महाराणी ताराबाई व मराठे सैन्य त्यांच्या मदतीला धावले. मोठे रणकंदन झाले. २८ एप्रिल

१७०५ मध्ये औरंगजेबाने वाकिणखेडा किल्ला जिंकला. महाराणी ताराबाईंनी या काळात लोहगड सिंहगड, राजमाची हे किल्ले परत जिंकून घेतले. औरंगजेब अहमदनगर या ठिकाणी परतला होता. त्याठिकाणी तो आजारी पडला.

### ८) स्वातंत्र्य युद्धाचा शेवटचा कालखंड (इ.स. १७०६ ते १७०७) :

वाकिणखेडा मोहीम औरंगजेब बादशहाची अखेरची ठरली. अहमदनगर येथे असतानाच तो आजारी पडला. तरी सुद्धा त्याने मराठ्यांबरोबर संघर्ष चालू ठेवला होता. मराठा सैन्य या काळात उत्तरेत व दक्षिणेत मोहीमा करीत होते. बादशहा गोंधळून गेला होता. बादशहाच्या साम्राज्यात सर्व दिशांना मराठे सैन्य संचार करीत होते. माळवा, दिल्ली-आग्रा, बंगाल-डाक्का, गुजरात-सुरत व तिची उपनगरे, बडोदा-नर्मदा नदी परिसर असे मोठे यश मराठा लष्करात मिळाले. औरंगजेब मुअज्जम, आझमशहा आणि कामबक्ष यांच्यात या काळात मतभेद झाले. सत्ता मिळविण्यासाठी त्यांनी आपआपल्या परीने हालचाली सुरू केल्या होत्या.

### ९) औरंगजेब बादशहाचा मृत्यू :

आपल्या मुलांमध्ये सत्तेसाठी संघर्ष होईल याची चिंता त्यास लागली होती. म्हणून त्याने मुअज्जम यास उत्तरेत, कामबक्ष यास विजापूरास आणि आझमशहा यांस माळव्यांकडे पाठविले. नंतर तो विश्रांती घेण्याचा विचार करीत असताना परत आजारी पडला. त्यामध्ये त्यांचे २० फेब्रुवारी १७०७ रोजी अहमदनगर जवळ निधन झाले. या काळात मराठ्यांनी रोहिडा, वसंतगड, पन्हाळा, परळी, सातारा इ. किल्ले परत जिंकून घेतले. बादशहा स्वत: मराठ्यांबरोबर २५ वर्षे लढत राहिल्याने उत्तरेकडे त्यांचे दुर्लक्ष झाले. जाट, बुंदेले, रजपूत, शीख सत्तांनी उठाव करून स्वतंत्र सत्ता स्थापन केल्या. मुघल सुभेदारांनी कांही ठिकाणी स्वत:ची राज्ये स्थापन केली. मुघल साम्राज्याची वाताहात झाली. मराठे दक्षिणेकडे विजयी झाले. मराठा स्वराज्य बुडविण्यासाठी आखलेली महत्त्वाकांक्षी मोहीम अशा तऱ्हेने अपयशी ठरली. मराठ्यांनी स्वातंत्र्यांसाठी बलाढ्य मुघलसत्तेला पराभूत केले. प्रदीर्घ काळ चाललेले मराठा स्वातंत्र्ययुद्ध समाप्त झाले.

### १०) महाराणी ताराबाई यांच्या विषयी विविध विचारवंतांची मते :

१) ''औरंगजेब बादशहास एका राजाशी अगर राजघराण्याशी लढण्याऐवजी मराठी जनतेशी लढण्याची वेळ त्यांच्यावर आली. एकीकडे आक्रमक वृत्तीचा, विस्तारवादी, अतिहट्टी व आपल्या धार्मिक धोरणामुळे अप्रिय झालेला औरंगजेब बादशहा आणि दुसरीकडे मराठी जनता असे या स्वातंत्र्ययुद्धाचे स्वरूप होते''

- सेतु माधवराव पगडी

२) ‘‘मुघल-मराठ्यांचे २५ वर्षाचे हे युद्ध मराठ्यांच्या इतिहासात सोनेरी अक्षरांनी लिहून ठेवण्यास योग्य आहे. स्वाभिमान, स्वराष्ट्र प्रीती व स्वातंत्र्यप्रेम इ. उच्चत्तर गुणांनी या युद्धाचा बराच भाग भरलेला आहे. अनेक संस्मरणीय प्रसंगी मराठ्यांचे गुण निदर्शनास आलेत. कितीही संकटे ओढवली तरी मराठे अपमान सहन करणारे नाहीत हे त्यांनी आपल्या कृतीने लोकांच्या निदर्शनास आणून दिले.’’

- रियासतकार सरदेसाई

३) ‘‘ताराबाई ही राजारामाची थोरली बायको होय. ती बुद्धिमान आणि शहाणी होती. सैन्याची व्यवस्था आणि राज्यकारभार या बाबतीत नवऱ्याच्या हयातीत तिचा मोठा लौकिक झाला होता’’

- खाफीखान

४) ‘‘ताराबाईने इतकी उत्तम व्यवस्था केली होती की, मराठा सरदार तिच्या आज्ञेशिवाय काही करत नसत.’’

- भिमसेन सक्सेना

५) ‘‘दिल्ली झाली दीन वाणी
दिल्लीशाचे गेले पाणी
ताराबाई रामराणी
भद्रकाली कोपली
अशी धिंग रामराणी
नाचतसे वैभवानी
मूर्तिमंत हे भवानी
जगी अवतरली
रामराणी भद्रकाली
रणरंगी क्रुद्ध झाली
प्रलयाची वेळ आली
मुघल हो सांभाळा’’

- कवी देवदत्ता

६) ''औरंगजेब बादशहा बरोबर लढताना ताराबाईंनी फिनिक्स पक्ष्याप्रमाणे मराठी राज्य राखेतून जिवंत केले. ही त्यांची अभूतपूर्व कामगिरी मराठी इतिहासाला कधीही विसरता येणार नाही.''

- स. मा. गर्गे

## ११) स्वातंत्र्य युद्धातील सेनापती धनाजी जाधव यांचे योगदान :

सेनापती धनाजीराव जाधव यांच्या कार्याची सुरूवात राजाराम महाराज यांच्या काळात झाली. संताजी घोरपडे व धनाजीराव जाधव यांनी राजाराम महाराजांच्या काळात मोठा पराक्रम केला. संताजी घोरपडे यांच्या खूनानंतर सेनापतीपद धनाजीराव जाधव यांचेकडे आले. राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर महाराणी ताराबाई यांच्या काळात धनाजीराव जाधव यांनी मोठा पराक्रम केला. धनाजीराव जाधव यांनी झुल्फीकारखान या सारख्या मुघल सेनापतीचा पराभव केला. त्यांची पूर्ण दमछाक केली. सातारा, परळी, कऱ्हाड, खटाव, मायणी, आष्टा, वाळवा, शिरोळ, पन्हाळगड, विशाळगड येथील संघर्षात अद्वितीय पराक्रम दाखविला. मुघल सैन्याची अनेक ठिकाणी कत्तल केली. रसद तोडली, खजिना पळविला. गनिमी कावा युद्ध तंत्र स्वीकारून मुघलांना पळवून लावले. धनाजीराव जाधव यांनी अनेक मराठा सरदार निर्माण केले. त्याचा उपयोग पुढील काळात शाहू यांना झाला.

कर्नाटक प्रदेशावर आक्रमण करून तिथून खंडणी वसूल केली. गुजरात, माळवा याठिकाणी मोठी दहशत निर्माण केली. औरंगजेबाच्या मृत्यूनंतर २ महिन्यात सर्व किल्ले जिंकून मराठा स्वराज्याचे अस्तित्व कायम टिकविले. म्हणून सेनापती धनाजीराव जाधव यांचे स्वातंत्र्ययुद्धातील योगदानास मोठे महत्त्व आहे.

## १२) महाराणी ताराबाईंची योग्यता :

राजाराम महाराजांच्या निधनानंतर महाराणी ताराबाईंनी स्वराज्याचे खंबीर नेतृत्व केले. ताराबाई या तेजस्वी, तडफदार होत्या. वैधव्याचे दु:ख दूर सारून राजसूत्रे व तलवार हाती घेऊन औरंगजेब बादशहा विरोधात त्यांनी सन १७०० ते १७०७ या काळात लढा उभारला. गनिमी कावा युद्ध नीती स्वीकारून मुघलांना त्यांनी अगतिक करून टाकले. स्वराज्य जिंकण्यासाठी औरंगजेब बादशहा उत्तरेकडून दक्षिणेकडे आला. त्यास महाराष्ट्राच्या भूमीत तिने अंतिम विश्रांती घ्यावयास भाग पाडले. औरंगजेब व त्यांच्या मुघल फौजेशी त्या त्वेषाने लढल्या. एक एक किल्ला पावसाळ्यापर्यंत लढविणे व नंतर मोठी रक्कम घेऊन तो किल्ला शत्रूच्या स्वाधीन करण्याचे सूत्र त्यांनी वापरले. मुघल सैन्याचे त्या किल्ल्याकडे दुर्लक्ष होताच तो किल्ला परत जिंकून घ्यावयाचा असा पाठशिवणीचा खेळ खेळून मोंगलांना त्यांनी हैराण केले. त्याबरोबरच त्यांनी या काळात मुघल सुभ्यात, माळवा आणि वऱ्हाड इ. सुभ्यातून खंडणी, लुटून आणली. मराठी मुलखातून माघार घेणे सुद्धा मुघलांना या काळात शक्य झाले नाही. महाराणी ताराबाईंनी स्वीकारलेल्या या धोरणामुळे औरंगजेब बादशहा निराश झाला. स्वराज्याची अस्मिता व स्वातंत्र्य ताराबाईंच्या रूपाने प्रकट झाले. देवदत्त हा तत्कालीन कवी लिहतो, 'दिल्लीच्या

मोंगल सिंहासनाची लाज गेली. बादशहाची अप्रतिष्ठा झाली. मोंगलांवर मराठ्यांच्या रूपाने एक प्रलयकाळ अवतीर्ण झाला. त्या प्रलयकाळात मोंगल साम्राज्याची वाताहत झाली.'

ताराबाई या हुशार व चपळ होत्या. त्यामुळे अनेकांनी त्यांना भद्रकाली, रणरागिणी, सौदामिनी अशी बिरूदे लावलेली आहेत. ताराबाईंच्या ठिकाणी सेनापतीपदाचे सर्व गुण होते. महाराणी ताराबाईंना औरंगजेब बादशहाच्या ताकदीची पूर्ण कल्पना होती. मराठा मावळ्यांकडे असणारे गुण, गनिमी कावा, जलद हालचालींची क्षमता, भूगोलाचे ज्ञान या बाबींचा त्यांनी कौशल्याने वापर केला आणि मराठ्यांना विजय मिळवून दिला.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३**

**रिकाम्या जागा भरा.**

१. महाराणी ताराबाई या ........... मराठा सेनानींच्या कन्या होत्या.

२. महाराणी ताराबाई यांनी आपला पुत्र ........ यास गादीवर बसवून मराठा छत्रपति म्हणून घोषित केले.

३. सन १७०४ मध्ये कृष्णा व भीमा नदीच्या दुआबातील ........ जमातीने मुघलांविरूद्ध मोठे बंड केले.

४. औरंगजेब सन १७०७ मध्ये ........ येथे मरण पावला.

५. मराठ्यांनी मुघल सत्तेला पराभूत केले आणि प्रदीर्घ काळ चाललेले ...... समाप्त झाले.

## ३.३ पारिभाषिक शब्द आणि शब्दार्थ

१) बंड : उठाव करणे

२) तक्त : सिंहासन

३) प्रतिकार : विरोध करणे

४) स्वराज्य : स्वतःचे राज्य

५) फंदफितुरी : शत्रू पक्षास जाऊन मिळणे

६) दुही : फाटाफूट होणे

७) दुआब : दोन नद्या मधील प्रदेश

| | | | |
|---|---|---|---|
| ८) | शिक्कामोर्तब | : | राजमुद्रा उठविणे |
| ९) | गलबत | : | जहाज |

## ३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १**

**रिकाम्या जागा भरा.**

१) बुधभूषण

२) साल्हेर

३) दुर्गादास राठोड

४) १६८७

५) औरंगजेब

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २**

**रिकाम्या जागा भरा.**

१) येसाजी कंक

२) जिंजी

३) झुल्फिकार खान

४) धनाजी जाधव

५) १७००

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३**

**रिकाम्या जागा भरा.**

१) हंबीरराव मोहिते

२) शिवाजी दुसरा

३) बेरड

४) अहमदनगर

५) मराठा स्वातंत्र्ययुद्ध

## ३.५ सारांश

मराठा इतिहासामध्ये शिवाजी महाराजांच्या मृत्यूपासून ते बादशहा औरंगजेबाच्या मृत्यूपर्यंतच्या काळास 'मराठ्यांचा स्वातंत्र्य युद्ध कालखंड' असे नामकरण केलेले आहे. संभाजी महाराज, राजाराम महाराज आणि महाराणी ताराबाई यांच्या महत्त्वाच्या कारकिर्दी होऊन गेल्या. राजपुत्र अकबराचे दक्षिणेकडे आगमन झाल्यावर पुढील काळात औरंगजेब बादशहा स्वत: दक्षिणेत प्रचंड सेना घेऊन आला. त्याने प्रथम संभाजी महाराजांबरोबर मोठा संघर्ष केला. संभाजी महाराजांची क्रूर हत्या केल्यानंतर स्वराज्य आता आपण जिंकले अशा स्वप्नात वावरणाऱ्या औरंगजेब बादशहाची धुंदी राजाराम महाराज व नंतर महाराणी ताराबाई यांनी उतरविली. या दोघांजवळ अनुभव नव्हता. तरी रणक्षेत्र आणि मुत्सद्देगिरीत ते बादशहापेक्षा श्रेष्ठ ठरले. अनेक सर्व सामान्य मराठी लोकांच्या कडून असामान्य अशी कामगिरी पार पाडून घेतली. २५ वर्षे चाललेल्या या संघर्षाने कर्तबगार, पराक्रमी मराठा पिढी निर्माण केली. मराठा स्वातंत्र्ययुद्ध म्हणजे स्वातंत्र्य व गुलामगिरी मधील संघर्ष होता. त्यात स्वातंत्र्याचे पाठीराखे मराठे विजयी ठरले.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

### (अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१. संभाजी महाराजांच्या कारकीर्दीतील मुघल-मराठा संघर्षाचे वर्णन करा.

२. संभाजी महाराज आणि पोर्तुगीज संबंधाचा आढावा घ्या.

३. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर संभाजी महाराजांनी केलेल्या कामगिरीचे मूल्यमापन करा.

४. राजाराम कालीन मुघल-मराठे संघर्षाची माहिती द्या.

५. सन १६८९ ते १७०७ या काळातील मराठा स्वातंत्र्य युद्धाची सटीक माहिती लिहा.

६. सेनापती संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांच्या स्वातंत्र्ययुद्धातील कामगिरीचे वर्णन करा.

### (ब) टिपा लिहा.

१. जिंजीचा पहिला वेढा (१६९०-९२)

२. स्वराज्य रक्षणातील राजाराम महाराजांचे कार्य

३. सेनापती संताजी घोरपडे व धनाजी जाधव

४. महाराणी ताराबाई

५. मुअज्जमची दक्षिण कोकणातील स्वारी (१६८३-८४)

## ३.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. हिंदवी स्वराज्य आणि मोंगल - लेखक : सेतूमाधव पगडी

२. शिवपुत्र संभाजी - लेखक : कमल गोखले

३. छत्रपती संभाजी महाराज यांचे चरित्र - लेखक : वा. सी. बेंद्रे

४. पोर्तुगीज - मराठे संबंध - लेखक : पां. स. पिसुर्लेकर

५. छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ - लेखक : डॉ. जयसिंगराव पवार

६. छत्रपती राजाराम महाराज - लेखक : वा. सी. बेंद्रे

७. Maratha-Mughal Relations, 1680-1707 (Author - Setu Madhavrao Pagadi)

८. Tarabai and her Times (Author - Brij Kishore)

९. New History of the Maratha's - Vol. - I (Author - G. S. Sardesai)

❋❋❋

# सत्र १ : घटक ४

# मराठा इतिहास समजण्यासाठी साधनांचे महत्त्व

अनुक्रमणिका


४.० उद्दिष्टे

४.१ प्रस्तावना

४.२ विषयविवेचन

४.२.१ साधने (संस्कृत आणि मराठी) : शिवभारत आणि आज्ञापत्र

४.२.२ फारसी साधने : तारीख-ए-दिल्कुशा, मुन्तखाब-उल-लुबाब

४.२.३ परराष्ट्रीय साधने आणि वृत्तांत : इंग्रजी व पोर्तुगीज

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ संदर्भग्रंथ


## ४.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यावर विद्यार्थ्यांना खालील गोष्टींचे आकलन होईल.

१) इतिहास लिहिण्यासाठी ऐतिहासिक साधनांचे व पुराव्यांचे महत्त्व स्पष्ट होईल.

२) शिवकाळाचा इतिहास लिहिण्यासाठी उपलब्ध असलेल्या महत्त्वाच्या संस्कृत, मराठी, फारसी, पोर्तुगीज व इंग्रजी भाषेतील साधनांची ओळख होईल.

३) शिवभारत व आज्ञापत्र सारख्या संस्कृत व मराठी साधनांचे इतिहास लिहिण्यासाठी काय महत्त्व आहे ते स्पष्ट होईल. या साधनांच्या मर्यादा कळतील.

४) मुन्तखाब-उल-लुबाब व तारीख ए दिल्कुशा या फारसी भाषेतील साधनांचे मराठ्यांचा इतिहास लिहिण्यासाठी महत्त्व व मर्यादा कळतील.

५) पोर्तुगीज व इंग्रजी भाषेतील कागदपत्रांचा मराठ्यांचा इतिहास लिहिण्यासाठी किती उपयोग आहे ते कळेल. ही कागदपत्रे कोणकोणत्या ठिकाणी जतन करून ठेवली आहेत ते कळेल.

## ४.१ प्रस्तावना

भूतकाळाची चिन्हे, खुणा अथवा अवशेष असण्याऱ्या गोष्टींना इतिहासाचे साधन समजले जाते. इतिहासाचे साधन हे लिखित स्वरुपात असू शकते उदा. कागदपत्रे, ग्रंथ, कायदे, वाङ्मय, रोजनिशी. ते अलिखित स्वरुपात देखील असू शकते उदा. मंदिर, इमारती, इ. इतिहास हा साधनांच्या आधारे लिहिला जातो. इतिहासकार जे बोलतो, लिहितो किंवा सिद्ध करण्याचा प्रयत्न करतो त्यासाठी तो साधनांचा अभ्यास करून त्यामधील माहिती व पुरावे देत असतो. इतिहासकाराला भूतकाळातील घटनांची, विचारांची, आचारांची माहिती व पुरावे ऐतिहासिक साधने देतात. साधनांमधील माहितीचा आणि पुराव्यांचा वापर करूनच इतिहासकार भूतकाळातील घटनांच्या किंवा व्यक्तींच्या इतिहासाचे कथन करू शकतो. यामुळे इतिहासलेखनामध्ये साधनांचे महत्त्व खूप असते.

सर्व ऐतिहासिक साधनांची विश्वासार्हता किंवा सत्यता सारखी नसते. इतिहासकार ऐतिहासिक साधनांची विश्वासार्हता आणि सत्यता काही प्रश्नांच्या उत्तरांवर ठरवत असतात. उदाहरणार्थ साधन कोणी व कधी निर्माण केले आहे ? ते का निर्माण केले आहे ? ते कसे निर्माण केले आहे ? ते कोणासाठी निर्माण केले गेले ? साधन निर्मात्यासाठी त्याचा काय अर्थ होता ? साधन निर्मात्याने त्याचा काय उपयोग केला ? साधनाची निर्मिती कोणत्या परिस्थितीत झाली ? असे अनेक प्रश्न विचारून इतिहासकार साधनाची विश्वासार्हता आणि सत्यता तपासतो. प्रत्येक साधनाचे ज्याप्रमाणे महत्त्व असते त्याप्रमाणे त्याच्या मर्यादाही असतात. इतिहासकार साधनांचे महत्त्व आणि मर्यादा समजून घेऊनच त्यांचा योग्य वापर करू शकतात. साधनांची अशा प्रकारे चिकित्सा केल्याशिवाय इतिहासकार त्यातून भूतकाळाचा इतिहास मांडण्यासाठी अचूक माहिती व पुरावे गोळा करू शकत नाही व भूतकाळाचा योग्य अन्वयार्थ लावू शकत नाही.

आपण या घटकामध्ये मराठा सत्तेच्या उदयाचा इतिहास लिहिण्यासाठी उपयोगी असलेल्या साधनांची ओळख करून घेणार आहोत. त्यांचे महत्त्व व मर्यादा जाणून घेणार आहोत.

## ४.२. विषयविवेचन

या घटकात आपल्याला इ.स. १६०० ते १७०७ या कालखंडामध्ये मराठा सत्तेच्या उदयाचा इतिहास लिहिण्यासाठी भारतीय, फारशी, इंग्रजी व पोर्तुगीज भाषेमध्ये उपलब्ध असलेल्या काही महत्त्वाच्या ऐतिहासिक साधनांची ओळख करून घ्यायची आहे. विसाव्या शतकामध्ये इतिहासकारांनी मराठ्यांच्या इतिहासाची विविध साधने प्रकाशात आणली आहेत. कोणत्याही एका साधनामध्ये भूतकाळातील एखादे प्रकरण, प्रसंग किंवा व्यक्ती या संबंधी सविस्तर माहिती नसते. इतिहासकाराला अनेक साधनांचा अभ्यास करून ती कण कण गोळा करावी लागते. असे केल्यावरच इतिहासकार एक तत्कालीन चित्र वाचकांपुढे उभे करू शकतो.

### ४.२.१ साधने (संस्कृत व मराठी) : शिवभारत आणि आज्ञापत्र

### अ) शिवभारत

शिवभारत हे ऐतिहासिक महाकाव्य (great poem) शिवाजी महाराजांच्या जीवन काळात त्यांच्या दरबारातील कवी परमानंद याने रचले होते. हे महाकाव्य संस्कृत भाषेमध्ये आहे व पद्य स्वरुपात आहे. या महाकाव्यामध्ये शिवाजी महाराजांनी आपली सत्ता कशी स्थापन केली याचे कथन केले आहे. त्यामुळे हे महाकाव्य शिवाजी महाराजांचा इतिहास व मराठा स्वराज्याची निर्मिती समजण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते. शिवभारतचे दुसरे नाव 'सूर्यवंश' 'अनुपुराण' असे आहे. शिवभारतच्या मूळ प्रतीमध्ये काही ठिकाणी हे दुसरे नाव नमूद केलेले आढळते.

परमानंद हा सध्याच्या अहमदनगर जिल्ह्यातील नेवासे गावाचा रहिवासी असलेला एक ब्राह्मण होता. तो वाराणसी येथे वास्तव्य करत असतांना शिवाजी महाराजांनी आपले चरित्र लिहिण्यासाठी त्याची नेमणूक केली होती. शिवाजी महाराजांनीच  कवींद्र (कवींचा राजा) ही पदवी बहाल केली असावी असे मत काही अभ्यासकांनी मांडले आहे. महाभारताप्रमाणे १,००,००० कडव्यांचे महाकाव्य लिहिण्याचा परमानंदाचा मानस होता. म्हणूनच त्याने आपल्या महाकाव्याचे नाव शिवभारत ठेवले. परंतु आपल्यापर्यंत आलेले शिवभारत हे २००० पेक्षा थोड्या जास्त कडव्यांचे व अपूर्ण आहे. महाकाव्याची विभागणी ३१ पूर्ण प्रकरणात केली आहे. ३२ वे प्रकरण अपूर्ण आहे. ३२ व्या प्रकरणात ९ व्या कडव्यात महाकाव्य अचानकपणे थांबते.

शिवभारताची सुरुवात शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी यांच्या जीवनपटाचा आढावा घेऊन होते. महाकाव्यात वर्णन केलेली शेवटची घटना साधारणपणे १६६१ सालच्या मे महिन्यातील आहे. परमानंदाने शिवभारतात शिवाजी महाराजांचे चरित्र हे स्वतःच्या आणि वाराणसीतील काही पंडितांच्या मध्ये झालेल्या संवादाचा स्वरुपात लिहिलेले आहे. महाकाव्यात परमानंद हे पंडितांना शिवाजी महाराजांच्या पराक्रमाची कथा सांगत आहेत. काही ठिकाणी परमानंद पंडितांनी विचारलेल्या प्रश्नांचे उत्तर म्हणून शिवाजी महाराजांच्या पराक्रमांचा इतिहास सांगतात.

प्राचीन काळापासून भारतात महाकाव्य रचण्याची परंपरा अस्तित्वात होती. प्राचीन काळात कालिदास, भारवी, माग, श्रीहर्ष, कुमारदास, भट्टी इत्यादी कवींनी अनेक महाकाव्ये रचलेली आढळतात. या महाकाव्यांमध्ये नायकाचा गौरव करण्याची परंपरा विकसित झाली होती. परमानंदाचे शिवभारत याच महाकाव्य लिहिण्याच्या परंपरेतील होते. त्यामुळे त्याचे स्वरूप एकाच वेळेस ऐतिहासिक वृत्तांत व गौरव करणारे महाकाव्य असे आहे.

शिवभारतामध्ये शिवाजी महाराजांच्या संबंधित अनेक घटनांचे वर्णन आहे ज्यांचे सविस्तर वर्णन आपल्याला इतर कोणत्याही साधनात आढळत नाही. महाराजांच्या जीवनात १६६१ साली झालेल्या घटना व त्यांनी हाती घेतलेल्या लष्करी मोहिमांची सविस्तर माहिती आपल्याला शिवभारत मध्येच मिळते. याशिवाय अफझलखान प्रकरणाचे लांबलचक वर्णनही शिवभारतामध्ये आहे.

शिवभारत ऐतिहासिक साधन म्हणून खालील घटनांसाठी महत्त्वाचे आहे :

१) शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी यांचा जीवनपट.

२) शहाजीराजे भोसले यांची कारकीर्द.

३) शिवाजी महाराजांचा जन्म व सुरवातीचा जीवनपट.

४) शिवाजी महाराजांच्या १६६१ साला पर्यंतच्या लष्करी कारवाया.

**महत्त्व :**

१) शिवभारत या साधनात शिवाजी महाराजांच्या जीवनातील अनेक महत्वाच्या घटना व घडामोडींचा अंतर्भाव झालेला नाही, असे असले तरी शिवभारत शिवाजी महाराजांचा इतिहास लिहिण्यासाठी एक महत्वाचे साधन ठरते, कारण त्याचे लिखाण महाराजांच्या जीवन काळातच झाले होते. यात कोणतीही शंका नाही की, कवी परमानंद हा शिवाजी महाराजांचा समकालीन होता व महाराजांनी त्याची नेमणूक केली होती. शिवाजी महाराजांच्या जीवन काळात लिहिलेले त्यांचे इतर कुठले चरित्र आज उपलब्ध नाही.

२) आपले महाकाव्य रचतांना परमानंदाने एक अचूक ऐतिहासिक चौकट वापरली आहे. अनेक ठिकाणी वर्णन केलेल्या घटनांना इतर मराठी किंवा इंग्रजी साधने दुजोरा देतात. उदाहरणार्थ शिवभारतात असे वर्णन आलेले आहे की १६६१ साली शिवाजी महाराजांनी कोकणातील राजापूर येथील इंग्रजांच्या वखारीवर हल्ला केला होता. शिवाजी महाराजांनी वखारीमधील जमीन खणायला लावली होती. या वर्णनाला डच भाषेतील कागदपत्रे दुजोरा देतात. याशिवाय शिवभारतात पन्हाळगडाचे वर्णन किंवा संगमेश्वर भोवतालच्या प्रदेशाचे वर्णन अचूकपणे केलेले आढळते.

३) शिवभारतात वर्णन केलेल्या घटनांचा क्रम अचूक आहे. परमानंदाचा घटना क्रमाबद्दल गोंधळ झालेला आढळत नाही.

**मर्यादा :**

कवी परमानंदाच्या शिवभारत या महाकाव्याचे ऐतिहासिक मूल्य ठरवताना आपण लक्षात ठेवले पाहिजे की हे काव्य शिवाजी महाराजांच्या दरबारी असणाऱ्या एका कवीने लिहिले आहे. दुसरे असे की शिवाजी महाराज दैवी अवतार होते असा परमानंदाचा विश्वास होता. त्यामुळे त्याने लिहिलेल्या महाकाव्यात काही बाबतीत कवी कल्पना व अतिशयोक्ती वापरली जाणे साहजिकच होते. पण असे जरी असले तरी बहुतेक वेळेला अभ्यासक परमानंदाची कवी कल्पना व अतिशयोक्ती ओळखू शकतो व ती बाजूला ठेवू शकतो. उदाहरणार्थ परमानंद एके ठिकाणी असे म्हणतो की शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी यांनी सोन्याच्या पायऱ्या असलेल्या अनेक विहिरी बांधल्या. या उदाहरणातली परमानंदाची कवी कल्पना व अतिशयोक्ती आपल्याला सहजपणे लक्षात येथे. शिवभारत जरी एक काव्य असले तरी ऐतिहासिक साधन म्हणून मौलिक आहे. इतिहासकारांनी काही खबरदारी घेऊन या महाकाव्याचा अभ्यास केला तर त्यांना महत्वाची ऐतिहासिक माहिती मिळते.

## ब) आज्ञापत्र - लेखक रामचंद्रपंत अमात्य

छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजनीतीवर प्रकाश टाकणारा एक अलौकिक ग्रंथ म्हणून आज्ञापत्राचा उल्लेख होतो. प्राचीन काळातील कौटिल्याचा 'अर्थशास्त्र' हा राजनीतीपर ग्रंथ मानला जातो. राज्यकारभाराचे अतिशय सूक्ष्म बारकावे या ग्रंथात पहावयास मिळतात, यानंतर शुक्राचार्याचा 'शुक्रनीती' मध्य युगातील 'आकाशभैरव', 'अभिलाषतीर्थ चिंतामणी' इत्यादीचा उल्लेख होतो. शिवकाळातील 'बुधभूषणम्' हा छत्रपती संभाजी महाराजांचा संस्कृत ग्रंथ ही राजनीतीवर आधारित आहे. रघुनाथपंत हणमंते यांनी लिहिलेला 'राज्यव्यवहारकोश' हाही ग्रंथ शिवकालीन राजनीतीवर प्रकाश टाकण्यास मदत करतो. मात्र छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजनीतीचा व प्रशासकीय व्यवस्थापनांचा यथासांग व विस्तृत विवेचन करणारा ग्रंथ म्हणून रामचंद्रपंत अमात्यकृत आज्ञापत्र या ग्रंथाचा प्रामुख्याने उल्लेख होतो. १८ व्या शतकाच्या प्रारंभी रचलेला हा ग्रंथ राजनीती व राज्य व्यवहार यांचे निरुपण करणारा आशयघन मात्र सूत्रात्मक ग्रंथ आहे. प्राचीन राजनीती विषयक तत्त्वांच्या आधाराने शिवकालीन राज्य व्यवहाराच्या काही अंगांचे विश्लेषण ऐतिहासिक घटनांच्या पार्श्वभूमीवर केलेले दिसते.

### १) रामचंद्रपंत अमात्य :

शिवकाळातील एक मुत्सद्दी व्यक्तिमत्त्व म्हणून रामचंद्रपंत यांचे नाव घेतले जाते. त्यांचे मूळ नाव रामचंद्र नीलकंठ भादाणेकर असे होते. त्यांना बहुतकर या आडनावानेही ओळखले जाते. ०३

एप्रिल १६६२ रोजी निळो सोनदेवांना अमात्य पद प्राप्त झाले. इ. स. १६७२ मध्ये निळो सोनदेवाचा मृत्यू झाला व अमात्य पद त्यांचे चिरंजीव नारो नीलकंठ व रामचंद्र नीळकंठ यांचे कडे आले. रामचंद्रपंत अमात्य झाले तेव्हा त्यांचे वय २२ वर्षाचे होते. शिवराज्यभिषेक प्रसंगी अष्टप्रधानामध्ये रामचंद्रपंत यांचा समावेश झाला. पुढे १६७७ पर्यंत रामचंद्रपंत अमात्य पदावर होते. संभाजी महाराजांच्या काळात इ.स. १६८० ते १६८५ मध्ये ते सचिव म्हणून कार्यरत होते. संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर १६९३ मध्ये ते पुन्हा अमात्य झाले. राजाराम महाराज जिंजीला गेले तेव्हा स्वराज्याची मोठी जबाबदारी त्यांच्यावर होती. राजाराम महाराजांनी त्यांना 'हुकूमतपन्हा' हा किताब दिलेला होता. रामचंद्रपंतानी राजाराम महाराजांना आपल्या कर्तृत्वाने व बुद्धिमत्तेने प्रभावित केलेले होते. मराठ्यांच्या स्वातंत्र्य युद्धात रामचंद्रपंतांनी खूप मोठी जबाबदारी पार पाडली.

## २) आज्ञापत्र लेखनाची प्रेरणा :

आज्ञापत्र या ग्रंथाच्या मूळ तीन प्रती धुळे येथे आहेत. धुळ्याच्या राजवाडे संशोधन मंडळात यातील दोन प्रती आहेत व तिसरी प्रत श्री समर्थ वाग्देवता मंदिर येथे आहे. आज्ञापत्र हा ग्रंथ सर्वप्रथम १८७५-७६ मध्ये विविध ज्ञानविस्तार या मासिकात प्रकाशित झाला. राजाराम महाराजांची दुसरी पत्नी राजसबाई यांचा मुलगा संभाजी दुसरा कोल्हापूरमधील रक्तहीन राज्यक्रांती नंतर इ.स. १७१४ मध्ये गादीवर आला. त्यांनीच रामचंद्रपंत यांना आज्ञापत्र लिहिण्यास सांगितले. आज्ञापत्राची लेखन प्रेरणा संभाजी दुसरे हे असले तरी त्याचा उद्देश शिवाजी महाराजांच्या कार्य कर्तृत्वाचा व राजनीतीचा भावगर्भ दर्शित करणे हा आहे.

## ३) आज्ञापत्र हा ग्रंथ केव्हा लिहिला ? :

आज्ञापत्र हा ग्रंथ शिवकालीन राजनीतीचे मर्म दर्शविणारा ग्रंथ आहे. शिवाजी महाराजांच्या बरोबर प्रत्यक्ष काम केलेले व त्यांच्या प्रशासनाच्या स्वानुभवाने रामचंद्रपंत यांनी हा ग्रंथ लिहिलेला असल्याने या ग्रंथाचे मूल्य वेगळेच आहे. मात्र हा ग्रंथ नेमका कोणत्या साली लिहिला याचा व्यवस्थित अर्थबोध होत नाही. आज्ञापत्राच्या मूळ संहितेत याचा लेखनकाळ राज्याभिषेक शके ४२ मन्मथनाम संवत्सरे, मार्गशीर्ष शुध्द चतुर्थी गुरुवासरे असा आहे. पिल्ले जंत्रीप्रमाणे या दिवशी १९ नोव्हेंबर १७१५ ही तारीख येते. मात्र या दिवशी गुरुवार येत नाही, शनिवार येतो. ग्रंथाची सुरुवात केव्हा झाली हे निश्चित समजते. मात्र हा ग्रंथ लिहून केव्हा पूर्ण झाला यासंबंधी ठोस माहिती उपलब्ध नाही. परंतु रामचंद्रपंत यांचे निधन इ.स. १७१६ मध्ये झाले यावरून हा ग्रंथ त्यांच्या मृत्यूपूर्वी लिहून तयार झालेला होता म्हणजे इ.स. १७१५ ते १७१६ या कालावधीत या ग्रंथाचे लेखन झालेले असावे, असे अनुमान लावता येईल.

## ४) आज्ञापत्राचे स्वरूप व रचना :

आज्ञापत्र हा ग्रंथ मूलत: मराठी भाषेतून लिहिलेला असला तरी या ग्रंथावर संस्कृत व फारशी भाषेचा अधिक प्रभाव दिसून येतो. रामचंद्रपंत अमात्यांनी या ग्रंथाचे लेखन ऐतिहासिक घटना विधीत

करण्यासाठी केलेले नसून शिवकालीन राजनीती व राज्यव्यवस्था कशाप्रकारे होती यावर प्रामुख्याने प्रकाश टाकलेला आहे. शिवाजी महाराजांच्या राजनीतीचे व राज्यव्यवस्थेचे उत्तम वर्णन यामधून पहावयास मिळते. शिवाजी महाराजांच्या राजनीतीचे वर्णन करताना पुढील राज्यकर्त्यानी ही या राजनीतीचे पालन करावे हा आदर्श घ्यावा ही लेखन कर्त्याची अपेक्षा असावी. श्री. ना. बनहट्टी यांनी इ.स. १९६१ मध्ये आज्ञापत्र अथवा शिवाजीराजांची राजनीती या नावाने आज्ञापत्र संपादित केलेले असून त्यामध्ये एकूण ९ कलमे अर्थात प्रकरणे दिलेली आहेत.

### १) प्रकरण पहिले :

पहिल्या प्रकरणामध्ये आज्ञापत्र का व कोणाच्या प्रेरणेने लिहिले या पासून सुरुवात असून शिवाजी महाराजांनी राज्य कसे स्थापन केले व स्वराज्याचा विस्तार कसा होत गेला, यासंबंधी संक्षिप्त माहिती दिलेली आहे. शिवाजी महाराजांच्या स्वराज्याच्या निर्मिती संदर्भात आज्ञापत्रकार म्हणतात की महाराजांनी नवीन सृष्टी निर्माण केली.

### २) प्रकरण दुसरे :

दुसऱ्या प्रकरणा मध्ये राजाराम महाराजांच्या काळातील राजकीय घडामोडी संदर्भात वर्णन आहे. मात्र या प्रकरणात ज्या राजकीय घडामोडीचा उहापोह अमात्यांनी केला आहे, त्या संदर्भात अभ्यासकांमध्ये मत-मतांतरे आहेत. उदा. राजाराम महाराजांची कधीही न झालेली नर्मदा नदीपलीकडील स्वारी.

### ३) प्रकरण तिसरे : (राज्य आणि राजधर्म)

प्रकरण तीन मध्ये राजाची कर्तव्ये व राजाचे गुणधर्म या संदर्भात चर्चा केलेली आहे; राजा या संस्थेचा उदय, वैयक्तिक कर्तव्ये, व्यक्तिगत संरक्षण आणि खाजगी सरंजाम, वैयक्तिक नित्य कर्मे, करमणूक, राजकवी व भाट, थट्टामस्करी, सल्लामसलत, आर्थिक धोरण, लष्करी धोरण, राज्ययंत्रणेतील नोकर-चाकर, राजाची वागणूक, राजकुमारांचे शिक्षण, राजाची सहिष्णुता या संदर्भात विवेचन केलेले आहे.

### ४) प्रकरण चौथे : (राज्य-व्यवस्था)

संपूर्ण चौथे प्रकरण प्रधान अथवा सरकारकून या विषयावरती आहे. राज्यव्यवस्थे संदर्भात राजाची कर्तव्ये, प्रधानाची आवश्यकता, प्रधानाचे महत्त्व, प्रधानाची योग्यता, राजा व प्रधानसंबंध, प्रधानांची कार्ये व वर्तणूक इत्यादी मुद्यांची चर्चा केलेली आहे.

### ५) प्रकरण पाचवे : (साहुकार)

भारतीय राजनीती संदर्भातील प्राचीन व मध्ययुगीन कालखंडात जे ग्रंथ लिहिले गेले त्यामध्ये अभावानेच व्यापारी अथवा साहुकार या संदर्भातील विवेचन आढळते. राजाने व्यापारी वर्गा संदर्भात

काय भूमिका घ्यावी याची चर्चा या प्रकरणात केलेली आहे. शिवाजी महाराजांचे परकीय व्यापाऱ्या संदर्भातील धोरण फारच लक्षवेधी आहे. या प्रकरणात प्रामुख्याने साहुकार व त्यांचे महत्त्व, परदेशी व्यापारी, परदेशी व्यापाऱ्या बाबतचे धोरण या संदर्भात चर्चा केलेली आहे.

### ६) प्रकरण सहावे : (वतनदार)

आज्ञापत्रातील वतनासंबंधीचे प्रकरण छोटे असले तरी ते अत्यंत अर्थपूर्ण आहे. शिवकालीन वतनदाराच्या प्रवृत्तीबद्दल चर्चा या प्रकरणाच्या अनुषंगाने केलेली आहे. वतनदारांच्या संदर्भात राज्यकर्त्यांनी कोणती भूमिका घेणे आवश्यक आहे याची या मध्ये चर्चा आहे.

### ७) प्रकरण सातवे : (वृत्ती आणि इनामे)

वतन आणि वृत्ती या मुद्यांच्या अनुषंगाने वृत्ती आणि त्याविषयी धोरण, नव्या वृत्ती देवू नयेत, नवीन इनामे देवू नयेत, धर्मार्थ भूदान या चार मुद्याच्या बाबतीत चर्चा केलेली आहे. या प्रकरणाच्या माध्यमातून अमात्यांनी नव्या वृत्ती किंवा नवीन इनामे देवू नयेत असा महत्त्वाचा इशारा दिलेला दिसतो.

### ८) प्रकरण आठवे : (गड-कोटदुर्ग)

शिवकालीन लष्करी व्यवस्थापनाचा व युध्दतंत्राचा महत्त्वाचा भाग असलेला गड-कोट-दुर्ग यांची सविस्तर चर्चा केलेली आहे. केवळ राज्य स्थापून अथवा विस्तार करून चालत नाही, त्याच्या संरक्षणाची व्यवस्था प्रथम केली पाहिजे, या अनुषंगाने दुर्गाचे महत्त्व वर्णिले आहे. या प्रकरणात प्रमुख तीन विषय असून गडाचे महत्त्व, गडाची व्यवस्था, गडाची रचना यांची चर्चा केलेली आहे. या प्रकरणातून शिवकालीन दुर्ग व्यवस्थापनावर उत्तम प्रकारे प्रकाश पडतो.

### ९) प्रकरण नववे : (आरमार)

प्राचीनकाळातील संस्कृत ग्रंथ 'युक्तीकल्पतरू' नंतर आरमारा विषयी व त्याच्या महत्त्वा विषयी चर्चा करणारा एकमेव ग्रंथ म्हणून आज्ञापत्राचा उल्लेख होतो. आरमाराचे महत्त्व सांगताना आज्ञापत्रकार म्हणतात की, ''ज्याच्या जवळ आरमार त्याचा समुद्र'' या छोट्याशा विधानातून आरमाराचे महत्त्व विशद केलेले दिसते. या प्रकरणात आरमाराचे महत्त्व, आरमाराची व्यवस्था, व्यापारी गलबते, नाविक युध्द, आरमारी छावणी इत्यादी मुद्यांच्या अनुषंगाने चर्चा केलेली आहे.

## ५) आज्ञापत्राच्या मर्यादा :

आज्ञापत्र हा शिवकालीन राजनीती, राज्य व्यवहार व प्रशासनाच्या व्यवस्थापना संदर्भातील विस्तृत विवेचन करणारा ग्रंथ असला तरी त्यामध्ये काही दोष आहेत हे ही नाकारून चालणार नाही, ते खालील प्रमाणे :

१) कालनिर्णयात विसंगती आहे.

२) काही विधानांमध्ये विसंगती आहे.

३) अतिशयोक्तिपूर्ण वर्णन

४) अनैतिहासिक माहिती

५) उत्तर (नर्मदा) विजयाची काल्पनिक माहिती

## ६) आज्ञापत्राचे गुण :

आज्ञापत्रात वरील प्रमाणे काही दोष असले तरी तत्कालिन संदर्भ साधन, साधन सूचिता व रामचंद्रपंत अमात्य यांच्या अनुषंगाने विचार करता (विस्मृती) अथवा राजाचे गौरवगान गृहीत धरले तर वरील दोष गौण ठरतात. यातील प्रमुख गुण खालील प्रमाणे :

१) मध्ययुगीन कालखंडातील राजनीतीचे यथार्थ दर्शन घडवणारा ग्रंथ.

२) शिवकालीन राज्यव्यवस्थापन, राज्यव्यवहार व राजनीतीची यथासांग माहिती.

३) शिवाजी महाराजांच्या राजनीतीचे दर्शन घडते.

४) मध्ययुगीन मुस्लिम राज्यकर्त्यांचे धोरण व शिवाजी महाराजांचे राज्य विषयक धोरण यातील फरक समजण्यास उत्तम.

५) साहुकार अथवा व्यापारी भांडवलदार या संदर्भात विवेचन करणारा मध्ययुगातील एकमेव ग्रंथ.

६) लष्करी प्रशासन व व्यवस्थापनाची माहिती.

७) आरमाराची महती सांगणारा ग्रंथ या अर्थाने अनेक गुण सांगता येतील.

आज्ञापत्र शिवाजी महाराजांच्या इतिहासाचा मराठी भाषेतून असलेला बहुमोल वृत्तांत आहे. महाराजांचा इतिहास लिहिण्यासाठी एक प्रमुख साधन आहे. आज्ञापत्राचा मराठ्यांच्या इतिहासाचे साधन म्हणून वापर करतांना त्यात केलेल्या वर्णनाची पुष्टी इतर समकालीन मराठी, फारसी, इंग्रजी, डच, फ्रेंच व पोर्तुगीज कागदपत्रे वापरून केली तर इतिहास लेखकाला फायद्याचे ठरेल.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय निवडून वाक्य/विधान पूर्ण करा.**

१) परमानंद हा ........... गावाचा रहिवासी होता.

(अ) वाराणसी (ब) नेवासे (क) जिंजी (ड) धरणगाव

२) शिवभारतामध्ये ......... प्रकरणे आहेत.

(अ) १० (ब) २२ (क) ३१ (ड) ३२

३) शिवभारताची सुरुवात ...... यांच्या जीवनपटाचा आढावा घेऊन होते.

(अ) मालोजी (ब) शहाजीराजे

(क) शिवाजी महाराज (ड) संभाजीराजे

४) शिवभारताचा शेवट शिवाजी महाराजांच्या जीवनातील ....... सालच्या घटना सांगून होतो.

(अ) १६६१ (ब) १६६४ (क) १६७१ (ड) १६८०

५) सूर्यवंश अनुपुरण हे ....... ग्रंथाचे दुसरे नाव आहे.

(अ) शिवभारत (ब) सभासदबखर

(क) चिटणीसीबखर (ड) तारीख- ए- खाफीखान

६) आज्ञापत्राचे लेखक .......... आहे

(अ) सभासद (ब) रामरावचिटणीस

(क) रामचंद्रपंत अमात्य (ड) खाफीखान

७) रामचंद्रपंत अमात्य यांना हुकूमतपन्हा हा किताब ......... यांनी दिला होता.

(अ) शिवाजीमहाराज (ब) संभाजीमहाराज

(क) राजाराममहाराज (ड) ताराराणी

८) आज्ञापत्र हा ग्रंथ सर्वप्रथम .......... या मासिकात प्रकशित झाला.

(अ) मनोरमा (ब) बॉम्बेदर्पण (क) मराठा इतिहास (ड) विविधज्ञानविस्तार

९) शिवाजी महाराजांनी नवीन सृष्टी निर्माण केली असे .......... ग्रंथात म्हटलेले आहे.

(अ) शिवभारत (ब) आज्ञापत्र

(क) शिवकालीन राजनीती (ड) इंग्लिश फॅक्ट्रीज इन इंडिया

१०) 'युक्तीकल्पतरू' एक .......... आहे.

(अ) गड (ब) तलवार (क) ग्रंथ (ड) इमारतीचे नाव

## १.२.२ फारसी साधने : तारीख-ए-दिल्कुशा, मुन्तखाब-उल-लुबाब

मध्ययुगीन भारताच्या इतिहास लेखनात फारसी साधनांचे खूप महत्त्व आहे. फारसी भाषाही मुघल साम्राज्याच्या राजकीय कारभाराची भाषा होती. मुघल सम्राट व त्याच्या सरदारांच्या हालचाली व हेतू जाणण्यासाठी फारसी भाषेतील दस्तावेज (कागदपत्रे) इतिहासकारांना अभ्यासावी लागतात. उदाहरणार्थ शिवकाळाबद्दल मौलिक माहिती देणारी अनेक फारसी कागदपत्रे कोल्हापूर येथील शिवाजी विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. अप्पासाहेब पवार यांनी संपादित केलेल्या ताराबाई पेपर्स (Tarabai Papers: A Collection of Persian Letters) या ग्रंथात प्रकाशित झाली आहेत. याशिवाय मुघल साम्राज्याच्या प्रशासनात नोकरी करणाऱ्या कांही अधिकाऱ्यांनी मुघल साम्राज्याचा इतिहास ग्रंथ स्वरुपात लिहून ठेवला आहे. खाफीखान याने लिहिलेले 'मुन्तखाब-उल-लुबाब' आणि भीमसेन सक्सेना याने लिहिलेला 'तारीख-ए-दिल्कुशा' ही ग्रंथ साधने मराठा-मुघल संघर्षा संबंधित महत्वाची माहिती देतात.

फारसी भाषेतील ही दोन साधने फारसी भाषा न येणाऱ्या इतिहासकारांना उपलब्ध करून देण्यात अनेक अभ्यासकांचे योगदान आहे. इलियट आणि डाऊसन या इंग्रजी इतिहासकारांनी खाफीखानच्या ग्रंथातील निवडक भागांचे इंग्रजी अनुवाद त्यांच्या 'हिस्ट्री ऑफ इंडिया ॲज टोल्ड बाय इट्स ओन हिस्टोरीयन्स 'खंड ७ (१८७७)' मध्ये प्रकाशित केले. खाफीखान आणि भीमसेन सक्सेना यांचे ग्रंथ मराठी भाषा जाणणाऱ्या अभ्यासकांना उपलब्ध करून देण्याचे काम प्रसिद्ध इतिहासकार सेतू माधवराव पगडी यांनी केले. सेतू माधवराव पगडींनी खाफीखानाने मराठ्यांच्या इतिहासाबद्दल लिहिलेला मजकूर त्यांच्या 'मराठ्यांचे स्वातंत्र्ययुद्ध' या ग्रंथात १९६२ साली अनुवादित केलेला आहे. पांडुरंग नरसिंह पटवर्धन यांनी १९२० साली भीमसेन सक्सेना यांच्या ग्रंथाचा मराठी अनुवाद 'बुंदेल्यांची बखर' या नावाने प्रसिद्ध केला. १९६३ साली सेतू माधवराव पगडी यांनीही त्याचा अनुवाद त्यांच्या 'मोगल व मराठे' या ग्रंथाच्या स्वरुपात केलेला आहे.

### अ) भीमसेन सक्सेना यांचे तारीख-ए-दिल्कुशा

तारीख-ए-दिल्कुशा हा ग्रंथ फारसी भाषेत आहे. या ग्रंथाला 'नुस्खाये दिल्कुशा' या नावाने देखील ओळखले जाते. त्याचा लेखक भीमसेन याचे घराणे मूळचे उत्तर प्रदेशातील होते. तो सक्सेना कायस्थ जातीचा होता. नोकरीच्या निमित्ताने हे घराणे दक्षिणेत आले. स. १६४९ च्या सुमारास भीमसेनचे वडील रघुनंदन सक्सेना हे बुऱ्हानपूर येथे एका लहानशा हुद्यावर होते. भीमसेन याचा जन्म बुऱ्हानपूर येथे इ.स. १६४९ मध्ये झाला. म्हणून त्याला भीमसेन बुऱ्हानपूरी या नावाने ओळखले जाते. औरंगजेब मुघल बादशाह झाल्यावर भीमसेनचे वडील तोफखान्याच्या खात्यात हिशेब-

तपासनीसाच्या (मुश्रीफ) जागी औरंगाबाद येथे १६५७ साली रुजू झाले. भीमसेनचे वडील हे धार्मिक वृत्तीचे होते. भीमसेन दहा वर्षाचा असताना आपल्या वडिलांसोबत नाशिक, त्र्यंबकेश्वर, प्रवरा संगम या स्थळांची यात्रा करून आला. पुढील काळात भीमसेनने अनेक वेगवेगळ्या मुघल सरदारांच्या बरोबर काम केले. स.१६६७ पासून स. १६७० पर्यंत भीमसेन आपल्या वडिलांचे तोफखाना खात्यातील हिशेब- तपासनीसाचे काम पाहत असे. नंतर त्याचा जोधपुरचा राजा जसवंतसिंग यांच्याशी संबंध आला आणि तो जसवंतसिंग यांच्या बरोबर त्याच्या लष्करी मोहिमांवर जाऊ लागला. यानंतर तो सरदार दाऊदखानचा एक अधिकारी बनला. मराठा फौजांबरोबर दाऊदखानच्या एका संघर्षात भीमसेन एकदा मराठ्यांच्या तावडीत सापडला होता. पण शिवाजी महाराजांचा एक मुसलमान अधिकारी नूरखान याने त्याला ओळखले आणि त्याला मुघल छावणीत नेऊन पोहचवले. यानंतर भीमसेन यास बहादूरखान, दिलेरखान, शहजादा मुअज्जम आणि पुन्हा बहादूरखान अशा निरनिराळ्या सुभेदारांच्या आणि सेनापतींच्या हाताखाली काम करावे लागले. शेवटी तो दातिया ह्या ठिकाणचा मुघल सरदार दलपतराव बुंदेला याच्या नौकरीत स्थिरावला. दलपतराव बुंदेलाच्या नौकरीत असल्यामुळे भीमसेन हा मुघलांच्या दख्खनच्या मोहिमेत स्वतः हजर होता. १६९८ साली मुघल फौजांनी पन्हाळगडाला वेढा घातला होता. भीमसेन सक्सेना देखील ह्या मुघल फौजफाट्यात सामील होता. वेढा सुरु असतांना पन्हाळगडाच्या पायथ्याशी असलेल्या आपल्या तंबूत भीमसेन सक्सेनाने आपला इतिहास लिहिण्यात सुरुवात केली.

तारीख-ए- दिल्कुशा ह्या ग्रंथामध्ये भीमसेन सक्सेनाने औरंगजेबाच्या दख्खनमधील मोहिमांच्या आठवणी लिहिल्या आहेत. त्यामुळे ह्या ग्रंथाला समकालीन इतिहासाबद्दल खूप माहिती असलेल्या एका व्यक्तीचे आत्मचरित्र अशा प्रकारचे स्वरूप प्राप्त झाले आहे. ह्या ग्रंथाची सुरुवात औरंगजेबाने १६५६ साली गोवळकोंड्यावर केलेल्या आक्रमणाने होते. ग्रंथाचा शेवट औरंगजेबाचा पुत्र शहजादा कामबक्ष याच्या १७०९ साली झालेल्या मृत्यूने होतो. भीमसेनची लेखणी अत्यंत साधी व सोपी आहे. अलंकारिक भाषा क्वचितच वापरलेली आढळते.

**महत्त्व :**

१) भीमसेन सक्सेनाने स्वतः दख्खनमधील महत्वाच्या घटना पाहिलेल्या होत्या व त्यामध्ये अनेकवेळा सहभाग देखील घेतला होता. त्यामुळे त्याच्या ह्या ग्रंथाला साक्षीदाराचा वृत्तांत (eye-witness account) म्हणून स्थान प्राप्त होते. भीमसेन मुघल सरदारांच्या चाकरीत असल्यामुळे तो अनेक महत्वाच्या घटनांचा साक्षीदार होता. उदाहरणार्थ. इ. स. १६८२ च्या सुमारास मुघलांनी रामसेजच्या किल्याला वेढा घातला. या प्रसंगी खाफीखान मुघल छावणीत हजर होता. इ.स. १६८९ मध्ये मुघलांनी रायगड जिंकून घेतला, त्यावेळी खाफीखान तेथील मुघल अधिकाऱ्याचा मदतगार म्हणून होता. संभाजीराजे मुघलांना मिळाले (१३ डिसेंबर१६७८) त्यावेळी भीमसेन हा मुघल छावणीत हजर होता.

२) मराठ्यांच्या विशेषतः शिवाजी महाराजांच्या लष्करी कारवाया समजण्यासाठी तारीख-ए-दिल्कुशा हा ग्रंथ अत्यंत महत्त्वाचा आहे. भीमसेनने शिवाजी महाराजांच्या लष्करी संघटन कौशल्याचे कौतुक केले आहे. शिवाजी महाराजांबद्दल त्याने सत्पुरुष, राजनीती प्रवीण, अद्वितीय शिपाई असे गौरवोद्गार काढले आहेत. महाराणी ताराबाईंचे वर्णन तो कर्तबगार, कुशल, सगळे मराठा सरदार तिच्या आज्ञेत असत असे करतो.

३) भीमसेनची निरीक्षणे विस्तारित व अचूक आहेत. त्याचे अनेक उच्चपदस्थ मुघल अधिकाऱ्यांबरोबर मैत्रीचे संबंध असल्यामुळे त्याला अचूक अधिकृत माहिती मिळत होती. याशिवाय अधिकाऱ्यांच्या बरोबर असलेल्या जवळीकतेमुळे त्याला गुप्त बातम्या देखील कळत होत्या.

४) भीमसेन सक्सेनाने मुघल बादशहाच्या आश्रयाखाली लिखाण केले नाही. त्यामुळे त्याने मुघल सरदार किंवा मोगल बादशाह यांना अपकीर्ति आणणाऱ्या गोष्टी लपवल्या नाहीत. तो स्वतः हिंदु धर्माचा असल्यामुळे तो मुघल-मराठा संघर्षाकडे तटस्थाच्या भूमिकेतून पाहू शकत होता. भीमसेनने आपल्या ग्रंथात अनेक ऐतिहासिक व्यक्तींच्या चरित्रांची वर्णने केली आहेत. त्यांचे गुणदोष सांगितले आहेत.

५) भीमसेनच्या ग्रंथामध्ये आपल्याला लष्करी मोहिमांच्या वर्णनाबरोबर सामान्य लोकांच्या परिस्थितीबद्दल माहिती मिळते. उदाहरणार्थ भीमसेन अन्न-धान्याचे भाव, लोकांची मनोरंजनाची साधने, रस्त्याची परिस्थिती, अधिकारी वर्गाचे सामाजिक जीवन इ. गोष्टींची माहिती देतो.

**मर्यादा :**

१) भीमसेन हा हिंदु असला तरी तो मुघलांचा राजनिष्ठ अधिकारी होता. त्यामुळे त्याच्या लिखाणात थोडा पक्षपातीपणा येणे साहजिकच होते. औरंगजेबाबद्दल त्याला एक प्रकारचा दरारा आणि आदर वाटत असल्याचे आपल्याला त्यांच्या ग्रंथावरून दिसते. शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सारख्या महत्वाच्या घटनेचा तो उल्लेख देखील करत नाही.

२) भीमसेन आपल्या ग्रंथामध्ये फार कमी तारखा देतो. भीमसेनने ग्रंथ लिहितांना आठवणींवर भर दिल्यामुळे घटनांच्या कालक्रमणामध्ये गोंधळ झाल्याचे आढळते.

## ब) खाफीखान यांचे मुन्तखाब-उल-लुबाब

मुघल साम्राज्याच्या इतिहासकारांत महंमद हाशिम खाफीखान याचे स्थान फार महत्त्वाचे आहे. इ. स. १७३४ साली त्याने फारसी भाषेत मोगल साम्राज्याचा इतिहास लिहून त्याचे नाव मुन्तखाब-उल-लुबाब-ए-महंमदशाही असे ठेवले. मुन्तखबुलुबाब हा शब्द अरबी भाषेतील आहे. त्याचा अर्थ Records (selected) of the Wise and Pure म्हणजेच शहाण्या आणि स्वच्छ

व्यक्तींच्या निवडक नोंदी असा होतो. या ग्रंथाला तारीखे खाफीखान असेही म्हणतात. हा ग्रंथ मुघल बादशाह मुहम्मदशहा (१७१९-१७४८) यांच्या कारकिर्दीत पूर्ण केला गेला.

ह्या ग्रंथात खाफीखानाने मुघल साम्राज्याची हकीकत १५१९ सालच्या मुघल बादशाह बाबराच्या आक्रमणापासून ते इ.स. १७३४ पर्यंत आणून सोडली आहे. खाफीखानने आपला इतिहास लिहिला तेव्हा मुघल साम्राजाची स्थिती बदललेली होती. मुघल साम्राज्याच्या राजकीय ऱ्हासाला सुरुवात झालेली होती. मुघल-मराठा संघर्षाला तीव्र स्वरूप प्राप्त झाले होते. त्यामुळे खाफीखानाच्या इतिहासात आपल्याला मराठ्यांबद्दल अनेक महत्त्वाचे संदर्भ मिळतात. जरी खाफीखानाचा इतिहास शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर ५० पेक्षा अधिक वर्षांनी लिहिला असला तरी हे निश्चित आहे की खाफीखानाने स्वतःला असलेल्या माहितीच्या आधारे आणि समकालीन लोकांकडून माहिती घेऊन लिहिला होता.

खाफीखानाच्या नावा बद्दल इतिहासकारांनी वेगवेगळे तर्कवितर्क मांडले आहेत. काही इतिहासकार खाफीखान हे नाव पडण्याचे कारण महंमद हाशिम खान याचे घराणे मूळचे इराण मधील 'खाफ' या गावांतले होते असे मानतात. तर काही इतिहासकारांच्या मते त्याने बादशाहा औरंगजेबाच्या कारकिर्दीत इतिहास लेखनावर बंदी असतांना महत्वाच्या घटना व प्रसंगांबद्दल गुप्तपणे (खाफी) टिपणे ठेवली म्हणून त्यांचे हे नाव पडले असावे. खाफीखान स्वतःला निजाम-उल-मुल्की असेही म्हणून घेतो. याचे कारण असे की, निजाम-उल-मुल्क हा इ.स. १७२३ मध्ये दक्षिणेचा सुभेदार म्हणून आला असता, खाफीखान हा त्याचा दिवाण म्हणून दोन वर्षांपर्यंत औरंगाबाद येथे राहिला. पुढील काळात ह्याच निजामउलमुल्क असफ जहाँ ने स्वतंत्र निजामशाही राज्याची स्थापना केली.

खाफीखानाचे वडील औरंगजेबाचा धाकटा भाऊ मुराद याच्या पदरी होते. औरंगजेब याची मुराद आणि दाराशुकोह बरोबर युद्धे झाली. त्यात खाफीखानाचे वडील हजर होते (१६५७-५८). राजपुत्र मुरादचा पाडाव झाल्यानंतर खाफीखानाचे वडील औरंगजेबाच्या पदरी लागलेले दिसतात. इ.स. १६८१ मध्ये जेव्हा औरंगजेबाचा धाकटा मुलगा अकबर याने आपल्या बापा विरुद्ध बंड केले तेव्हा दक्षिणेकडे जाणाऱ्या घाटांवर देखरेख करण्याचे काम खाफीखान याच्याकडे दिले गेले होते.

**महत्त्व :**

१) मुघल बादशाह औरंगजेबाने आपल्या कारकिर्दीतील घटना अथवा प्रसंगाची नोंद ठेवण्यावर बंदी घातली होती. त्यामुळे औरंगजेबाच्या कारकिर्दीचे इतिहास अत्यंत दुर्मिळ आहेत. मात्र खाफीखानाने गुप्तपणे बारीकसारीक घटनांच्या नोंदी ठेवल्या होत्या. बादशाहाच्या मृत्यूनंतर खाफीखानाने ह्या नोंदींचा उपयोग करून औरंगजेबाच्या कारकिर्दीचा इतिहास लिहिला. खाफीखानाने लिहिलेल्या ग्रंथात आपल्याला औरंगजेबाच्या संपूर्ण कारकिर्दीची माहिती मिळते.

२) मराठ्यांच्या संबंधित घटना किंवा त्यांच्या कारवायांचा मुघल बादशहावर काय परिणाम होत असे हे आपल्याला खाफीखानाच्या इतिहासातून कळते. उदाहरणार्थ संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे किल्ले आपण अल्पावधीत जिंकून घेऊ अशी औरंगजेबाला खात्री वाटत होती असे खाफीखान लिहितो. संताजी घोरपडेचे पराक्रम ऐकून औरंगजेबाने हताशपणे उद्गार काढले, 'मनुष्य हा परस्वाधीन आहे, सर्व काही परमेश्वराच्या हाती आहे'; किंवा राजाराम महाराजांच्या मृत्यूनंतर 'आता मराठ्यांचा नाश झाला म्हणून मुघल परस्परांचे अभिनंदन करू लागले' असे तो सांगतो. खाफीखानाच्या इतिहासात आपल्याला मुघल गोटात मराठ्यांच्या संबंधित घटनांकडे कशा प्रकारच्या प्रतिक्रिया उमटत होत्या व ते कशा प्रकारे विचार करत होते ते कळते.

३) शत्रूपक्षातील असून देखील खाफीखानाने जागोजागी मराठ्यांच्या शौर्याधैर्यादिगुणांची स्तुती केली आहे. शिवाजी महाराजां संबंधी त्याने गौरवाचे उद्गार काढले आहेत. शिवाजी महाराजांनी आपल्या अनुयायांना मस्जिद, कुराण किंवा स्त्रियांना हानी पोचवायची नाही असा कडक आदेश दिला होता ही महत्वाची माहिती आपल्याला खाफीखानाच्याच इतिहासात मिळते. संताजी घोरपडे ह्या मराठा सरदाराच्या पराक्रमांचे वर्णन करतांना मुघल सरदारांना त्याचा किती धाक वाटत होता हे त्यांने मोकळेपणाने लिहिले आहे. शत्रूपक्षातील एका इतिहासकाराने मराठ्यांबद्दल काढलेले उद्गार हे इतिहास लेखनाच्या दृष्टिकोनातून महत्वाचे ठरतात.

४) मुघल गोटातील असून देखील मुघलांची दुर्दशा खाफीखानाने लपवून ठेवली नाही. औरंगजेबाने सातारा, परळी, पन्हाळगड, विशाळगड, सिंहगड इत्यादी किल्ले घेतले. या मोहिमेत मोगल सैन्याची जी दुर्दशा झाली त्याचे तपशीलवार वर्णन त्याने दिले आहे.

**मर्यादा :**

आपला इतिहास लिहिताना खाफीखानाने निःपक्षपाती राहण्याचा प्रयत्न केला असला तरी हा इतिहास मुघल साम्राज्याच्या अधिकृत दृष्टिकोनातून लिहिला आहे हे आपण लक्षात ठेवले पाहिजे. खाफीखान हा मुघल साम्राज्याचा इतिहास लिहित होता. त्याच्यासाठी शिवाजी महाराज आणि मराठे हे मुघल साम्राज्याविरुद्ध बंडखोरी करणारे लोक होते. खाफीखान हा शत्रू पक्षातील असल्यामुळे त्याचा मराठ्यांबद्दलचा हा पूर्वग्रह त्याच्या लिखाणात आढळतो. मराठ्यांच्या संबंधी लिहिताना खाफीखान अनेकवेळा संयम सोडतो व त्यांना हीन दर्जा देतो. काफर, नर्कवासी, नालायक, हीन, दुष्ट, पिडा देणारे, फुटक्या नशिबाचे अशी अनेक विशेषणें खाफीखान मराठ्यांचे वर्णन करतांना वापरतो.

## स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न- २

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय भरा.**

१. शिवाजी महाराजांनी आपल्या अनुयायांना मस्जिद, कुराण किंवा स्त्रियांना हानी पोचवायची नाही असा कडक आदेश दिला होता ही माहिती आपल्याला ..... यांच्या ग्रंथातून मिळते.

(अ) भीमसेन सक्सेना (ब) परमानंद (क) खाफीखान (ड) सभासद

२) भीमसेन सक्सेनाने आपला ग्रंथ ....... गडाचा वेढा सुरु असताना लिहिण्यास सुरुवात केली.

(अ) विशाळगड (ब) जिंजी (क) पन्हाळगड (ड) रायगड

३) १७०९ साली औरंगजेबाचा पुत्र शहजादा कामबक्षच्या मृत्यूच्या घटनेने ............ चा शेवट होतो.

(अ) तारीख-ए-दिल्कुशा (ब) मुन्तखाब-उल-लुबाब

(क) शिवभारत (ड) सभासदबखर

४) शिवाजी महाराजांबद्दल ......... याने सत्पुरुष, राजनीती प्रवीण, अद्वितीय शिपाई असे गौरवोद्गार काढले आहेत

(अ) भीमसेन सक्सेना (ब) परमानंद (क) खाफीखान (ड) सभासद

५) महाराणी ताराबाईंचे वर्णन .......... याने कर्तबगार, कुशल, सगळे मराठा सरदार तिच्या आज्ञेत असत असे केले आहे.

(अ) भीमसेन सक्सेना (ब) परमानंद (क) खाफीखान (ड) सभासद

६) ............ भाषा ही मोगल साम्राज्याच्या राजकारभाराची भाषा होती.

(अ) संस्कृत (ब) अरबी (क) फारसी (ड) मराठी

७) ताराबाईकालीन कागदपत्रे या ग्रंथाचे संपादन ......... यांनी केले आहे.

(अ) डॉ. आप्पासाहेब पवार (ब) डॉ. बाळकृष्ण

(क) गो.स. सरदेसाई (ड) डॉ. जयसिंगराव पवार

८) 'हिस्ट्री ऑफ इंडिया ॲज टोल्ड बाय इट्स ओन हिस्टोरीयन्स' या ग्रंथाच्या सातव्या खंडां मध्ये .......... याचा ग्रंथ इंग्रजी भाषेत अनुवादित केला गेला.

(अ) भीमसेन सक्सेना (ब) खाफीखान (क) परमानंद (ड) सभासद

९) ......... यांनी खाफीखान आणि भीमसेन सक्सेना यांचे फारसी ग्रंथ मराठी भाषेत अनुवादित केले.

(अ) गो. स. सरदेसाई (ब) डॉ. आप्पासाहेब पवार

(क) सेतुमाधवराव पगडी (ड) डॉ. अ. रा. कुलकर्णी

१०) ......... ने स्वतःला निजाम-उल-मुल्की असेही म्हणून घेतले आहे.

(अ) खाफीखान (ब) भीमसेन सक्सेना (क) अबुल फजल (ड) अब्दुल हमीद लाहोरी

## १.२.३ परराष्ट्रीय साधने (इंग्रजी व पोर्तुगीज)

### अ) इंग्रजी भाषेतील साधने

ईस्ट इंडिया कंपनीचे मुख्यालय लंडन येथे होते. त्याला 'इंडिया ऑफिस' असे संबोधले जात असे. कंपनीने भारतात स्थापन केलेल्या वखारी आणि लंडनमधील कंपनी मुख्यालयात प्रचंड अंतर होते. असे असले तरी कंपनी मात्र भारतातील आपल्या वखारीतील अधिकाऱ्यांवर कडक नजर ठेवत असे. प्रत्येक वखारीच्या दैनंदिन कामकाजाचा अहवाल लंडनच्या मुख्यालयात पाठवण्याची सक्ती होती. वखारीचे दैनंदिन प्रशासन एक प्रशासकीय मंडळ (कौन्सिल) पाहत असे. ह्या प्रशासकीय मंडळाचे सदस्य वेगवेगळ्या प्रश्नांवर चर्चा करत असत. आपली वेगवेगळी मते सांगत असत. प्रशासकीय मंडळामध्ये झालेल्या चर्चेची नोंद ठेवली जात असे. नंतर सभेचे इतिवृत्तांत लंडनला पाठवले जात असत. याशिवाय कंपनी अधिकाऱ्यांनी लिहिलेली पत्रे व खास महत्त्व असलेले दस्तावेज सुद्धा मुख्यालयाला पाठवले जात होते.

ईस्ट इंडिया कंपनीच्या अधिकाऱ्यांच्या रोजनिशी, वखारींच्या प्रशासकीय मंडळाच्या सभांचे इतिवृत्तांत, अधिकाऱ्यांनी पाठवलेली पत्रे, वखारीमध्ये राहणाऱ्या व्यक्तींनी लिहिलेली पत्रे अशा प्रकारची इंग्रजी भाषेतील साधने इंडिया ऑफिस दफ्तरखान्यात जतन करून ठेवली आहेत. वखारीच्या स्थापनेपासून ते साधारणतः १७०८ साला पर्यंतच्या कागदपत्रांचे वर्गीकरण 'फॅक्ट्री रेकॉर्डस' या शीर्षकाखाली करण्यात आले आहे. त्यानंतरच्या काळातील कागदपत्रांना 'प्रेसिडेंसी रेकॉर्डस' असे वेगळे शीर्षक दिले गेले आहे. १६०० ते १७०७ या काळातील मराठ्यांच्या इतिहासाची माहिती फॅक्ट्री रेकॉर्डस मध्ये मिळते. सर विलियम फॉस्टर यांच्या 'इंग्लिश फॅक्ट्रीज इन इंडिया (१६६१-१६६४)' या ग्रंथांच्या खंडांमध्ये काही निवडक कागदपत्रे संकलित केली आहेत. याशिवाय वि. डी. काळे व बी. जी. परांजपे यांनी शिवाजी महाराजां संबंधित फॅक्ट्री रेकॉर्डस मधील कागदपत्रे 'इंग्लिश रेकॉर्डस ऑन शिवाजी' या ग्रंथाच्या दोन खंडांमध्ये संपादन केले आहेत.

फॅक्ट्री रेकॉर्डस मधील कागदपत्रे ईस्ट इंडिया कंपनीच्या पूर्वेकडील देशांमध्ये असलेल्या वखारींच्या दैनंदिन कामकाजा संबंधीत आहेत. ईस्ट इंडिया कंपनीच्या भारतातील वखारीमध्ये अनेक एजंट (दलाल) काम करीत असत. त्याचे प्रमुख काम भारतामध्ये कंपनीच्या व्यापाराचा विस्तार करणे हे होते. त्यामुळे ह्या कागदपत्रांमध्ये मराठ्यांच्या इतिहासाच्या संबंधित घटनांचे उल्लेख सापडतात. प्रत्येक वखारीची कागदपत्रे वेगळी ठेवलेली आहेत. उदाहरणार्थ सुरत, मुंबई व कलकत्ता येथील फोर्ट सेंट जॉर्ज वखारीची कागदपत्रे वेगवेगळी ठेवलेली आहेत.

फॅक्ट्री रेकॉर्डसमध्ये शिवाजी महाराज आणि मराठ्यांच्या इतिहासाबाबत अत्यंत महत्त्वाची माहिती मिळते. उदाहरणार्थ सुरत मधील ख्रिस्ती धर्मगुरु रेवरंड जॉन एस्केलीयॉट याने १६६४ सालच्या शिवाजी महाराजांच्या सुरतवरील हल्ल्याचा वृत्तांत लिहिला आहे. सुरतमधील इंग्रजांच्या वखारीत ख्रिस्ती धर्मोपदेशक म्हणून जॉन एस्केलीयॉट काम पाहत होता. ह्या वृत्तांताचे महत्त्व असे की शिवाजी महाराजांनी सुरत लुटली तेव्हा जॉन एस्केलीयॉट सुरतमध्ये हजर होता. त्याने ही सर्व घटना आपल्या डोळ्याने पाहिलेली होती. सुरत हल्ल्याचे वर्णन असलेले पत्र त्याने घटना घडल्यावर काहीच दिवसांनी लिहिले होते. त्यामुळे घटनेच्या स्मृती त्याच्या मनात ताज्या होत्या. शिवाजी महाराजांचे वर्णन जॉन एस्केलीयॉटने असे केले आहे ''उंचीला माझ्या पेक्षा थोडा लहान, पण ताठ आणि उत्कृष्ट बांध्याचा आहे. रोज व्यायाम करून कमावलेले शरीर आहे. प्रसन्न चेहरा, बोलताना मंद स्मित करतो. त्याच्या लोकांमध्ये तो सर्वात गोरा आहे, डोळे भेदक आणि बोलके आहेत.'' फॅक्ट्री रेकॉर्डस्चे महत्त्व दाखवणारे दुसरे उदाहरण म्हणजे हेन्री ऑक्झन्डेन ह्या इंग्रजी अधिकाऱ्याची १६७४ सालची रोजनिशी (डायरी). सुरत मधील इंग्रज वखारीच्या अध्यक्षांनी मराठ्यांबरोबर व्यापारी करार करण्यासाठी तीन दूतांना शिवाजी महाराजांकडे पाठवले होते. हेन्री ऑक्झन्डेन, जॉर्ज रॉबिन्सन व हेन्री मिचेल हे तीन इंग्रज अधिकारी १६७४ साली मे महिन्यात रायगडावर दाखल झाले. त्यामुळे त्यांना शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाला उपस्थित राहण्याची संधी मिळाली. हेन्री ऑक्झन्डेनने आपल्या रोजनिशीत महाराजांच्या राज्याभिषेकाचा वृत्तांत लिहून ठेवला आहे. शिवाजी महाराजांच्या जीवनातील एका अतिशय महत्वाच्या घटनेचा हा वृत्तांत, त्यांच्या दरबाराचे आणि अष्टप्रधान मंडळाचे एका चाणाक्ष व हुशार इंग्रज अधिकारांने केलेले वर्णन शिवरायांचा इतिहास लिहिण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरते.

**महत्त्व :**

१) इंग्रजी भाषेतील ह्या साधनांचे मराठ्यांच्या इतिहास लेखनासाठी खूप महत्त्व आहे. फॅक्ट्री रेकॉर्डस् मध्ये असलेले अहवाल, अधिकाऱ्यांच्या रोजनिशी व पत्रांमध्ये मराठ्यांसंबंधी कथन केलेल्या घटना ह्या इंग्रजी व्यक्तींनी स्वतः पाहिल्या अथवा ऐकल्या होत्या. अनेक व्यक्तींचा घडलेल्या घटनेत सहभाग होता. उदाहरणार्थ राजापूर, हुबळी, सुरत आणि धरणगाव येथे मराठ्यांनी केलेल्या हल्ल्याचे अचूक वर्णन तेथील इंग्रजांनी केले होते.

२) इंग्रजांनी लिहिलेले अहवाल किंवा पत्रे हे त्यांचा दैनंदिन व्यापारी कामकाजाचा भाग होता. मराठ्यांबद्दलची माहिती बहुतेकवेळा इंग्रजांनी एकमेकाला किंवा लंडनमधील मुख्यालयाला भारतात घडत असलेल्या घटनांची महिती देण्याच्या निमित्ताने लिहिलेली आढळते. यामुळे ह्या कागदपत्रांची विश्वासार्हता वाढते.

**मर्यादा :**

१) इंग्रजी वखारीमधील व्यक्तींचा प्रमुख हेतू त्यांच्या व्यापाराचा विस्तार करणे हा होता. फॅक्ट्री रेकॉर्डसमध्ये असलेला पत्रव्यवहार हा व्यापारासंबंधी असल्यामुळे अनेक वेळेला लेखकांनी वर्णन केलेल्या घटनांच्या तारखा, कालक्रम किंवा सत्यता तपासून पाहिलेली आढळत नाही.

२) काही पत्रांमध्ये इंग्रजी लेखकाचा मराठ्यांबद्दलचा पूर्वग्रह दूषित दृष्टिकोन पुढे येतो. मराठ्यांचे वर्णन दरोडेखोर अथवा क्रूर असे काही पत्रांमध्ये केल्यामुळे इंग्रजांची भारतीय वंशाच्या लोकांना हीन दर्जा देण्याची प्रवृत्ती स्पष्ट होते.

## ब) पोर्तुगीज भाषेतील साधने :

पोर्तुगीज लोकांनी भारताकडे येण्याचा संपूर्ण सागरी मार्ग शोधून काढला. १४९८ साली कालिकत (केरळ) बंदरात वास्को द गामाची जहाजे येऊन पोहचली. काहीच वर्षात पोर्तुगीज लोकांनी आपली सत्ता भारतात रुजवली. १५१० साली गोवा इलाख्यावर विजय मिळवून भारतामध्ये आपल्या सत्तेला कायमस्वरूप दिले. त्यांनी गोवा, साष्टी, बारदेश इ. ठिकाणी आपल्या वखारी उघडल्या. पुढील १०० वर्ष पोर्तुगीज लोकांचे भारताच्या सागरी व्यापारावर वर्चस्व होते. काही पोर्तुगीज व्यक्ती भारतीय महासागरामध्ये चाचेगिरी करत असत. काहींनी भारतीय राज्यांच्या लष्करा मध्ये नोकरी स्वीकारली. पोर्तुगीज लोकांच्या ह्या वेगवेगळ्या कृत्यांमुळे त्यांचा अनेकवेळा मराठ्यांशी संबंध आला.

पोर्तुगीजांचे पश्चिम किनाऱ्यावर दोन ठिकाणी राज्य होते. पहिले गोव्याचे तर दुसरे उत्तर कोकणातील चौल, वसई, दमण इ. भागाचे. शिवाजी महाराजांच्या लष्करात अनेक पोर्तुगीज अधिकारी होते. पोर्तुगीज त्यांच्या तोफखान्यासाठी प्रसिद्ध होते. काही अभ्यासकांचे असे मत आहे की शिवाजी महाराजांच्या १८ कारखान्यांपैकी दारूखाना हा पोर्तुगीज तोफखाना कासा द पोलबोरावर आधारलेला होता. शिवाजी महाराजांनी मुंबईजवळील चौलच्या वरील भागावर १६५७ साली विजय मिळवला. महाराजांनी १६५९ साली मराठा आरमाराचा पाया घातला. १६६७ साली महाराजांनी पोर्तुगीजांच्या बार्देश इलाख्यावर आक्रमण केले. १६७७ साली पोर्तुगीजांच्या दमन इलाख्याकडून चौथची मागणी केली. संभाजी महाराजांनी चौलला १६८३ साली वेढा घातला आणि पोर्तुगीजांना फोंड्याच्या लढाई मध्ये हरवले. राजाराम महाराज आणि महाराणी ताराबाई यांच्या कारकिर्दीतही पोर्तुगीज मराठ्यांच्या राजकीय संपर्कात वारंवार येत राहिले. त्यामुळे त्यांची कागदपत्रे मराठ्यांच्या इतिहास लेखनाला उपयोगी पडणे साहजिकच आहे.

ग्रांट डफने लिहिलेल्या 'हिस्ट्री ऑफ द मराठाज' मध्ये पोर्तुगीज कागदपत्रांचे अनेक संदर्भ दिले आहेत. प्रा. पांडुरंग पिसुर्लेकर यांनी मराठ्यांचा इतिहास लिहिण्यासाठी महत्वाची असलेली पोर्तुगीज भाषेतील साधने आपल्या 'मराठा-पोर्तुगीज रिलेशन्स' या ग्रंथामध्ये संकलित केली आहेत. शिवाजी महाराजांचे परकीय भाषेत चरित्र लिहिण्याचा पहिला मान एका पोर्तुगीज लेखकाकडे जातो. इ.स. १६७५ मध्ये 'कोस्मि द ग्वार्द' याने शिवाजी महाराजांचे पोर्तुगीज भाषेतून पहिले चरित्र लिहिले. इतिहासकार सुरेंद्रनाथ सेन यांनी संपादित केलेल्या 'फॉरेन बायोग्राफिज ऑफ शिवाजी' (शिवाजी महाराजांची परकीय लेखककृत चरित्रे) याग्रंथामध्ये कोस्मि द ग्वार्दने लिहिलेल्या चरित्राचा इंग्रजी अनुवाद छापला आहे.

लंडनमधील ईस्ट इंडिया कंपनीने फ्रेडरिक चार्ल्स डॅनवर्स नावाचा एक अभ्यासक लिस्बन आणि एव्होरा या पोर्तुगाल मधील शहरांमध्ये असलेली अभिलेखागारातील भारतासंबंधीची कागदपत्रे अभ्यासण्यासाठी पाठविला होता. डॅनवर्सने ह्या पुराभिलेखागारातील पोर्तुगीज भाषेत असलेल्या भारतासंबंधीत कागदपत्रांचा आढावा घेतला. डॅनवर्सच्या आढाव्यामुळे हे स्पष्ट झाले की मराठ्यांसंबंधी पोर्तुगीज भाषेत मोठ्या संख्येने कागदपत्रे उपलब्ध होती.

लिस्बनच्या प्रमुख दफ्तरखान्यास तोरीदु तोंबु (Torredo Tombo) असे म्हणतात. पोर्तुगीज कागदपत्रे गोवा, लिस्बन, एवोरा, आजुदा या ठिकाणच्या दफ्तरखान्यात मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत. पोर्तुगीज कागदपत्रांचे खालीलप्रमाणे वर्गीकरण केलेले आढळते:

१) **लीव्हरुश-दश-मॉंसोइश-दु-रैनु (राज्याची मान्सून पत्रके):** ही पत्रके पोर्तुगालहून गोव्यात पावसाळ्यात पोहचत असत म्हणून या संग्रहाला वरील प्रमाणे नाव दिले आहे. हा संग्रह लिस्बनच्या दफ्तरखान्यात आहे. या संग्रहातील १२ खंडांमध्ये शिवाजी महाराजांच्या संबंधित माहिती मिळते.

२) **लीव्हरुश-दश-रैश-विझीन्युश (सीमावर्ती राज्याची पत्रके):** भारतातील पोर्तुगीज वसाहतीच्या शेजारील राज्यांना पोर्तुगीज सरकारने पाठवलेल्या पत्रांचा हा संग्रह आहे. हा संग्रह शिवाजी महाराजांच्या इतिहासासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. शिवाजी महाराजांच्या काळापासून पोर्तुगीजांचे आणि मराठ्यांचे संबंध येऊ लागले. कधी त्यांच्यामध्ये मित्रत्वाचे नाते होते तर कधी शत्रुत्वाचे नाते होते. त्यामुळे ह्या संग्रहातील कागदपत्रे शिवाजी महाराजांच्या कार्यकर्तृत्वावर प्रकाश टाकतात.

३) **लीव्हरुश-दश-पाझेश-ई-त्रानादुश-दंव्दरीया (भारताच्या तहांची व करारांची पत्रके):** या संग्रहात भारतातील गोव्याच्या वसाहतीने शेजारील राज्यांशी वेळोवेळी केलेल्या तहांचे व करारांचे मसुदे आहेत.

४) **आसेंतुश-दश-काँसन्यूदु-इश्ता-दु (राज्य सल्लागार मंडळाची इतिवृत्ते):** यामध्ये हस्तलिखित कागदपत्रे आहेत, जी १६१८ ते १७५० या काळात झालेल्या भारतातील पोर्तुगीज सरकारच्या सभांची इतिवृत्ते आहेत.

५) **दुकुमे-तुश-आव्हूल-सुश-रालती-व्हुश-इंडिया (भारतविषयी सुटी कागदपत्रे):** लिस्बन दफ्तरखान्यात हा पत्र संग्रह आहे. यामध्ये शिवाजी महाराजांच्या संबंधित कागदपत्रे आहेत.

याशिवाय पांडुरंग पिसुर्लेकर यांनी पोर्तुगीज पुस्तकांचा अनुवाद केला आहे. त्यामध्ये पोर्तुगोझिश ई माराताश - भाग १ शिवाजी महाराज, भाग २ संभाजी महाराज, भाग ३ राजाराम महाराज. डॉ. बंग्रास परेरा यांनी पोर्वात्य पोर्तुगीज दफ्तर खंड १, भाग ३ ही कागदपत्रे संपादित केली आहेत. यामध्ये मराठ्यांचा इतिहास लिहिण्यासाठी उपयोगी ठरणाऱ्या ५०० कागदपत्रांचा अनुवाद आहे.

**महत्त्व :**

१) शिवाजी महाराजांचा इतिहास लिहिण्यासाठी पोर्तुगीज भाषेतील साधनांना महत्त्व आहे. शिवाजी महाराजांचे लष्कर व आरमाराचे कार्य व त्यांची परराष्ट्र नीती समजण्यासाठी पोर्तुगीज भाषेतील साधने अभ्यासणे गरजेचे ठरते.

२) पोर्तुगीज भाषेतील कागदपत्रे मराठ्यांच्या इतिहासाशी संबंधित खालील विषयांवर प्रकाश टाकतात :

(अ) पोर्तुगीज सरकारबरोबर शिवाजी महाराजांनी केलेले तह, (ब) चौथ (चौथाई) पद्धतीचा उगम, (क) शिवाजी महाराज व संभाजी महाराज यांच्या आरमाराने केलेल्या कारवाया, (ड) मराठ्यांचे आणि पोर्तुगीजांचे समुद्री प्रदेशावरील नियंत्रण.

३) छत्रपती संभाजी महाराजांनी जून १६८३ मध्ये पोर्तुगीज राज्यावर स्वारी केली होती. ह्या स्वारीचे वर्णन इतिहासकारांनी संभाजी महाराजांच्या आयुष्यातील पराक्रमाचे शिखर असे केले आहे. या पोर्तुगीज- मराठा संघर्षाची तपशीलवार माहिती पोर्तुगीज साधनांमध्ये मिळते. ह्या लढ्याची तारीखवार सविस्तर हकीकत फक्त ख्रिस्ती मिशनऱ्यांच्या संघाच्या (कंपनी) कचेरीतून तयार झालेल्या निनावी वृत्तांतातून उपलब्ध आहे. या लढाई संबंधी अस्सल पत्रव्यवहार गोव्यातील पणजी येथील अभिलेखागार व पोर्तुगालमधील लिस्बन येथील राष्ट्रीय अभिलेखागार व ग्रंथ संग्रहालय आणि अजुंदा येथील ग्रंथालय येथे उपलब्ध आहे.

**मर्यादा :**

१) बहुतेक पोर्तुगीज लोक मराठ्यांच्या बद्दल वांशिक दृष्ट्या पूर्वग्रह दूषित होते. यामुळे त्यांच्या कागदपत्रांमध्ये मराठ्यांना हीन दर्जा दिलेला आढळतो. पोर्तुगीज लोक मराठ्यांना हीन दर्जाचे समजत असल्यामुळे मराठ्यांचा समाज, संस्कृती व धर्माचे वर्णन करणे त्यांना गरजेचे वाटत

नसे. मराठा समाज, संस्कृती व धर्माबद्दल माहिती देणारी पोर्तुगीज कागदपत्रे क्वचितच आढळतात.

२) मराठ्यांच्या संबंधित पोर्तुगीज भाषेतील साधने हे लष्करी कारवाया व परराष्ट्र नीती या दोन विषयांपर्यंतच मर्यादित आहेत. मराठ्यांची संस्कृती, त्यांचे राहणीमान, त्यांचे सामाजिक व धार्मिक जीवन ह्या विषयांवर पोर्तुगीज भाषेतील साधने प्रकाश टाकत नाहीत.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - ३**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय भरा.**

१) ईस्ट इंडिया कंपनीचे मुख्यालय ........ येथे होते.

(अ) लंडन (ब) मुंबई (क) मद्रास (ड) सुरत

२) इंग्लिश फॅक्ट्रीज इन इंडिया (१६६१-१६६४) ह्या ग्रंथामध्ये ....... यांनी निवडक इंग्रजी साधने संकलित केली आहेत.

(अ) विलियम फॉस्टर (ब) इलियट आणि डावसन

(क) स्कॉट (ड) ग्रांट डफ

३) ......... याने १६६४ सालच्या शिवाजी महाराजांच्या सुरतवरील हल्ल्याचा वृत्तांत लिहिला आहे.

(अ) जॉन एस्केलीयॉट (ब) जॉन फ्रायर

(क) जॉर्ज रॉबिन्सन (ड) हेन्री ऑक्झन्डेन

४) शिवाजी महाराजांचे वर्णन ............ याने केले आहे.

(अ) जॉन एस्केलीयॉट (ब) जॉन फ्रायर

(क) जॉर्ज रॉबिन्सन (ड) हेन्री ऑक्झन्डेन

५) ........ याने आपल्या रोजनिशीत महाराजांच्या राज्याभिषेकाचा वृत्तांत लिहून ठेवला आहे.

(अ) जॉन एस्केलीयॉट (ब) जॉन फ्रायर

(क) जॉर्ज रॉबिन्सन (ड) हेन्री ऑक्झन्डेन

६) इ.स. ......... मध्ये शिवाजी महाराजांनी पोर्तुगीजांच्या बार्देश इलाख्यावर आक्रमण केले.

(अ) १६६१ (ब) १६६७ (क) १६६४ (ड) १६७४

७) ........ प्रमुख दफ्तरखान्यास 'तोरीदु-तोंबु' (Torredo Tombo) असे म्हणतात.

(अ) लिस्बन (ब) अजुदा (क) गोवा (ड) एवोरा

८) ......... यांनी मराठ्यांचा इतिहास लिहिण्यासाठी महत्वाची असलेली पोर्तुगीज भाषेतील साधने आपल्या 'मराठा-पोर्तुगीज रिलेशन्स' या ग्रंथामध्ये संकलित केली आहेत.

(अ) डॉ. बंग्रास परेरा (ब) प्रा. डॉ. पांडुरंग पिसुर्लेकर

(क) स. श. देसाई (ड) डॉ. अप्पासाहेब पवार

९) ........... कागदपत्रे गोवा, लिस्बन, एवोरा, आजुदा या ठिकाणच्या दफ्तरखान्यात मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहेत.

(अ) इंग्रजी (ब) फ्रेंच (क) पोर्तुगीज (ड) डच

१०) कोस्मि द ग्वार्द याने ........... यांचे चरित्र पोर्तुगीज भाषेतून लिहिले.

(अ) शिवाजी महाराज (ब) संभाजी महाराज

(क) राजाराम महाराज (ड) महाराणी ताराबाई

## १.३. पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१) अभिलेखागार : ज्या इमारतीमध्ये ऐतिहासिक कागदपत्रे जतन करून ठेवण्यात येतात.

२) चौथ (चौथाई) : मराठी राज्याच्या सतराव्या-अठराव्या शतकांतील उत्पन्नांच्या बाबींपैकी एक महत्वाची बाब होती. चौथ मुख्यतः मराठी राज्याबाहेर, छत्रपतींच्या स्वराज्या बाहेर - पण राज्याच्या छायेखाली असलेल्या प्रदेशांतून वसूल करीत. चौथाई एकंदर पूर्ण उत्पन्नाच्या एक चतुर्थांश भागा एवढी होती.

३) अन्वयार्थ : कागदपत्राचा अन्वयार्थ लावणे इतिहास संशोधन प्रक्रियेतील एक अंत्यंत महत्त्वाचा टप्पा असतो. एखादे स्थळ, काळ किंवा व्यक्तीच्या संदर्भात ऐतिहासिक साधनांच्या माध्यमातून माहीत झालेल्या ऐतिहासिक घटनांना किंवा व्यक्तीच्या जीवनाला स्पष्टीकरण देणे म्हणजेच अन्वयार्थ होय.

## १.४. स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न- १**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय भरा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) ब | २) ड | ३) अ | ४) अ | ५) अ |
| ६) क | ७) क | ८) ड | ९) ब | १०) क |

**स्वयं-अध्ययनासाठीप्रश्न- २**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय भरा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) क | २) क | ३) अ | ४) क | ५) अ |
| ६) क | ७) अ | ८) ब | ९) क | १०) अ |

**स्वयं-अध्ययनासाठीप्रश्न- ३**

**अ) रिकाम्या जागी योग्य पर्याय भरा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) अ | २) अ | ३) अ | ४) अ | ५) ड |
| ६)ब | ७) अ | ८) ब | ९) क | १०) अ |

## १.५. सारांश

इतिहासकार साधनांच्या आधारे इतिहास लिहितो. भूतकाळातील कोणतीही घटना किंवा व्यक्ति याबद्दल पूर्ण माहिती एकाच ऐतिहासिक साधनात सापडत नाही. इतिहासकाराला ही माहिती वेगवेगळ्या साधनांमधून गोळा करावी लागते. साधनांमधून मिळालेल्या माहिती व पुराव्यांच्या आधारे इतिहासकार भूतकाळाचा अन्वयार्थ लावत असतो. इतिहास लिहिण्यासाठी उपलब्ध असलेल्या प्रत्येक साधनाला जसे महत्त्व असते तशी मर्यादा देखील असते. साधनाची विश्वासार्हता व सत्यता तपासूनच इतिहासकाराने त्याचा वापर केला पाहिजे.

मराठा सत्तेच्या उदयाचा इतिहास लिहिण्यासाठी उपयुक्त असलेल्या प्रमुख साधनांची चर्चा आपण ह्या प्रकरणात केली आहे. त्यांचे महत्त्व आणि मर्यादा पाहिल्या आहेत. कवींद्र परमानंद यांनी रचलेले शिवभारत हे महाकाव्य व रामचंद्रपंत अमात्य यांनी मराठी भाषेतून लिहिलेले आज्ञापत्र शिवाजी महाराजांचे चरित्र समजण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे आहेत. मराठा सत्तेच्या स्थापनेच्या सुरवातीच्या काळात शिवाजी महाराजांनी केलेले पराक्रम व त्यांना आलेल्या अडचणी यावरही साधने प्रकाश टाकतात.

मुघल-मराठा संघर्षाचा इतिहास समजण्यासाठी शत्रू पक्षाची म्हणजेच मुघल सम्राट व सरदारांची मराठ्यांबद्दलची भूमिका जाणून घेणे महत्त्वाचे आहे. खाफीखान यांचा मुन्तखाब-उल-लुबाब व भीमसेन सक्सेना यांचा तारीख- ए-दिल्कुशा हे फारसी भाषेतील ग्रंथ आपल्याला शत्रू पक्षाच्या कंपूतील घटना व त्यांच्या भूमिकेबद्दल माहिती देतात. जरी ह्या लेखकांचा मराठ्यांबाबत काही प्रमाणात पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन असला तरी इतिहासकार आपल्या चिकित्सक बुद्धीचा वापर करून ह्या साधनातून मौलिक माहिती मिळवू शकतो.

इंग्रज व पोर्तुजीज लोक भारतामध्ये व्यापार करण्यासाठी आले होते. त्यांनी भारतामध्ये आपल्या वखारी स्थापन केल्या. पोर्तुगीजांनी तर १५१० सालीच गोवा येथे आपली राजकीय सत्ता स्थापन केली होती. वेगवेगळ्या कारणांमुळे त्यांचा मराठ्यांबरोबर संबध आला. त्यामुळे भारतातील इंग्रज व पोर्तुगीज अधिकाऱ्यांनी लंडन किंवा लिस्बनला पाठविलेल्या पत्रव्यवहारात मराठ्यांच्या संबंधी अनेक नोंदी आढळतात. इंग्रजी व पोर्तुगीज भाषेतील साधनांच्या मर्यादा लक्षात ठेवल्या तर ह्या साधनांतून बहुमोल अशी माहिती आणि पुरावे इतिहासकाराला मिळतात.

## १.६. सरावासाठी स्वाध्याय

१) मराठ्यांच्या इतिहासाचे साधन म्हणून शिवभारताचे महत्त्व आणि मर्यादा स्पष्ट करा.

२) मराठ्यांच्या इतिहासाचे साधन म्हणून आज्ञापत्राचे गुण सांगा.

३) खाफीखानाच्या मुन्तखाब-उल-लुबाब या ग्रंथाचे मराठ्यांचा इतिहास लिहिण्यासाठी महत्त्व व मर्यादा सांगा.

४) मराठ्यांच्या इतिहासाचे साधन म्हणून भीमसेन सक्सेना यांच्या तारीख- ए- दिल्कुशाचे महत्त्व सांगा.

५) मराठ्यांचा इतिहास लिहिण्यासाठी इंग्रजी साधनांचे महत्त्व स्पष्ट करा.

६) मराठ्यांचा इतिहास लिहिण्यासाठी उपलब्ध असलेल्या पोर्तुगीज साधनांचा आढावा घ्या.

७) मराठ्यांच्या इतिहास लेखनास आवश्यक पोर्तुगीज साधनांचे महत्त्व विशद करा.

## १.७ संदर्भग्रंथ

१. स. म. दिवेकर (संपादक), कवींद्र परमानंद कृत शिवभारत, भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे, १९२७.

२. डॉ. जयसिंगराव पवार (संपादक), छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ, कोल्हापूर, २००९.

३. कुलकर्णी अ. रा., आज्ञापत्र, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००७.

४. कुलकर्णी श्री. रं., शिवकालीन राजनीती आणि रणनीती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९९४.

५. डॉ. फाळके केदार, शिवराजनीती, स्नेहल प्रकाशन, पुणे.

६. Khafi Khan, Muhammad Hashim. Muntakhab-ul-Lubab in The History of India as Told by Its Own Historians, Vol. 7, Elliot and Dowson (eds.), Second Edition, Calcutta, 1952

७. English Records on Shivaji (1659 - 1682), Shiva Charitra Karyalaya, Poona, 1931

८. Surendra Nath Sen, Siva Chhatrapati : Being a Translation of Sabhasad Bakhar with Extracts from Chitnis and Sivadigvijya, with Notes. Calcutta, 1920.

९. Mohibbul Hasan (ed.), Historians of Medieval India, Meerut, 1968.

१०. Patwardhan, R.P., and H.G. Rawlinson, Source Book of Maratha History: To the Death of Shivaji, Vol. I, Bombay, 1929

११. Frederick Charles Danvers, Report to the Secretary of State for India in Council on the Portuguese Records Relating to the East Indies, contained in the Archivo Da Torre Do Tombo, and the Public Libraries at Lisbon and Evora, London, 1892.

१२. S. P. Sen, Portuguese Records Relating to Maratha History, S.P. Sen (ed), Sources for Indian History, Vol. I, Calcutta, 1978, pp. 387-422

१३. Jadunath Sarkar, Studies in Mughal India, Calcutta, 1919.

१४. Surendranath Sen, Studies in Indian History: Historical Records at Goa, Asian Educational Services, 1930.

१५. सेतु माधवराव पगडी, मराठ्यांचे स्वातंत्र्य युद्ध (खाफीखानाचा साधन ग्रंथ), पुणे,१९६२.

१६. सेतु माधवराव पगडी, मोगल आणि मराठे (तारीखे दिल्कुशा). पहिली आवृत्ती, पुणे, १९६३.

१७. रघुनाथ विनायक हेरवाडकर, मराठी बखर, पुणे, १९७५.

१८. Prachi Deshpande, Creative Pasts: Historical Memory and Identity in Western India, 1700-1960, Columbia University Press, 2007.

१९. M.N. Pearson, Coastal Western India: Studies from Portuguese Records, New Delhi, 1981.

❋❋❋

# सत्र २ : घटक १

# राजनीती

## (Politics)


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ मुलकी प्रशासन

१.२.२ शिवकालीन न्याय प्रशासन

१.२.३ लष्करी प्रशासन

१.३ पारिभाषिक शब्द

१.४ स्वयं - अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी ग्रंथ


## १.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अध्ययनानंतर आपल्याला

- शिवकालीन मुलकी प्रशासनाशी संबंधित विविध व्यवस्थांच्या रचनेची आणि प्रशासनाच्या विविध वैशिष्ट्यांची माहिती होईल.
- शिवाजीराजांनी निर्माण केलेल्या अष्टप्रधान मंडळाच्या वेगळेपणाची व वैशिष्ट्यांची माहिती होईल.
- शिवकालीन न्याय संरचना, विविध पातळीवरील न्यायव्यवस्था आणि न्यायदानाच्या पद्धती, दिव्यांचे प्रकार याची माहिती मिळेल.

- शिवाजीराजांनी गड - कोट - किल्ल्यांना दिलेले महत्व आणि स्वराज्य कार्यासाठी त्यांचा करून घेतलेला उपयोग याची माहिती होईल.
- शिवाजीराजांनी किल्ले आणि आरमाराच्या व्यवस्थापनासाठी निर्माण केलेल्या वैशिष्ट्यपूर्ण प्रशासन व्यवस्थेची माहिती होईल.
- शिवाजीराजांच्या प्रजेसाठी असणाऱ्या कल्याणकारी दृष्टिकोनाची माहिती होईल.

## १.१ प्रास्ताविक

शहाजीराजांना पुणे, सुपे, बारामती आणि इंदापूर हे परगणे जहागिरी म्हणून मिळाले. हा सर्व भाग विजापूरच्या आदिलशहाच्या ताब्यात होता. शिवपूर्व काळात सततची युद्धे, लूटमार यामुळे हा भाग उध्वस्त होऊन बरीचशी रयत परागंदा झाली होती. शांतता- सुव्यवस्थेचा पूर्ण अभाव असलेल्या या भागात जणू अराजकाची परिस्थिती निर्माण झालेली होती. अशा अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत शिवाजी महाराजांनी या भागातूनच स्वराज्य स्थापनेच्या कार्याला सुरवात केली. अनेक राजकीय आव्हाने त्यांच्यासमोर होती. त्याचबरोबर या विस्तृत प्रदेशात चांगली प्रशासकीय व्यवस्था निर्माण करणे हे एक मोठे आव्हान होते. केवळ राजकीयदृष्ट्या स्वराज्य विस्तार करणे इतकेच ध्येय न ठेवता अंतर्गतदृष्ट्या भरभक्कम कसे होईल याकडेही त्यांनी लक्ष दिले. तत्कालीन परिस्थितीला योग्य अशी प्रशासन व्यवस्था त्यांनी निर्माण केली. या व्यवस्थेतील काही गोष्टी नव्या होत्या तर काही परंपरेने चालत होत्या. या व्यवस्था निर्माण करताना स्वराज्याची गरज, प्रथा - परंपरा, जाती वैशिष्ट्ये, वतनदारी - जहागिरी पद्धतीतील गुण दोष या सर्वांचा विचार त्यांनी केला. त्याचबरोबर सर्वसामान्यांची मदतही घेतली. यामुळेच आजूबाजूला सर्वत्र शत्रू असतांनाही स्वराज्य कार्य व्यवस्थित सुरू राहिले आणि पुढे ते अनेक वर्षे टिकले. शिवाजी राजांना विविध मोहिमामूळे स्वराज्यापासून दूर जावे लागे पण त्यांच्या अनुपस्थितीतही प्रशासन अगदी व्यवस्थितपणे चालत असे.

**शिवाजी महाराजांच्या राज्याचा विस्तार आणि प्रशासन विभागणी -**

१) पोर्तुगीज, सिद्दी आणि ब्रिटीशांच्या ताब्यातील प्रदेश सोडला तर कोकण किनारपट्टीवर महाराजांचा ताबा होता. यात रामनगर ते दक्षिणेकडील बेदनूर पर्यंतच्या प्रदेशाचा समावेश होता.

२) स्वराज्याची उत्तर भागातील सीमा ही बागलाण प्रांतापर्यंत होती. तेथून नाशिक, पुणे जिल्ह्याचा भाग,सातारा, कोल्हापूर इ. प्रदेशाबरोबर कारवार पर्यंतचा प्रदेश यात समाविष्ट होता.

३) कर्नाटक भागातील बेळगांव, कोप्पल, बेल्लारी, चित्तूर, बेंगलोर इ. प्रदेश यात समाविष्ट होता.

४) मद्रास भागातील बेल्लोर, जिंजी, पाँडेचरी, नेगापट्टम, तंजावरचा काही प्रदेश यामध्ये समाविष्ट होता.

स्वराज्यात समाविष्ट असलेल्या या प्रदेशाचे विभाजन चार मोठ्या विभागात केलेले होते. याला सरसुभा असे म्हटले जात होते. त्यावर सरसुभेदाराची नियुक्ती केलेली होती.

१) मोरोपंत पिंगळेंच्या नेतृत्वाखाली उत्तर कोकण ते साल्हेर- मुल्हेर पर्यंतचा प्रदेश

२) दत्ताजी वाकणीस यांच्या नेतृत्वाखाली पुणे ते कर्नाटकातील धारवाड - कोप्पल पर्यंतचा प्रदेश

३) अण्णाजी दत्तोच्या नेतृत्वाखाली दक्षिण कोकण ते कारवार - बेदनूर पर्यंतचा प्रदेश

४) हरजी महाडीकच्या नेतृत्वाखाली म्हैसूर त्याचप्रमाणे तामिळनाडूतला प्रदेश

या सरसुभ्याचे विभाजन सुभ्यात, सुभ्याचे परगण्यात, परगण्याचे महालात केले. प्रशासनाच्या या उतरंडीत खेडे हा शेवटचा व लहान घटक होता. विविध अधिकार्यांच्या मदतीने या विभागाचा कारभार पाहिला जात होता.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ मुलकी प्रशासन (Civil administration)

शिवाजी महाराजांनी छोट्याशा जहागिरीचे स्वतंत्र राज्यात रूपांतर केले. समकालीन इतर सत्तांच्या तुलनेत हे राज्य जरी विस्ताराने लहान असले तरी आजूबाजूच्या बलाढ्य शत्रूना पुरून उरले. यामागचे सर्वात महत्वाचे कारण म्हणजे शिवाजी महाराजांनी निर्माण केलेली भक्कम प्रशासन व्यवस्था. राजसत्ताक शासन पद्धत असलेल्या या राज्याचे अंतिम प्रमुख शिवाजी महाराज होते. त्यांनी त्यांच्या मदतीसाठी इतर व्यवस्था निर्माण केल्या.

### अ) मुलकी प्रशासकीय रचना (Administrative structure)

शिवकालीन मुलकी प्रशासनाचा महत्वाचा भाग म्हणून आपल्याला केंद्रीय प्रशासन व्यवस्थेचा उल्लेख करावा लागतो.

**१) शिवकालीन केंद्रीय प्रशासन व्यवस्था** - शिवकालीन केंद्रीय प्रशासनाची पुढीलप्रमाणे उतरंड होती.

राजा

⇩

अष्टप्रधान मंडळ

कारकून (कचेरी )

### २) स्वराज्यातील छत्रपतींचे स्थान :

राज्यकारभाराचा कणा असे छत्रपतींचे राज्यकारभारातील स्थानाचे वर्णन करावे लागते. राज्याचा त्याचप्रमाणे सर्व व्यवस्थांचा प्रमुख हा राजाच असे. थोडक्यात मध्ययुगात सर्वत्र असलेली संकल्पना ती म्हणजे अनियंत्रित राजसत्ता येथेही होती. मात्र शिवाजी महाराजांच्या विचारामुळे आणि कार्यकर्तृत्वामुळे ती कल्याणकारी राज्यसत्ता ठरली. प्रजेचे पालनपोषण, संरक्षण, उत्तम प्रशासन या सर्व कर्तव्याचे पालन राजांनी केले. राज्याभिषेकाच्यावेळी त्यांनी छत्रपती ही बिरुदावली धारण केली. राज्याच्या सर्व विभागात त्यांची अंतिम सत्ता होती किंवा अंतिम निर्णय हे त्यांच्या हातात एकवटलेले होते. राजा या नात्याने ते कायदे करत. त्याचे पालन करवून घेत. त्याचप्रमाणे कायदे मोडणाऱ्यांना शिक्षाही देत. मदतीसाठी राज्यकारभारातील विविध पदे त्यांनीच निर्माण केली होती. पदावर कुणाची नियुक्ती करायची किंवा काढून टाकायचे हे स्वतः ठरवत होते. कोणाचाही सल्ला त्यांच्यावर बंधनकारक नव्हता. थोडक्यात त्यांची सत्ता निरंकुश होती पण इतिहासाचा आढावा घेतला तर शिवाजी महाराज कधीही निरंकुशपणे वागले किंवा त्यांनी मनमानी कारभार केला असे आढळत नाही. याउलट निर्णयप्रक्रियेत त्यांचे महत्वाचे अधिकारी सहभागी असतील याची काळजी त्यांनी घेतली. स्वतःवर नैतिक बंधने घालून घेत त्यांनी राजधर्माचे पालन केले, जे आदर्शवत होते.

### ३) कानुजाबता :

शिवाजी महाराजांनी राज्याभिषेक करवून घेतला त्यामुळे राज्याला घटनात्मक स्वरूप प्राप्त झाले. त्याचप्रमाणे कानुजाबता तयार करून विविध खाती - अधिकारी यांची कार्यक्षेत्रे निश्चित केली. कानुजाबता म्हणजे शिवकालीन मराठी राज्याची घटनाच होती. यात अष्टप्रधान, त्यांच्या हाताखाली काम करणारे विविध दर्जाचे अधिकारी, कारखाने - महाल (विविध विभाग), त्यांची कर्तव्ये यांचा प्रामुख्याने समावेश होता. कानुजाबत्यामुळे स्वराज्याचा राज्यकारभार हा त्यावेळच्या इस्लामिक सत्तांपेक्षा वेगळा आहे हे सिद्ध झाले. महाराजांनी याचबरोबर रघुनाथपंत हणमंते यांच्याकडून राज्यव्यवहारकोशही तयार करून घेतला आणि विविध पदांना प्रचलित असलेली फारशी (पर्शियन) नावे बदलून संस्कृत नावे दिली.

### ४) अष्टप्रधान मंडळ (Ashtapradhan) :

केंद्रीय नागरी प्रशासन अधिकाधिक कार्यक्षम बनावे यासाठी शिवाजी महाराजांनी ज्या व्यवस्था निर्माण केल्या त्यापैकी एक महत्वाची व्यवस्था म्हणून अष्टप्रधान मंडळाचे नाव घ्यावे लागते. अष्टप्रधान मंडळाची पद्धती शिवाजी महाराजांनी नेमकी कोणापासून घेतली याबद्दल मतभेद आहेत. काही इतिहासकारांच्या मते तत्कालीन समाजात लोकप्रिय असलेल्या रामायण, महाभारत, मनुस्मृती, शुक्रनीती यातून महाराजांना प्रेरणा मिळाली असावी. विशेषतः शुक्रनीतीमध्ये मंत्री, त्यांची कर्तव्ये याची चर्चा विस्ताराने केली आहे, त्याचा प्रभाव शिवाजी महाराजांवर असावा.

अष्टप्रधान मंडळ हे शिवाजी महाराजांच्या केंद्रीय प्रशासनातील महत्वाचे अंग होते. त्याची निर्मिती शिवाजी महाराज जेंव्हा माता जिजाबाईंसोबत पुणे जहागिरीत आले तेंव्हाच झाली होती. शहाजीराजांनी

त्यांच्या मदतीसाठी काही मंत्री दिले होते. पुण्यात आल्यानंतर गरजेनुसार त्यांनी मंत्र्यांच्या नेमणूका केल्या. स्वराज्याचा विस्तार होत गेला तशी संख्याही वाढत गेली. राज्याभिषेकाच्या वेळी या मंत्रिमंडळाला अधिकृत स्वरूप प्राप्त झाले. या पदांची सुरवातीची नावे फारशी भाषेत होती. महाराजांनी ती नावे बदलून संस्कृत नावे दिली. या प्रधान मंडळातील मंत्र्यांची संख्या आठ होती म्हणून अष्टप्रधान हे नाव पडले. राज्याभिषेकाच्या वेळी असलेले अष्टप्रधान मंडळ पुढीलप्रमाणे (पदांच्या नांवापुढे कंसात दिलेली नांवे फारसी भाषेतील आहेत).

१) मुख्य प्रधान (पेशवा) : मोरोपंत त्र्यंबक पिंगळे

२) अमात्य (मुजुमदार) : नारो निळकंठ आणि रामचंद्र निळकंठ

३) सेनापती (सरलष्कर) : हंबीरराव मोहिते

४) सचिव (सुरनीस) : आण्णाजी दत्तो

५) मंत्री (वाकनीस) : दत्ताजी त्र्यंबक

६) पंडितराव (दानाध्यक्ष) : रघुनाथ पंडितराव

७) सुमंत (डबीर) : रामचंद्र त्र्यंबक

८) न्यायाधीश : निराजी रावजी

**ब) अष्टप्रधानमंडळातील मंत्र्यांची कर्तव्ये पुढीलप्रमाणे :**

**१) मुख्य प्रधान (पेशवा) :**

प्रधान मंडळातील सर्वात महत्वाचे पद होय. सर्व राजपत्रांवर शिक्का करणे, युद्ध करणे, शत्रूचा पराभव करून नवीन प्रदेश मिळविणे, नेमून दिलेल्या प्रदेशाचा बंदोबस्त ठेवणे, राजाची व राज्याची निस्वार्थपणे सेवा करणे, मुख्य प्रधान या नात्याने इतर प्रधानांना सांभाळून घेणे ही मुख्य प्रधानाची कामे होती. मुख्य प्रधानाला वर्षाला पंधरा हजार होन इतका पगार दिला जात होता.

**२) अमात्य ( मुजुमदार ) :**

राज्याच्या सर्व आर्थिक बाबीकडे लक्ष पुरविणे, राज्याचा जमा खर्च ठेवणे, आर्थिक हिशेब करवून घेणे, इतर महत्वाची पत्रके आणि राजांची आज्ञापत्रे यावर संमती मुद्रा करणे, वेळप्रसंगी युद्धावर जाणे, छत्रपतींनी दिलेल्या इतर जबाबदाऱ्या सांभाळणे. अमात्याला वर्षाला बारा हजार होन इतका पगार दिला जात होता.

### ३) सेनापती (सरलष्कर ) :

लष्कराची सर्व देखरेख करणे, स्वराज्याचे संरक्षण करणे, लष्कराचा प्रमुख या नात्याने सैनिकांच्या पगाराची व्यवस्था पाहणे, कर्तबगार व पराक्रमी सैनिकांचा गौरव करणे, नवीन प्रदेश जिंकून घेणे, युद्धा वेळच्या लुटीचा हिशेब देणे, जिंकलेल्या प्रदेशाच्या संरक्षणाची व्यवस्था करणे. इ. लष्कराच्या संदर्भातील कामे सेनापतीकडे होती. सेनापतीला दहा हजार होन इतका वर्षाला पगार दिला जात होता.

### ४) सचिव (सुरनीस ) :

छत्रपतींचा व एकूण राज्याचा पत्रव्यवहार पाहणे, राजपत्र स्वतः काळजीपूर्वक वाचणे व त्यातील मजकूर तपासून पाहणे, वेळ प्रसंगी युद्धावर जाणे, नवीन प्रदेशाचा कारभार पाहणे, राजपत्रावर संमत चिन्ह करणे, सरकारी दफ्तरांची नीट व्यवस्था ठेवणे, महाल - परगण्याचा हिशेब तपासून संमत करणे. सचिवाच्या मदतीला अनेक कारकून होते त्यांच्याशिवाय कोणताही पत्रव्यवहार होत नव्हता. सचिवाला वर्षाला दहा हजार होन इतका पगार होता.

### ५) मंत्री ( वाकनीस ) :

राज्यातील अनेक जबाबदाऱ्या मंत्र्याला सांभाळाव्या लागत होत्या. राजनैतिक दैनंदिन घडामोडी, राजदरबारात येणाऱ्या पाहुण्यांचे स्वागत, हेर व्यवस्थेवर देखरेख करणे, छत्रपतींची दैनंदिन व्यवस्था पाहणे, छत्रपतींच्या भोजनाची व्यवस्था पाहणे, अन्न पदार्थ तपासणे, प्रसंगी लष्कराचे नेतृत्व करणे आणि नेमून दिलेल्या प्रदेशाचा कारभार पाहणे. मंत्र्यांच्या मदतीला हेरखात्यातील गुप्तहेर असत. राजांना भेटायला येणाऱ्या लोकांवर ते नजर ठेवत. मंत्र्याला वर्षाला दहा हजार होन इतका पगार होता.

### ६) पंडितराव ( दानाध्यक्ष ) :

धार्मिक बाबतीत निर्णय देण्याचे काम पंडितरावांकडे होते. राज्यातील सर्व धार्मिक कृत्ये करणे, अनुष्ठान करणे, रूढी परंपरा आचार व्यवहार याबाबतच्या राजपत्रावर संमत चिन्ह करणे, छत्रपतीनी स्वतः करावयाचे दानधर्म, शांती अनुष्ठान यांचे आयोजन करणे, धर्म - अधर्म, रूढी - परंपरा पाहून प्रायश्चिताच्या पत्रावर संमत चिन्ह करणे, विद्वान - ब्राह्मण यांचा यथायोग्य सन्मान करणे इ. जबाबदारी पंडितरावांकडे होती. पंडितरावांना वर्षाला दहा हजार होन इतका पगार होता.

### ७) सुमंत (डबीर) :

परराष्ट्र व्यवहाराची कामे पाहणे, परराज्यातील व्यवहार ठेवणे, परराज्यातून आलेल्या व्यक्तीचे स्वागत करणे आणि त्यांची व्यवस्था पाहणे, परराज्याची सर्व माहिती मिळवून ती छत्रपतींना सादर करणे, परराज्यांशी संबंध प्रस्थापित करणे, परराज्यात आपल्या राज्याचा दर्जा व प्रतिष्ठा वाढविणे, वेळप्रसंगी सैन्याचे नेतृत्व करून युद्धावर जाणे, राजपत्रावर संमत चिन्ह उठविणे. सुमंतला वर्षाला दहा हजार होन इतका पगार होता.

## ८) न्यायाधीश :

सर्व प्रकारच्या खटल्यांवर न्यायधीशांचा अधिकार असे. दिवाणी आणि फौजदारी अशा दोन्ही प्रकारच्या खटल्यातील न्यायदानाचे कामकाज व्यवस्थित चालले आहे का नाही हे पाहणे, गोतसभेने किंवा सरकारी अधिकाऱ्यांनी दिलेला न्यायनिवाडा मान्य नसल्याचा राजदरबारी अर्ज आल्यास अशा खटल्यांचा निवाडा करणे, ब्रम्हसभेकडून होणाऱ्या न्यायदानावर लक्ष ठेवणे, जमिनीचे हक्क, ग्राहकांचे हक्क इत्यादी न्यायनिवाडे करणे, याशिवाय राज्यातील न्याय-अन्यायाच्या बाबी तपासून पाहणे आणि त्याचे निवेदन छत्रपतीना करणे ही कामेही न्यायाधीश करत असे. न्यायाधीशाला वर्षाला दहा हजार होन पगार होता.

प्रत्येक प्रधानाला त्याचे कामकाज योग्य रीतीने पार पाडण्यासाठी आठ कारकून दिले होते ते पुढील प्रमाणे

१) दिवाण २) मुजुमदार - हिशेब तपासणीस ३) फडणीस - महसुलाचा हिशोब ठेवणारा ४) सबनीस - दप्तरदार ५) कारखानीस - पुरवठा अधिकारी ६) चिटणीस ७) जामदार - खजिनदार ८) पोतनीस - नाणेतज्ज्ञ

## क) अष्टप्रधान मंडळ पद्धतीची वैशिष्ट्ये :

शिवाजी महाराजांनी अत्यंत उत्कृष्ट अशी प्रशासन व्यवस्था निर्माण केली. अष्टप्रधान मंडळ व्यवस्थेचा सर्वात महत्त्वाचा भाग होते. परंपरागत अनेक गोष्टींना फाटा देत नवे नियम किंवा नवीन पद्धती त्यांनी आणली. यामुळे प्रधानमंडळाची कार्यक्षमता खूप वाढली. या पद्धतीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १. वंशपरंपरागत पदे देण्याची पद्धत बंद :

या कालखंडात भारतातील इतर सत्ताधिशांकडून दरबारातील पदे सरदारांना वंशपरंपरागत दिली जात असत. मात्र महाराजांनी ही पद्धत बंद करून कर्तबगारी बघून या पदावर नियुक्त्या केल्या. प्रधानांनाही याची जाणीव होती की आपण कर्तृत्व सिद्ध केले तरच आपल्याकडे हे पद राहील. सेनापती प्रतापराव गुर्जर यांच्या मृत्यूनंतर त्यांच्या मुलाला हे पद न देता हंबीरराव मोहिते यांना दिले.

### २. अधिकाऱ्यांची निवड स्वतः महाराजांकडून :

अष्टप्रधानमंडळातील सर्व प्रधान त्याचप्रमाणे त्यांच्या मदतीला दिले जाणारे सर्व अधिकारी यांची निवड स्वतः महाराज करत. त्या त्या पदावर योग्य व्यक्ती येतील याची काळजी त्यांनी घेतली आणि त्यामुळेच प्रशासन भक्कम बनले.

### ३. अकार्यक्षम प्रधानांना काढून टाकण्याचे धोरण :

कामात कुचराई करणाऱ्या किंवा गैरवर्तन करणाऱ्या प्रधानांचा कुठलाही मुलाहिजा न बाळगता पदावरून दूर केले. तुकोजी चोर, माणकोजी दहातोंडे, नेताजी पालकर या सेनापतींना महाराजांनी पदावरून काढून टाकले. कार्यक्षमता हा एकच निकष या पदावर राहण्यासाठी होता.

### ४. रोख वेतन देण्याची पद्धत :

दरबारात काम करणाऱ्या विविध अधिकाऱ्यांना त्यांच्या दर्जाप्रमाणे जहागिर किंवा वतन देण्याची पद्धत मध्ययुगीन भारतात रूढ होती. मात्र महाराजांनी या पद्धतीला फाटा दिला, कारण एखादा जहागिरदार शिरजोर बनून राजा विरोधात बंडखोरी करू शकतो, याची जाणीव राजांना होती म्हणूनच त्यांनी वतनांऐवजी रोख पगार द्यायला सुरुवात केली. त्यामुळे या सर्वांवर राजांचे थेट नियंत्रण प्रस्थापित झाले. दिले जाणारे वेतन पुरेसे असेल याची काळजी महाराजांनी घेतली. पुढे राजाराम महाराजांच्या काळात वतने देण्याची पद्धत पुन्हा सुरू झाली.

### ५. खात्याच्या कारभाराबरोबरच लष्करी जबाबदारी :

अष्टप्रधान मंडळातील न्यायाधीश व पंडितराव ही पदे वगळली तर उर्वरित सर्व प्रधानांना वेळप्रसंगी लष्करी मोहीमेचे नेतृत्व करावे लागे. म्हणजेच या पदांवर काम करणाऱ्या व्यक्ती या अंतर्गत प्रशासनाबरोबरच लष्करी नेतृत्व करण्यात किंवा युद्धात निपुण ही असावी याकडे महाराजांनी लक्ष दिले.

### ६. जाती वैशिष्ट्यांचा वापर :

शिवाजी महाराजांनी प्रशासनात जाती वैशिष्ट्यांचा अचूक वापर करून घेतला. या कालखंडात शिक्षण घेण्याचा अधिकार असलेला समाज म्हणून ब्राह्मणांचा उल्लेख करावा लागतो. सर्व शास्त्रांचे, विविध विद्येचे ज्ञान असणाऱ्या या वर्गाचा, महाराजांनी प्रशासन अधिकाधिक कार्यक्षम बनविण्यासाठी उपयोग करून घेतला. प्रधान मंडळातील सेनापती व्यतिरिक्त इतर सात प्रधान हे ब्राह्मण जातीतले होते तर सेनापती हे पद मराठा जातीतील व्यक्तीला दिले होते. मात्र सर्वांसाठी घालून दिलेले नीतिनियम सारखेच होते.

### ७. प्रधानांवर प्रदेशाचा कारभार पाहण्याची जबाबदारी :

राज्यकारभाराच्या सोयीसाठी महाराजांनी स्वराज्याचे चार भाग पाडले होते. यापैकी महाराष्ट्र भागात असलेल्या तीन भागांवर अण्णाजी दत्तो, मोरोपंत पेशवे, दत्ताजीपंत वाकणीस यांची सरसुभेदार म्हणून नियुक्ती केली तर तामिळनाडू किनाऱ्यावरील प्रदेश हरजी महाडीक या प्रधानमंडळात नसलेल्या सरसुभेदारावर सोपवली होती. या प्रधानांना नेमून दिलेल्या मुलखाचा कारभारही पाहावा लागे. त्या त्या भागातील गडकोट किल्ल्यांची व्यवस्था ठेवणे, त्याचबरोबर प्रांताचा हिशोब ठेवून तो राजाला सादर करावा लागे.

### ८. राज्यकारभारातील निर्णयांची संयुक्त जबाबदारी :

प्रशासन सांभाळताना जी महत्त्वाची पत्रे तयार होत, उदाहरणार्थ तह, करार, खटल्याची निकालपत्रे, यावर प्रधान, अमात्य, सचिव, मंत्री, सुमंत यांना आपआपली मुद्रा उठवावी लागे. घेतलेला हा निर्णय प्रधानांनी बघावा, त्यात कोणतीही चूक राहू नये, घेतलेल्या निर्णयाची जबाबदारी प्रधानांवरही राहावी हा त्यामागचा हेतू होता.

### ९. अष्टप्रधान मंडळाचा सल्ला राजांवर बंधनकारक नव्हता :

शिवाजी महाराजांनी राज्यकारभार सुरळीत चालावा यासाठी ही प्रधान मंडळाची निर्मिती केली होती. हे प्रधान प्रसंगी राजांना सल्ला देण्याचे कामही करत, मात्र हा सल्ला राजांवर बंधनकारक नव्हता. असे जरी असले तरी राजांनी मनमानी कारभार केला असे कधी झाले नाही.

### १०. प्रधानांची बदलती संख्या :

अष्टप्रधान असे जरी नाव असले तरी संख्या कमी जास्त झालेली दिसते. एका पदावर दोन व्यक्तींनी काम केलेले होते. ( नारो निळकंठ आणि रामचंद्र निळकंठ ) राजाराम महाराजांनी प्रतिनिधी हे आणखीन एक पद निर्माण केले होते.

अष्टप्रधानांवर विविध प्रकारच्या जबाबदाऱ्या असल्या तरी अंतिम निर्णय हा शिवाजी महाराजांकडून घेतला जात असे. अष्टप्रधानांचे अस्तित्वच महाराजांच्या इच्छेवर अवलंबून होते. या पदांवर योग्य व्यक्ती येतील, चांगले कार्य त्यांच्याकडून होईल याकडे त्यांनी लक्ष दिले. यामुळेच शिवकालीन प्रशासनाचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणून अष्टप्रधान पद्धतीकडे पाहावे लागते.

### छत्रपतींना मदत करणारे कारकून (कारकून कचेरी) :

छत्रपतींच्या दिमतीला असणारा चिटणीसही खास दर्जाचा असे. अत्यंत विश्वासू व्यक्तीला या पदावर नेमले जाई. राजपत्रे लिहिणे, ती तपासणे, दुरुस्त करणे अशी कामे चिटणीस करत असे. तर वतनपत्रे, दानपत्रे, इनामपत्रे तयार करण्याचे कार्य फडणीस किंवा फडणवीस या अधिकाऱ्याकडे असे. गडणीस हा अधिकारी किल्लेदारांशी होणारा पत्रव्यवहार सांभाळत असे. या पदावरही लायक व्यक्ती येतील याची काळजी महाराजांनी घेतली. थोडक्यात राजांचे हे सचिवालय होते. बाळाजी आवजी या चिटणीसास त्याच्या बुद्धिमत्तेमुळे महाराजांनी प्रधान मंडळातील पद देवू केले होते. मात्र त्याने ते नाकारले. या कारकूनांची नियुक्तीही महाराज स्वत: करत असत.

### कारखाने व महाल :

स्वराज्याचे प्रशासन सुरळीत चालावे म्हणून सर्व कामाचे विभाजन अठरा विभागात केले होते. प्रत्येक विभागाच्या कार्याला त्याच्या विभागाचा मंत्री जबाबदार असे. या अठरा भागांना अठरा कारखाने

म्हटले आहे, तसेच प्रशासनाचे विभाग पाडून त्यांना महाल असे नाव देण्यात आले होते. हे अठरा कारखाने आणि बारा महाल अष्टप्रधान मंत्रिमंडळाच्या देखरेखीखाली होते.

**अठरा कारखाने (खाती ) :**

१) खजिना (रोख रक्कम), २) जवाहीरखाना (हिरे, माणिक इ. जड-जवाहीर ठेवणे), ३) अंबरखाना (धान्याचे गोदाम), ४) आबदारखाना (जलस्थान), ५) नगारखाना (नगारे ठेवणे, वाजविणे), ६) तालीमखाना ( व्यायामशाळा ) ७) जामदारखाना (किल्ल्यावरील जड-जवाहीर ठेवण्याचे ठिकाण ), ८) जिरातेखाना (शस्त्रालय), ९) मुदपाकखाना (स्वयंपाक घर), १०) शरबतखाना (दवाखाना), ११) शिकारखाना (खेळ, शिकार आणि इतर मनोरंजनाची साधने ठेवण्याचे ठिकाण), १२) दारुखाना (दारूगोळा ठेवण्याचे ठिकाण), १३) शहतखाना (आरोग्यगृह, औषधीशाळा), १४) पिलखाना (हत्ती शाळा), १५) फरासखाना (राहुटया, तंबू ठेवण्याची जागा), १६) उष्टरखाना (उंट शाळा), १७) तोफखाना (तोफदळ), १८) दफ्तरखाना (कागदपत्रे ठेवण्याची जागा).

**बारा महाल :**

१) पोते (कोषागार), २) भट्टी (गोशाळा), ३) सेरी (आरामशाळा, खाजगी विहार बाग), ४) वहिली (रथशाळा), ५) कोठी (धान्याचे कोठार), ६) सौदागीर (व्यापारी माल ठेवण्याचे ठिकाण), ७) टांकसाळ (नाणी पाडण्याचे ठिकाण), ८) दरुणी (अंत:पुर, राणीवसा), ९) पागा (अश्वशाळा), १०) इमारत (शिल्पशाळा), ११) पालखी (पालखी), १२) छबिना (पहारा, रात्र रक्षक)

**स्वयं - अध्ययनासाठी प्रश्न १**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. कोणत्या दोन प्रधानांवर लष्करी जबाबदारी नसे ?

२. राज्याभिषेकाच्यावेळी मुख्य प्रधानपदी कोण होते ?

३. सेनापती कोणत्या जातीतला नेमला जाई ?

४. प्रशासनातील अधिकाऱ्याची निवड कोण करत असे ?

५. छत्रपती राजाराम महाराजांना कोणती पद्धत पुन्हा सुरू करावी लागली ?

**ब) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१. अष्टप्रधान मंडळाच्या निर्मितीला ................ यांच्या कालखंडात सुरवात झाली.

अ) तुळाजी ब) शहाजीराजे क) मालोजीराजे ड) सरफोजी

२. शिवराज्याभिषेकाच्यावेळी ................ हे सेनापतीपदी होते.

अ) मोरोपंत ब) रामचंद्र त्रिंबक क) हंबीरराव मोहिते ड) नारोपंत

३. अष्टप्रधानापैकी .......... प्रधान ब्राह्मण जातीतले असत.

अ) सात ब) आठ क) पाच ड) तीन

४. परराष्ट्रव्यवहार सांभाळण्याचे कार्य .. या प्रधानाकडे असे.

अ) सुमंत ब) सेनापती क) पेशवा ड) पंडित

५ .......... चे हित हे शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचे सूत्र होते.

अ) अष्टप्रधानांचे ब) कुटुंबाचे क) रयतेचे ड) सैनिकांचे

## १.२.२ शिवकालीन न्याय प्रशासन (Judicial administration)

मध्ययुगीन भारतातील समाजव्यवस्था आणि धर्मव्यवस्था यांचा आधार घेऊन विकसित झालेली व्यवस्था, असे या काळातल्या न्यायव्यवस्थेचे वर्णन करावे लागते. स्वराज्यात विकसित झालेली न्यायव्यवस्था ही शिवाजी महाराजांनी निर्माण केलेली नव्हती तर महाराजांच्या अगोदरच्या कालखंडापासून अस्तित्वात असलेल्या न्यायव्यवस्थेला त्यांनी अधिक परिणामकारकरीत्या वापरण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीच्या कालखंडात स्वराज्यातील न्यायव्यवस्थेवर इस्लामिक न्याय व्यवस्थेचा प्रभाव होता, मात्र जसजसे स्वराज्य विकसित होत गेले तसे महाराजांनी प्रशासनाच्या इतर अंगाप्रमाणेच न्याय प्रशासनालाही त्यावेळच्या परिस्थितीला योग्य असे बनविण्याचा प्रयत्न केला. राज्याभिषेकाच्या वेळी महाराजांनी कानुजाबता तयार करून घेतला. प्रशासनातील विविध अधिकारी, त्यांची कर्तव्ये यात स्पष्ट करण्यात आली. अष्टप्रधानमंडळ हे शिवाजी महाराजांच्या प्रशासनाचे प्रमुख वैशिष्ट्य होते. या मंडळातील न्यायाधीश व पंडितराव हे दोन प्रधान न्यायव्यवस्थेशी संबंधित होते. त्याचबरोबर प्रत्येक गावात, कसब्यात, महालात, प्रांतात त्यांच्या स्वतःच्या न्यायदान करणाऱ्या संस्था असत, ज्याचा उल्लेख गोतसभा किंवा गोतमजलीस असा केलेला आढळतो. शिवकालीन न्यायव्यवस्थेचे पुढील प्रमाणे स्तर दिसून येतात.

**न्याय संरचना (judicial structure)**

**अ) केंद्रीय न्यायव्यवस्था :**

**१) राजा :**

राजा जसा राज्यव्यवस्थेचे उगमस्थान असे त्याचप्रमाणे तो न्यायव्यवस्थेचा निर्माता असे. न्यायव्यवस्थेचे अंतिम अधिकारही राजाच्या हातात एकवटलेले असत. राज्यातील सर्व दिवाणी आणि

फौजदारी खटल्यांचे न्यायदान करण्याचा अधिकार त्यांना होता. शिवाजी महाराजांनी या अधिकाराचा कधीच गैरवापर केला नाही. न्यायाधीश, पंडितराव इत्यादी अधिकाऱ्यांशी सल्लामसलत केल्यानंतरच त्यांनी न्यायदान केले.

**२) न्यायाधीश व पंडितराव :**

अष्टप्रधानमंडळातील राजांनी नेमलेले हे दोन अधिकारी न्यायव्यवस्थेचे प्रमुख भाग होते. राज्यातल्या सर्व प्रकारच्या खटल्यांवर न्यायाधीशाचा अधिकार असे. तत्कालीन प्रथा - परंपरा, धार्मिक नीतिनियमाला अनुसरून त्याने न्यायदान करावे असे अपेक्षित होते. त्याने दिलेल्या निकालावर राजाची संमती आवश्यक असे. राजदरबारातील आणि राज्यातील सर्व धार्मिक बाबी सांभाळणाऱ्या पंडितरावांच्या समोर धार्मिक बाबींशी संबंधित खटले येत. धर्म - अधर्म पाहून त्याने निर्णय द्यावा असे अपेक्षित असे. धर्मशास्त्रांचा आधार यावेळी घेतला जाई.

**३) राज्यमंडळ किंवा राजमंडळ :**

स्वतः राजा त्याचबरोबर मंत्रीगण, सुभेदार, हवालदार अशी वतनदार मंडळी ज्या भागातील तंटा असे त्या विभागातील वतनदार इत्यादी मिळून निर्णय घेत असत. यानंतर त्यावर राजमुद्रा उठवली जात असे. याचा उल्लेख धर्मसभा असाही केलेला दिसतो.

**ब) स्थानिक न्यायव्यवस्था - गोतसभा आणि दिव्य (Gotsabha and divya)**

**अ) गोतसभा :**

या काळातील न्यायव्यवस्थेतील पायाभूत संस्था म्हणून गोतसभेचा उल्लेख करावा लागतो. परंपरेने चालत आलेली ही व्यवस्था लोकांनी लोकांमार्फत चालविलेली होती. गोतसभा कोठे आयोजित केली आहे, त्यानुसार त्यामध्ये कोण सहभागी होणार होणार हे ठरत असे. ग्राम खेडे - गाव किंवा मौजा येथील गोतसभेत गावचे पाटील, कुलकर्णी, चौगुला हे प्रमुख वतनदार, गावातले बलुतेदार- अलुतेदार, थळकरी किंवा मिरासदार, उपरे इत्यादी सदस्य एकत्र येत आणि न्यायदान करत. पेठ किंवा कसब्याच्या ठिकाणी भरणाऱ्या गोतसभेस स्थानिक पाटील, कुलकर्णी, यांच्याबरोबरच शेटे - महाजन, आसपासच्या गावातील पाटील, कुलकर्णी असत. स्थानिक अलुतेदार - बलुतेदार मंडळी असत. परगण्यातील गोतसभेचे प्रमुख पद हे देशमुखांकडे असे. देशपांडे हा त्याचा सहाय्यक असे. शिवाय आसपासच्या गावातील किंवा कसब्यातील महत्त्वाच्या वतनदारांनाही यावेळी निमंत्रित केले जाई. जनतेचे प्रतिनिधी यामध्ये सहभागी होत असत. ज्यावेळी परगण्यातील किल्ल्यांवर गोतसभा बोलावली जाई त्यावेळी किल्ल्याचे हवालदार, कारखानीस, सबनीस, तटसरनौबत यांच्याबरोबर आसपासच्या प्रदेशातील प्रमुख वतनदार देशमुख, देशपांडे, पाटील, कुलकर्णी, शेटे - महाजन, बलुतेदार इत्यादी हजर असत. म्हणजेच वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर बलुतेदारांची उपस्थिती महत्त्वाची मानली जात होती. याचा उल्लेख काही कागदपत्रातून धर्मसभा किंवा देशक सभा असाही केलेला आढळतो.

## १) गोतसभेतील न्यायदान प्रक्रिया :

तत्कालीन समाजव्यवस्थेत गोतसभेस खूप महत्त्वाचे स्थान होते. गोतसभेने दिलेले निर्णय बहुतांशी मान्य केले जात. तक्रार दाखल करणाऱ्या किंवा त्याच्या विरोधीपक्षांना जर वाटले की, गावातील गोतसभेकडून आपल्याला न्याय मिळणार नाही तर त्यांना दुसऱ्या गावच्या गोतसभेकडे किंवा परगण्याच्या गोतसभेकडे जाण्याची परवानगी होती. त्या काळातले गावातील तंटे प्रामुख्याने शेती, वारसा हक्क, ईनाम, दत्तक यांच्या संदर्भातले दिसतात. जो तक्रार दाखल करे त्याला वादी किंवा अग्रवादी तर ज्याच्याविरुद्ध तक्रार केली जाई त्याला प्रतिवादी किंवा पश्चिमवादी असे म्हटले जाई. वादी-प्रतिवादींना त्या गोतसभेवर विश्वास आहे की नाही हे तपासून मगच पुढचे कामकाज सुरू होत असे. गोतसभेचा निर्णय हा दोघांनाही मान्य होणार आहे याची खात्री केल्यानंतर गोतसभेच्या कामकाजास सुरुवात होत असे. दोन्ही पक्षकारांना आपल्या हकिकती लिहून देण्यास सांगितले जाई, त्याला तकरीरा असे म्हणत. यानंतर दोन्ही बाजूंना आपले पुरावे सादर करायला सांगितले जात असे. त्या संदर्भात जामीनही काही वेळेला लिहून घेतलेला आढळतो. उभय पक्षांच्या साक्षीदारांच्या साक्षी नोंदवल्या जात. पुराव्याची छाननी गोतसभेकडुन केली जात असे. त्यानंतर गोतसभेत चर्चा होऊन मग निर्णय जाहीर केला जाई. लेखी स्वरूपात हा निर्णय असे. त्याला निवाडापत्र किंवा महजर असे म्हटले जात होते. याचे लिखाण कुलकर्णी करत असे. सदरच्या निवाडपत्रावर उपस्थितांची निशाणी खूप आवश्यक असे. या काळात बहुतेक जणांना लिहिता- वाचता येत नसे. ते निशाणी करत. प्रत्येकाची निशाणी परंपरेने ठरलेले होती. उदाहरणार्थ चौगुल्यांची निशाणी काठी, पाटील यांचा - नांगर, शेटे - महाजन यांची तागडी, कुंभाराची - चाक, तर मुलाणाची निशाणी सुरी इ. थोडक्यात बलुतेदार व्यवसाय करताना ज्या वस्तूचा वापर करत ती त्यांची प्रमुख निशाणी असायची. एकदा निशाणी झाली की तो निर्णय पक्का समजला जात असे. या निर्णयाच्या विरोधात परगण्याच्या गोतसभेकडे किंवा खुद्द छत्रपतींच्या समोर घेऊन जाण्याची सोय या काळी होती. अशा वेळी पुन्हा एकदा गोतसभेचे आयोजन करून निर्णय दिला जात होता. थोडक्यात कोणाकडे न्याय मागायचा हे स्वातंत्र्य समाजाला दिलेले होते.

## २) ब्रह्मसभा :

धर्मशास्त्र पारंगत विद्वान ब्राह्मणांची - पंडितांची सभा म्हणजे ब्रह्मसभा. या काळात तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी अशा ब्रह्मसभा असत. उदाहरणार्थ नाशिक, पैठण, कराड, कोल्हापूर इत्यादी. असे खटले जे धर्माशी संबंधित आहेत, उदाहरणार्थ घटस्फोट, दत्तक, धर्मांतर, प्रायश्चित्य, सगोत्र विवाह इत्यादीचे कामकाज ब्रह्मसभेसमोर चालत असे. काही वेळा धार्मिक वतने, पुजाऱ्यांचे हक्क, दोन जमाती मधील वाद याबाबतही ब्रह्मसभा निर्णय घेत होती. या सभेने दिलेला निर्णय त्यावेळेला अंतिम समजला जात असे. बऱ्याचदा गोतसभेला एखादा वाद सोडविणे शक्य नसेल असा ब्रह्मसभेकडे पाठवीत असत. ब्रह्मसभेचे अस्तित्व खूप अगोदर पासून होते ते शिवकाळात टिकून राहिले. या ब्रह्मसभेसमोर आलेल्या प्रकरणाची बाजू ऐकून घेऊन धर्म - अधर्म ठरवत आणि त्यानंतर प्रायश्चित्त सांगितले जात होते. ब्रह्मसभेने दिलेला निर्णय समाजाकडून मान्य केला जात होता. ब्रह्मसभेच्या विरोधात सहसा कोणी जात नसे. ब्रह्मसभेने दिलेले

प्रायश्चित्त पूर्ण केल्यानंतर सदर व्यक्ती ब्रह्मसभेकडून शुद्धीपत्र घेऊन जातपंचायतीकडे जाई, त्यानंतरच तो आपल्या जातीबरोबर व्यवहार करण्यासाठी शुद्ध होत असे.

**ब) दिव्य :**

मध्ययुगीन न्यायव्यवस्थेत सामाजिक मान्यता मिळालेली एक पद्धती म्हणून दिव्य पद्धतीचा उल्लेख करावा लागतो. एखाद्या खटल्याच्या वेळी जर पुरेसे साक्षी - पुरावे नसतील किंवा कागदपत्रे नसतील तर दिव्य करण्याच्या पद्धतीचा स्वीकार केला जात होता. काही वेळेस साक्षी - पुरावा ग्राह्य धरला जायचा नाही अथवा न्यायदानाबद्दल लोक असमाधानी असतील अशा वेळीही दिव्य केले जात होते. याला दैवी पुरावा असे समजले जात होते. या प्रकारांना प्राचीन धर्मशास्त्राचा आधार दिला जात होता. दिव्य म्हणजे एखादी विशिष्ट प्रकारची कृती, जी वादी - प्रतिवादींना करायला सांगितली जात होती. त्यानंतर संबंधित खटल्याचा निकाल दिला जात होता. या काळात विविध प्रकारच्या दिव्य करण्याच्या पद्धती अस्तित्वात होत्या. यापैकी काही महत्वाच्या पद्धती पुढीलप्रमाणे

**१) रवा दिव्य :**

एखाद्या पवित्र धार्मिक क्षेत्राच्या ठिकाणी विशेषतः शंकराच्या देवळा शेजारी या दिव्याची प्रक्रिया पार पाडली जात होती. वादी आणि प्रतिवादी या दोघांनाही मंदिराभोवती सात प्रदक्षिणा घातल्यानंतर सर्वासमक्ष उकळत्या तेलाच्या किंवा तुपाच्या कढईत हात घालून त्यामध्ये असलेला लोखंडाचा तुकडा बाहेर काढावा लागे.त्यांचे हात पिशव्याच्या सहाय्याने सीलबंद करण्यात येत असत. दुसऱ्या दिवशी पिशवी काढून हात तपासले जात असत. ज्याच्या हातावर खुणा उठत किंवा फोड उठत, तो दोषी समजला जात होता.

**२) अग्निदिव्य :**

या पद्धतीत व्यक्ती जवळजवळ अडीच किलो वजनाचा तप्त लोखंडी गोळा तळहातावर घेऊन मंदिरासमोर काढलेल्या सात रिंगणातून जात असे किंवा देवळाभोवती सात प्रदक्षिणा घालाव्या लागत. यावेळी दिव्य करणाऱ्याचे हात सीलबंद करून ते दुसऱ्या किंवा तिसऱ्या दिवशी उघडले जात असत. ज्याच्या हातावर फोड आले नाहीत त्याच्या बाजूने निकाल दिला जात असे.

**३) ऐरणी दिव्य :**

या दिव्याचा वापर बहुतेकदा दोन गावांच्या सरहद्द तंट्यात केला जात होता. येथे तप्त लोखंडी गोळ्या ऐवजी तप्त ऐरणीचा वापर केला जात होता.

४) **दिवा दिव्य :** वादी-प्रतिवादीच्या बाजूने एक-एक दिवा प्रज्वलित केला जाई. साधारणपणे श्रावण महिन्यात पंधरा दिवस हे दिवे लावले जात असत. दिव्याची वात सर्वप्रथम ज्याची विझेल तो दोषी समजला जात होता. काही कागदपत्रातून या दिवा दिव्या बद्दलचा उल्लेख सापडतो.

### ५) क्रिया दिव्य किंवा नदीची क्रिया :

गावातील पाटील, मिरासदार किंवा पंचमंडळींच्या समोर वादी आणि प्रतिवादी नदीच्या पात्रात उतरत असत. हातात पाणी घेऊन त्यांच्याकडून सत्य वदवून घेतले जात असे आणि त्यानंतर निर्णय दिला जायचा.

### ६) धारा दिव्य :

फिर्याद घेऊन आलेल्या व्यक्तीला एखादे पराक्रमी कृत्य करायला सांगितले जायचे. वतन परत मिळविण्यासाठी अशा प्रकारचे दिव्य केल्याचे उल्लेख सापडतात.

या पद्धती बरोबरच देवावरचा बेलभंडारा उचलून सत्य वदवून घेणे, तुळशीचे पान हातात घेऊन शपथ घेणे, पवित्र धर्मग्रंथावर हात ठेवून शपथ घेणे अशा प्रकारेही निकाल दिला जात होता. बऱ्याच वेळेला साक्षी - पुरावे बघण्याऐवजी अशा पद्धतींचा जास्त अवलंब केलेला दिसतो. कारण समाजावर देव - धर्म, पाप- पुण्य याचा पगडा होता. वाईट कृत्य केले किंवा खोटे बोलले तर सात पिढ्या नरकात जातील या गोष्टीवर विश्वास होता. यामुळे दिव्य करणे या पद्धतीचा अवलंब समाजाने बऱ्याच प्रसंगी केलेला दिसतो.

### क) गुन्हेगारांना दिल्या जाणाऱ्या शिक्षेचे स्वरूप :

या कालखंडात शेती हद्द, वतनासंबंधीचे वाद, विवाह - काडीमोड इ. दिवाणी गुन्ह्यांबरोबरच चोरी,लूटमार,हत्या,खोट्या साक्षी देणे, अनैतिक वर्तन, फितुरी किंवा राजद्रोह इ. विविध प्रकारचे गुन्हे घडत असत. गुन्हा सिद्ध झाल्यावर त्याच्या स्वरूपानुसार शिक्षा दिल्या जात असत. अर्थात याचा आधार धार्मिक ग्रंथ, सामाजिक प्रथा - परंपरा, जाती व्यवस्थेचे नियम, राजाने केलेले कायदे असत. या कालखंडात साधारणपणे शिक्षेचे पुढील प्रकार अस्तित्वात होते.

### १) दिवाण दंड :

याचा उल्लेख राजदंड असाही केला जात होता. याची सुनावणी काहीवेळा न्यायाधीशाकडून किंवा खुद्द राजकडूनही केली जात होती. गुन्ह्याच्या स्वरूपानुसार द्रव्यदंड, कारावास, हातपाय तोडणे तर काही वेळा मृत्युदंड देखील दिला जात होता. गंभीर गुन्हा करणाऱ्यांसाठी किल्ल्यावर अंधार कोठडी तयार केलेली असे.

### २) देव दंड :

याला ब्रह्मदंड असेही म्हटले जात होते. अपराध करणाऱ्यांची आत्मिक आणि धार्मिक शुद्धी व्हावी यासाठी हा दंड होता. राजा, ब्रह्मसभा किंवा जातीसभेकडून हा दंड सुनावला जात होता. यात गुन्हेगारास एखादे प्रायश्चित्त करायला सांगितले जात होते. उदा. एखाद्या तीर्थक्षेत्राची यात्रा, पंचगव्य प्राशन. सदर व्यक्तीस प्रायश्चित्त केल्यानंतर ब्रह्मसभेकडून शुद्धी पत्र मिळवावे लागत असे. त्यानंतर त्याची शिक्षा पूर्ण होत असे.

### ३) जाती दंड :

याला गोत दंड असेही म्हणत. जाती नियमांच्या बाहेर जाऊन कृत्य करणाऱ्यास जाती बहिष्कृत केले जात होते. त्याला पुन्हा जातीत यायचे असल्यास गुन्हा मान्य करून दिलेली शिक्षा भोगावी लागे. यासाठी गोताईचे आयोजन केले जात होते. त्यानंतर जाती बांधवाबरोबर जेवण करण्याची त्याला परवानगी मिळत होती. याला पंक्तिपावन होणे असे म्हणत. त्यानंतरच त्याचा पुन्हा स्वजातीत प्रवेश होत असे आणि जाती व्यवहार करण्याची त्याला परवानगी मिळत होती.

### ड) न्यायदानातून सरकारला मिळणारे उत्पन्न :

न्यायदान प्रक्रिया आणि त्याची अंमलबजावणी पूर्ण झाल्यानंतर विजयी पक्षाकडून काही रक्कम घेतली जात होती. त्याला हरकी असे म्हणत. तर पराभूत पक्षाकडून वसूल केल्या जाणाऱ्या रक्कमेस गुन्हेगारी असे म्हटले जात होते. विशेषतः वतनासंबंधीच्या वादातून मिळणारी ही रक्कम जास्त असे.

### ड) शिवकालीन न्यायपद्धतीची वैशिष्ट्ये :

### १) न्यायव्यवस्थेचे साधे - सोपे स्वरूप :

भारतात प्राचीन कालखंडापासून चालत आलेली न्यायव्यवस्था चालीरीती, परंपरा, सामाजिक नियम, धार्मिक नियम यावर आधारित होती. विज्ञानेश्वर यांनी लिहिलेल्या 'मिताक्षरा' या ग्रंथाचा आधारही घेतला जात होता. या काळातही ती अशीच सुरू राहिली. मात्र त्याचे स्वरूप किचकट नव्हते. सर्वांना न्याय मागण्याचा हक्क या व्यवस्थेत होता.

### २) जनतेचा सहभाग :

या काळातले हे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य. सामान्य लोक किंवा लोकप्रतिनिधी या प्रक्रियेत सहभागी होत असत. अगदी बलुतेदार - अलुतेदारांच्या प्रतिनिधींचाही या प्रक्रियेत सहभाग असे.

### ३) न्याय कोणाकडे मागायचा याचे स्वातंत्र्य :

फिर्यादीला स्वत:च्या गावच्या गोतसभेपासून ते थेट छत्रपतीपर्यंत कोणाकडेही न्याय मागण्याचा हक्क यावेळच्या न्यायव्यवस्थेत होता. एकदा दिलेल्या निर्णयाविरुद्धही पुन्हा दाद मागण्याचा हक्क होता.

### ४) न्याय देण्याची प्रक्रिया अधिक वेगवान :

फिर्यादीला न्याय मिळवण्यासाठी वर्षानुवर्ष वाट पहावी लागते आहे असे दृश्य त्यावेळी नव्हते. शिवाय खूप लांब जायची गरज भासत नसे. कमी वेळेत, कमी खर्चात न्यायदानाची प्रक्रिया पूर्ण होत असे.

### ५) पुरावा :

ज्यावेळी कागदोपत्री पुरावे किंवा साक्षीदार मिळत नसत, त्यावेळी दिव्य करण्याची प्रक्रिया केली जात होती. याला समाजमान्यता होती. न्यायदान प्रलंबित ठेवले जात नव्हते.

### ६) शिक्षेचे प्रकार :

गंभीर गुन्ह्यांना मृत्युदंड किंवा हातपाय तोडणे अशा शिक्षा दिल्या जात होत्या. यामागे गुन्हेगारांवर वचक बसविणे हा हेतू होता. दिवाणी खटल्यात शिक्षेचे प्रकार सौम्य असत. काहीवेळा तर पंचगव्य प्राशन करणे यासारखे विधी केले तरी फिर्यादीची सुटका होत असे. अर्थात यामागे धार्मिक संकल्पनांचा समाजावर असलेला पगडा हेच होते.

एकूणच लोकांच्या सहभागातून लोकांसाठी विकसित झालेली न्याय व्यवस्था असे या काळातल्या न्यायव्यवस्थेचे वर्णन करावे लागते. या व्यवस्थेत स्वतः छत्रपतींनीही ढवळाढवळ केलेली दिसत नाही.

## स्वयं अध्ययन २

### अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१) ब्रह्मसभा म्हणजे काय ?

२) धारा दिव्य म्हणजे काय ?

३) कानुजाबता काय होते ?

४) गावातल्या गोतसभेचा प्रमुख कोण असे ?

५) न्यायदानात सरकार विजयी पक्षाकडून काही रक्कम बक्षीस म्हणून घेई, त्यास काय म्हणत ?

### ब) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

१) अष्टप्रधान मंडळात न्यायाधीश म्हणून ........ यांनी काम पाहिले.

अ) रामचंद्र नीलकंठ ब) आण्णाजी दत्तो

क) निराजी रावजी ड) रघुनाथ पंडितराव

२) गोतसभेचा महजर म्हणजे निवाडापत्र लिहिण्याचे काम .............. करत होते.

अ) पाटील ब) देशमुख

क) चौगला ड) कुलकर्णी

३) न्यायदान करताना ........... या ग्रंथाचा आधार घेतला जात होता.

अ) अर्थशास्त्र ब) मिताक्षरा

क) ज्ञानेश्वरी ड) आज्ञापत्र

४) धर्माशी संबंधित प्रकरणे .......... कडे पाठवली जात.

अ) देशक सभा ब) गोतसभा

क) ब्रह्मसभा ड) राजसभा

५) राज्याभिषेकाच्यावेळी पंडितराव हे पद .......... यांच्याकडे होते.

अ) नारो नीलकंठ ब) रघुनाथ पंडितराव

क) हंबीरराव मोहिते ड) मोरोपंत

## १.२.३ लष्करी प्रशासन (Military administration)

**लष्करी प्रशासनाचे महत्व :**

देशाच्या एकात्मकतेत व बांधणीत लष्कराचे महत्व अनन्यसाधारण असते. राज्य सैन्यावर चालते हे सर्व कालखंडाचे सूत्र आहे. राज्याची संरक्षण व्यवस्था मजबूत करण्यासाठी चांगल्या लष्कराची गरज आहे याची जाणीव शिवाजी महाराजांना होती, कारण या कालखंडात परकीय आक्रमणे, लूटमार, युद्धे ही नित्याची बाब होती. स्वराज्य अधिक मजबूत होण्यामागे शिवाजी महाराजांनी मजबूत उभ्या केलेल्या लष्करी व्यवस्थेचा वाटा महत्वाचा होता. लष्करी प्रशासनामध्ये पायदळ, घोडदळ, किल्ले, आरमार व हेरखाते असे प्रमुख घटक होते. त्यावेळच्या राजकीय व भौगोलिक परिस्थितीचा विचार करून राजांनी सैन्याची उभारणी केली. यामध्ये गनिमी कावा (Gaurilla war) या युद्ध तंत्राचा प्रामुख्याने वापर केला. हेरखाते हे त्यांच्या लष्कर व्यवस्थेचा प्रमुख भाग होता. युद्ध प्रसंगी उपयोगी ठरेल अशी एखादी गुप्त गोष्ट शोधून काढण्याचे महत्वपूर्ण काम गुप्तहेर खाते करत असे. या बरोबरच महाराजांनी किल्ल्यांचा आणि आरमाराच्या संरक्षण व्यवस्थेसाठी अत्यंत परिणामकारक असा वापर करून घेतला. असा वापर भारतातल्या त्यावेळच्या इतर कोणत्याच शासकांनी करून घेतलेला दिसत नाही. साधेपणा व शिस्त ही शिवाजी महाराजांच्या लष्करी शासन व्यवस्थेची दोन महत्वाची वैशिष्ट्ये होती.

## किल्ले आणि आरमार प्रशासन (Forts and Navy Administration)

### अ) किल्ले प्रशासन :

**James Douglas -** Shivaji's dwelling was among the rocks, and his strength lay in the everlasting hills. He was a man of forts, born in a fort. The forts made him what he became, and he made the nation ; the basis of his conquests; the steps of his ambition, his home and his joy ; many of them he built, all of them strengthened.

**जेम्स डग्लस** याने शिवाजी महाराजांच्या किल्यांचे महत्व सांगताना असे नमूद केले की, ज्याचे सर्व सामर्थ्य किल्यावर अवलंबून होते, तो खराखुरा दुर्ग स्वामी होता. त्याचा जन्म दुर्गात झाला. त्याला दुर्गामुळे वैभव प्राप्त झाले. त्याचे किल्ले त्याच्या भारतातील शत्रूंना धाक होता. त्याच्या राष्ट्राची ती संवर्धन भूमी होती. त्याच्या विजयाचा तो पाया होता. त्याच्या वाढत्या महत्वाकांक्षेचा तो जिना होता. दुर्ग हेच त्याचे निवासस्थान व तेच त्याच्या आनंदाचे निधान होते. कित्येक किल्ले त्याने बांधले, जे आधी बांधले होते त्या सर्वांना त्याने बळकटी आणली.

किल्यांचा राज्याच्या संरक्षण व्यवस्थेत अत्यंत परिणामकारक उपयोग करून घेणारा राजा म्हणून शिवाजी महाराजांचे नाव आपल्याला घ्यावे लागते. स्वराज्यकार्याची सुरवात किल्यावरून झाली. पुढे स्वराज्याचा विस्तार झाल्यावर शत्रूचा सामना करण्यासाठी त्यांनी किल्यांचा अगदी अचूक वापर करून घेतला. शत्रू प्रदेशातील किल्ले जिंकून घेणे, नवीन किल्ले बांधणे, किल्यांची डागडुजी करणे, किल्यावर पुरेशी शिबंदी - रसद राहील याकडे त्यांनी नेहमी लक्ष दिले. मराठी स्वराज्याचा कणा म्हणून किल्यांनी महत्वाची भूमिका बजावली. या कालखंडात किल्यांचे प्रामुख्याने तीन प्रकार होते .

१ गिरी दुर्ग किंवा डोंगरी किल्ले

२ स्थलदुर्ग किंवा जमिनीवरचे किल्ले

३ जलदुर्ग किंवा सागरी किल्ले

यापैकी महाराजांनी संरक्षणासाठी डोंगरी किल्यांचा वापर सर्वात जास्त केला. राज्यातील भौगोलिक परिस्थिती डोंगरी किल्यांसाठी अनुकूल होती. या किल्ल्यांच्या दुर्गमतेचा वापर करुन त्यांनी शत्रूंना झुंजवले. राजांच्या महत्त्वाच्या माहीमा किल्यांच्या विशेषतः डोंगरी किल्याच्या साह्याने पार पडल्या. स्वराज्याची पहिली राजधानी राजगड आणि नंतरची राजधानी रायगड हे डोंगरी किल्लेच होते. राज्याभिषेकासारखा सर्वात महत्वाचा प्रसंगही रायगडावर पार पडला. थोडक्यात स्वराज्यात डोंगरी किल्यांना अनन्यसाधारण महत्व होते. शिवाजी महाराजांच्या मते शेतकरी जसा शेतास माळा घालून शेताचे रक्षण करतो तशी किल्याच्या

बांधणीमुळे राज्यास बळकटी येते. शत्रूने हे किल्ले जिंकायचे ठरवले तरी त्याचे सर्व आयुष्य येथेच संपून जाईल ! त्यांचे हे म्हणणे औरंगजेबाच्या स्वराज्यावरच्या आक्रमणाच्या वेळी अगदी तंतोतंत खरे ठरले. मराठ्यांनी किल्यांच्या सहाय्यानेच औरंगजेबाला झुंजवत ठेवले आणि अखेरीपर्यंत स्वराज्य अजिंक्यच राहिले.

किल्यांसाठी शिवाजी महाराजांनी स्वतंत्र प्रशासन व्यवस्था निर्माण केली. किल्याचे प्रशासन भरभक्कम बनावे यासाठीही महाराजांनी काळजी घेतली. किल्ला जसे लढाईचे व संरक्षणाचे मुख्य ठिकाण मानले जात असे त्याप्रमाणे त्या प्रदेशातील ते प्रशासकीय व्यवहाराचे आणि व्यापाराचेही मुख्य केंद्र असे. अर्थात किल्यांना महत्व शिवाजी महाराजांमुळे मिळाले. शिवाजी महाराजांनी काही नवीन किल्ले बांधून घेतले तर काही जुन्या किल्यांची दुरूस्ती करून त्यांचा वापर करून घेतला. प्रतापगड, वसंतगड, प्रचंडगड, सिंधुदुर्ग, विजयदुर्ग हे किल्ले त्यांनी नव्याने बांधले तर सिंहगड, विशाळगड, पन्हाळा, जिंजी इ. जुन्या किल्यांची डागडुजी करून त्याचा वापर केला. राजधानी म्हणून रायगडचा विकास करत असताना अनेक इमारती त्यांनी बांधून घेतल्या, त्यासाठी पुष्कळ पैसा खर्च केला. याच किल्यांनी स्वराज्य रक्षणात मोलाची भूमिका बजावली.

**किल्यांची संख्या :**

स्वराज्यात शिवाजीराजांनी नवा मुलूख जिंकून घेणे किंवा काही भाग शत्रूच्या ताब्यात जाणे हे सातत्याने सुरू होते. त्यामुळे नेमके किती किल्ले होते याबाबत वेगवेगळे उल्लेख सापडतात. सभासद बखरीनुसार २४०, चिटणीस बखरीनुसार ३१७ इतकी संख्या सांगितलेली आहे. चित्रगुप्त बखरीनुसार डोंगरी किल्ले २४०, जमिनीवरचे किल्ले १०८, समुद्रातील किल्ले १३ असे एकूण ३६१ किल्ले स्वराज्यात होते.

**किल्यांवरील अधिकारी :**

किल्यावर शत्रूकडून फंदफितुरी होऊ शकते याची जाणीव असणाऱ्या राजांनी किल्यांचे संपूर्ण नेतृत्व एका माणसाकडे कधीच दिले नाही. किल्यावरील कामांची विभागणी करत त्यांनी १) हवालदार २) सबनीस आणि ३) कारखानीस या तीन अधिकाऱ्यांची नियुक्ती किल्ल्यांमध्ये केली. येथेही जाती वैशिष्ट्यांचा अचूक वापर महाराजांनी केलेला दिसतो. या तीन अधिकाऱ्यांकडे सोपविलेली कार्ये पुढीलप्रमाणे -

**१) हवालदार किंवा किल्लेदार :**

हा मराठा जातीचा असे. किल्याचा एकंदरीत कारभार पाहणे, किल्याच्या दरवाजाची व्यवस्था पाहणे, सूर्यास्ताबरोबर दरवाजे बंद करणे तर सूर्योदयाबरोबर उघडणे, किल्याचे रक्षण करणे इत्यादी. पराक्रमी, निस्वार्थी, विश्वासू व्यक्तीची नियुक्ती या पदावर केली जात होती.

२) **सबनीस :**

हा ब्राह्मण जातीचा असे. किल्यावरील जमा - खर्चाचा सर्व हिशोब पाहणे, पत्रव्यवहार सांभाळणे, किल्ल्या संदर्भातले सर्व कागदपत्रांचे लिखाण करणे, किल्यावरील लोकांची हजेरी ठेवणे इत्यादी कामे सबनीसाला पार पाडावी लागत होती.

३) **कारखानीस :**

हा कायस्थ प्रभू जातीचा असे. किल्यावरील कारखान्यांचे नियंत्रण याच्याकडे असे. कोठीची - दारुगोळ्याची व्यवस्था करणे, किल्याची दुरुस्ती व इमारत देखरेख ठेवणे, सबनीस जो पत्रव्यवहार करत असे त्यावर हवालदार व कारखानीस आपले संमतीदर्शक शिक्के उठवत असत. पत्रव्यवहारांची नोंद कारखानीसाच्या दप्तरी होत असे व नंतरच हे पत्र किल्याबाहेर पाठवले जाई.

किल्यावरची कामे निरनिराळ्या मुख्य जातींकडे सोपविल्यामुळे दगाफटका होण्याची किंवा बंड होण्याची फारशी भीती उरत नसे. तिघेही अधिकारी एकमेकावर अप्रत्यक्षरीत्या नियंत्रण ठेवत असत. याशिवाय किल्याच्या तटबंदीच्या संरक्षणासाठी तटसरनौबत नावाचा अधिकारी नियुक्त केलेला असे किल्याच्या वाटेवरती भिल्ल, रामोशी, पटवारी, बेरड इत्यादी जमातींच्या चौक्या असत. या जमाती अत्यंत काळजीपूर्वक किल्याच्या संरक्षणाचे काम करत. आज्ञापत्रातून या अधिकाऱ्यांची नियुक्ती करताना कोणती काळजी शिवाजी महाराज घेत असत याचे वर्णन सापडते. सर्व नियुक्त्या महाराजांच्या देखरेखीखालीच होत असत.

३) **इतर नियम :**

किल्यावरील सर्व अधिकाऱ्यांची ठराविक कालखंडानंतर बदली होत असे. तीन वर्षांनी हवालदार, चार वर्षांनी सरनोबत तर पाच वर्षांनी सबनीस व कारखानीस यांची बदली करावी असा नियमच केला गेला होता. किल्यावरील एखाद्या अधिकाऱ्याचा अकस्मात मृत्यू झाल्यास त्याच्या नात्यातल्या व्यक्तीला ते पद दिले जात नसे. स्वराज्यात इतर पदावर त्यांची नियुक्ती केली जात असे. शिवाय एका घराण्यातील दोघे-तिघे स्वराज्याच्या सेवेत असतील तर त्यांची नियुक्ती एकमेकापासून लांब असणाऱ्या किल्यांवर केली जात असे. कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांची ताबडतोब गच्छंती केली जाई. जर एखाद्याने काही गंभीर राजकीय गुन्हा केल्यास प्रसंगी सर्वांसमक्ष शिरच्छेदाची किंवा मृत्युदंडाची शिक्षा देण्याची तरतूद शिवाजी महाराजांनी केली होती. याशिवाय किल्यावर मुख्य अधिकाऱ्यांच्या हाताखाली काम करणारे नोकर चाकर, सुतार, लोहार, पाथरवट, वैद्य, ज्योतिषी इत्यादी गरजेप्रमाणे किल्यावर राहत असत. किल्यावर आवश्यकतेपेक्षा जास्त लोकांचे वास्तव्य असू नये याची काळजी घेतली जात असे. स्वतः महाराज किंवा त्यांचे अधिकारी किल्याला अचानक भेटी देऊन संरक्षणव्यवस्थेची तपासणीही करत.

**४) किल्यावरील शिबंदी :**

किल्यावरील शिबंदीचा म्हणजेच सैनिकांचा प्रमुख हा हवालदार होता. किल्यावर असणारी सैनिक रचना पुढीलप्रमाणे

१० सैनिक = १ नाईक

१० नाईक = १ जमादार

सर्व जमादार = १ हवालदार

**५) अधिकाऱ्यांचा पगार :**

किल्याच्या हवालदारास दरवर्षी १२५ होन इतका पगार असे. कारखानीस व सबनीस यांनाही तेवढाच पगार दिला जात असे. तटसरनौबतास १०० होन इतका पगार दिला जाई. पगार पुरेसा आणि वेळेत होईल याकडे महाराजांनी नेहमी लक्ष दिले.

**६) किल्यांसाठी स्वतंत्र निधीची तरतूद :**

जुने किल्ले दुरुस्त करणे, नवे किल्ले बांधणे, किल्ल्यावरची रसद, बांधकामे इतर कार्यासाठी महाराजांनी स्वतंत्रपणे रकमेची तरतूद केलेली दिसते. उदाहरणार्थ १६७१ मध्ये महाराजांनी १,७५,००० होन किल्याच्या बांधणीसाठी व १२५००० होन हे किल्यावरील रसदीसाठी म्हणजेच अन्नधान्य, दारूगोळा इत्यादीसाठी बाजूला ठेवले होते. या रकमेचा विनियोग त्याच कारणासाठी होत असे. राज्याच्या संरक्षण व्यवस्थेत महाराजांनी किल्याला दिलेले महत्त्व यातून प्रतिपादित होते.

**७) किल्यावरील रसदीबाबत आणि बांधकामाबाबत घेतली जाणारी काळजी :**

किल्याचे बांधकाम करताना खूप काळजी घेतली जाई. शत्रूला चकवतील असे दरवाजे, किल्याच्या वाटेवर भक्कम बुरूज आणि दरवाजे, किल्याचे रस्तेही दुर्गम असतील याकडे लक्ष दिले जाई. अंबरखाने किंवा धान्य गोदामे, दारुगोळ्याची कोठारे ही उंदीर, वाळवी किंवा आगीपासून सुरक्षित राहतील याची त्याचबरोबर दारूच्या कोठारातील सर्व युद्ध साहित्याची काळजी घेतली जाई. गडावर राहणाऱ्या लोकांच्या गरजा भागविण्यासाठी साहित्य, अन्नधान्य, चारा- पाणी, दारूगोळा इत्यादी कायम भरपूर राहील याची काळजी घेतली जात असे. कारण शत्रूने जर किल्याला वेढा दिला तर तो किती काळ चालेल याची शाश्वती नसे, म्हणूनच पुरेशी शिबंदी - रसद किल्यावर राहील याकडे महाराजांनी नेहमी लक्ष दिले.

स्वतः हवालदार किल्यावरची सर्व देखभाल करत असे. उदा. बुरूजावरती असलेल्या तोफा पावसाळ्यात गंजू नयेत, यासाठी त्यावर तेल किंवा मेणाचा थर लावला जात होता. थोडक्यात कोणत्याही प्रकारचे नुकसान होऊ नये यावर महाराजांचा कटाक्ष होता. किल्यावर उत्तम दर्जाची बांधकामे व्हावीत याची महाराजांनी काळजी घेतलेली दिसते, यासाठी त्यांनी देशी-विदेशी तंत्रज्ञांची मदत घेतली. काही किल्ले

शिवाजी महाराजांनी नवीन बांधले. काही जुनेच ताब्यात घेवून त्यांची डागडुजी केली. शिवकालीन किल्ला बांधकामाचे वेगळे वैशिष्ट्य म्हणजे किल्यावरील बाजारपेठांची बांधणी ! महाराजांच्या दोन्ही राजधान्यांवर बाजारपेठा बांधलेल्या होत्या. विशेषतः रायगडावरील बाजारपेठेचे बांधकाम काळजीपूर्वक केलेले होते. सामान्य लोकांबरोबर किल्ल्यावरील सैनिकांचाही विचार केला जात होता.

### ब) शिवाजी महाराजांचे आरमार :

शिवाजी महाराजांनी स्वराज्याला संरक्षित करण्यासाठी अनेक उपाय केले त्यापैकी एक महत्त्वाचा वैशिष्ट्यपूर्ण असा उपाय होता, स्वतःच्या आरमाराची निर्मिती ! स्वराज्याच्या अवतीभवती सर्वत्र शत्रू होते. विशेषतः कोकणपट्ट्यात असलेल्या सिद्दीने या भागात धुमाकूळ घालत लोकांना त्रस्त केले होते. त्यांची चाचेगिरी मोठ्या प्रमाणावर चालत होती, ज्याचा व्यापारावर विपरीत परिणाम होत असे. मराठ्यांचा सिद्दीशिवाय ब्रिटिश, पोर्तुगीज, डच, फ्रेंच इत्यादी युरोपीय सागरी सत्तांशी संबंध येऊ लागला होता. पोर्तुगीजांच्या परवान्याशिवाय इतर कोणालाही आपली जहाजे या भागात नेता येत नसत. या सर्व सत्ता आरमाराच्या जोरावर या भागातील समुद्रावर वर्चस्व गाजवत आहेत हे त्यांच्या लक्षात आले. थोडक्यात या सर्वांचा योग्य बंदोबस्त करण्यासाठी त्याचप्रमाणे पश्चिम कोकण किनारपट्टी सुरक्षित करण्यासाठी चांगल्या आरमाराची गरज आहे याची जाणीव शिवाजी महाराजांना झाली. भारतातील तत्कालीन इतर सत्तांनी या क्षेत्राकडे पुर्ण दुर्लक्ष केले होते, तो विचार शिवाजी महाराजांनी पुर्णत्वास नेला. स्थानिक लोकांच्या मदतीने पश्चिम किनारपट्टीवर भक्कम जलदुर्गांची आणि आरमार तळाची उभारणी करून महाराजांनी आरमाराला स्वतंत्र दर्जा दिला. रामचंद्रपंत अमात्य आज्ञापत्रात उल्लेख करतात, 'आरमार म्हणजे स्वतंत्र राज्यांग, ज्याच्या जवळ आरमार त्याचा समुद्र, याकरीता आरमार अवश्यमेव करावे', डॉ. एस. एन. सेन यांनी शिवाजी महाराजांचा उल्लेख "Father of Indian Navy" असा केला आहे.

### १) शिवाजी महाराजांच्या आरमाराची रचना आणि प्रशासन :

आरमार निर्मितीचे कार्य महाराजांनी साधारणपणे १६५८ नंतर म्हणजेच कल्याण - भिवंडीचा प्रदेश काबीज केल्यानंतर सुरू केले. विशेषतः जहाजबांधणीकडे त्यांनी सुरुवातीला लक्ष दिले, अर्थात मोठी जहाजे बांधण्याचे तंत्रज्ञान केवळ युरोपियन लोकांकडे होते, ते मराठ्यांना देण्याची त्यांची फारशी तयारी नव्हती. यामुळे मध्यम आणि लहान आकाराच्या जहाज निर्मितीकडे त्यांनी लक्ष दिले. या कामी त्यांनी पोर्तुगीज कारागिरांची मदत घेतली. अर्थात त्यासाठी महाराजांना सिद्दी विरुद्ध लढण्यासाठी आपण ही जहाजे बांधत आहोत असे जाहीर करावे लागले.

### १) महाराजांनी बांधून घेतलेल्या जहाजांचा आकार :

युरोपियन जहाजांच्या तुलनेत लहान आणि मध्यम आकाराच्या जहाज बांधणीकडे महाराजांनी लक्ष दिले. सुरुवातीच्या टप्प्यात वीस जहाजे बांधून तयार केली, हळूहळू ही संख्या वाढवत नेली. कोकण

किनारपट्टीवर असलेल्या उथळ समुद्रकिनाऱ्यात मोठी जहाजे अडकून पडण्याची भीती होती. लहान जहाजे एकूण हालचालींसाठी योग्य होती.

**२) जहाजाचे प्रकार :**

तत्कालीन साधनात विविध प्रकारच्या जहाजांचा उल्लेख सापडतो. गुराबा, गलबते, तरांडी, दुबारे, शिबाड, पगार, माचवा, तिरकाठी, पाल अशा प्रकारची लहान मध्यम प्रकारची जहाजे महाराजांनी बांधून घेतली यापैकी सर्वात मोठ्या गुराबाचे वजन १०० ते ३०० टन इतके असे तर गलबताचे ७० टनांपर्यंत वजन असे.

**३) जहाजांची संख्या :**

शिवाजी महाराजांच्या आरमारात एकूण किती जहाजांची संख्या होती याबाबतचे वेगवेगळे उल्लेख सापडतात. सभासद बखरीत ७००, चिटणीस बखरीत चारशे-पाचशे, चित्रगुप्त बखरीत ६४० इतकी संख्या दिली आहे. या बखरीनुसार महाराजांच्या आरमारात १६० होड्या, १५० महागिरी, १०० गलबते, ५० माचवे, ५० लहान गुराब, ६० तारू, ३० मोठे गुराब, २५ पाल तर १५ जुग होते. अशी एकूण विविध प्रकारची ६४० जहाजे होती. १६७३ मध्ये ५७ लढाऊ जहाजे होती. १६७५ मध्ये ती ६६ पर्यंत वाढली होती असाही उल्लेख सापडतो. एकूणच जहाजांची संख्या किती याबाबत एकमत नाही.

**४) आरमाराची प्रशासन व्यवस्था :**

आरमाराचे विविध विभाग केलेले होते त्याला आरमार सुभे असे म्हटले जात होते. रामचंद्रपंत अमात्य यांनी केलेल्या उल्लेखानुसार एका सुभ्यात पाच गुराब आणि पंधरा गलबते असत. प्रत्येक सुभ्याचा एक अधिकारी असे. सर्व सुभ्यांचे मिळून दोन आरमारी दले तयार केलेली होती. आरमारी सुभ्याकडे जे आरमार असे तेथे जहाजावर काम करणाऱ्या लोकांची रचना खालील प्रमाणे होती. १० सारंग्याचा - मुख्य तांडेल, ५० सारंग्यांचा - मुख्य सर तांडेल, त्यांच्यावर दुय्यम सुभेदार, त्यावर सुभेदार व शेवटी सरखेल अशी रचना होती. भंडारी मायनाईक आणि दर्यासारंग ही पदांची नावे आहेत की व्यक्तींची नावे किंवा दिलेली बिरुदे आहेत याबाबत इतिहासकारांनी वेगवेगळी मते मांडलेली दिसतात. दर्यासारंग व दौलतखान याचा उल्लेख मात्र सापडतो. कोकण किनारपट्टीवर राहणाऱ्या कोळी, भंडारी, मलबारी, ख्रिश्चन इत्यादी जातीतल्या लोकांना जहाजावर खलाशी म्हणून घेतले जात होते. या लोकांना समुद्राचे पुरेपूर ज्ञान होते, त्यांचा अनुभव, धाडसीपणा याचा फायदा महाराजांनी आरमार भक्कम करण्यासाठी करून घेतला.

**५) जलदुर्गाची निर्मिती :**

आरमाराला भक्कम करण्यासाठी जलदुर्गाची निर्मिती हा एक महाराजांच्या दूरदृष्टीपणाचा पैलू म्हणावा लागेल. जलदुर्गामुळे सिद्दी भक्कम बनले होते. याचा अनुभव महाराजांनी घेतला होता, विशेषतः जंजिरा या जलदुर्गाच्या आधारे त्यांच्या कारवाया चालत असत. शिवाय आरमारातील जहाजांची संख्या

वाढत चालली होती, त्यामुळे त्यांना थांबवण्यासाठी समुद्र तळांची गरज होती. यामुळे महाराजांनी जलदुर्गाच्या बांधणीकडेही लक्ष दिले. जलदुर्गामुळे कोकणातला त्यांच्या आसपासचा प्रदेश संरक्षित होणार याची जाणीव त्यांना होती. यातूनच त्यांनी सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, पद्मदुर्ग इत्यादी जलदुर्ग बांधले. सिंधुदुर्ग हे आरमारी हालचालीचे प्रमुख केंद्र बनले होते. जलदुर्गामुळे आरमार अधिक भक्कम बनले तर भक्कम आरमारामुळे स्वराज्यातील कोकण - किनारपट्टीचा भाग संरक्षित बनला. परकीय आरमारी सत्तांवर वचक बसविणे यामुळे शक्य झाले.

**६) जहाज बांधणी उद्योग :**

आरमारासाठी लागणारी जहाजे तयार करण्याचा उद्योग महाराजांनी सुरू केला. कोकणपट्ट्यात उत्तम दर्जाची झाडे उपलब्ध होती त्याचा फायदा झाला. कल्याण-भिवंडीची खाडी, पनवेल, कुलाबा, राजापूर, देवगड, मालवण अशा बंदरातून जहाज निर्मिती त्याचप्रमाणे जहाज दुरुस्तीचे कामही चालत असे. सुरुवातीच्या काळात काही पोर्तुगीज कारागीर या कारखान्यातून कामाला होते, नंतर त्यांनी हे काम सोडले. त्यानंतर स्थानिक कारागिरांच्या मदतीने त्यांनी हे काम पूर्णत्वास नेले. आरमाराला असलेली जहाजाची गरज भागली गेली, त्याचबरोबर स्थानिक लोकांना रोजगारही मिळाला.

**शिवाजी महाराजांच्या आरमाराची कामगिरी आणि महत्त्व :**

मध्ययुगातील भारतातल्या मुघल, आदिलशाही व इतर सत्तांनी आरमाराच्या निर्मितीकडे पूर्ण दुर्लक्ष केले, मात्र शिवाजी महाराजांनी परकीय सत्तांचा धोका ओळखत त्यांना प्रत्युत्तर देण्यासाठी आरमाराची निर्मिती केली. शिवाजी महाराजांच्या दूरदृष्टीपणाची जाणीव यातून होते. आरमार निर्मिती करून महाराजांनी अनेक गोष्टी साध्य केल्या.

१) सिद्दींवर आणि युरोपियन सत्तांवर वचक निर्माण झाला. या सत्ता केवळ आरमाराच्या जोरावर कोकणपट्ट्यात दादागिरी करत होत्या. मराठा आरमारामुळे त्यांच्या हालचाली मंदावल्या.

२) व्यापारी जहाजांना संरक्षण दिल्यामुळे या भागातल्या व्यापारी आणि आर्थिक घडामोडी वाढल्या. स्वराज्याचे उत्पन्नही वाढले.

३) सिद्दी - पोर्तुगीजांनी कोकणातल्या जनतेला अगदी त्रस्त करून सोडले होते. त्यांना पायबंद घालण्याचे काम मराठी आरमाराने केले.

४) आरमारामुळे कोकणपट्ट्यातील तरुणांना रोजगार मिळाला. आरमारी जहाजावर खलाशी, सैनिक त्याचप्रमाणे जहाज बांधणी कारखान्यात कारागीर म्हणून किंवा जलदुर्ग बांधणीसाठी कारागीर म्हणून या भागातील तरुण काम करू लागले.

५) आरमार निर्मितीमुळे लष्कराला सामर्थ्य मिळाले.

**स्वयं अध्ययन ३**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) मराठ्यांचे आरमार कोणत्या दोन अधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली होते ?

२) चित्रगुप्ताच्या बखरीनुसार महाराजांच्या जहाजांची संख्या किती होती ?

३) संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग असा उल्लेख कशा मध्ये सापडतो ?

४) किल्याच्या दरवाजांची जबाबदारी कोणाकडे असे ?

५) जंजिरा हा किल्ला कोणाच्या ताब्यात होता ?

**ब) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) किल्याच्या प्रमुखास ............ असे म्हटले जात होते.

अ) हवालदार ब) सबनीस

क) तटसरनौबत ड) कारखानीस

२) किल्यावरील जमा - खर्च पाहण्याचे काम .......... करत असे.

अ) गडकरी ब) सबनीस

क) तटसरनौबत ड) कारखानीस

३) सिंधुदुर्ग किल्ला .......... या प्रकारात मोडतो.

अ) वनदुर्ग ब) गिरीदुर्ग

क) भुईकोट ड) जलदुर्ग

४) छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमारातील .......... हे सर्वात मोठे जहाज होते.

अ) गुराब ब) गलबत

क) पाल ड) तारू

५) किल्यावरील हवालदार .... जातीचा, सबनीस .......... जातीचा व कारखानीस .......... जातीचा नेमत असत.

अ) मराठा, ब्राह्मण, प्रभू ब) रामोशी, पारधी, डवरी

क) बेरड, मांग, महार ड) कोळी, भंडारी, मलबारी

## १.३ पारिभाषिक शब्द

| | | | |
|---|---|---|---|
| १) | होन | - | सोन्यापासून बनवलेले शिवकालीन नाणे, चलन |
| २) | गुराबा | - | एक प्रकारचे लढाऊ जहाज |
| ३) | गलबत | - | एक प्रकारचे लढाऊ जहाज |
| ४) | शिबंदी | - | किल्यावरील संरक्षणाचे सैनिक, लष्कर |
| ५) | परगणा | - | प्रांत |
| ६) | सार | - | गाभा , मुख्य , महत्वाची गोष्ट |
| ७) | अभ्रपटल न्याय | - | आकाशात ढग येतात आणि लगेच नाहीशे होतात तसे क्षणिक |
| ८) | दुर्ग नसता मोकळा देश | - | ज्या देशात किल्ला नाही तो वाटेल त्याला मोकळा, त्याचे संरक्षण होणे कठीण |

## १.४ स्वयं - अध्ययन प्रश्नांची उत्तरे १

### अ) एका वाक्यात उत्तरे लिहा

१) पंडितराव व न्यायाधीश

२) मोरो त्रिंबक उर्फ मोरोपंत पिंगळे

३) मराठा

४) स्वतः शिवाजी महाराज

५) वतनदारी पद्धत

### ब) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.

१) ब) शहाजीराजे

२) क) हंबीरराव मोहिते

३) अ) सात

४) अ) सुमंत

५) क) रयतेचे

**स्वयं - अध्ययन प्रश्नांची उत्तरे २**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा**

१) धर्मशास्त्र पारंगत विद्वान ब्राह्मण पंडितांची सभा म्हणजे ब्रह्मसभा होय.

२) फिर्याद घेवून आलेल्या व्यक्तीला एखादे पराक्रमी कृत्य करायला सांगितले जात होते त्याला धारा दिव्य असे म्हणत.

३) कानुजाबता हे प्रशासनातील विविध अधिकारी आणि त्यांची कर्तव्ये स्पष्ट करणारा ग्रंथ होय.

४) गोतसभेचा प्रमुख पाटील किंवा मुकादम असे.

५) हरकी

**ब) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) क) निराजी रावजी

२) ड) कुलकर्णी

३) ब) मिताक्षरा

४) क) ब्रह्मसभा

५) ब) रघुनाथ पंडितराव

**स्वयं - अध्ययन प्रश्नांची उत्तरे ३**

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) दर्यासारंग आणि मायनाईक

२) ६४०

३) आज्ञापत्र

४) हवालदार

५) सिद्दी

**ब) योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१) अ) हवालदार

२) ब) सबनीस

३) ड) जलदुर्ग

४) अ) गुराब

५) अ) मराठा, ब्राह्मण, प्रभू

## १.५ सारांश

महाराष्ट्राच्या इतिहासाला वळण देणारी घटना म्हणून स्वराज्य निर्मितीचा उल्लेख करावा लागतो. येथील जनतेला पहिल्यांदाच स्वत:चे राज्य, स्वत:ची मुलकी, लष्करी व्यवस्था मिळाली. शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले हे राज्य सुशासन असलेले राज्य होते. मुलकी प्रशासन व्यवस्था निर्माण करताना महाराजांनी तत्कालीन इतर सत्तांच्या प्रशासन व्यवस्थेत असलेले दोष दूर करण्याचा प्रयत्न केला. जहागिरी - वतने वंशपरंपरागतरित्या देण्याची पद्धत त्यांनी बंद केली. त्याऐवजी पुरेसे रोख वेतन द्यायला सुरवात केली. जाती वैशिष्ट्यांचा वापर करत प्रशासन अधिक गतिमान केले. मुलकी सेवेला लष्करी सेवेबरोबरचा दर्जा मिळवून दिला. त्या काळात समाजात प्रचलित असलेल्या न्यायव्यवस्थेत महाराजांनी बदल केला नाही. मात्र व्यवस्था अधिक सर्वसमावेशक होईल याची काळजी घेतली. अष्टप्रधानमंडळातील न्यायाधीश आणि पंडितराव ही दोन्ही पदे न्यायदानासाठी कार्यरत असत. महाराज स्वत: स्वराज्यातील सर्वोच्च किंवा अंतिम न्यायाधीश होते. मात्र या अधिकाराचा त्यांनी कधीच अनिर्बंध वापर केला नाही. सर्वांशी सल्लामसलत केल्यानंतरच ते निर्णय घेत असत. स्वराज्याच्या संरक्षण व्यवस्थेत त्यांनी केलेला किल्ल्यांचा आणि आरमाराचा वापर हे त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक होते. आरमार निर्मितीकडे इतर भारतीय सत्तांनी पूर्ण दुर्लक्ष केले होते ते कार्य शिवाजी महाराजांनी केले. आणि याच जोरावर त्यांनी स्वराज्याच्या शत्रूंवर वचक निर्माण केला. शक्तीपेक्षा युक्ती श्रेष्ठ या तत्वाचा वापर करत स्वराज्य संरक्षित केले. महाराजांनी केवळ भौगोलिक सीमा असलेले राज्य निर्माण केले नाही तर रयतेचे राज्य निर्माण केले. हे माझे राज्य आहे ही भावना अधिकाऱ्यांच्या आणि सर्वसामान्यांच्या मनात निर्माण करण्यात त्यांना यश मिळाले. यामुळेच मोगलांच्या झंझावातात आदिलशाही - कुतुबशाही नष्ट झाल्या मात्र स्वराज्य टिकून राहिले.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**टिपा लिहा -**

१) अष्टप्रधान मंडळ

२) शिवकालीन न्यायप्रशासन.

३) गोतसभा

४) शिवछत्रपतींचे आरमार

५) ब्रह्मसभा

**दीर्घोत्तरी प्रश्न -**

१) स्वराज्याची प्रशासकीय संरचना स्पष्ट करा

२) अष्टप्रधान मंडळाची रचना स्पष्ट करून त्याची वैशिष्ट्ये सांगा

३) शिवकालीन किल्ला प्रशासनाची माहिती द्या.

४) छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमाराची सविस्तर माहिती द्या

५) शिवकालीन न्यायदानाची रचना आणि वैशिष्ट्ये स्पष्ट करा

६) शिवाजी महाराजांचे आरमार विषयक धोरण स्पष्ट करा

## १.७ अधिक वाचनासाठीचे ग्रंथ


१) कुलकर्णी अ. रा., अशी होती शिवशाही, राजहंस प्रकाशन, पुणे, २००९

२) गायकवाड , सरदेसाई व इतर, मराठे कालीन संस्था व विचार , फडके प्रकाशन, कोल्हापूर , १९८७

३) कुलकर्णी अ. रा., देशपांडे प्र. न., मराठ्यांचा इतिहास ( भाग पहिला ), स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, नोव्हेंबर १९९५

४) आचार्य धनंजय, मराठा सत्तेचा उदय, श्री साईनाथ प्रकाशन, नागपुर, जानेवारी २००७

५) देव प्रभाकर, मराठ्यांचा इतिहास, विद्या प्रकाशन नागपुर

६) कृष्णाजी अनंत सभासद, सभासद बखर, संपादन पठाण यु. म. स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, मार्च २०००

७) पवार जयसिंगराव व इतर (संपा.), छत्रपती शिवाजी महाराज स्मृतिग्रंथ, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ पुणे, २०११

८) बेंद्रे वा. सी., छत्रपती शिवाजी महाराज ( उत्तरार्ध ), पार्श्व पब्लिकेशन, कोल्हापूर, मार्च २०१३

९) Balkrishana, Shivaji The Great Vol. IV, Edited by Dr. Jaysingrao Pawar, Shahu Research Centre, Shivaji University, Kolhapur, 2018.

# सत्र २ : घटक २

# अर्थव्यवस्था
## (Economy)

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ शेती (Agriculture)

२.२.२ उद्योग (Industry)

२.२.३ व्यापार (Trade)

२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ स्वाध्याय

२.७ अधिक माहितीसाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्टे

हा घटक अभ्यासल्यानंतर आपल्याला -

- शिवकालीन मराठा राज्याचे आर्थिक स्वरूप लक्षात येईल.
- शिवकालीन शेतीविषयी माहिती मिळेल.
- शिवकालीन महत्त्वाच्या उद्योग व्यवसायांचे आकलन होईल.
- शेती, उद्योग व व्यापाराचे शिवकालीन अर्थव्यवस्थेमधील महत्त्व लक्षात येईल.
- शिवाजी महाराजांनी शेती, उद्योग व व्यापाराच्या विकासासाठी दिलेल्या योगदानाची माहिती मिळेल.

## २.१ प्रास्ताविक

मराठा राज्याचा वस्तुनिष्ठ अभ्यास करण्यासाठी न्या. एम. जे. रानडे पासून इतिहास अभ्यासकांची एक फळी निर्माण झाली. त्यांनी अस्सल मराठी साधनांबरोबरच फारसी व परकीय भाषेतील साधनांचा अभ्यास केला आणि मराठा राज्याबद्दल पूर्वग्रहदूषित लिखाण झाले होते, ज्यामुळे अनेक गैरसमज निर्माण झाले ते या अभ्यासकांनी खोडून काढले, मराठा राज्याच्या उदयापासून ते अस्तापर्यंत असलेल्या विविध कारणांचा आढावा घेतला. यामध्येही मराठा राज्याच्या आर्थिक परिस्थितीकडे या अभ्यासकांनी फारसे लक्ष दिले नाही. पण अलीकडे या दुर्लक्षित अभ्यासाकडे अनेक इतिहास अभ्यासकांनी आपले लक्ष केंद्रीत केले आहे. त्यामध्ये टी. टी. महाजन यांनी मराठी सत्तेच्या उदयाला आर्थिक परिस्थिती कशी कारणीभूत होती हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

मराठी सत्ता दीर्घकाळ का टिकू शकली नाही याचे मुख्य कारण म्हणजे मराठी राजांनी आपल्या प्रदेशाच्या आर्थिक विकासाची मजबूत पायाभरणी केली नाही असे म्हटले जाते. विशेषत: वंग (बंगाली) इतिहासकार जदुनाथ सरकार यांनीही मराठ्यांनी राज्याच्या आर्थिक विकासाकडे दुर्लक्ष केले होते (Neglected the economic development of the state) असे म्हटले आहे.

शिवाजी महाराजांच्या कालखंडात तरी हे विधान पूर्णपणे लागू करता येणार नाही. कारण शिवाजी महाराजांच्या राजमुद्रेमध्येच 'मुद्रा भद्राय राजते' असा उल्लेख आहे. म्हणजेच हे राज्य सर्वांच्या आनंद व कल्याणासाठी आहे असा त्याचा अर्थ आहे. त्यादृष्टीने त्यांनी आपल्या नवनिर्मित 'स्वराज्याला' आपल्या जीवनाच्या अत्यल्प काळात फक्त सार्वभौम राज्यच बनविले नाही तर आर्थिकदृष्ट्या टिकाव धरू शकेल असे त्यास समर्थ बनविले होते.

सन १६३० च्या दुष्काळामुळे उध्वस्त झालेल्या प्रदेशाला शिवाजी महाराजांनी स्वत:च्या प्रयत्नांनी आर्थिकदृष्ट्या एक सक्षम राज्य बनविले. शेतीला संरक्षण व उत्तेजन देऊन स्वदेशी उद्योगांना विकसित केले. व्यापार व वाणिज्याला उत्तेजन दिले. तरुण व हुशार लोकांच्यातील सुप्त गुणांचा वापर करून, त्यांच्यामधील विश्वासू लोकांचे जाळे आपल्याभोवती निर्माण केले. अशा सर्व राजकीय धोरणांचा व संकल्पनांचा वापर करून शिवाजी महाराजांनी आपले राज्य विस्तारले. मराठा प्रदेशातील लोकांच्या इच्छा व निर्णयशक्तीद्वारे, त्यांच्याकडून एका स्वायत्त स्वराज्याची निर्मिती करून, त्याचा आर्थिक पाया भक्कम करून स्वराज्याची निरंतर जोपासना केली.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ शेती (Agriculture)

शिवकाळात शेती हाच लोकांच्या जीवनाचा मुख्य स्त्रोत होता. बहुतांशी लोक शेती व्यवसायावर अवलंबून होते. जमीन किंवा भूमी लोकांच्या जीवनामध्ये महत्त्वाची भूमिका पार पाडत असल्यामुळे जमीनीला 'भूमाता, काळी आई' असे म्हटले जात असे. जमीन महसूल हा राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य आधार होता. त्यामुळे शिवकाळात जास्तीत जास्त शेती लागवडीखाली आणण्यासाठी सरकार तर्फे शेतकऱ्यांना उत्तेजन दिले जाई. त्यासाठी नवीन लागवडीखाली आणलेल्या जमिनीवर सुरुवातीला काही काळ जमीन महसूलात सुट देणे, शेतीसाठी जनावरे, अवजारे, बी-बियाणे खरेदी करण्यासाठी सरकार तर्फे तगाई (कर्ज) देणे, यासारख्या बाबींचा सरकार मार्फत अवलंब केला जात असे.

**अ) शेतकरी व त्यांच्या गरजा :**

शेतकरी हा समाजाचा उत्पादक घटक होता. तत्कालीन कागदपत्रात शेतकऱ्यांचा उल्लेख रय, रयत, कुणबी, मुजेरी (Mujeri) कुलवाडी (Kulvadi) असा केला जाई. शेतकरी हे सर्वसामान्यपणे मराठा जातीतील असत. १७ व्या शतकातील बहुतांशी शेतकरी हे सतत संकटाखाली होते. अनिश्चित पर्जन्यमान, वन्यश्वापदांचा त्रास, सतत चालणारी युद्धे, अपुरी जलसिंचन व्यवस्था, अपुरी चलन व्यवस्था, करांचे ओझे यासारखे घटक शेती व शेतकरी यांच्या मागासलेपणाचे प्रमुख कारण होते. शिवाय या काळात महाराष्ट्रामध्ये घडत असलेल्या विविध राजकीय घडामोडींचे पडसाद शेतकऱ्यांच्या जीवनावर पडत होते. शेती व्यवसाय करण्यासाठी शेतकऱ्यांना वेगवेगळ्या घटकांची गरज लागत असे. त्यांची थोडक्यात माहिती पुढीलप्रमाणे.

**१) मनुष्यबळ (Man Power) :**

शिवकाळात शेती व्यवसायासाठी मनुष्यबळ ही एक महत्त्वाची गरज होती. शिवाजी महाराजांनी केलेली स्वराज्य स्थापना, त्यामुळे तरुणांचा मोठ्या प्रमाणात लष्करात झालेला समावेश, तसेच दुष्काळ व रोगराई यासारख्या आपत्तीमुळे होणारी प्रचंड जिवितहानी, यामुळे शेतीकरिता मनुष्यबळाचा मोठा प्रश्न निर्माण होत असे.

**२) बैलजोडी (Pair of Bullocks) :**

शेतकऱ्यांची दुसरी महत्त्वाची गरज म्हणजे बैल जोडी. आजच्या प्रमाणे शेतीचे यांत्रिकीकरण झाले नव्हते. सततच्या युद्धजन्य परिस्थितीमुळे शत्रूपक्षाकडून जनावरे पळवून नेण्याचे प्रकार सतत घडत. त्यामुळे शेतकऱ्यांची अर्थव्यवस्थाच मोडकळीस येत असे.

### ३) शेतीची अवजारे :

शेती व्यवसायासाठी नांगर, कुळव, तिफण, कोळपा, निलंगा, पाटे, बैलगाडी यासारख्या अवजारांची गरज असे.

### ४) बी-बियाणे (Seeds) :

शिवकाळात शेतकरी शेतातून चांगल्या प्रकारे उत्पादन झालेल्या उत्पन्नातील काही भाग बियाणे म्हणून बाजूला काढून काळजीपूर्वक जतन करून ठेवीत असे.

### ५) खत :

शेतीमधून चांगले उत्पन्न घेण्यासाठी शिवकाळात शेतकरी प्रामुख्याने शेणखतांचा वापर करीत असत. शेळ्या व मेंढ्यांना शेतात बसवून त्यांच्या मल-मूत्राचा वापर उत्पन्न चांगले येण्यासाठी केला जात असे.

## ब) जमिनीचे स्वरूप व प्रकार :

आजच्याप्रमाणेच महाराष्ट्रातील जमीन विविध प्रकारची होती. पण साधनांच्या कमतरतेमुळे ती आजच्याप्रमाणे मोठ्या प्रमाणावर लागवडीखाली नव्हती.

शिवकाळात जमिनीचे प्रामुख्याने दोन विभाग पाहून ज्या भागावर लोक वसाहत करून राहत तिला 'पांढरी आई' तर ज्या भागावर शेती केली जाई तिला 'काळी आई' म्हणत असत. शिवकाळात 'काळ्या आई'चे प्रामुख्याने वांजट जमीन व लागवडीखालील जमीन असे दोन प्रकार होते.

### १) वांजट जमिन :

ज्या जमिनीवर पिकांची प्रत्यक्ष लागवड केली जात नसे अशा पडीक, नापीक जमिनीला शिवकालीन कागदपत्रात वांजट जमीन म्हटलेले दिसते.

### २) लागवडीखालील जमीन :

जमिनीवर प्रत्यक्षात पिकांची लागवड होत असे अशा जमिनीला लागवडीखालील जमीन म्हणत असत. या जमीनीचे पुन्हा तिच्या सुपीकतेवरून अव्वल (उत्तम), दुम (मध्यम), सीम (कनिष्ठ) आणि चारहम असे उपप्रकार शिवकाळात पाडण्यात आले होते. याशिवाय या जमीनीत तिच्यामध्ये घेतल्या जाणाऱ्या पिकांच्या आधारे जिराईत व बागाईत असे दोन प्रकार पाडण्यात आले होते.

### (१) जिराईत जमीन :

जिराईत जमिनीमध्ये सर्वसाधारण पिके घेतली जात असत. या जमीनीमध्ये खरीप हंगामामध्ये प्रामुख्याने पावसाच्या पाण्याच्या आधारे पिके घेतली जात. शिवकाळात बहुतांशी जमीन जिराईत जमीन होती.

### (२) बागाईत जमीन :

बागाईत जमीनीमध्ये प्रामुख्याने नगदी पिके घेतली जात. ज्या ठिकाणी बारमाही पाण्याची सुविधा उपलब्ध आहे अशा ठिकाणच्या जमीनीला बागाईत जमीन म्हणत असत. शिवकाळात बागाईत जमीनीचे प्रमाण खूपच कमी होते.

याशिवाय पाण्याच्या उपलब्धतेवरून जमीनीची पध्दतीनुसार पाट स्थळ व मोट स्थळ अशी वर्गवारी करण्यात आली होती.

### (१) पाट स्थळ :

ज्या जमीनीला कालवा, तळे, नदी यांचे पाटाच्या सहाय्याने जमीनीला पाणीपुरवठा होई, तिला पाटस्थळ म्हणत असत. काही ठिकाणी नदी, नाले, छोटे-छोटे ओढे यांना बांध घालून पाटाच्या सहाय्याने उताराच्या दिशेने शेतीला पाणी पुरवठा केला जात असे.

### (२) मोट स्थळ :

ज्या जमीनीला विहीरीतून मोटेच्या सहाय्याने पाणीपुरवठा होत असे तिला मोटस्थळ म्हणत असत.

जमीनीच्या वरील प्रकाराशिवाय जमीन धारणेवरून, मालकी हक्कांवरून शेतजमीनीचे (१) खालसा जमीन, (२) वतनी जमीन व (३) इनामी जमीन असे प्रकार पडत. वतनी व इनामी जमीनीमध्ये अग्रहार इनाम, देवस्थान इनाम, दिवाण निसबत इनाम, गावनिसबत इनाम, ग्राम अधिकारी, कारागीर व बलुतेदारांना दिलेल्या वतनी इनाम, दूधभात, साडीचोळी इनाम, चोळखण इनाम इ. वेगवेगळे प्रकार असत.

## क) मराठेकालीन कृषी तंत्र :

शिवकाळात शेती ही पारंपारिक स्वरूपाची होती. शेती ही प्रामुख्याने निसर्गावर, पावसाच्या प्रमाणावर अवलंबून होती. जलसिंचनाच्या सुविधा फारशा उपलब्ध नसल्यामुळे बहुतांशी शेती ही कोरडवाहू किंवा जिराईत शेती होती. बागाईती शेती फारच तुरळक होती. शेती ही पारंपारिक पद्धतीने

केली जाई. पिके काढल्यानंतर बैलांच्या सहाय्याने लाकडी नागराचा वापर करून शेत जमीनीची नांगरणी केली जात असे. शेतकरी स्वत: जवळचे घरातील धान्य बियाणे म्हणून वापरत. त्यानंतर मनुष्यबळाच्या सहाय्याने खुरपणी व इतर कामे केली जात असत. पीक तयार होताच त्याची काढणी, मळणी केली जात असे. एकंदरीत मराठा काळातील कृषितंत्र पारंपरिक स्वरूपाचे होते. शेतीची कामे ही जास्तीत जास्त मनुष्यबळाच्या सहाय्याने केली जात होती. त्याचबरोबर जनावराचांही वापर केला जात होता. या काळात शेतीसाठी वापरली जाणारी अवजारे, त्यामध्ये नांगर, कुळव, तिफण, कोळपा, बिलंगा, पाटे ही देखील गावातीलच सुतार, लोहारांकडून तयार केलेली, फारशी प्रगत नसलेली दिसतात.

## ड) शेती/कृषि उत्पादने (Agriculural Production) :

जमीनीची उत्पादकता आणि पाण्याची उपलब्धता यावरून कृषि उत्पादने निश्चित होतात. ज्यावेळी शेतकरी फक्त पावसाच्या पाण्यावर पावसाळ्यात पिके घेतो त्यास खरीप पिके म्हणतात. त्यामध्ये बाजरी, ज्वारी, तांदूळ, नाचणी व कडधान्यांचा समावेश होत असे. तर ज्याठिकाणी नद्या, विहिरी, तलाव, कालवे यासारख्या साठवणुकीच्या साधनांतून पाण्याची उपलब्धता होत असे अशा ठिकाणी शेतकरी बाजारपेठेसाठी पैसा मिळवून देणाऱ्या पिकांचे उत्पादन घेत असत. त्यांना रब्बी पिके म्हणत. त्यामध्ये प्रामुख्याने ऊस, कापूस, हळद, कांदा, लसूण, फळे, भाजीपाला यांचे उत्पादन शिवकाळात घेतले जाई. जेथे जास्त उत्पादन होत असे तेथील उत्पादन बाजारपेठेसाठी पाठविले जात असे. तत्कालीन कागदपत्रामध्ये अन्नधान्य, कडधान्ये, तेलबिया, नगदी पिके आणि मिश्र पिके असे पिकांचे वर्गीकरण केलेले आढळते. कोकणामध्ये मुख्यत: तांदूळ व नाचणी ही पिके मोठ्या प्रमाणावर घेतली जात. त्याशिवाय वरी, तूर, मुग, कुळीथ, हरभरा, काळा हरभरा त्याचबरोबर आंबा, चिंच, कवठ, बोरे, सिताफळे, रामफळे या फळांचेही उत्पादन होत होते. तर देशावर प्रामुख्याने ज्वारी, बाजरी, ऊस, गहू, तांदूळ ही पिके तर वऱ्हाडात कापूस, गहू व ज्वारी ही पिके घेतली जात.

शिवकाळात घेतल्या जाणाऱ्या कृषि उत्पादनाचे वर्गीकरण प्रामुख्याने पुढीलप्रमाणे करता येईल.

### १) अन्नधान्य पिके :

ज्या पिकांचा वापर स्थानिक लोकांच्या दैनंदिन आहारामध्ये मोठ्या प्रमाणावर होतो. त्या पिकांना अन्नधान्याची पिके म्हणतात. शिवकालीन अन्नधान्य पिके पुढीलप्रमाणे, ज्यात तांदूळ, नाचणी, ज्वारी, बाजरी, गहू इत्यादीचा समावेश होता.

## २) कडधान्ये :

शिवकाळात कडधान्यांमध्ये प्रामुख्याने तूर, मुग, मसूर, उडीद, मटकी, हुलगा, हरभरा इ. पिकांचे उत्पादन घेतले जात असे. या काळात लोकांच्या आहारात कडधान्यांचा समावेश होत असल्याने कडधान्यांचे संपूर्ण स्वराज्यात कमी अधिक प्रमाणात उत्पादन होत असे.

## ३) विविध प्रकारची फळे :

शिवकाळात आंबा, चिंच, बोर, लिंबू, कवठ, केळी, फणस, रामफळ, सिताफळ ही फळझाडे वेगवेगळ्या ठिकाणी होती. कोकणात आंबा व फणसाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असे. खेड शिवापूरमध्ये आंब्याची बाग लावण्याचा उल्लेख तत्कालीन कागदपत्रात सापडतो.

## ४) नगदी पिके :

शिवकाळात अन्नधान्य पिकांबरोबरच काही प्रमाणात नगदी पिकांची लागवड केली जात असे. या नगदी पिकांच्या उत्पादनाचा वापर बाजारपेठेसाठी केला जात असे. यामध्ये ऊस, कापूस इत्यादीचा समावेश होता.

## ५) तेलबिया :

भूईमूग, तिळ, करडई, मोहरी या तेलबियांचे उत्पादन शिवकाळात होत असे. देशावर प्रामुख्याने तेलबियांचे उत्पादन घेतले जात असे.

## ६) मसाल्याचे पदार्थ :

शिवकाळात सूंठ, कांदा, लसूण, वेलची, दालचिनी, तमालपत्र, जिरे, जायपत्री, मिरे यासारख्या मसाल्याच्या पदार्थांचे उत्पादन होत असे. विशेषत: कोकण मसाल्याच्या पदार्थांसाठी प्रसिद्ध होता. वरील पिकांच्या उत्पादनाबरोबरच शिवकाळात नारळ, सुपारी, वरी, हळद, तंबाखू या पिकांचेही उत्पादन होत असे.

## इ) पाणीपुरवठा (Irrigation) :

शेती अर्थव्यवस्थेमध्ये सर्वात महत्त्वाचा घटक हा पाणीपुरवठा असतो. पावसाची उपलब्धता व त्याचे नियोजन यांनी शेती अर्थव्यवस्था प्रभावित होते. शेती उत्पादन वाढविण्यासाठी पाण्याची अत्यंत गरज असते. शेती उत्पादन वाढल्यावर आपोआपच सरकारच्या महसूलातही वाढ होते. शिवाजी महाराजांनीही शेतीचा विकास करण्यासाठी पाणीपुरवठ्याच्या साधनांचा विकास करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. शिवकाळातील स्वराज्यातील शेती ही पावसावर अवलंबून होती. त्यामुळे पावसाच्या

लहरीपणाचा फटका वारंवार शेतकऱ्यांना सहन करावा लागे. त्यामुळे जिराईत जमीन जास्तीत जास्त बागाईत करण्यासाठी सरकारतर्फे प्रयत्न केले जात असत. शिवकाळात बागाईत शेतीचे प्रमाण अत्यल्प होते. स्वराज्याचा प्राकृतिक भूभाग विचारात घेता जी काही बागाईत शेती होती ती पारंपरिक विहिरी, तलाव, नदींच्या पाटाच्या पाण्यावर अवलंबून होती. शिवकाळात जो पाणीपुरवठा केला जाई त्याचे पाटस्थळ व मोटस्थळ असे दोन प्रकार पडतात.

**(१) पाटस्थळ :**

तलाव, नद्या-नाले किंवा छोटे-छोटे ओढे यातील अडविलेले पाणी नैसर्गिक उतारानुसार पाट काढून शेतीला दिले जाई. त्यास पाटस्थळ किंवा आडव्या पाटाचे पाणी असे म्हणत. पाटस्थळ ही पद्धत पावसाच्या प्रमाणावर अवलंबून होती. उन्हाळ्यामध्ये याचा वापर होत नसे, कारण उन्हाळ्यामध्ये ओढे, तलाव, नद्या कोरड्या पडलेल्या असत.

**(२) मोटस्थळ :**

दोन किंवा चार बैलांचा वापर करून मोटेच्या सहाय्याने विहिरीतून पाणी काढून ते शेतीला दिले जाई. त्यास मोटस्थळ असे म्हणत. ही मोट बहुतांशी चामड्याची बनविलेली असे. बऱ्याचवेळा या मोटस्थळ साधनांनाही मर्यादा होती. कारण विहिरींची संख्या मर्यादित होती.

**ई) शेतकऱ्यांसमोरील संकटे :**

शिवकाळात शेतकऱ्यांना अवर्षण, दुष्काळ, महापूर, रोगराई यासारख्या नैसर्गिक आपत्तीबरोबरच सतत चालणारी युद्धे, त्यामुळे शत्रूकडून होणारे शेतीचे नुकसान, त्याशिवाय शत्रूकडून होणारा अन्याय यासारख्या मानवनिर्मित आपत्तींनाही वारंवार तोंड द्यावे लागत होते.

**१) नैसर्गिक संकटे / आपत्ती :**

पाणीपुरवठ्याच्या फारशा सुविधा उपलब्ध नसल्यामुळे शिवकालीन शेती ही पर्जन्यावर अवलंबून होती. निसर्गाची अवकृपा झाली तर दुष्काळ, अवर्षण, अतिवर्षण, महापूर, रोगराई यासारख्या नैसर्गिक संकटांना शेतकऱ्यांना सामोरे जावे लागत असे. दुष्काळामुळे तर अख्खी गावेच्या गावे ओस पडत. त्यावेळी शेतकऱ्यांना प्रचंड दुःख, हाल-अपेष्ठांना सामोरे जावे लागत असे. १६३० च्या दुष्काळाबाबत पातशहानामा ग्रंथात म्हटले आहे की, 'दक्षिण देश निदान एका पिढीपर्यंत दरिद्री राहिला.' याबरोबरच पिक तयार होताना जंगली जनावरांचा त्रास, पक्ष्यांचा त्रास, यामुळे शेतकऱ्यांना दिवसरात्र आपल्या शेतातच जागत राहावे लागत असे.

## २) मानवनिर्मित संकटे/आपत्ती :

सततच्या युद्धमोहिमांमुळे शत्रू सैनिकांकडून कधी पिकांचे नुकसान होईल याचा अंदाज नसे. शिवाय शत्रूसैन्ये शेतकऱ्यांची गुरे-ढोरे पळवून नेत, उभ्या पिकांचे नुकसान करीत, आपल्या घोड्यांना चारा म्हणून पिकांचा वापर करीत, शेतकऱ्यांवर जुलम जबरदस्ती करून स्त्रियांना पळवून नेत. त्यामुळे शत्रूसैन्याच्या आगमनाची चाहूल लागताच शत्रूसैन्याच्या भीतीने गावेच्या गावे परागंदा होत. याबरोबरच स्वराज्यातील जमिनदार, वतनदार व शासकीय अधिकाऱ्यांकडून काही वेळा शेतकऱ्यांवर अन्याय होत असे.

## ए) जमीन महसूल (Land Revenue) :

शिवकाळात जमीन महसूल हाच राज्याच्या उत्पन्नाचा मुख्य आधारस्तंभ होता. कारण बहुतांशी लोकांचा व्यवसाय शेती होता. राज्याची अर्थव्यवस्था शेती व शेतीशी पूरक व्यवसायावर आधारित असल्याने शिवाजी महाराजांनी जमीन महसूल पद्धतीत सुधारणा करून त्यामध्ये पारदर्शकता आणली. जमीन महसुलातील पूर्वीच्या त्रुटी लक्षात घेऊन त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी शिवाजी महाराजांकडून तीन वेळा जमीनीची मोजमापणी करून सारा निश्चित केला गेला. दादोजी कोंडदेव यांनी सन १६३६ मध्ये प्रथमत: जमीनीची मोजमापणी करून सारा निश्चित केला. त्यानंतर सन १६४८-४९ च्या दरम्यान मोरोपंत पिंगळे या शिवाजी महाराजांच्या पेशव्याने सारा निश्चित करण्याचा प्रयत्न केला. तिसरा प्रयत्न सन १६७३ नंतर अण्णाजी दत्तोने केला.

सुरुवातीला अण्णाजी दत्तोने प्रत्येक गावातील लागवडीखाली असणाऱ्या जमिनीची यादी तयार केली. त्यानंतर या जमीनीची अव्वल, दुम, सिम व चारसीम (अनुक्रमे पहिल्या प्रतीची, दुसऱ्या प्रतीची, तिसऱ्या प्रतीची व चौथ्या प्रतीची जमीन) अशी जमीनीची तिच्या प्रतवारीनुसार वर्गवारी लावली. याननंतर अण्णाजी दत्तोने प्रत्येक जमीनीमध्ये येणारे पिक कोणते, त्या जमीनीमध्ये वर्षातून एकदाच पिके घेतली जातात की दोनदा पिके घेतली जातात, प्रत्येक बिघ्यात साधारणत: किती उत्पादन होते, तसेच एखाद्या जमीनीच्या तुकड्यावर जास्तीत जास्त कष्ट केले तर त्यातून किती उत्पन्न वाढेल याची यादी तयार केली. अण्णाजी दत्तोने बिघावणी व पिकपाहणी करण्याचे काम परगण्यातील देशमुख, देशपांडे, गावातील पाटील, कुलकर्णी आणि गावातील प्रतिष्ठित नागरिक यांच्यावर सोपविले. यामुळे सर्वसामान्य लोकांच्या मनातील भीती व गोंधळ नष्ट झाला व रयतेला सुख मिळाले. गावातील

लोकांचाही सारा ठरविण्याच्या कामी उपयोग करून घेतल्याने डॉ. बाळकृष्ण यांनी अण्णाजी दत्तोच्या सारा आकारणी पद्धतीला लोकांची धारापद्धती (Peoples Settlement) असे म्हटले आहे.

**सारा आकारणीची तत्वे :**

**१) जमीनीची मोजणी :**

शिवाजी महाराजांनी जमीन महसूल निश्चित करण्याकरीता मलिक अंबरच्या जमीन मोजणी पद्धतीमध्ये काही बदल करून आपली जमीन मोजणी पद्धत सुरू केली. शिवकाळात जमीन मोजण्यासाठी काठीचा उपयोग केला जात असे. त्या काठीला शिवशाही काठी म्हणत. ही काठी पाच हात व पाच मुठी लांबीची असे. एक हात चौदा तसूंचा आणि हात व मुठी मिळून ८२ तसू काठीची लांबी असे. २० चौरस काठ्यांचा एक बिघा व १२० बिघ्यांचा एक चावर होत असे. जमीनीच्या या मोजणीला बिघावणी, चावरणी अथवा चकवादी म्हणत. जमीन मोजणी करताना प्रत्येक खेड्यातील एकंदर जमीन किती, त्यात पिकाऊ किती व पडीक किती याची नोंद ठेवली जात असे.

**२) जमीनीची वर्गवारी :**

शिवकाळात सारा आकारणीसाठी गावातील फक्त लागवडीखालील जमीनीचाच विचार केला जात असे. वांजट (पडीक) जमीन, जंगल, कुरण याखालील जमिनीचा विचार केला जात नसे. लागवडीखालील जमिनीचे अव्वल, दुम, सीम व चारसीम अशी जमीनीच्या सुपिकतेनुसार प्रतवारी पाडून या प्रतवारीनुसार सारा आकारणी केली जात असे.

**३) महसूलाचे प्रमाण :**

शिवकाळात जमीनीच्या प्रतवारीनुसार व पिकांनुसार महसूलाचे प्रमाण निश्चित करण्यात आले होते. कृष्णाजी अनंत सभासद जमीन महसूल आकारणीबाबत म्हणतात की, ''बिघेयास पिकाचा आकार करून पाच तक्षिमा (भाग) पिकाच्या करून तीन तक्षिमा रयतेस द्याव्या, दोन तक्षिमा दिवाणात (सरकारात) घ्याव्या, येणेप्रमाणे रयतेपासून घ्यावे''. यावरून असे दिसते की एकूण उत्पन्नाच्या चाळीस टक्के शेतसारा आकारला जात असावा. तत्कालीन काळात स्वराज्याच्या बाहेरच्या प्रदेशात हा महसूल दर १/२ असा होता. शिवकालीन कागदपत्रामध्ये शेतसाऱ्याचा उल्लेख 'राजभाग पचादुई' असा सापडतो.

**४) जमीन महसूल गोळा करण्याची पद्धत :**

ज्यावेळी जमीन मोजणी, पिकपाहणी पूर्ण होऊन जमाबंदी म्हणजे सारा आकारणी किंवा निश्चिती केली जात असे त्यावेळी महसूल गोळा करण्यास सुरूवात होत असे. हा महसूल खरीप हंगाम संपल्यानंतर साधारणत: ऑक्टोबर महिन्यात व रब्बी हंगाम संपल्यानंतर साधारणत: मे महिन्यात असा दोन वेळा गोळा केला जात असे.

प्रथम थकबाकीदारांकडून महसूल वसूल करण्याचा प्रयत्न केला जात असे. तसेच एखाद्या वर्षी एखाद्या गावांकडून जास्त महसूल गोळा केला असेल तर पुढील वर्षी तेवढा महसूल कमी गोळा करण्याविषयी पाटलाला सूचना दिल्या जात. जर नैसर्गिक संकट किंवा शत्रूचा हल्ला होऊन पिकांचे नुकसान झाले असेल तर साऱ्यात सरकारकडून सूट दिली जात असे. शेतकऱ्यांच्या भाजीच्या देठालाही हात न लावण्याची सक्त ताकीद महाराजांनी आपल्या वसूली अधिकाऱ्यांना दिली होती.

**५) जलसिंचनासाठी उत्तेजन :**

जास्तीत जास्त शेती बागाईत करण्यासाठी सरकारतर्फे शेतकऱ्यांना प्रोत्साहन दिले जात होते. बऱ्याचवेळा सरकारतर्फे किंवा लोक एकत्र होऊन नद्या, ओढ्यांना बांध घालून शेतीसाठी सिंचनाची व्यवस्था केली जाई. यासाठी शिवाजी महाराजही आग्रही होते. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे शिवापूर येथील एका धरणाचे पाणी एका मोठ्या खडकामुळे शेतकऱ्यांना शेतीस देता येत नव्हते. अशावेळी तो खडक फोडण्याची कामगिरी महाराजांनी येस पाटील कोंढवेकर यास सांगितली. येस पाटलाने मोठ्या परिश्रमाने ही जबाबदारी पार पाडली. तेव्हा महाराजांनी त्यास सिंहगडाच्या पायथ्याशी एक पाटीलकी बक्षीस म्हणून दिली. अशाप्रकारे रयतेस जास्तीत जास्त सवलती देऊन त्यांच्या कल्याणाचा शिवाजी महाराजांनी सातत्याने विचार केला. म्हणूनच त्यांना 'रयतेचा राजा' असे म्हटले जाते.

**स्वयं अध्ययन प्रश्न - १**

**(अ) रिकाम्या जागा भरा / योग्य पर्याय निवडा.**

१. नदीच्या किनारी असलेल्या जमिनीला ....... असे म्हणत.

(१) माळव (२) रेगूर

(३) तांबडी (४) वरकस

२. ज्याठिकाणी बारमाही पाण्याची सुविधा उपलब्ध आहे अशा प्रकारच्या जमीनीला ..... जमीन म्हणत असत.

(१) कोरडवाहू (२) बागाईत

(३) जिराईत (४) खरीप

३. ज्यावेळी शेतकरी फक्त पावसाच्या पाण्यावर पावसाळ्यात पिके घेतो त्यास .... पिके म्हणतात.

(१) रब्बी (२) बागाईत

(३) खरीप (४) नगदी

४. शिवकाळात जमिनीच्या सुपिकतेवरून अव्वल, ......... सीम व चारसीम हे उपप्रकार पाडण्यात आले होते.

(१) तांबडी (२) रेगूर

(३) गाळाची (४) दुम

५. शिवाजी महाराजांच्या काळात ....... वेळा जमिनीची मोजणी करून सारा निश्चिती करण्यात आली होती.

(१) तीन (२) चार

(३) दोन (४) पाच

### २.२.२ उद्योग (Industry) :

शिवकाळात खेडे हा लोकांच्या आर्थिक जीवनाचा पाया होता आणि शेती व्यवसाय हा या जीवनाचा मानबिंदू होता. त्यामुळे शेतीशी निगडीत अनेक उद्योग व्यवसाय खेडेगावातून निर्माण झाले. त्याचबरोबर काही उद्योग कसब्याच्या पेठेच्या ठिकाणी निर्माण झाले. त्यातील काही वस्तू परदेशात निर्यातही होत होत्या. असे असले तरी या काळातील उद्योग बाल्यावस्थेत होता. शिवाजी महाराजांनी उद्योग वाढीसाठी उत्तेजन देऊन प्रसंगी उद्योगांच्या संरक्षणाचे धोरणही स्वीकारले होते.

**१) ग्रामीण उद्योग व्यवसाय :**

शिवकाळात खेडेगाव हे स्वावलंबी असल्यामुळे खेडेगावात शेतीबरोबरच निरनिराळे उद्योग व्यवसाय निर्माण झाले. हे उद्योग बहुतांशी शेतीशी पूरक होते. गाव वसवण्यासाठी जशी शेतकरी रयतेची गरज असे तशी शेतीशी निगडीत वस्तू तयार करणाऱ्या कारागिरांचीही गरज असे. शिवकाळात ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये ‘गावगाडा’ हा महत्त्वाचा भाग होता. शिवकाळात गाव हे सामाजिक व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होते. म्हणजेच गावातील सर्व गरजा शेतकरी व कारागिरांकडून एकमेकांच्या सहकार्याने भागविल्या जात होत्या. गावाबाहेरून फक्त काही अपवादात्मक वस्तूच आयात केल्या जात होत्या. गावात निर्माण झालेले वादविवाद, तंटे, बहुतांशी गावातील प्रतिष्ठित लोकांकडून सोडविले जात.

बलुतेदार व अलुतेदार हे खेडेगावात व्यवसाय करणारे कारागीर होते. शेतकरी शेती करीत असत तर शेतकऱ्यांना वर्षभर लागणाऱ्या वेगवेगळ्या वस्तू बलुतेदार व अलुतेदार तयार करीत असत. त्या मोबदल्यात त्यांना ‘बलुता’ स्वरूपात धान्य शेतकऱ्यांकडून मिळत असे.

शिवकालीन राजकवी परमानंद याच्या अणुपुराण अथवा शिवभारत या काव्यात सतराव्या शतकातील काही व्यवसायांचे उल्लेख आलेले आहेत. त्यामध्ये सोनार, लोहार, चांभार, कुंभार, सुतार, परीट, न्हावी, कोष्टी, बाणकरी, मांग, तेली, धनगड, कोमटी, तांबट, महार, तांबोळी, साळी, सनगर, माळी, गवंडी, रंगारी इ. कारागीर व्यवसायाचे उल्लेख आहेत.

कारागीर व्यावसायिकांच्या कामाचे स्वरूप पाहता शेतकरी शेती उत्पादन करीत, सुतार गावातील लोकांना लाकडाची हत्यारे, अवजारे बनवून देत, लोहार लोखंडाची हत्यारे अवजारे बनवून देत, सोनार सोन्याची आभूषणे व दागिने बनवून देत, चांभार जनावरांच्या चामड्याची पादत्राणे व चामडी वस्तू बनवून देत, तांबट धातूची भांडी बनवित, मांग दोरखंड तयार करीत, सनगर कांबळी तयार करीत, जिनगर घोड्याची जिन तयार करीत, गुरव झाडांच्या पानांपासून पत्रावळ्या बनवित, फुलारी फुलांचे हार तयार करीत, माळी फुलांच्या बागा पिकवीत, तांबोळी खाऊची पाने विकत, कासार काचेच्या बांगड्या विकत, भूतफरोशी मूर्ती विकत, कलाल दारू विकत, मुल्लाणी बकरे कापत, गवंडी घर बांधीत, रंगारी कपड्यांना रंग देत, शिंपी कपडे शिवत, तेली घाण्यातून तेल काढून देत, याशिवाय गायक, कलावंत, गारूडी लोकांचे मनोरंजन करीत. अशी वेगवेगळे व्यवसाय करणारी मंडळी शिवकालीन गावगाड्यात सहभागी झालेली दिसून येतात. या उद्योग व्यवसायांचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे या व्यावसायिक कारागिरांचा मुख्य आधार 'जात' हा होता. म्हणजे एखादी जात विशिष्ट असा व्यवसाय, उद्योग परंपरेने करीत आलेली होती. सुतार व लोहाराचा अपवाद वगळता जातीबाहेर जाऊन दुसऱ्या जातीचा व्यवसाय लोक करीत नसत. व्यवसाय निश्चितीमुळे प्रत्येकाला समाजामध्ये निश्चित स्थान व संरक्षण प्राप्त होत असे.

## २) शिवकालीन उद्योग :

शेती हा शिवकालीन ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा होता. गाव स्वयंपूर्ण होते. गावातील कारागीर त्या गावातील लोकांच्या गरजेइतपत उत्पादन करीत असले तरी काही उद्योग एकाद्या ठिकाणच्या भौगोलिक, नैसर्गिक परिस्थितीमुळे त्या ठिकाणी सुरू झाले आणि त्यांनी उत्पादित केलेल्या वस्तू निर्यातही होऊ लागल्या. असे काही शिवकालीन उद्योग पुढीलप्रमाणे सांगता येतील.

### १) मीठ उद्योग :

समुद्राच्या पाण्यापासून मीठ तयार करणे हा कोकण किनार पट्टीवरील एक महत्त्वाचा उद्योग होता. ठाणे, कुलाबा, पेण, पनवेल, राजापूर, नागोठाणे, रेवदंडा, कल्याण, भिवंडी याठिकाणी मिठागरे होती. शिवकाळात शेती व्यवसाय सांभाळून लोक मिठ निर्मितीचा उद्योग करीत होती. कोकणातील मिठागरांमध्ये तयार होणारे मिठ देशावर पाठविले जात असे. शिवकाळात तळ कोकणातून देशाच्या सर्व भागात मिठाचा व्यापार चालत असे. त्याबरोबरच परदेशातही मिठाची निर्यात होत असे.

## २) जहाजबांधणी उद्योग :

शिवकाळात कोकण किनारपट्टीवर जहाजबांधणीचा उद्योग सुरू होता. शिवाजी महाराजांनी कल्याण भिवंडीचा प्रदेश जिंकल्यानंतर आपल्या आरमार सज्जतेसाठी जहाजबांधणी उद्योग सुरू केला. कोकण किनारपट्टीवरील कल्याण, भिवंडी, मालवण, देवगड, राजापूर, पनवेल या ठिकाणी जहाजबांधणी व दुरुस्तीचा उद्योग चालू होते. याठिकाणी गुराबा, तराडी, गलबत, मचवा, पगार, पाल, तिरकटी, होडी, महागिऱ्या, शिबाड या मध्यम आकाराच्या जहाजांची निर्मिती होत होती. जहाजबांधणीसाठी आवश्यक असणारे सागाचे लाकूड मोठ्या प्रमाणात कोकणात उपलब्ध होत असे. शिवाय स्थानिक कारागीरही उपलब्ध होत असल्याने कोकण किनारपट्टीवर हा उद्योग मोठ्या प्रमाणात चालू होता.

## ३) लाकूड काम उद्योग :

शिवकाळात लाकूडकाम उद्योग विशेषत: कोकणामध्ये मोठ्या प्रमाणावर चाले. इमारत व जहाजबांधणीसाठी मोठ्या प्रमाणावर लाकडाची गरज असे. कोकणातील सागाच्या लाकडाचा उपयोग जहाजबांधणीसाठी केला जात असे. शिवाय इमारतीसाठी तुळ्या, खांब, दरवाजे यासाठी तसेच शेती अवजारांसाठीही लाकडाचा वापर केला जात असे. कोकणातील वसई याठिकाणी इमारती लाकूड तयार होत असे.

## ४) मत्स्योद्योग :

शिवकाळात कोकण किनारपट्टीवरील लोकांचा हा महत्त्वाचा उद्योग होता. भिवंडी, कल्याण, रोहा, पेण, पनवेल, रत्नागिरी, नागोठाणे या ठिकाणी मत्स्योद्योग मोठ्या प्रमाणावर चालत असे. कोकण किनारपट्टीवरील लोकांचा मासे व तांदूळ हा मुख्य आहार असल्याने त्यासाठी मासेमारी केली जात असे. शिवाय सुकवलेली खारी मासळी देशावर विक्रीसाठी पाठविली जात आसे.

## ५) कापड व रंग उद्योग :

शिवकालात पारंपरिक पद्धतीने हस्तकलाकार कापडाचे उत्पादन करीत असत. याकाळात सुती, रेशमी व लोकरी व चिटाचे कापड कमी-अधिक प्रमाणात तयार केले जाई. चिटापासून साड्या, पागोटी, रूमाल, टोप्या, पासोट्या इ. उत्पादित केले जाई. बुऱ्हाणपूर, सासवड, नागपूर याठिकाणी चिटाच्या कापडाचे उत्पादन होत होते. या काळात स्त्रिया सुती व चिटाच्या साड्या वापरत तर पुरूष धोतरे, तुमानी, पायजमे, अंगरखे, पागोटी, पगड्या इ. प्रकारची वस्त्रे वापरत. धोतराचे उत्पादन सासवड, सुपे, टाकळी, अष्टी, नागपूर, माहेश्वर, चांदवड, सोलापूर याठिकाणी होत असे. फैजपुर, नांदेड, कोटगिरी, जालना, शहादा, पैठण व जुन्नर याठिकाणी पागोटी व तिपट तर धनाबाद व वानापूर येथे फेट्यांचे उत्पादन होते होते. याबरोबरच कपड्यांना रंग देण्याचा कापड उद्योगाला पूरक रंग उद्योगही त्या त्या ठिकाणी चालत असे. कापड उद्योगाप्रमाणेच हा उद्योगही पारंपरिक स्वरूपात

चालू होता. याबरोबरच वेगवेगळ्या प्रकारचे नक्षीकामही केले जात असे. रंगकाम व छपाईच्या अनेक पद्धती या काळात अस्तित्वात होत्या.

**६) धातू उद्योग :**

सोने, चांदी, तांबे, पितळ, लोखंड या धातूंपासून शिवकाळात वेगवेगळ्या वस्तू बनविल्या जात होत्या. लोखंडापासून लोहार शेतीची अवजारे व युद्धोपयोगी साहित्य बनवित असे.

**७) गूळ उद्योग :**

शिवकाळामध्ये सातारा, पुणे, कोल्हापूर या भागामध्ये ऊसाचे उत्पादन होत होते. त्यामुळे या भागात ऊसापासून गुऱ्हाळ घरात गुळाचे उत्पादन होत होते. इंदापूर, कऱ्हाड, कोल्हापूर या गुळाच्या व्यापारपेठा शिवकाळात प्रसिद्ध होत्या. हा गूळ परदेशातही निर्यात होत होता.

शिवकाळात वरील प्रमुख उद्योग होते. शिवाजी महाराजांनी स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन दिले. स्थानिक उद्योगांना संरक्षण दिले. याचे उत्तम उदाहरण म्हणजे कोकणातील मिठ उद्योगाला त्यांनी दिलेले संरक्षण. एकंदरीत ग्रामीण अर्थव्यवस्था स्वयंपूर्ण असल्याने, शिवाय हा काळ सतत युद्धाच्या धामधुमीचा असल्याने याकाळात महाराष्ट्रात उद्योगांचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला नाही. हा काळ उद्योगांच्या बाल्यावस्थेचा होता.

## स्वयं अध्ययन प्रश्न - २ :

**योग्य पर्याय निवडा.**

१. शिवकाळात मूर्ती विकण्याचे काम ........... करीत असत.

(१) तांबट (२) भूतफरोशी

(३) माळी (४) सोनार

२. कोकणातील .... या ठिकाणी इमारतीचे लाकूड तयार केले जात असे.

(१) राजापूर (२) संगमेश्वर

(३) वसई (४) विजयदुर्ग

३. .......... व वानापूर येथे फेट्यांचे उत्पादन होत होते.

(१) धनाबाद (२) पूणे

(३) कल्याण (४) नाशिक

४. इंदापूर, कऱ्हाड व ........ या गुळाच्या व्यापारपेठा शिवकाळात प्रसिद्ध होत्या.

(१) पूणे (२) रायगड

(३) जुन्नर (४) कोल्हापूर

५. शिवकाळात जहाजबांधणी उद्योग कल्याण, .........., मालवण, देवगड वगैरे ठिकाणी चालू होता.

(१) भिवंडी (२) कऱ्हाड

(३) पूणे (४) रत्नागिरी

## २.२.३ व्यापार (Trade) :

प्राचीन काळापासून भारत हा आशिया खंडातील एक महत्त्वाचा व्यापारी देश आहे. प्राचीन व मध्ययुगीन काळात भारताचा व्यापार सागरी व खुष्कीच्या मार्गाने जगभरातील इतर देशांशी मोठ्या प्रमाणावर चालत होता. महाराष्ट्राचा विचार केल्यास मध्ययुगात महाराष्ट्राचा व्यापार थंडावला होता. कारण १३ व्या शतकापासून १७ व्या शतकापर्यंत यादवांचा काळ सोडल्यास महाराष्ट्र हा परकीय सत्ताधिशांच्या वर्चस्वाखाली होता. त्यामुळे व्यापारी वृत्तीस पोषक वातावरण या काळात निर्माण होऊ शकले नाही. त्यातच प्रतिकूल भौगोलिक परिस्थितीमुळे वाहतूक दळणवळणामध्ये अनेक अडचणी असल्याने महाराष्ट्राचा व्यापार भरभराटीला आला नाही. १७ व्या शतकात शिवाजी महाराजांनी केलेल्या स्वराज्य स्थापनेमुळे मराठी लोकांच्यात नव्या अस्मिता निर्माण झाल्या. त्यामुळे अनेक क्षेत्रात क्रांतिकारक बदल झाले. व्यापार उद्योगालाही नव्या संधी प्राप्त झाल्या. त्यामुळे व्यापार वाढीस लागला.

**१) व्यापाराचे प्रकार :**

शिवकालीन व्यापाराचे बहिर्गत किंवा सागरी व्यापार व अंतर्गत व्यापार असे दोन प्रकार होते.

**१) बहिर्गत किंवा सागरी व्यापार :**

कोरोमंडल, मलबार व गुजरात प्रमाणे महाराष्ट्रालाही कोकण किनारपट्टीवरील चांगल्या बंदराचे नैसर्गिक वरदान लाभले आहे. शिवकाळात तर कोकण किनारपट्टीवरील चौल, दाभोळ, कल्याण-भिवंडी, राजापूर, वेंगुर्ला, बांदा, पेण, डहाणू, माहिम, खारेपाटण ही व्यापारी केंद्रे भरभराटीला आलेली होती. या व्यापारी केंद्रातून आफ्रिका, अरबस्तान, एडन, ऑरमूझ, इराण तसेच युरोपियन देशांशी सागरीमार्गे व्यापार चालत असे. तसेच मलबार व गुजरात बरोबर आयात-निर्यात व्यापारही सागरी मार्गे चालत होता.

## २) अंतर्गत व्यापार :

प्रतिकूल नैसर्गिक व भौगोलिक रचना, पुरेशा दळणवळण साधनांचा अभाव व स्वयंपूर्ण ग्रामव्यवस्था यामुळे शिवकालीन महाराष्ट्रात अंतर्गत व्यापाराला मर्यादा पडत होत्या. तरी देखील आठवडी बाजार, कसबा, पेठा या अंतर्गत व्यापारी केंद्रातून वस्तूंची खरेदी-विक्री होत असे. महाराष्ट्रातील वेगवेगळ्या प्रदेशामध्ये वेगवेगळ्या वस्तूंचे उत्पादन होत असे. या वेगवेगळ्या वस्तूंचा वेगवेगळ्या प्रदेशामध्ये गरजेनुसार खरेदी-विक्रीचा व्यापार चालत असे. यामध्ये कोकणातून नारळ, सुपारी, विड्याची पाने, मसाल्याचे पदार्थ, फळे, नाचणी, अन्नधान्ये देशावर पाठविली जात तर देशावरून अन्नधान्ये, ज्वारी, बाजरी, गूळ, फळे या वस्तू कोकणामध्ये पाठविल्या जात होत्या.

## २) व्यापारी वस्तू (Articles of Trade) :

शिवकाळात बाजारपेठा, व्यापारी केंद्रातून वेगवेगळ्या वस्तूंची खरेदी-विक्री होत असे. तत्कालीन कागदपत्रावरील जकातकरांच्या दरांवरून समजते की, इंग्रज, पोर्तुगीज, डच, मुस्लिम, पर्शियन व्यापाऱ्यांकडून महाराष्ट्रातील मुख्य व्यापारी केंद्रातून वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तूंची खरेदी-विक्री होत असे. त्यांचे वर्गीकरण पुढीलप्रमाणे करता येईल.

### २.१ अन्नधान्ये (Foodgrains) :

तांदूळ, गहू, बाजरी, ज्वारी, नाचणी, मका ही अन्नधान्ये, मुग, मसुर, हरभरा, वरणा, उडीद, मटकी या डाळी तर भूईमूग, तिळ, मोहरी, करडई या तेलबियांचा समावेश व्यापारामध्ये होत होता. तांदळाचे विविध प्रकार या काळात प्रचलित होते.

### २.२ मसाले (Spices) :

मसाल्यांमध्ये लवंग, दालचिनी, जायपत्री, तमालपत्र, वेलदोडे, मोहरी, तिळ, जिरे, वेलची, आले, कांदा, लसूण, मिरे, हळद, मिरची, खोबरे, आक्रूड, मध, सुंठ इत्यादीचा समावेश होत होता.

### २.३ सुवासिक तेल :

चमेली, मोगरा, चंपा, गुलाब या सुवासिक तेलांचा तर केशर, कापूर, चंदन, गोपीचंद या सुगंधी पदार्थांचा व्यापारात समावेश होत होता.

### २.४ फळे (Fruits) :

फळामध्ये केळी, आंबा, बोर, नारळ, कलिंगडे, सिताफळे, रामफळे, फणस, काजू, चिंच, लिंबू या फळाचा शिवकालीन व्यापारात समावेश होत होता.

## २.५ खाद्यवस्तू :

खाद्यवस्तूंमध्ये दूध, तूप, लोणी, गूळ, खडीसाखर, मासे, मांस, विड्याची पाने याचा व्यापारामध्ये समावेश होत होता.

## २.६ कापड (Cloths) :

शिवकाळात महाराष्ट्रातील बाजारपेठांमध्ये ताफ्ता, शेला, साड्या, लुगडी, धोतरे, कांबळी, पासोटे, मलमल, कढ, पिंताबर, शाली, किनखाप, टोप्या, फेटे यासारख्या अनेक कापडी वस्तू बाजारपेठांमध्ये असत. तेलंगाण, मलबार, विदर्भ, गुजरात, बंगाल या भारताच्या वेगवेगळ्या प्रदेशातून वेगवेगळ्या प्रकारचे कापड व कापडी वस्तू महाराष्ट्रात येत असत.

## २.७ जनावरे (Animals) :

घोडे, उंट, हत्ती, बैल, गाय, म्हैशी, शेळ्या, मेंढ्या इ. जनावरे बाजारपेठेमध्ये खरेदी-विक्रीसाठी येत असत.

## २.८ गुलाम (Slave) :

या काळात स्त्री-पुरूष गुलामांची खरेदी-विक्री होत असे.

वरील वस्तूंशिवाय पादत्राणे, लहान बूट, कागद, फण्या, सुपे, साबण, मीठ, दोरखंड, कंदील, तंबाखू, खाद्यतेल, वेगवेगळ्या प्रकारची दारू, बैलगाड्या, वेगवेगळ्या धातूपासून बनवलेली शस्त्रास्त्रे, भांडी व शेती अवजारे, सोन्या-चांदीचे दागिने बाजारपेठांमध्ये खरेदी-विक्रीसाठी येत.

वर उल्लेख केलेल्या काही वस्तू भारताच्या एखाद्या प्रदेशातून किंवा परकीय देशातून महाराष्ट्रात विक्रीसाठी येत, तर काही वस्तू महाराष्ट्रातून निर्यात होत. परकीय व्यापाऱ्यांमध्ये प्रामुख्याने इंग्रज, डच, पोर्तुगीज, फ्रेंच, पर्शियन, अरब व्यापारांचा समावेश असे. यामध्ये इंग्रज तांबे, शिसे, लोखंड, बंदुकीची दारू, बंदुका, चांदी, पत्रा, लाख, कथील, कपडे; पोर्तुगीज रंगीत कपडे, सुत, दोर तर डच व्यापारी प्रामुख्याने तांब्याचा पुरवठा करीत असत.

## ३) प्रमुख व्यापारी केंद्रे व बाजारपेठा :

शिवकाळात महाराष्ट्रात आठवडी बाजार, कसबा अथवा पेठेच्या ठिकाणी लहानमोठ्या बाजारपेठा तयार झालेल्या होत्या. मोठ्या बाजारपेठाही शिवकालीन महाराष्ट्रात अस्तित्वात होत्या. अशा बाजारपेठा प्रामुख्याने कोकण किनारपट्टीवरील बंदरांच्या ठिकाणी निर्माण झाल्या होत्या. शिवकालीन बाजारपेठांचे समुद्र किनाऱ्यावरील बाजारपेठा किंवा व्यापारी केंद्रे व अंतर्गत बाजारपेठा किंवा व्यापारी केंद्रे असे वर्गीकरण करता येईल.

## ३.१ चौल (Caul) :

शिवकाळातील चौल हे एक दाट लोकवस्तीचे महत्त्वाचे व्यापारी बंदर सध्याच्या अलिबाग तालुक्यातील कुंडलिका नदीच्या मुखावर वसले आहे. याला मुर्तजाबाद असेही म्हणत असत. फार प्राचीन काळापासून चौल हे पश्चिम किनाऱ्यावरील व्यापारी केंद्र म्हणून प्रसिद्ध होते. सन १६७० नंतर शिवाजी महाराजांच्या ताब्यात हे बंदर आले. या बंदरातून निळ, रेशीम, अफू, कलाकसुरीच्या वस्तू व घोड्यांचा मोठ्या प्रमाणावर व्यापार चालत होता. चौल याठिकाणी पोर्तुगीजांची वखार होती. युरोपातील वेगवेगळे देश, अरबस्थान, इराण या परकीय देशांबरोबरच मलबार, खंबायत व गुजरात या देशांतर्गत प्रदेशाशी चौल बंदरातून व्यापार चाले. मलबार येथून चौल बंदरात येणारी जहाजे मसाले, सुपारी, नारळ, औषधे, पारा घेऊन येत. या वस्तू येथून गुजरात, खंबायतलाही पाठविल्या जात आणि जाताना परतीच्या प्रवासात कापड, गहू, धान्य, तलम मलमल, रेशीम व सुती कापड घेऊन जात. चौलला भेट दिलेला डॉ. फ्रायर हा परकीय प्रवाशी चौलबाबत म्हणतो, ''दक्षिणेकडून येणाऱ्या मालाची ही एक उत्कृष्ठ बाजारपेठ होती.''

## ३.२ दाभोळ :

कोकण किनारपट्टीवरील वशिष्ठी नदीच्या मुखाशी वसलेले दाभोळ हे दाट लोकवस्तीचे एक व्यापारी केंद्र होते. इ.स. १६६२ मध्ये दाभोळ शिवाजी महाराजांच्या ताब्यात आल्यानंतर ते शिवाजी महाराजांच्या आरमारी व व्यापारी हालचालीचे केंद्र बनले. शिवाजी महाराजांच्या जहाजांच्या जाण्यायेण्याच्या सागरी मार्गावरील हे एक विश्रांतीचे ठिकाण होते. याशिवाय श्रीमंत लोकांचे वाडे, मंदिरे व जुन्या मशिदी या ठिकाणी होत्या. या बंदराचा लौकिक पूर्वापार असला तरी निकितीन या रशियन प्रवाशाच्या माहितीनुसार हे बंदर पंधराव्या-सोळाव्या शतकात भरभराटीला आले होते. पूर्व आफ्रिका, अरबस्थान, इराण, युरोपियन देश इ. बरोबर दाभोळ बंदराचा व्यापार चालत असे. शिवाय मक्का, एडन, ऑरमुझ येथून व्यापारी दाभोळला येत. त्यांच्या जहाजांची येथे सतत ये जा होत असे. देशावरून व्यापारी वस्तूंनी भरलेले तांडे निर्यातीसाठी दाभोळला येत असत. दाभोळला इतर ठिकाणांच्या तुलनेने अनेक वस्तू स्वस्त मिळत असल्याने इंग्रज दाभोळहून युरोपकडे व्यापारी वस्तू पाठवित असत. पश्चिम किनाऱ्यावरील मलबार, खंबायत, गुजरात, दीव येथून तांबे, पारा, हिंगूळ दाभोळमध्ये येत असे तर तेथून देशांतर्गत भागातून विक्रीसाठी आलेले कापड, धान्य, गहू, डाळी यांची निर्यात विविध देशांना होत असे.

## ३.३ कल्याण :

१७ व्या शतकात कल्याण हे भरभराटीला आलेले व्यापारी केंद्र होते. याठिकाणी उत्तर भारत, गोवळकोंडा व मलबार या देशांतर्गत भागातून व्यापारी माल विक्रीसाठी येत होता. डॉ. फ्रायर म्हणतो, 'बॉम्बेहून महाराजांच्या प्रदेशात शिरण्याचे कल्याण हे मुख्य प्रवेशद्वार होते'.

## ३.४ भिवंडी :

कल्याणजवळ असणारे भिवंडी हे १७ व्या शतकातील एक महत्त्वाचे औद्योगिक व व्यापारी केंद्र होते. भिवंडीला विणकरांचा धंदा जोरात चालू असे. इंग्रजांच्या कागदपत्रातील उल्लेखानुसार बॉम्बेमध्ये विणकरांचा व्यवसाय वाढविण्यासाठी भिवंडीतील विणकरांना इंग्रजांकडून अनेक प्रलोभने दाखविली होती. परंतु भिवंडीतील विणकर अशा प्रलोभनांना बळी पडले नाहीत. याउलट त्यांनी बॉम्बेला मोठ्या प्रमाणावर वस्तूंचा पुरवठा करण्याचे वचन दिले. कल्याण-भिवंडी येथे मोठ्या प्रमाणावर जहाजबांधणीसाठी लागणारे सागवान लाकूड 'ओक' मिळत असे. सन १६७० नंतर शिवाजी महाराजांनी हा प्रदेश ताब्यात घेतल्यानंतर येथील लाकडाचे महत्त्व ओळखून कल्याण-भिवंडीला आपल्या आरमाराच्या जहाज निर्मितीचा उद्योग सुरू केला होता.

## ३.५ संगमेश्वर :

रत्नागिरी जिल्ह्यात शास्त्री नदीच्या मुखापासून २० मैल आतील भागात सोनावी व शास्त्री नदीच्या संगमावर वसलेले संगमेश्वर हे एक शिवकाळातील व्यापारी केंद्र होते. शास्त्री नदीच्या पात्रातून समुद्रातील जहाजे संगमेश्वरपर्यंत ये जा करीत. शिवकाळात येथे जहाजबांधणीचा व्यवसायही होता. देशावरून घाटमार्गाने अनेक वस्तू येथे विक्रीसाठी येत होत्या. येथून मोठ्या प्रमाणावर मिठ व चिंच यांची निर्यात होत असे.

## ३.६ राजापूर :

रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर हे शिवकाळातील महत्त्वाचे व्यापारी केंद्र होते. येथे इंग्रज व फ्रेंच्यांच्या वखारी होत्या. फ्रेंच व्यापारी येथे लोखंड व शिसे यांचा व्यापार करीत होते. याशिवाय राजापूर येथे मूरलोक, हिंदू व इतर परकीय लोकही व्यापाराच्या निमित्ताने येऊन राहिले होते. या बंदरातून मिरे, वेलदोडे, सोरा, मिठ, कागद, सुती कापड व सुती धागा यांचा व्यापार चालत असे. फ्रेंच प्रवासी अॅबे कॅरे म्हणतो, राजापूरमध्ये अनेक श्रीमंत व्यापारी होते कि ज्यांची मालवाहू जहाजे तांबडा समुद्र व इराणमधील बसरा याठिकाणी जात असत.

## ३.७ विजयदुर्ग :

कोकणातील वाघोटन नदीच्या मुखाशी वसलेले हे बंदर विड्याच्या पानाच्या व्यापारासाठी प्रसिद्ध होते. कारण येथील परिसरात विड्याच्या पानाचे उत्पादन होत होते. येथून विड्याची पाने देशाच्या वेगवेगळ्या भागात व परदेशात निर्यात होत होती.

## ३.८ बांदा :

स्वराज्यातील कोकण किनारपट्टीवरील अतिदक्षिणेकडील बांदा हे महत्त्वाचे व्यापारी केंद्र होते. मलबारी लोक येथे नारळ, औषधे, मिरे, मसाल्याचे पदार्थ घेऊन येत तर जाताना तांदूळ, बाजरी, ज्वारी इ. अन्नधान्याच्या वस्तू घेऊन जात. एडन व ऑरमूझ येथूनही अनेक जहाजे व्यापारासाठी येथे येत होती.

## ३.९ वेंगुर्ला :

वेंगुर्ला हे कोकण किनारपट्टीवरील परदेशी व्यापारासाठी प्रसिद्ध असलेले व्यापारी केंद्र होते. येथे डचांची वखार होती. येथून सुती व रेशमी कापड, अन्नधान्ये, लाख, मिरे यांची निर्यात होत होती. वेंगुर्ला येथे बटेव्हिया, सिलोन, जपान, इराण, अरबस्थान येथून व्यापारी जहाजे येत होती. याशिवाय इराण, सुरत व युरोपियन देशांशी येथून व्यापार चालत असे.

वरील महत्त्वाच्या कोकण किनारपट्टीवरील बंदराशिवाय नागोठाणे, केळशी, तारापूर, आगाशी, जैतापूर, खारेपाटण या कोकण किनारपट्टीवरील छोट्या छोट्या व्यापारी केंद्रातूनही व्यापार चालत असे.

## ४) अंतर्गत व्यापारी केंद्रे किंवा बाजारपेठा :

अनेक व्यापारी केंद्रे व बाजारपेठा यांचे अस्तित्व हे व्यापाराच्या भरभराटीला आवश्यक असते. शिवकाळात कोकण किनारपट्टीवरील अनेक व्यापारी केंद्रे भरभराटीला आली होती. त्याचप्रमाणे स्वराज्याच्या अंतर्गत भागातही अनेक व्यापारी केंद्रे व बाजारपेठा या उर्जितावस्थेत होत्या.

## ४.१ आठवडी बाजार :

शिवकाळात मोठमोठ्या गावांमध्ये आठवड्यातून एकदा किंवा दोनदा बाजार भरत असे. अशा बाजारांना आठवडी बाजार म्हणत. अशा बाजारामध्ये आसापासचे शेतकरी, कारागीर, लहान-लहान व्यापारी आपल्या वस्तू विक्रीसाठी घेऊन येत. या आठवडी बाजारात अन्नधान्ये, भाजीपाला, फळे, तूप, किराणा माल त्याचबरोबर कापडासारख्या कारागिरी वस्तूंचा समावेश असे. अशा आठवडी बाजाराचे निश्चित दिवस ठरलेले असत. हा आठवड्याचा बाजार खेड्यातील लोकांच्या विविध गरजा भागवत असे.

## ४.२ कसबा :

पंचक्रोशीतील मोठ्या गावास कसबा म्हणत असत. कसब्याच्या ठिकाणी कसबी कारागीर व स्थानिक व्यापारी यांची वसाहत असे. कसब्याच्या ठिकाणीही ठराविक दिवशी आठवडी बाजार भरत

असे. आजूबाजूच्या  गावातील वेगवेगळे कारागीर, शेतकरी, व्यापारी आपल्या वस्तू खरेदी-विक्रीसाठी घेऊन येत असत. त्यामध्ये अन्नधान्ये, मसाल्याचे पदार्थ, फळे, कसबी कारागिरांच्या वस्तूंचा समावेश असे.

## ४.३ पेठा :

कसब्यातील बाजारपेठेचा विकास होऊन त्याचे व्यापारपेठेत रूपांतर होई. पेठ म्हणजे आकाराने मोठे असलेले व्यापारी केंद्र होय. पेठेमध्ये कारागिर, व्यापारी यांची कायमस्वरूपी दुकाने असत. यामध्ये प्रामुख्याने तेल विक्री करणारे तेली, तेल गाळणारे तांबट, पादत्राणे तयार करणारे चांभार, कापड तयार करणारे विणकर, कपडे शिवणारे शिंपी, दारू गाळणारे व विकणारे कलाल, सोन्या चांदीचे दागिने तयार करणारे सोनार यासारख्या लोकांचा समावेश असे. स्थानिक व्यापाऱ्यांबरोबरच दूर दूरचे व्यापारीही पेठेच्या ठिकाणी वस्तू खरेदी-विक्रीसाठी येत असत. शिवकाळात नवीन पेठा वसविण्यासाठी सरकारकडून प्रोत्साहन दिले जात होते. त्यासाठी सरकारकडून अनेक सोयी सवलती दिल्या जात असत. शिवकाळात जिजापुरा, मालपुरा, खेळपुरा, विठापुरा यासारख्या नवीन पेठा वसवल्याचे संदर्भ मिळतात. पेठेची देखभाल व नियंत्रण ठेवण्यासाठी शेटे, महाजन यासारखे अधिकारी व त्यांच्या मदतीला बिडवाई, कोतवाल यासारख्या अधिकाऱ्यांची सरकारकडून नियुक्ती केली जाई.

## ४.४ किल्ल्यावरील बाजारपेठा :

काही प्रमुख किल्ल्यावर शासकीय अधिकारी व प्रजाजन यांची बरीच मोठी संख्या असे. त्यांच्या व त्या परिसरातील लोकांच्या दैनदिन गरजा भागविण्यासाठी शिवाजी महाराजांनी अशा किल्ल्यांवर खास बाजारपेठा वसविल्या. उदा. शिवाजी महाराजांनी रायगडावर वसवलेली बाजारपेठ अत्यंत नियोजनबद्ध होती. त्याचे अवशेष आजही आपणास पाहावयास मिळतात.

## ५) बाजारपेठांचे अधिकारी :

नवीन पेठा वसविण्यासाठी शिवकाळात सरकारकडून प्रोत्साहन मिळत असे. पेठेचा व्यापार-उदीम वाढून वेगवेगळे कारागिर पेठेत स्थायिक व्हावेत यासाठी सरकार पेठेच्या अधिकाऱ्यांना व कारागिरांना काही सवलती जाहीर करीत असे.

शिवकाळात पेठेचा प्रमुख म्हणून शेटे हा काम करीत असे. पेठ वसविण्याचे व तिच्या सर्व व्यवहारात देखरेख ठेवण्याचे काम शेटे हा अधिकारी करीत असे. त्या मोबदल्यात त्याला काही सारामाफ जमीनही सरकारकडून मिळत असे. पेठेतील आर्थिक व्यवहाराचे हिशेब ठेवण्यासाठी महाजन हा दुसरा महत्त्वाचा अधिकारी असे. याशिवाय पेठेत विक्रीसाठी येणाऱ्या वस्तूवरील जकात वसूल करण्यासाठी 'बिडवई' नावाचा एक अधिकारी असे. पेठेतील कारागिरांचे व व्यापाऱ्यांचे संरक्षण करण्यासाठी 'कोतवाल' नावाचा अधिकारी असे. पेठेच्या संरक्षणाचे व गुन्ह्यांच्या चौकशीचे त्याला अधिकार असत.

## ६) व्यापारी मार्ग / वाहतूक मार्ग (Trade Routes) :

शिवकाळात दळणवळणाचे व व्यापारी मार्ग कोणते होते, ते कोणत्या प्रदेशातून जात होते हा एक महत्त्वाचा विषय आहे. आज दळणवळण व वाहतुकीच्या कक्षा विस्तारल्या आहेत. पण सतराव्या शतकाचा विचार करता सुव्यवस्थित वाहतूक मार्ग किंवा दळणवळणाचा फारसा विस्तार झाला नव्हता. कारण महाराष्ट्राच्या भौगोलिक रचनेमुळे तसेच मर्यादित साधनांमुळे त्याकाळी ते शक्य नसावे. जे काही व्यापारी मार्ग होते त्याची वर्गवारी पुढीलप्रमाणे करता येईल.

### ६.१ जलमार्ग :

शिवकाळात सागरी जलमार्गाचा वापर वाहतुकीसाठी मोठ्या प्रमाणावर होत होता. कोकण किनारपट्टीवरील वेगवेगळ्या बंदरातून परदेशांशी व मलबार, गुजरात याठिकाणी व्यापारी वस्तूंची ने-आण करण्यासाठी सागरी जलमार्गाचा वापर केला जात होता. त्याचबरोबर कोकण किनारपट्टीवरील बंदरांमध्ये आपापसात व्यापारी मालाची वाहतूक करण्यासाठी सागरी जलमार्गांचा वापर केला जात होता. सागरी जलमार्गाशिवाय देशावरील व कोकणातील लहानमोठ्या नद्यांचा वापर वाहतुकीसाठी होत होता. देशावरील गोदावरी, कृष्णा, भिमा, निरा या नद्यांचा कमी अंतरावरील वाहतुकीसाठी उपयोग होत होता. त्याबरोबरच कोकणातील ठाणे, वसई, जयगड, धरमतर, तेरेखोल या खाड्यांमधून व्यापारी मालाची वाहतूक होत असे. परंतु देशावरील व कोकणातील नद्या या बारमाही नसल्याने शिवाय तुलनेने उत्तर भारतातील नद्यांप्रमाणे मोठ्या नसल्याने या नद्यांचा वाहतुकीसाठी काही काळापुरता व कमी अंतरासाठी उपयोग होत होता. शिवाजी महाराजांनी सागरी वाहतुकीच्या व कोकण किनारपट्टीच्या संरक्षणासाठी आपले प्रबळ आरमार उभारले होते.

### ६.२ भूमार्ग (Land Route) :

शिवकाळात हमरस्ते ज्याला मोठे रस्ते म्हणतात स्वराज्यात फारसे नव्हते. महाराष्ट्राच्या भौगोलिक रचनेचा विचार करता याकाळात स्वराज्यात कच्च्या रस्त्यांच्या स्वरूपात गाडीवाटा व पायवाटा मोठ्या प्रमाणात होत्या. बुऱ्हाणपूर ते गोवळकोंडा व चौल-चिपळूण-मालवण-गोवा हे दोन प्रमुख मार्ग सोडले तर मराठी मुलखात हमरस्ते नव्हते. जे होते ते गावागावांना जोडणाऱ्या कच्च्या गाडीवाटा किंवा पाऊलवाटा. कोकण व देश या महाराष्ट्राच्या दोन नैसर्गिक विभागांना जोडणारे घाटमार्ग होते. सह्याद्री पर्वतरांगांमधून गेलेले हे बिकट घाटमार्ग त्याकाळी महत्त्वाचे व्यापारी मार्ग होते. यामध्ये रत्नागिरी व कोल्हापूर यांना जोडणारा आंबा घाट, आंबोली घाट, कुभार्ली घाट, फोंडा घाट, जुन्नर व कोकण यांना जोडणारा पिंपरी घाट, जुन्नर व मुरवाड यांना जोडणारा नाणेघाट, मुंबई व पुणे यांना जोडणारा खंडाळा घाट हे प्रमुख घाटमार्ग होते. याशिवाय असंख्य पायवाटाही होत्या. या घाट मार्गांवर सरकारकडून चौक्या बसविलेल्या असत. तेथे घाटपांडे, पत्की, डांगी, पानसरे, पथकदार, मेटकरी इ. अधिकारी सरकारकडून नेमलेले असत.

### ७) वाहतुकीची साधने :

शिवकाळात वाहतुकीसाठी बैल, गाढव, म्हैस, रेडा, तट्टू, उंट, बैलगाड्या, होड्या, जहाजे, पालट्ट्या व डोली यांचा वापर केला जात असे. स्त्री-पुरुष आपल्या डोक्यावरून मालाची वाहतूक करीत असत. घाटमार्गातून होणाऱ्या वाहतुकीसाठी व जड मालासाठी प्रामुख्याने बैलांचा उपयोग केला जात असे. मालाची पोती, बैलांच्या पाठीवर लादून व्यापाऱ्यांचा तांडा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जात असे. कोकण किनारपट्टीवरील जहाज वाहतुकीसाठी जहांजांचा वापर केला जात असे. तर कोकणातील खाड्यांमधून केल्या जाणाऱ्या वाहतुकीसाठी लहान-लहान होड्यांचा वापर केला जात असे. कोकणात भूमार्गावरील मालाच्या वाहतुकीसाठी प्रामुख्याने पाडाचा वापर केला जाई.

### स्वयंअध्ययन प्रश्न - २

**योग्या पर्याय निवडा.**

१. ............. हे व्यापारी केंद्र कुंडलिका नदीच्या मुखावर वसलेले आहे.

(१) चौल (२) दाभोळ

(३) राजापूर (४) कल्याण

२. भिवंडीला ........... चा धंदा जोरात चालू असे.

(१) रेशीम (२) विणकर

(३) गुळ (४) लोखंड

३. .......... हे बंदर विड्याच्या पानाच्या व्यापारासाठी प्रसिद्ध होते.

(१) कल्याण (२) भिवंडी

(३) बॉम्बे (४) विजयदुर्ग

४. कोकण किनारपट्टीवरील ...... येथे डचांची वखार होती.

(१) रत्नागिरी (२) सिंधुदुर्ग

(३) वेंगुर्ला (४) कल्याण

५. शिवकाळात पेठेतील आर्थिक व्यवहाराचे हिशेब ठेवण्यासाठी ........... हा अधिकारी असे.

(१) शेटे (२) महाजन

(३) कोतवाल (४) घाटपांडे

## २.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१. तगाई : सरकारतर्फे आगाऊ दिले जाणारे कर्ज.

२. बलुता : बलुतेदार व अलुतेदार यांना धान्य स्वरूपात शेतकऱ्यांकडून दिला जाणारा ठराविक भाग.

३. व्यापार : वस्तू व सेवांची खरेदी-विक्री.

४. घाटमार्ग : पर्वतरांगांमधून गेलेल्या रस्तेमार्गांना घाटमार्ग म्हणतात.

## २.४ स्वय अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययन प्रश्न - १**

१) माळव २) बागाईत ३) खरीप

४) दुम ५) तीन

**स्वयं अध्ययन प्रश्न - २**

१) भूतफुरोशी २) वसई ३) धनाबाद

४) कोल्हापूर ५) भिवंडी

**स्वयं अध्ययन प्रश्न - ३**

१) चौल २) विणकर ३) विजयदुर्ग

४) वेंगुर्ला ५) महाजन

## २.५ सारांश

छत्रपती शिवाजी महाराज एक कुशल प्रशासक होते. त्यांनी स्वराज्याच्या राजकीय व लष्करी व्यवस्थेबरोबरच आर्थिक व्यवस्थेकडेही बारकाईने लक्ष दिले होते. कारण राज्याचा आर्थिक पाया भक्कम असेल तर ते राज्य प्रबळ होते याची त्यांना जाणीव होती. त्यामुळे महाराजांनी स्वराज्याच्या आर्थिक विकासासाठी प्रोत्साहन दिले.

शिवकाळात शेती हाच लोकांच्या उदरनिर्वाहाचा प्रमुख स्रोत होता. कारण या काळात उद्योग व्यवसाय आणि व्यापाराचा फारसा विकास झालेला नव्हता. जमीन महसूल हाच राज्याच्या उत्पन्नाचा

मुख्य आधार असल्याने शेती हा राज्याच्या अर्थव्यवस्थेचा कणा होता. त्यामुळे जास्तीत जास्त शेती लागवडीखाली आणण्यासाठी सरकारतर्फे प्रयत्न केले जात होते. जमीन महसूल पद्धतीमध्ये पारदर्शकता आणून महाराजांनी संकटाच्यावेळी रयतेस अनेक सोयी सवलती दिल्या.

शिवकाळात खेडी ही बहुतांशी स्वावलंबी होती. शेती हाच लोकांचा प्रमुख व्यवसाय होता. त्यामुळे प्रामुख्याने शेतीशी निगडीत अनेक उद्योग व्यवसाय या काळात निर्माण झाले. त्यातील काही उद्योगांमधील उत्पादित वस्तूंची परदेशातही निर्यात होत होती. शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील उद्योग वाढीसाठी प्रोत्साहन देऊन प्रसंगी स्वदेशी उद्योगांच्या संरक्षणाचे धोरण अवलंबिले होते. असे असले तरी या काळातील उद्योग बाल्यावस्थेच होते.

व्यापाराचा विकास हा शांतता व सुरक्षितता या दोन गोष्टीवर अवलंबून असल्याने शिवाजी महाराजांनी याकडे विशेष लक्ष दिल्याचे आढळते व ही राज्याची जबाबदारी समजली जात असे. चोर, दरोडेखोर, लुटमार व शत्रूंचे हल्ले यांच्यापासून व्यापाराचे संरक्षण करण्यासाठी शिवाजी महाराज सतत दक्ष होते. तसेच आपल्या राज्यातील व्यापार भरभराटीला यावा म्हणून शिवाजी महाराजांनी व्यापाऱ्यांना अनेक सवलतीही दिल्या होत्या.

## २.६ स्वाध्याय

**१) टिपा लिहा.**

१. शिवकालीन जमिनीचे स्वरूप

२. मराठेकालीन कृषितंत्र

३. मोटस्थळ

४. ग्रामीण उद्योग व्यवसाय

५. शिवकालीन व्यापारी वस्तू

६. शिवकालीन वाहतुकीची साधने

७. बाजारपेठांचे अधिकारी

२)	**दीर्घोत्तरी प्रश्न**

१.	शिवकालीन कृषि उत्पादनांची सविस्तर माहिती लिहा.

२.	शिवाजी महाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी केलेल्या उपाययोजनांचे मूल्यमापन करा.

३.	शिवकालीन वेगवेगळ्या उद्योगांची माहिती लिहा.

४.	शिवकालीन व्यापारी केंद्राची सविस्तर माहिती लिहा.

## २.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१.	Kulkarni A. R. - Maharashtra in the Age of Shivaji.

२.	Mahajan T.T., Aspects of Agrarian and Urban History of the Marathas, Common Wealth Publishers, 1991.

३.	Kulkarni A.R., Medieval Maratha Country, Diamond Publications, 2008.

४.	डॉ. सरदेसाई बी. एन. - मराठ्यांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास.

५.	प्रा. सावंत बी. एस. व प्रा. जाधव व्ही. के. - मराठ्यांचा प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास.

६.	डॉ. पवार जयसिंगराव - मराठी साम्राज्याचा उदय आणि अस्त.

७.	न्या. रानडे म. गो. - मराठी सत्तेचा उत्कर्ष.

८.	कोलारकर श. गो. - मराठ्यांचा इतिहास.

९.	चिटणीस के. एन. - मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था (खंड १ ते ४).


❋❋❋

# सत्र २ : घटक ३

# समाज आणि धर्म

## (Society and Religion)

३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

   ३.२.१ ग्रामीण समाजरचना

   ३.२.२ शिवकालीन धर्म

   ३.२.३ तीर्थक्षेत्रे

३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक माहितीसाठी संदर्भ ग्रंथ

## ३.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील मुद्दे स्पष्ट करता येतील अथवा समजून घेण्यास मदत होईल.

- शिवकालीन समाजरचना कशी होती हे स्पष्ट होईल.
- शिवकालीन खेडे, तेथील गावगाडा व गावगाड्यातील वतनसंस्था समजून घेता येईल.
- शिवकालीन धर्म व्यवस्था व तिचे स्वरूप स्पष्ट होईल.
- भक्ती पंथातील पंढरपूर चळवळीचे स्वरूप व संताचे योगदान सांगता येईल.
- शिवकालीन तीर्थक्षेत्रे, तेथील दैवते व तीर्थक्षेत्रांचे सर्वांगिण महत्त्व समजून घेण्यास मदत होईल.

## ३.१ प्रास्ताविक

शिवकालीन खेडी स्वयंपूर्ण होती. शिवपूर्वकाळातील महाराष्ट्रातील समाजस्थिती शिवकाळातही थोड्याफार फरकाने तशीच राहिली. प्रस्तुत घटकामध्ये शिवकालीन समाजरचना, खेडे गावातील वतनदार, त्यांचे हक्क लाजिमे यांचा उहापोह करण्यात आला आहे. समाज हा जातिव्यवस्थेवर आधारलेला होता. शिवकाळातील समाजरचना म्हणजे गावगाडा होय. गावातील सामाजिक, आर्थिक, प्रशासकीय व्यवहार म्हणजे गावगाडा, शिवकालीन गाव सामाजिक व आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी होते. गावातील लोकांच्या गरजा भागविण्यासाठी गावातच वस्तूंची निर्मिती होत असे. गाव स्वयंपूर्ण करण्यासाठी गावातील कारागीर, बलुतेदार यांचे योगदान महत्त्वाचे होते.

शिवकाळात महाराष्ट्रात अनेक संप्रदाय उदयास आले. पण महाराष्ट्रात निस्तेज झालेल्या समाजाला मार्गदर्शन करण्याचे काम वारकरी संप्रदायाने केले. या संप्रदायास पुंडलिक, ज्ञानदेव-नामदेव, भानुदास, तुकाराम याबरोबरच संत बहिणाबाई, संत जनाबाई या स्त्री संताचे योगदान लाभले. यासंतांनी हा संप्रदाय सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहचवून यामध्ये सर्वांना सामावून घेतले. त्यामुळे सर्व जाती-भेद विसरून लोक या संप्रदायात सामील झाले. शिवाजी महाराज धार्मिक सहिष्णू प्रवृत्तीचे होते. देवालयाप्रमाणेच मशिदीनाही सरकारी तिजोरीतून दिवा-बत्तीसाठी नेमणूक मिळत असे.

कोल्हापूरची अंबाबाई (महालक्ष्मी), तुळजापूरची तुळजाभवानी व शिखर शिंगणापूरचे शंभू महादेव या तीर्थक्षेत्रांना शिवकाळात महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले. या ठिकाणी मोठ्या संख्येने भाविक जात असत. तुळजाभवानी हे छत्रपती शिवाजी महाराजांचे आराध्य दैवत असल्याने सर्व महाराष्ट्राची कुलस्वामिनी म्हणून ओळखली जाते. एकूणच प्रस्तुत प्रकरणात शिवकालीन ग्रामीण समाज, वतनदार, शिवाजी महाराजांचे वतनदारांसंबंधीचे धोरण, पंढरपूर चळवळ व कोल्हापूर, तुळजापूर व शिखर शिंगणापूर या तीर्थक्षेत्रांचा उहापोह करण्यात आला आहे.

### ३.२.१ ग्रामीण समाज रचना

> एक राज्य जाऊन दुसरे आले म्हणून गावच्या दिनचर्येत दिसण्याजोगा बदल झाला नाही. बहुधा होत नसे. ज्याप्रमाणे अनेक पिढ्यावरून आल्या व गेल्या तरी उंबरा आपल्या ठिकाणच्या ठिकाणीच, त्याप्रमाणे राज्याच्या अनेक तऱ्हा व उलथापालथी झाल्या तरी गावगाड्याने आपले ठिकाण सोडले नाही.
>
> - त्रिंबक नारायण अत्रे 'गावगाडा'

भारत हा कृषीप्रधान देश आहे. प्राचीन काळापासून आपल्या देशाची बहुसंख्य लोकसंख्या खेड्यात निवास करणारी व शेती करणारी राहीली आहे. मध्ययुगीन कालखंडात ८५% लोक शेतीवर अवलंबून होते.

## शिवकालीन खेडे अथवा गाव

अशी लोकवस्ती की जिच्याभोवती शेती करण्यास योग्य अशी जमीन आहे व जिथे बहुसंख्य शेतकरी (कुणबी) व शेतीपूरक व्यवसाय करणारे लोक राहतात, म्हणजे गाव.

गावाचे प्रामुख्याने दोन विभाग मानले जात. पहिला ज्या ठिकाणी गावातील लोक वस्ती करून राहत तो विभाग. त्या 'पांढरी' किंवा 'पांढरी आई' असे म्हणत. या ठिकाणाची जमीन पांढऱ्या मातीची असे. या मातीत घरांना पाया चांगला मिळतो. दुसरा विभाग शेत जमिनीचा, याला 'काळी' अथवा 'काळी आई' म्हणत. काळी व पांढरी मिळून गाव बनत असे. अशा गावाला शिवकालीन कागदपत्रात 'देहे', 'मौजा', किंवा 'ग्राम' असे म्हटलेले आढळते.

कालौघात गावची लोकसंख्या वाढत असे. काही शेतकरी गावच्या शेजारीच वस्ती करीत. पुढे अशा वस्त्याही वाढत जात. अशा वस्त्या म्हणजे गावाचा एक उपविभाग बनत असे. अशा उपविभागास देशावर 'मजरा' अथवा 'वाडी' असे म्हणत तर कोकणात 'पाडी' अथवा 'खारी' म्हणत. काही गावांच्या शेजारीच एखादी वस्ती वाढत जाते आणि तिचे रूपांतर दुसऱ्या एका गावामध्ये होते. तेव्हां दोन गावे तयार होतात. अशा दोन गावांचे वेगवेगळेपण दाखविण्यासाठी मूळच्या मोठ्या गावास 'बुद्रुक' म्हटले जाई व नव्या गावास 'खुर्द' म्हणजे मोठे. उदाहणार्थ - हिंगणगाव बुद्रुक आणि हिंगणगाव खुर्द.

शिवकालीन कागदपत्रात गावांना 'मौजा', 'कसबा', 'पेठ' असे संबोधले जाई. लहान गावांना 'मौजे' म्हटले जाई. अशा मौज्यांची संख्या मोठी होती. दहा-वीस मौजांच्यामध्ये एखादे मोठे गाव असे त्यास 'कसबा' असे म्हणत. 'कसबा' हा शब्द 'कसब' या शब्दापासून तयार झाला आहे. ज्या गावात कसबी कारागीर, व्यापार - उदीम करणारे लोक अधिक संख्येने वस्ती करून राहतात त्यास 'कसबा' असे म्हटले जाई. अशा कसब्यात आठवड्याचा बाजारहाट म्हणजे आर्थिक उलाढालीचा व्यवहार वाढत जाऊन त्याचे 'पेठे'त रूपांतर होई. काही प्रसंगी व्यापार-उदीमसाठी खास 'पेठ' वसविण्याची सनद काही लोकांना दिली जाई. त्यासाठी त्यांना इनामही दिले जाई. बंदराच्या ठिकाणी आयात-निर्यात व्यापारामुळे त्यास पेठेचे स्वरूप आपोआपच प्राप्त होत असे. अशा बंदराच्या गावास 'मिरे' असे म्हटले जाई.

## ब) शिवकालीन गावातील समाजरचना (गावगाडा) :

शिवकालीन समाजरचना म्हणजे गावगाडा ही पद्धतशीर निर्माण झालेली समाजव्यवस्था होती. गावात शेती हेच उदरनिर्वाहाचे प्रमुख साधन असल्याने ज्यांच्याकडे जमीन असे, तसे शेतकरी त्या गावचे प्रमुख रहिवाशी असत. त्यामध्ये गावातील वंशपरंपरागत अधिकारी आणि गावाची विविध प्रकारे सेवा करणारे लोक यांचा समावेश होत असे. याशिवाय ज्यांना काहीच शेतजमीन नाही व जे दुसऱ्याच्या शेतावर मोलमजूरी करीत अथवा खंडाने दुसऱ्याची शेते करीत असेही लोक गावात असत. गावामध्ये सर्वात वरिष्ठ दर्जा पाटील, कुलकर्णी, चौगुला, शेटे, महाजन इ. मंडळींना होता. त्यांना आपल्या सेवेबद्दल सरकारातून जमिनीचे इनाम, काही ठरावीक हक्क व मानपान मिळत असे. ही मंडळी 'वतनदार' होती. त्यांना कागदपत्रात 'देशक' असेही संबोधलेले असे. हे एक प्रकारचे गावचे शाश्वत अधिकारी (ग्रामाधिकारी) होते.

ज्यांच्याकडे स्वत:च्या मालकीची जमीन असे व जे त्या जमिनीचा सारा सरकारात भरत असत त्यांना 'मिरासदार' असे म्हणत. 'मिरासदार' म्हणजे वंशपरंपरेने जमिनीची मालकी उपभोगणारे लोक. त्यांना 'थळकरी' (स्थळकरी) अशीही संज्ञा होती. गावामध्ये स्वत:च्या मालकीची काहीच जमीन नसणारे व उदरनिर्वाहासाठी दुसऱ्याची जमीन कसणारे अथवा मोलमजूरी करणारे लोक असत. त्यांना 'उपरी' अथवा 'उपरे' असे म्हणत. यानंतर गावगाड्यातील महत्त्वाचा घटक म्हणजे 'बलुतेदार' होता. गावाची सेवा करणारे हे ग्रामसेवक होते. त्यांच्या सेवेचा मोबदला म्हणून गावकरी त्यांना आपल्या उत्पन्नाचा काही वाटा-बलुते म्हणून देत.

शिवकालीन गावगाड्यात एकूण चार प्रकारच्या सत्ता अस्तित्वात होत्या.

### १) दिवाणी सत्ता :

यामध्ये हवालदार, मुजूमदार, कारकून यासारखे राजसंस्थेचे अधिकारी असत. या दिवाणी सत्तेच्या माध्यमातून राजा आपला अधिकार गावात बजावत असे.

### २) देशक सत्ता :

यामध्ये पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे, शेटे-महाजन व बारा बलुतेदार हे भागीदार असत. गावची खरी सत्ता ही देशक सत्ता होती. ही दिवाणी सत्तेहून भिन्न व स्वतंत्र असे.

### ३) धर्मसत्ता / ज्ञातीसत्ता :

धर्म परंपरा किंवा ज्ञानी परंपरा या संदर्भात गावात काही वाद निर्माण झाला तर ही सत्ता महत्त्वाची व निर्णायक भूमिका बजावत असे.

## ४) व्यापारी सत्ता :

व्यापारी सत्ता ही सर्व साधारपणे 'कसबा' अथवा 'पेठ' या ठिकाणी अस्तित्वात असे. शेटे-महाजन हे या सत्तेचे मुख्य अधिकारी असत.

शिवकालीन गावगाड्यात वतनदार, मिरासदार, बलुतेदार व उपरी असे चार सामाजिक वर्ग अस्तित्वात होते. या बरोबर वरील चार सत्ताही नांदत होत्या. आता आपण या गावगाड्यातील प्रमुख वतनदार, त्यांची कामे व हक्क-अधिकार, बलुतेदार व त्यांच्या कामाचे स्वरूप याची अधिक विस्ताराने माहिती पाहू.

## क) शिवकालीन गावगाड्यातील वतनसंस्था :

### १) वतन व वतनदार म्हणजे काय ?

'वतन'हा अरबी भाषेतील शब्द असून त्याचा मूळ अर्थ आपला देश, आपली जमीन असा आहे. इस्लामी राजवटीत हा शब्द मराठी भाषेत रूढ झाला. सरकारकडून गावच्या अधिकाऱ्याला अथवा सेवकाला त्याच्या चाकरीच्या मोबदल्यात जी जमिनीची देणगी मिळे, तिला 'वतन' असे म्हणत. ही देणगी (म्हणजे वतनी जमिनीची देणगी) वंशपरंपरेने त्या कुटुंबात राहत असे. जोपर्यंत त्या कुटुंबातील व्यक्ती वतनास नेमून दिलेले काम प्रामाणिकपणे करीत असे तोपर्यंत ते वतन त्या कुटुंबाकडे राही.

पाटील, कुलकर्णी, चौगुला, शेटे-महाजन हे गावातील प्रमुख वतनदार लोक होते. या वतनदारांचे पालन-पोषण सर्व गावाकडून होत असे. हे वतनदार गावाची जी सेवा करीत असत त्या सेवेच्या मोबदल्यात त्यांना गावकऱ्यांकडून 'नख्त' (म्हणजे रोख रक्कम) आणि गला (म्हणजे वस्तू) मिळत असत. याशिवाय प्रत्येक वतनदारास गावकऱ्यांकडून 'हक्क-लाजिमे' प्राप्त होत. 'हक्क म्हणजे वतनदारास ऐच्छिक स्वरूपात मिळणारी बाब'. प्रत्येक वतनदारांचे हक्क-लाजिमे वेगवेगळे असत. वतनदार म्हणजे एक प्रकारे ग्रामाधिकारी होते. गावचा कारभार कार्यक्षमपणे चालविण्यासाठी त्यांची निर्मिती केली गेली. शिवकालीन गावगाड्यातील वतनदारांची चौकट एवढी भक्कम होती की, राजवटी बदलल्या तरी या चौकटीस धक्का लागत नसे. कारण नव्या राजवटीसही वतनदारांच्या सेवेची तितकीच गरज भासत असे.

## २) वतनदारांची कर्तव्ये :

१. गावचा जमीन महसूल वसूल करणे.

२. गावच्या शेतीचा विकास घडवून आणणे.

३. गावात शांतता व सुरक्षितता निर्माण करणे.

४. गोत सभेमार्फत गावातील तंटे-बखेड्यांचा निकाल लावणे.

५. गावचे सण, उत्सव, जत्रा व यात्रा साजरे करणे.

६. शत्रूच्या स्वारीच्या वेळी गावकऱ्यांचे संरक्षण करणे.

अशी अनेक कामे वतनदार मंडळीना जबाबदारीने करावी लागत.

शिवकालीन समाजजीवनात वतनास मोठी प्रतिष्ठा होती. समाजातील वतनदाराचा सामाजिक दर्जा तो कोणत्या वतनाचा धनी आहे यावर ठरत असे. वतन ही बाब वतनदाराच्या केवळ योगक्षेमाचे साधन नव्हते तर अनेकदा ते राजकीय सत्ता संपादन करण्याचे ही साधन बनत असे. वतनाची प्रतिष्ठा इतकी होती की सरकार दरबारचे मोठे मोठे अधिकारी असणारी मंडळीही आम्ही 'अमुक गावचे पाटील' अथवा अमुक परगण्याचे देशमुख असे म्हणून घेण्यात धन्यता मानत होते.

स्वाभाविकच शिवकाळातील 'वतनसंस्था' ही समाजाची पायाभूत संस्था बनली होती. व्यक्तीचा उदरनिर्वाह व प्रतिष्ठा या बाबी या संस्थेशी जोडल्या गेल्याने समाजातील बहुसंख्य तंटेबखेडे वतनाच्या मालकी हक्कातून निर्माण होत व ते पिढ्यान्‌पिढ्या चालत राहत. वतनासाठी दंगे, धोपे, कटकारस्थाने, फसवाफसवी इतकेच नव्हे तर खून, मारामारी, कुटुंबाच्या कतली करण्यापर्यंत माणसे जात. गावगाड्याच्या स्थैर्यासाठी व विकासासाठी वतनसंस्था निर्माण झाली होती व तिला मध्ययुगात दुसरा पर्याय नव्हता हे ही लक्षात ठेवले पाहिजे. एका परीने वतनसंस्था प्रदेशातील सत्तेचे विकेंद्रीकरण करणारी संस्था होती. गावगाड्याचा कारभार सुनियंत्रित रहावा, गावामध्ये कज्जे व इतर बाबी गावातील यंत्रणेकडूनच निकालात निघाव्यात, त्यासाठी प्रजेला सरकार दरबारी हेलपाटे घालावे लागू नयेत हा वतनसंस्थेच्या निर्मितीमागचा हेतू होता.

## ३) शिवकालीन वतनसंस्थेतील प्रमुख वतनदार :

### १) पाटील :

पाटील हा गावचा प्रमुख होता. शिवकालीन कागदपत्रात पाटलाचा उल्लेख 'पाटील', 'गावपाटील', 'मोकदम', 'मोकदम-पाटील' असा केलेला आढळतो. राज्यव्यवहार कोशात त्याला

'ग्रामगोपक' अशी संज्ञा दिलेली आहे. गावातील पाटील हा ग्रामाधिकारी आहे. ज्याने पुढे होऊन साहसाने गाव वसवला तो मिरासदारांचा पुढारी स्वाभाविकच 'पाटील' म्हणून नेमला गेला. गावच्या मिरासदारांत पाटलाचे घराणे प्रमुख व मानाचे समजले गेले. गावापुरता विचार करता पाटलास गावचे सर्व मुलकी, दिवाणी अधिकार असत. अशा पाटलामधून पुढे पराक्रमी सरदार शिवकाळात निर्माण झाले. पेशवाईत आपणास पाटीलबाबा असे म्हणवून घेण्यात महादजी शिंदे सारख्या पराक्रमी सरदारासही भूषण वाटे.

**अ) गावच्या पाटलाची कामे :**

१. गावात नवीन कुळे (रयत) आणून पडीक जमिन लागवडीखाली आणणे.

२. रयतेच्या विचाराने काळीचा म्हणजेच शेतजमिनीचा सारा ठरविणे व त्या साऱ्याविषयी सरकारच्या कारकूनाशी चर्चा करून तो निश्चित करणे.

३. मिरासदारांकडून सारा वसूल करून तो सरकारात भरणे.

४. साऱ्याच्या तुटीस जबाबदार राहणे.

५. रयतेचे हक्क, तक्रारी, सारासूट, सारातहकूबी इ. बाबींविषयी सरकार दरबारी दाद मागणे.

६. गावच्या संरक्षणाची तजवीज करणे.

७. गावात घडणाऱ्या गुन्ह्यांचा तपास करणे.

८. गुन्हेगारास शिक्षा करणे.

९. गोतसभा भरवणे व त्यामध्ये गावातील तंटेबखेडे निकालात काढणे.

१०. परचक्र आले असता गावकऱ्यांच्या सुरक्षिततेची तजवीज करणे.

पाटील याचा गावच्या वसाहतीशी व जमिनीच्या लागवडीशी मूलत: संबंध असल्याने त्याची निशाणी 'नांगर' अशी मानली गेली. तत्कालीन कागदपत्रावर पाटलाची ही निशाणी चिन्हीत किंवा अंकित झालेली दिसते. गावचा जमीन महसूल गोळा करून त्याचा हिशेब ठेवण्याच्या कामी पाटलास कुलकर्णी हा ग्रामाधिकारी मदतनीस म्हणून दिलेला असे. त्याच्या मदतीने पाटील गावचा महसूल दिवाणात भरत असे. गावातील गोतसभेचा पाटील हा प्रमुख असे. त्याच्याच निशाणीने गोतसभेचे निवाडे अधिकृत मानले जात. सामान्यत: पाटील हा घरंदाज मराठा कुटुंबातील असे. याचे कारण गावात बहुसंख्य लोक 'मराठा' जातीचे असत. बहुसंख्य समाजाचाच नेता गावास असावा, असा त्यामागील हेतू होता. पण काही ठिकाणी ब्राह्मण, मुसलमान, धनगर, महार अशा समाजाचेही पाटील आढळतात, पण हे अपवाद होते.

## ब) पाटलांचे हक्कलाजिमे :

पाटलास गावच्या सेवा-चाकरीबद्दल इनामी जमीन, अनेक प्रकारचे हक्कलाजिमे व मानपानाच्या बाबी मिळत असत. पाटलाच्या वतनाचे हे हक्क-लजिमे व मानपान त्याला मिळालेल्या पाटीलकीच्या सनदेत नमूद केलेले असत. सर्वच गावच्या पाटलांना एक सारखेच हक्क-लाजिमे व मानपान मिळे असे नाही. तरी त्यांचे सर्वसाधारण स्वरूप पुढील प्रमाणे असे. गावापासून सरकारला जे महसूली उत्पन्न मिळत असे, त्यातील काही हिस्सा रोखीने पाटलास मिळत असे. त्यास 'खुर्दा' असे म्हणत. याचे प्रमाण सरकार ठरवीत असे. गावातील प्रत्येक शेतकऱ्यांकडून पाटलाला काही धान्य अथवा वस्तू मिळत असत. या हक्कास 'गल्ला' असे म्हणत. यामध्ये घुगरी, फसकी, हुर्डा असे अनेक हक्क असत.

गावातील कसबी कारागिरांकडून अनेक प्रकारच्या वस्तू त्यास मोफत मिळत. उदा. चांभाराकडून 'पायपोसी', कोष्ट्याकडून 'पासोडी', कुंभाराकडून 'रांजण', तेल्याकडून तेल, पेठेतील व्यापाऱ्याकडून 'नारळ, सुपारी' इ. याशिवाय पाटलाला वेठबिगार वापरण्याचा हक्क असे. त्याच्या तैनातीला एक 'राबता महार' मिळत असे. प्रसंग विशेष गावातील वाजंत्रीही आपली सेवा फुकट देत असे. वरील हक्कांशिवाय पाटलाच्या सनदेत मान-पानाचा निर्देश असे. गावच्या यात्रेत त्यास पुढारपणाचा मान मिळे. होळीच्या दिवशी गावच्या होळीस पोळी बांधण्याचा अग्रमान त्याचा असे. मकर संक्रातीस तिळगुळ, गणेशचतुर्थीस गणपती, दसरा-दिवाळीस भेट वस्तू इ. त्यास मानाने मिळत.

## २) कुलकर्णी :

पाटलाच्या खालोखाल गावात कुलकर्णी हा महत्त्वाचा वतनदार होता. त्याचे वतन पाटलासारखेच प्राचीन होते. त्याच्या पदास कागदपत्रात 'कुलकर्ण' अथवा 'लेखनवृत्ती' असे म्हटलेले आहे. गावचा पाटील बहुधा निरक्षर असल्याने गावचा हिशेब ठेवण्याचे प्रमुख काम कुलकर्णी करीत असे. पाटलाचा तो हिशेबनीस होता.

## अ) कुलकर्ण्याचे काम :

गावातील मिरासदारांच्या जमिनीचे क्षेत्र, लागवडीखालील क्षेत्र, पिकांची नोंद, शेतसारा, त्याची वसूली, थकबाकी इ. च्या नोंदी कुलकर्णी ठेवीत असे. गावातील गोतसभांच्या बैठकांना तो हजर असे व गोतसभेचा 'महजर' म्हणजे 'निवाडापत्र' तोच लिहित असे. गावचा सरकार दरबारी होणारा पत्रव्यवहार तो ठेवत असे. गावात लिहिणे-वाचणे जाणणारा तो एकमेव माणूस असल्याने गावची सर्व लिखापढी त्यास करावी लागे. एवढेच नव्हे तर काही गावचे कुलकर्णी 'ज्योतिष' ही करीत. अशावेळी कुलकर्ण्याबरोबर 'जोशीवृत्ती' ही त्याच्याकडे असे.

जसा प्रत्येक गावात पाटील असे तसे प्रत्येक गावास कुलकर्णी असेलच असे नाही. याचे कारण त्या काळी समाजात साक्षर व्यक्तींचे प्रमाण अल्प असल्याने कुलकर्णपदासाठी लायक माणूस मिळणे दुरापास्त होत असे. परिणामी एकेका कुलकर्ण्याकडे काही वेळा पाच-दहा गावेही नेमून दिलेली असत. कुलकर्ण्याच्या घरातच 'कुलकर्ण' वतन वंशपरंपरेने नांदत असे. कुलकर्णी कुटुंबात त्या दृष्टीने लिखापढी करणारे वारस तयार होत असत. किंबहुना कुलकर्ण्याची ती जबाबदारीच असे. काही ठिकाणी कुलकर्णी आपल्या वतनावर अन्य माणूस 'मुतलिक' म्हणूनही नेमत असे. काही गावी कुलकर्णी पद रिक्त राहिले तर गावकरी एकत्र येवून लायक माणसाची नेमणूक करीत व सरकारने त्यास मान्यता द्यावी असा अर्ज करीत. कोकणात काही ठिकाणी कुलकर्णी नसे. उदा. चौल सुभ्यात ते पद नव्हते. सारा वसुलीच्या हिशेबाचे काम 'हुजूरदार' नावाचे अधिकारी करीत. शिवाजी महाराजांनी चौलचा प्रदेश जिंकल्यानंतर तेथे कुलकर्णी नेमले. कुलकर्णी हा बहुधा ब्राम्हण जातीमधील असे. पण क्वचित प्रसंगी लिंगायत समाजातील व्यक्तीही 'कुलकर्णी' असल्याचे आढळते.

### ब) कुलकर्ण्याचे हक्क :

पाटलाप्रमाणे कुलकर्ण्यासही वतनी इनाम जमीन, गावकऱ्यांकडून हक्क-लाजिमा व मानपान मिळत असे. गावात वसूल होणाऱ्या जमीन महसूलाचा ठराविक भाग त्याला मिळत असे. 'सादिलवार' या सदराखाली त्याला दफ्तर खर्चासाठी काही रक्कम सरकारातून व हक्क-लाजिम्याच्या रूपाने मिळत असे. उदा. शेतकऱ्यांकडून घुगरी, हुर्डा इ. चांभाराकडून पायपोसी, तेल्याकडून तेल, लोणी विक्र्याकडून तूप, व्यापारी लोकांकडून नारळ-सुपारी, फळे इ. घरी राबता महार हक्काने मिळे. अर्थात कुलकर्ण्याचे हक्कलाजिमे स्थानपरत्वे भिन्न-भिन्न असत.

## ३) चौगुला :

पाटील-कुलकर्णी याच्यानंतर गावातील महत्त्वाचा वतनदार म्हणजे चौगुला. चौगुल्याचे मुख्य काम म्हणजे गावच्या कारभारात पाटलास मदत करणे, सरकार दरबारी पत्रव्यवहार, हिशेबाची कागदपत्रे पोहचविणे, गावचा सारा वसूल करण्यात पाटलास मदत करणे, गाव सोडून गेलेल्या कुळांना परत गावात आणून त्यांना स्थिर करणे, गावात वस्तूच्या रूपाने जमा झालेला महसूल सुरक्षित राखणे इ. अनेक कामे करावी लागत. पाटलाप्रमाणे त्याची निशाणी 'नांगर' होती. गोतसभेत त्याचे स्थान पाटलानंतरचे होते. काही तत्कालीन कागदपत्रात त्याची निशाणी 'काठी' अशी दाखविली आहे. यावरून गावच्या क्षेत्रफळाच्या मोजणी मापनाशी संबंधित काम ही तो करीत असावा.

पाटील-कुलकर्णी गावचा शेतसारा गोळा करीत, तेव्हा तो सरकारी खजिन्यात पोहचता करण्याची जबाबदारी चौगुल्यावर असे. गावची धान्याची व इतर वस्तूंची कोठारे ही त्याच्या ताब्यात असत. त्याची सुव्यवस्था ठेवणे हे त्याचे काम होते. सामान्यत: चौगुला हा मराठा जातीपैकी असे पण

अपवाद म्हणून काही ठिकाणी लिंगायत, जैन, मुसलमान इ. समाजातील ही चौगुला असत. एकंदरीत पाटलाच्या खालोखाल चौगुला वतनास प्रतिष्ठा असावी. म्हणूनच लोकगीतात एका चौगुला कन्येस चिडविण्यासाठी म्हटलेले आढळते....

''चौगुल्याच्या लेकी नको बोलूस चढईरू ।
कागदाचा भारा तुझ्या बापाच्या डोईवरू ॥''

## ४) शेटे महाजन :

शेटे-महाजन हे शिवकालीन गावगाड्यात आर्थिक व्यवहारांशी संबंधित वतनदार होते. मोठ्या गावी म्हणजे कसब्यासारख्या ठिकाणी, बाजारासाठी पेठ असे; अशी पेठ वसविण्याचे काम सरकारातून शेटे-महाजन यांना सांगितले जाई. त्यासाठी सरकारकडून शेटेला वतनी जमीन, रोख व काही हक्क मिळत असत. पाटील हा जसा गावचा प्रमुख तसा पेठेचा प्रमुख शेटे. गावचा हिशेब ठेवण्यासाठी जसा कुलकर्णी असे तसा पेठेचा हिशेब ठेवण्यासाठी महाजन हा वतनदार असे. शेटे प्रमाणे त्यासही इनाम, रोख रक्कम व गावकऱ्यांकडून काही वस्तू हक्काने मिळत. गावामध्ये भरणाऱ्या गोतसभेत शेटे-महाजन सभासद म्हणून बसत असत व गोत सभेच्या कामकाजात भाग घेत असत. गोतसभेच्या निवाडापत्रावर त्याची 'तराजू' ही निशाणी केली जाई. गावगाड्यातील सावकारीचे व्यवहार मुख्यत: शेटे-महाजनाकडून केले जात.

## ५) बलुतेदार व आलुतेदार :

प्राचीन काळापासून भारत देश शेतीप्रधान देश असून तो लाखो खेडे अथवा गावांचा बनलेला होता. यातील प्रत्येक खेडे आर्थिक बाबतीत स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनविण्यात आले होते. त्यासाठी प्रत्येक ग्रामीण शेतकऱ्यांच्या कामाचे स्वरूप लक्षात घेऊन एक व्यवस्था ठरवून देण्यात आली होती, ती म्हणजे महाराष्ट्रात मध्ययुगात प्रचलित असलेली बलुतेदारी पद्धती होय.

### अ) बारा बलुतेदार :

प्रत्येक गावाला सामान्यत: पुढील बारा बलुतेदार असत. त्यात बलुतेदारांच्या कामानुसार व त्यांना मिळणाऱ्या बलुत्यांच्या प्रमाणानुसार तीन वर्ग करण्यात आले होते.

### १) पहिल्या कासेचे बलुतेदार :

सुतार, लोहार, चांभार व महार या सर्वात जास्त महत्त्वाच्या चार बलुतेदारांना सर्वाधिक बलुते मिळत असे. यातील सुताराकडे शेतीची लाकडी अवजारे दुरूस्त करणे, बैलगाड्या, घर बांधण्यासाठी तुळ्या, खांब, दारे, खिडक्या वगैरे लाकडी सामान धान्याच्या किंवा पैशाच्या मोबदल्यात पुरविण्याची कामे होती. बलुत्यामध्ये दुरूस्त केली जात. लोहाराकडे शेतकऱ्यांची सर्व लोखंडी अवजारे

दुरूस्त करण्याचे काम असे. यामध्ये घोड्याला नाल बसविणे, गाडीच्या चाकाच्या धावा बसविणे वगैरे कामे तो करीत असे. चांभाराकडे शेतकऱ्याची सर्व चामड्याची कामे सोपविण्यात आली होती. त्यात मोटेची दुरूस्ती, चाबुक दुरूस्ती, शेतकऱ्यांची पायताणे, वहाणा, जोडे, दुरूस्त करणे, नवीन जोडे व वहाणा धान्य घेऊन पुरविणे. महाराकडे शेतकऱ्याची बलुत्याची कामे होती. त्याला राबत्याची कामे म्हणत. शेतकऱ्यांचा नांगर वाहून शेतात नेणे, पाट बरोबर करणे, ओझी वाहण्याची, कष्टाची सर्व कामे, गावात अथवा शेतातून इनामी जमिनीवर नेऊन करणे. कातडी सोलून मालकाला परत करणे, कुटुंबातील मृत्यू झाल्यास त्याच्या दहनासाठी गवऱ्या किंवा लाकडे स्मशान भूमीवर नेणे, मृत्युची बातमी गावोगावी असलेल्या नातलगांना पोहचविणे वगैरे कामे करावी लागत.

**२) दुसऱ्या कासेचे बलुतेदार :**

या वर्गात परीट, कुंभार, न्हावी आणि मांग या बलुतेदारांचा समावेश होई. त्यांना मिळणारे बलुते पहिल्या कासेच्या बलुतेदारांना मिळणाऱ्या बलुत्याच्या अर्धे बलुते मिळत होते. परीट गावातील मानकरी शेतकऱ्याच्या कपड्यांची धुलाई करत. लग्न प्रसंगी परटाकडे पुष्कळ धुलाईची कामे असत. कुंभार याकडे खेड्यातील शेतकरी कुटुंबांना सर्व प्रकारची मातीची भांडी पुरविण्याचे काम असे. त्यात स्वयंपाकाची भांडी, पाणी साठविण्याचे माठ, धान्य, मसाला व इतर खाद्य पदार्थ साठविण्याची भांडी यांचा समावेश होता. घरबांधण्यासाठी विटा धान्य घेऊन पुरविण्यात येत. न्हावी गावातील शेतकऱ्यांच्या हजामती करत, नखे कापणे, लहान मुलांचे जावळ काढणे व इतर अनेक कामे त्याला मिळणाऱ्या बलुल्यात करावी लागत. मांग सर्व शेतकऱ्यांना दोरखंड पुरवित; गावच्या वेशीला तोरण बांधणे, चावडी व मानकऱ्यांच्या दारांना तोरण बांधणे, धार्मिक प्रसंगी उफडे वाजविणे वगैरे कामे सुद्धा त्यांच्याकडे सोपविण्यात आली होती.

**३) तिसऱ्या कासेचे बलुतेदार :**

या वर्गात सोनार, गुरव, जोशी, मुलाणा, कोळी वगैरेंचा समावेश होतो. त्यांना मिळणारे बलुते दुसऱ्या बलुतेदारांना मिळणाऱ्या बलुत्यांपेक्षा अर्धे बलुते मिळत होते.

या तीन वर्गाच्या बलुतेदारामध्ये बलुत्याचे प्रमाण १० : ५ : २.५ असे होते.

**ब) अठरा अलुतेदार :**

अलुतेदारांमध्ये तेली, तांबोळी, साळी, सनगर, शिंपी, माळी, गोंधळी, डवऱ्या, भाट, ठाकूर, गोसावी, जंगम, मुलाणा, वाजंत्री, घडशी, कलावंत, भोई व कोराब यांचा समावेश होता. या वर्गाकडे सोपवलेली कामे कमी महत्त्वाची असल्याने त्यांना फार कमी आलुते मिळत असे. अशारीतीने प्रत्येक गावात बलुतेदार व अलुतेदार असत. विविध व्यवसाय करणाऱ्या लोकांत मुख्यत: दोन विभाग होते. त्यास 'कारू' व 'नारू' असे म्हणत. कारू म्हणजे 'बलुतेदार' आणि नारू म्हणजे 'आलुतेदार'

होय. या दोन्हीमधील फरक असा की, ज्याच्या सेवेवाचून शेतकऱ्याचे हरघडी नडते तो कारू अथवा बलुतेदार आणि ज्याची सेवा मिळाली नाही तरी शेतकऱ्याचे फारसे नडत नाही तो नारू. अथवा अलुतेदार; बलुतेदार शेतकऱ्यांची जी सेवा करतो तिचा मेहनताना त्यास शेतकऱ्यांकडून धान्य अथवा अन्य वस्तू यांच्या रूपाने मिळतो. त्यास 'बलुते' म्हणत; अलुतेदाराला त्याच्या सेवेसाठी जे मिळे ते 'अलुते' होय. 'बलुते-अलुते' यासच घुगरी, पेढी, काडी, सळई, भिकणे, शेर, हक्क असे कागदपत्रात म्हटलेले आढळते.

शिवकाळातील समाजस्थितीचे एक संशोधक इतिहासकार डॉ. अ. रा. कुलकर्णी यांनी बलुतेदार व अलुतेदार या गावच्या सेवकांचे तीन वर्ग पाडलेले आहते ते असे -

१) कारागीर वर्ग - सुतार, लोहार, न्हावी, चांभार इ.

२) सेवक वर्ग - महार, तराळ, मांग, रामोशी इ.

३) धार्मिक सेवक वर्ग - जोशी, गुरव, ठाकूर, जंगम, मुलाणा इ.

ग्रामव्यवस्थेत शेतकरी व बलुतेदार वर्गामध्ये 'गाय व तिची वासरे' असे मायलेकराचे जिव्हाळ्याचे संबंध होते. या संबंधामुळे प्रत्येक गावात एकात्मता नांदत होती. शेतीच्या लागवडीसाठी बलुतेदारांना वर्षभर पुरेल इतके धान्य मिळत नव्हते. त्यामुळे बलुतेदारांवर उपासमारीची पाळी येत होती. बलुतेदारांची अशी ओढग्रस्त स्थिती लक्षात घेऊन प्रत्येक गावात काही फार उपयोगी परंपरा निर्माण झाल्या होत्या. त्यातील एक परंपरा म्हणजे गावाची सेवा करून त्यांच्यावरच जगणाऱ्या बलुतेदारांना तयार जेवण पुरविण्याची परंपरा होय. त्यानुसार गावची चाकरी करणाऱ्या महार जागले, मांग जागले, राबते महार, घर महार, वेशीचे रक्षण करणारे वेस्कर, पाडेवार महार अशा वर्गाला शेतकरी लोक दर दिवशी दुपारी व रात्री तयार जेवण पुरवित असत. न्हाव्याला हजामतीचे दिवशी त्या-त्या घरातून दर डोई एक भाकरी व भाजी पुरविण्याचा शिरस्ता होता. प्रत्येक सणाच्या दिवशी गावातील मानकरी पाटील, कुलकर्णी, परगण्याचे देशमुख, देशपांडे, शेटे-महाजन या प्रतिष्ठितांच्या, वतनदारांच्या घरी सरपणाच्या मोवळ्या टाकल्या की महारांना जेवण देण्यात येत होते. वतनदार, मिरासदार शेतकऱ्यांचे मेलेले जनावर ओढून नेले की,'हातधुलाई' म्हणून गावच्या महारांना ५ शेर ज्वारी देण्यात येत होती. याच कामासाठी उपऱ्या शेतकऱ्याकडून महार २ ते ६ पायली धान्य आणि आठ आणे ते एक रूपया वसूल करीत असत. तसेच वर्षभरातील सर्व सणांच्या दिवशी गावातील शेतकरी वर्गाकडून सर्व बलुतेदारांना व काही अलुतेदारांना गोडधोड जेवण वाढण्यात येत असे. जेवण घेणे हा आपला हक्कच आहे असे बलुतेदार समजत असत. अशा रितीने दर दिवशी व सणासुदीला बलुतेदारांना शेतकऱ्यांकडून जेवण पुरविण्याच्या शिरस्त्यामुळे त्यांच्या उपजीविकेमध्ये अडचणी निर्माण होत नसत. गावातील शेतकरी आणि त्यांची सेवा करणारे बलुतेदार यांच्या दरम्यान जिव्हाळा निर्माण होणे साहजिक होते.

## ६) मिरासदार व उपरे :

गावामध्ये बहुसंख्य लोक मिरासदार असत. मिरासदार म्हणजे त्यांना वंश परंपरेने जमिनी दिलेल्या असत. ते जमिनीचे मालक असून शेतसारा सरकारात भरत असत. नागरिकांचे सर्व हक्क उपभोगण्यास ते पात्र समजले जात असत. गोतसभेच्या सर्व सभांना हजर राहून ते त्यांच्या कामकाजात भाग घेत असत.

मिरासदारांना त्याच्या शेतीच्या किंवा इतर कामात मदत करण्यासाठी जे लोक बाहेरून गावात येत असत त्यांना उपरे असे म्हणत. उपऱ्यांचा गोतसभेशी काहीही संबंध नसे. गावची पडीक जमीन ते कसण्यासाठी घेत असत. कालांतराने जर त्यांना त्या जमिनीची मालकी मिळाली तर ते मिरासदार होत असत. अन्यथा गावच्या कारभारात त्यांना कुठेच मान नसे.

## ड) शिवाजी महाराजांचे वतनदारासंबंधीचे धोरण :

शिवाजी महाराजांचा वतनसंस्थेकडे पाहण्याचा दृष्टिकोन इतर वतनदारांपेक्षा पूर्ण भिन्न होता. इतर वतनदार हे वतनाकडे केवळ व्यक्तिगत स्वार्थ, अधिक सत्ता, प्रतिष्ठा, संपत्ती साधण्याच्या दृष्टिकोनातून पाहत. याउलट वतनसंस्थेचा उपयोग स्वराज्य कार्यासाठी करणे हा शिवाजी महाराजांचा दृष्टिकोन होता. त्यांनी वतन संस्था नष्ट केली नाही. एखाद्या वतनदाराने गुन्हा केला, त्याला नेमून दिलेल्या जबाबदाऱ्या त्याने पार पाडल्या नाहीत तर त्याचे वतन जप्त केले जाई. जर त्याने आपल्या वागणुकीत सुधारणा केली तर त्याला ते वतन परत दिले जाई. वतनदारांमध्ये काही उणेपणा आहे म्हणून त्याचे वतनच नष्ट करावयाचे मार्ग स्वीकारलेले नाही. वतनदारांविषयी शिवाजी महाराजांचे धोरण सांगताना रामचंद्र अमात्य म्हणतात, 'दोष या लोकांत आहेत म्हणून केवळ त्यांचा द्वेष करावा, वतने बुडवावी म्हणता हा ही परम अन्याय ..... यास स्नेह आणि दंड या दोहोंमध्ये निक्षून ठेवावे लागतात'. शिवाजी महाराज वतनसंस्थेच्या विरूद्ध नव्हते. राज्य प्रशासनातील या संस्थेची आवश्यकता त्यांनी जाणली होती. वतनदारी नष्ट केली नाही तर अनेक प्रशासनाच्या कार्यासाठी तिचा योग्य तो उपयोग त्यांनी करून घेतलेला दिसतो. ग्रामजीवनाचा अविभाज्य भाग असलेली वतनसंस्था ही मध्ययुगातील परिस्थितीचाच परिपाक होती. मध्ययुग हा काळ वहनशील राजकीय पद्धतीचा होता. वहनशील राजकीय पद्धत ही आधुनिक पूर्व तंत्रज्ञान आणि संस्थात्मक पद्धत यांचे अभिव्यक्त रूप होते. मध्ययुगामध्ये परिणामकारकरित्या राज्यकारभार करण्यासाठी तंत्रज्ञान प्रगत झालेले नव्हते. संपर्क साधने अप्रगत होती. रेल्वे, पोस्ट, चांगले हमरस्ते, आधुनिक शस्त्रे, आधुनिक युद्ध तंत्रज्ञान नव्हते. त्यामुळे सत्ताधाऱ्याला आपली सत्ता काही प्रमाणात दुसऱ्याला द्यावी लागत होती. स्थानिक कारभार, स्थानिक शेती व महसूल विषयक कामे ही अप्रगत तंत्रज्ञान व अप्रगत संपर्क साधनांमुळे एकट्या राज्यसत्तेला करणे अशक्य होते. त्यामुळे राजा व रयत यांना जोडणारा वतनदार हा एक महत्त्वाचा दुवा होता. सरकारात रयतेचे तो प्रतिनिधित्व करीत असे, आणि रयतेला न्याय मिळवून देत असे.

वतनसंस्था ही त्या काळाची गरज होती. शेतीच्या विकासासाठी सामान्यांच्या कल्याणासाठी ही संस्था उपयुक्त आहे हे महाराजांना माहीत होते. पण त्या वतनाचा उपयोग स्वबळ वाढविण्यासाठी न करता स्वराज्य वृद्धीसाठी केला पाहिजे हे महाराजांचे धोरण होते. शिवकाळामध्ये राजसत्ता प्रबळ होती. 'राजपद' हे शक्तिशाली होते. राजाची सत्ता अंतिम होती. शिवाजी महाराजांचे व्यक्तिमत्व हे प्रभावी व लोकमान्य होते. त्यामुळे वतनसंस्थेवर ते नियंत्रण प्रस्थापित करू शकले. ही वतनदार मंडळी आपली सार्वभौम सत्ता सहजासहजी मानणार नाहीत हे महाराजांनी ओळखले होते. जेथे जावळीच्या चंद्रराव मोरे यांनी पुरातन राजेपणाचा केलेला दावा हे याचे उदाहरण होय. चंद्रराव मोरे सारख्या वतनदारांना एकच सार्वभौम सत्ता माहीत होती व ती म्हणजे सुलतानांची. ही समजूत दूर करण्यासाठी व त्यांच्यावर आपली सत्ता प्रस्थापित करण्यासाठी महाराजांनी राज्याभिषेक प्रसंगी देशमुख आदी वतनदारांवर पट्टी म्हणजे कर बसवून त्यांना आपले सार्वभौमत्व मान्य करायला लावले होते. वतन सत्तेवर राजसत्तेचा अधिकार अशा रितीने त्यांनी प्रस्थापित केला म्हणजेच शिवाजी महाराजांनी वतन संस्थेला नियंत्रणाखाली आणून ती प्रजा हितकारक बनविण्याचा प्रयत्न केला. जे वतनदार त्यांच्याशी एकनिष्ठ राहतील, जमिनी लागवडीखाली आणून शेतीचा विकास साधतील व रयतेची काळजी घेतील त्यांची वतने त्यांनी कायम ठेवली. आवश्यक प्रसंगी नवीन वतने देताना हेच निकष लावून ती दिली. सनदी वतनांचे नूतनीकरण करून दिले.

शिवचरित्र साहित्य खंड १० मधील इ.स. १६८६ मधील एका न्यायनिवाड्यामध्ये प्रल्हाद निराजीने शिवछत्रपतींचे धोरण सांगितले आहे. ते म्हणतात, ''राजश्री छत्रपतींचा तह की वतनदाराचे वतन विकत घेणाऱ्यास शिक्षा व्हावी व विकणाऱ्यासही सक्त ताकीद व्हावी.'' वतनदार हा कर्तबगार व निष्ठावंत माणूस असला पाहिजे अशी वतनदाराबद्दलची छत्रपतींची भावना या पत्रात दिसते. परंतु जे वतनदार राज्याविषयी, राजाविषयी निष्ठा बाळगणार नाहीत, राज्याच्या व प्रजेच्या दृष्टीने उपद्रवी ठरतील त्यांची वतने शिवाजी महाराजांनी जप्त केली.

शिवाजी महाराज आणि वतनदार यांचे प्रत्यक्ष संबंध कसे होते ते समकालीन कागदपत्रे आणि 'आज्ञापत्र' यावरून अभ्यासता येते. आज्ञापत्रामध्ये वतनदारांचे वर्णन 'स्वल्पच परंतु स्वतंत्र देशनायक', 'राज्याचे दायदा' असे केले आहे. दायाद याचा शब्दश: अर्थ वटिकरी.... हिस्सेदार असा होतो. परंतु हे वटिकरी म्हणजे राज्याच्या सार्वभौमत्वाचे वाटेकरी असे म्हणता येणार नाही. (शिवाजी महाराजांच्या स्वराज्य कार्यात ज्यांचा सहभाग होता त्याला उद्देशून हा शब्द प्रयोग वापरला आहे असे आपणास म्हणता येईल).

**स्वयं अध्ययन प्रश्न - १**

१) गावातील गोतसभेचा प्रमुख कोण असे ?

२) बलुतेदारांची संख्या किती होती ?

३) गावचा हिशेब ठेवणे हे काम कोणत्या वतनदारांचे असे ?

४) नारू कोणास म्हणत ?

५) पेठ वसविण्याचे मुख्य काम कोणत्या वतनदाराचे होते ?

## ३.२.२ शिवकाळातील धर्म

महाराष्ट्रामध्ये मुसलमानी अंमल सुरू झाल्यानंतर सुरुवातीला काही वर्षे हिंदुना डोके वर काढण्यास संधी मिळाली नाही. राज्यसूत्रे हिंदुच्या हातातून गेल्यामुळे त्यांचे कार्यक्षेत्र संकुचित बनले. मुस्लीम राजवटीमध्ये हिंदुच्या धार्मिक छळाला सुरुवात झाली. राजवाडे म्हणतात, 'हिंदु बलात्काराने बाटवले गेले. देवळे मोडली गेली, देव फोडले गेले, देवळाच्या मिशिदी झाल्या, पर्वतांचे पीर झाले, धर्म केवळ लोपून गेला अशी हैराणगत झाली. शिवकाळाच्या सुरुवातीला हिंदुची धार्मिक स्थिती अशी दिसून येते. अनेकांनी राज्यकर्त्यांना खूष करण्यासाठी मुस्लीम धर्म स्वीकारला. महाराष्ट्रात निस्तेज झालेल्या समाजाला मार्गदर्शन करण्याचे काम वारकरी संप्रदायाने केले. बहामनी राजवटीपासून दत्त संप्रदाय हा महाराष्ट्रात धार्मिक पुनरुज्जीवनाचे कार्य करीत होता. धर्म राखला तर धर्म आपले रक्षण करील आणि आचार हाच खरा धर्म आहे अशी लोकांची खात्री पटली.

१७ व्या शतकात शिवकालात पूर्वापार चालत आलेल्या अनेक श्रद्धा व अंधश्रद्धा समाजामध्ये दिसून येतात. रामदास स्वामींनी मारूतीची उपासना करण्याचा एक संप्रदाय महाराष्ट्रात सुरू केला. यादवकाळातील अनेक देवदेवता या काळातसुद्धा उपास्य देवता म्हणून मानल्या जात असत. पंढरपूरचा विठ्ठल, कोल्हापूरची अंबाबाई (महालक्ष्मी) व तुळजापुरची तुळजाभवानी ही दैवते अत्यंत लोकप्रिय होती. तुळजाभवानी ही शिवाजी महारांजाची कुलस्वीमिनी असल्यामुळे संबंध महाराष्ट्राचे श्रद्धास्थान बनलेले होते. पंढरपूरच्या आषाढी व कार्तिक वारीला हजारो भाविक वारकरी म्हणून जात असत. नाशिक, शिखर शिंगणापूर, पाली या क्षेत्रांना शिवकालात असाधारण महत्त्व प्राप्त झाले होते. शिवाजी महाराज हे धार्मिक बाबतीत सहिष्णू वृत्तीचे होते. देवालया प्रमाणेच मशिदीनाही सरकारी तिजोरीतून दिवाबत्तीसाठी नेमणूक मिळत असे. सभासद म्हणतो, 'मुसलमानांचे पीर, मशिदी त्यांचे दिवाबत्ती, नैवेद्यस्थान पाहून चालविले. शिवकाळात धार्मिक क्षेत्रात गेल्या तीन-चारशे वर्षातील अन्यायाची परंपरा संपली व स्वाभिमानाची परंपरा सुरू झाली.

**पंढरपूर चवळवळ (Pandharpur Movement) :**

महाराष्ट्रात मध्ययुगात नाथ संप्रदाय, महानुभव संप्रदाय, दत्त संप्रदाय, समर्थ संप्रदाय इ. संप्रदायांनी आगळेवगेळे आध्यात्मिक कार्य केले. महानुभव संप्रदायाने द्वैत विचारांचा तर वारकरी संप्रदायाने अद्वैत विचारांचा मार्ग स्वीकारला. दोन्ही संप्रदायांनी कर्मकांड व भेदभावाला दूर करत धर्माचा खरा अर्थ सांगितला. हिंदु धर्मातून पुढे आलेल्या या संप्रदायामधील अत्यंत श्रेष्ठ व महत्त्वाचा भक्ती संप्रदाय म्हणजे वारकरी संप्रदाय होय. महाराष्ट्र संस्कृतीचे जतन व संवर्धन करण्यामध्ये वारकरी संप्रदायाने फार मोठे योगदान दिले आहे.

वारकरी संप्रदायाची स्थापना कोणी केली व कोणत्या साली झाली हे निश्चित सांगता येत नसले तरी संत ज्ञानेश्वरांनी वारकरी संप्रदायाला तात्त्विक बैठक प्राप्त करून दिली. संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम यासारख्या संतांच्या अनुभूतीतून वारकरी संप्रदायाचा आचार मार्ग व साधी सोपी शिकवण सर्वसामान्यांना मिळाली. महाराष्ट्रातील भक्तिचळवळ अतिशय लोकप्रिय होऊन सर्वसामान्य माणसापर्यंत व सर्व जातींच्या लोकांपर्यंत पोहचविण्याचे काम वारकरी संप्रदायाने केले. आजही त्याचे वाढणारे अनुयायी वा लोकप्रियता आपण पाहत आहोत. या संप्रदायाला 'पंढरपूर चळवळ' या नावानेही ओळखले जाते. पंढरपूरचा विठ्ठल हे त्यांचे आराध्य दैवत. विठ्ठलाच्या दर्शनाला वर्षातून किमान एक वेळा तरी हे भक्त जातात. त्याला 'पंढरपूर वारी' असे म्हणतात आणि या वारीला जाणारे ते 'वारकरी' होत. मात्र मुळ 'वारकरी' शब्द हा 'वारीकरी' या शब्दाचा अपभ्रंश असावा. जुन्या वाङ्मयात 'वारी' हा शब्द 'येरझारा' या अर्थाने वापरलेला आढळतो. राजवाडे यांनी वारी शब्दाची उत्पत्ती दिली आहे ती पुढील प्रमाणे - ''वारी : री (प्रवाशांची टोळी) = वारी. पंढरीची वारी म्हणजे पंढरपूरला जाणाऱ्या प्रवाशांची टोळी. म्हणून वारकरी म्हणजे वारीला जाणारा प्रवासी. 'वारी' या शब्दाचा अर्थ यात्रा, नियमित फेरी, व्रत, येरझारा असा दिला जातो. वारकरी संप्रदाय हा पंढरपूरच्या विठ्ठलाशी संबंधीत असलेला संप्रदाय आहे. या दृष्टीने वर्षातून आषाढी, कार्तिकी, माघी अथवा चैत्री यापैकी एका शुद्ध एकादशीस गळ्यात तुळशीची माळ घालून नियमाने जो पंढरपूरास जातो तो 'पंढरपूरचा वारकरी' म्हटला जातो.

**वारकरी संप्रदायाचा इतिहास :**

''ज्ञानदेवेरचिला पाया । उभारिले देवालय ।
नामा तयाचा किंकर । तेणे रचिले ते आवार ।
जनार्दन एकनाथ । खांब दिला भागवत ।
तुका जालासे कळस । भजन करा सावकाश ।
बहिणी म्हणजे फडकती ध्वज । निरूपणा केले वोजा ॥''

संत बहिणाबाईंच्या या अभंगामधूनच वारकरी संप्रदायाची माहिती मिळते. ज्ञानदेवांच्या पूर्वी होऊन गेलेल्या पुंडलिक या विठ्ठल भक्ताकडे या संप्रदायाच्या प्रवर्तकाचा मान जातो. ज्ञानदेवांनी या संप्रदायाचा पाया रचला म्हणजे या संप्रदायाला अध्यात्मनिष्ठ मानवतावादी तत्त्वज्ञानाचे अधिष्ठान दिले. पण विठ्ठल भक्तीचा उगम पुंडलिकापासून झाला आहे.

**१) पुंडलिकाचा कालखंड :**

विठ्ठलभक्त पुंडलिकाविषयी फार थोडी ऐतिहासिक माहिती उपलब्ध आहे. पुंडलिक हा भक्त श्रेष्ठ असून त्याच्या भक्तिपोटी विठ्ठल त्याच्याकडे पंढरीस येऊन विटेवर उभा राहिला, अशी परंपरेने सांगितली गेलेली कथा ज्ञानदेवपूर्व कालातही रूढ होती.

**२) संत ज्ञानदेव-नामदेव यांचा कालखंड :**

वारकरी संप्रदायाच्या इतिहासात हा कालखंड (१३ वे - १४ वे शतक) सुवर्ण कालखंड समजला जातो. या कालखंडाचे स्फूर्तिस्थान संत ज्ञानेश्वर होते. त्यांनी 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ रचला. वारकरी संप्रदायास प्रमाणभूत झाला. हा ग्रंथ म्हणजे भगवद्गीतेवरची मराठीतील टिका असून त्याद्वारे ज्ञानेश्वरांनी अध्यात्मविद्येची दारे सामान्य जनास खुली केली.

संत नामदेव हे ज्ञानदेवांचे समकालीन होते. त्यांच्या मनोमिलनातून ज्ञान-भाक्तिचा संगम झाला. नामदेवांनी 'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी' या निष्ठेने किर्तनभक्ती करून केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्राबाहेर गुजरात, राजस्थान व पंजाब इतक्या दूरवरच्या प्रदेशात विठ्ठल भक्तीची पताका फडकवली. विठ्ठलाच्या भक्तीची दारे अबालवृद्धांना, स्त्री-पुरूषांना, सर्व जातिजमातींना खुली झाल्याचा उद्घोष ज्ञानदेव-नामदेवांनी केला आणि वारकरी संप्रदाय जनसामान्यांचा बनला.

**३) संत भानुदास - एकनाथांचा कालखंड :**

संत भानुदास (इ.स. १४४५ - १५५३) हे पंढरीचे वारकरी होते. विजयनगरचा सम्राट कृष्णदेवराय याने पंढरपूरच्या विठ्ठलाची मूर्ती विजयनगरला नेली होती. ती भानुदासांनी परत पंढरपूरास आणली, अशी कथा परंपरेने सांगितली जाते. संत भानुदासांच्या विठ्ठल भक्तीची परंपरा एकनाथांच्या पाठीशी होती. ते स्वत: अत्यंत प्रतिभासंपन्न विद्वान होते. ज्ञानदेवांनी जशी संस्कृत गीता मराठीत आणली तसे संस्कृतमधील भागवत पुराण एकनाथांनी मराठीत श्लोकबद्ध केले. विशेष म्हणजे तत्कालीन सनातन्यांचा विरोध नाहीसा करून हे भागवत त्यांनी काशीत पूर्ण केले. 'एकनाथी भागवत' या नावाने ते प्रसिद्ध आहे.

एकनाथी भागवताशिवाय एकनाथांनी 'चतु:श्लोकी भागवत', 'रूक्मिणीस्वयंवर', 'भावार्थ-रामायण', आदी ग्रंथाची रचना केली. तथापि भक्तिमार्गातील परमार्थ विचाराचा जनसामान्यांत प्रसार

होण्यासाठी त्यांनी ‘भारूड’ या सारख्या लोककाव्य प्रकाराचा पुरस्कार केला. त्यातून सामान्य लोकांच्या दैनंदिन व्यवहारातील, संसारातील विविध दाखले देऊन भक्तिरसाचे पाट त्यांनी झोपडीपर्यंत नेले. अध्यात्माचे धडे लोकभाषेत दिले. ‘मला दादला नको ग बाई’, ‘विंचू चावला’, ‘जोहार मायबाप जोहारा’ ही भारूडे आजही लोकप्रिय आहेत. याशिवाय एकनाथांनी अनेक पदे व ‘गौळणी’ रचल्या.

## ४) संत तुकारामांचा कालखंड :

महाराष्ट्रातील भागवत धर्माच्या इमारतीचा कळस संत तुकाराम महाराज झाले, असे यथार्थ वर्णन त्यांच्या शिष्या संत बहिणाबाई यांनी केलेले आहे. तुकारामांचे सुमारे ५ हजार अभंग आज उपलब्ध आहेत. त्यांच्या अभंगवाणीबद्दल बहुजनांना नेहमीच अत्मीयता वाटत राहिली आहे. समाजातील अंधश्रद्धा, दांभिकपणा, देवभोळेपणा, जातपातच्या दुष्ट रूढी, निरर्थक कर्मकांड, वर्ण-अहंकार या सर्वांवर तुकारामांनी कोरडे ओढले आहेत.

## ५) संत बहिणाबाईंचा कालखंड :

संत तुकारामांच्या निर्वाणानंतर वारकरी संप्रदायात जे काही महत्त्वाचे स्त्री-पुरुष संत झाले, त्यात संत बहिणाबाई व संत निळोबा यांचा प्रामुख्याने समावेश होतो. बहिणाबाई या तुकारामांच्या शिष्या होत्या. तुकाराम हे बहिणाबाईंनी म्हटल्याप्रमाणे वारकरी संप्रदायाच्या मंदिराचे कळस झाले तर खुद्द बहिणाबाई या मंदिराच्या साक्षात फडकती ध्वजा बनल्या. संत तुकारामांची शिष्या बहिणाबाई हे संत वाङ्मयातील एक गूढ व्यक्तिमत्व. शिवकालीन कवयित्री म्हणून तिचे स्थान महत्त्वाचे आहे. बहिणाबाईने स्वत:ची ‘गाथा’ लिहिली तेच तिचे आत्मचरित्र. बहिणाबाई ब्राम्हण पण तिचे गुरू तुकाराम जन्माने शुद्र म्हणून तिला तत्कालीन समाजाचा व कुटुंबाचा विरोध सहन करावा लागला. तिच्या काव्यरचनेमुळे भागवत धर्माची फडकती पताका होण्याचा मान तिला मिळतो.

संत निळोबा (पिंपळनेरकर) हे वारकरी संप्रदायातील अखेरचे संत समजले जातात. तुकारामांच्या विठ्ठलभक्तीशी व अभंगवाणीशी ते इतके समरस झाले होते की जीवनाच्या वाटचालीत तुकोबा हेच त्यांचे प्रेरणास्थान राहिले. निळोबांनी चांगदेव-ज्ञानदेव यांचे चरित्र ७६० ओव्यांत रचले असून तुकारामांची स्तुती ३३३ श्लोकात केलेली आहे. त्यांनी कृष्णलीलांवर काही अभंग केले असून गौळणीही रचल्या आहेत.

महाराष्ट्रातील नव्हे तर भारतातील इतर संप्रदायापेक्षा वारकरी संप्रदायाचे वेगळेपण व असाधारणत्व दिसून येते. हा संप्रदाय स्त्री-पुरुष असा भेद न मानता समाज जीवनात समानता मानतो. वारकरी संप्रदायामध्ये मुक्ताबाईस वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. ‘निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, एकनाथ, नामदेव, तुकाराम यांच्या नामावलीत ‘मुक्ताबाई’ ही एकच स्त्री संत मिळते. मुक्ताबाईचे ‘ताटीचे अभंग’ प्रसिद्ध आहेत.

## ६) संत जनाबाईंचा कालखंड :

संत जनाबाई ही वारकरी संप्रदायातील महत्त्वाची स्त्री संत विठोबाच्या दर्शनासाठी पंढरपूरास आल्या असता, त्या नामदेवाचे वडील दामाशेट्टी शिंपी यांना सापडल्या व त्यांच्या घरी कामकरी मुलगी म्हणून राहू लागल्या. वडिलांच्या मृत्युनंतर नामदेव शिंपी व्यवसाय करीत. स्वत: अभंग रचित. नामदेवाची शिष्या जनी (जनाबाई) हिच्या रचना अतिशय सरस असत. जनीबरोबर विठोबा सर्व कामे करतो अशा अनेक दंतकथा प्रसिद्ध आहेत. याचाच अर्थ त्या विठ्ठलभक्तीत मग्न झाली. त्यांचे अभंग त्याची स्वत:ची वेगळी प्रतिभा दर्शवितात. शुद्र स्त्रीला होणाऱ्या यातना त्यांच्या काव्यातून व्यक्त होतात. ती म्हणते, ''राजाई, गोणाई अखंडीत तुझे पायी, मज ठेविले द्वारी, नीच म्हणोनी बाहेरी''.

आज वेगवेगळ्या जाती धर्मातील पुरुषांबरोबरच स्त्रियाही पंढरपूरच्या वारीमध्ये सहभागी होतात. संप्रदायाचा आचारधर्म स्त्री व पुरुषांना एकसारखाच आहे. वारकरी होण्यास वयाचीही अट नाही. जाती, धर्म व वर्णाचा कोणताही प्रतिबंध नसल्याने संप्रदायामध्ये अठरा पगड जाती धर्माचे लोक समाविष्ट झालेले आहेत. संप्रदायात कुठलाच मतभेद नसल्याने समाज जीवनात वारकरी संप्रदायाने खऱ्या अर्थाने अध्यात्मिक लोकशाही स्थापन केल्याचे दिसते. ईश्वर प्राप्तीसाठी, साधनेसाठी, संसार किंवा व्यवहार सोडून देण्याची आवश्यकता नाही असे आग्रही प्रतिपादन या संप्रदायाने केले. त्याचबरोबर कर्मकांड, अंधश्रद्धा, भोंदूगिरी याचाही सदैव निषेध केला. इतर संप्रदायात असणारे सोवळे-ओवळे वारकरी संप्रदायात अस्तित्वात नाहीत. त्यामुळेच 'यारे यारे लहान थोर' अशी सामाजिक समतेची हाक हा संप्रदाय देताना दिसतो. साध्या, सोप्या व सरळ मार्गी शिकवणीतून संप्रदायाने लोकांमध्ये एकमेकांविषयी आपुलकी, श्रद्धा निर्माण केली. व्यक्तिगत जीवनाच्या उद्धाराबरोबरच लोकोद्धरासाठी विशेष महत्त्व दिले. त्यामुळेच आध्यात्मिक, सामाजिक एकोपा वाढीस लागला. भक्तीबरोबरच कर्मालाही संप्रदायाने महत्त्व दिल्यामुळेच इस्लामच्या आक्रमणापासून व इंग्रजी राजवटीपासून मराठी संस्कृती वाचू शकली व स्वराज्य स्थापण्यास हातभारही लावला गेला.

इ.स. १२ ते १७ व्या शतकाच्या अखेर पर्यंतच्या काळात ही चळवळ खूप लोकप्रिय झाली होती. मध्ययुगामध्ये वारकरी संप्रदायाचा जो प्रसार झाला व आजही होत आहे त्याचे मुख्य कारण म्हणजे वारकरी सांप्रदयातील संतानी व अनुयायांनी सदाचरणाचा साधा सोपा मार्ग लोकांना सांगितला. वारकरी संप्रदायाची भूमिका ही सर्वसमावेशक आहे. वेगवेगळ्या मूर्तीतून आकारणाऱ्या त्या परमेश्वराच्या रूपाविषयी वारकरी संप्रदायाचे तत्त्व पुढीलप्रमाणे पहावयास मिळते.

परमेश्वर सर्वत्र आहे.

मूर्ती हे केवळ प्रतिक, माध्यम आहे.

प्रत्येक भक्ताला आपल्याला भावणाऱ्या मूर्तीतून भक्ती व श्रद्धेने त्याच्या पर्यंत पोहोचून त्याचा अनुग्रह घेणे शक्य आहे. हा उदारमतवाद वारकरी संप्रदायात असल्याने या संप्रदायाला लोकाश्रय प्राप्त

होत गेला. समाजातील सर्व स्तरातील भक्त संप्रदायात सामील झाले. गृहस्थाश्रम धर्म पाळून, कोणत्याही जाचक कर्मकांडात न अडकता सहज शक्य होईल अशी साधी, सोपी शिकवण या संप्रदायाची असल्याने सर्वसामान्यांचा या संप्रदायाविषयी आत्मीय भाव वाढत गेला.

**स्वयं अध्ययन प्रश्न - २**

१) ज्ञानेश्वरी हा ग्रंथ कोणी लिहीला ?

२) वारी या शब्दाचा अर्थ सांगा.

३) चतु:श्लोकी भागवत या ग्रंथांची रचना कोणी केली ?

४) कोणाचे 'ताटीचे अभंग' प्रसिद्ध आहेत ?

५) शिवकालीन कवयित्री म्हणून कोणाचे स्थान महत्त्वपूर्ण आहे ?

## ३.२.३ तीर्थक्षेत्रे :

### १) कोल्हापूर :

दक्षिण महाराष्ट्रातील महत्त्वाचे तीर्थक्षेत्र म्हणून कोल्हापूरची ओळख आहे. ब्रह्मपूरी, उत्तरेश्वर, खोल खंडोबा, रंकाळा, पद्माळा व रावणेश्वर या मूळ सहा गावांना साधून त्यांना मध्यवर्ती असे (अंबाबाई) महालक्ष्मीचे देऊळ राष्ट्रकुटांनी नवव्या शतकात पूर्णावस्थेला नेले. महाराष्ट्रात आदिमाता आदिशक्तीची साडेतीन पीठे आहेत. त्यांना शक्तीची पीठे म्हणतात. या साडेतीन पीठात (करवीर) कोल्हापूरची श्री अंबाबाई, तुळजापूरची तुळजाभवानी, माहूरगडची रेणुका ही तीन पूर्ण पीठे आहेत व वणी सप्तशृंगी हे अर्धे पीठ आहे. यातील करवीर पीठ ५१ व १०८ शक्तीपीठांच्या गणनेत समाविष्ट आहे. त्यामुळे करवीर पीठ हे देवीचे महत्त्वाचे पीठ मानले जाते.

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांमध्ये स्थान पावलेली कोल्हापूरची अंबाबाई आजही लाखो भाविकांचे श्रद्धास्थान बनलेले आहे. आजही या देवालयात देवीची पूजा, सण, उत्सव साजरे केले जातात. पुराणकालीन ग्रंथात जरी हे शक्तिसंप्रदायाचे प्रमुख शक्तिपीठ म्हणून उल्लेख आला असला तरी आज आपणास तिचे सौम्य व सोज्वळ रूप बघावयास मिळते.

प्राचीन काळापासून कोल्हापूर परिसर कोणत्या ना कोणत्या राजसत्तेखाली होता. परंतु खुद्द कोल्हापूर ही आपल्या साम्राज्याची राजधानी ठेवून आजूबाजूच्या प्रदेशांवर राज्य करणाऱ्या दोनच सत्ता आपणांस इतिहासात आढळून येतात. पहिली सत्ता म्हणजे कोल्हापूरहून राज्य करणारे शिलाहार

घराणे व दुसरी सत्ता म्हणजे मराठा कालखंडातील महाराणी ताराबाईंनी स्थापन केलेली छत्रपतींची दुसरी गादी (करवीर) होय. या दोन्ही घराण्यांची सत्ता सातारा, कराड, सांगली, मिरज, कोल्हापूर, बेळगाव व दक्षिण कोकणचा प्रदेश यावर असलेली आपणांस आढळून येते.

कोल्हापूरातील अंबाबाईचे मंदिर हे या भागातील महत्त्वाचे धार्मिक क्षेत्र आहे. परंतु इथे ती शक्तीच्या रूपात आहे व कोल्हापूर हे एक शक्तीपीठ मानले जाते. कोल्हापूरला दक्षिण काशी शिवकाशीक्षेत्र व चौसष्ठ योगपीठ म्हणून मानले जाते. श्री महालक्ष्मीचे कागदपत्रे पहात असता असे दिसते की अनेक राजे व संत मंडळींनी येथे भेटी दिल्या आहेत. उदा. शककर्ते श्री छत्रपती शिवाजी, बाळाजी बाजीराव पेशवे यांची पत्नी गोपिकाबाई, श्री. समर्थ रामदास स्वामी, ब्रम्हेंद्रस्वामी इ. दक्षिणेमध्ये मुसलमानांच्या स्वाऱ्या होऊ लागल्या व ते मूर्ती, मंदिरे उद्ध्वस्त करू लागले. १६ व्या शतकात श्री महालक्ष्मीची मूर्ती मुसलमानांच्या भीतीने, कपिलतीर्थ येथील नजीकच्या एका पुजाऱ्यांनी लपवून ठेवली होती असे संदर्भ आढळतात.

महाराणी ताराबाई यांनी कोल्हापूरची स्वतंत्र गादी स्थापन केली आणि त्यावेळेपासून करवीर क्षेत्राचे व श्री अंबाबाईचे महत्त्व वाढू लागले. त्याला राजाश्रय मिळाला. छत्रपती शाहू महाराजा यांनी श्री अंबाबाई मंदिराची देखभाल उत्तम प्रकारे पाहिली व काही सुधारणा घडवून आणल्या. त्यामुळे कोल्हापूरची धार्मिक, सामाजिक व आर्थिक भरभराट झाली. ऐतिहासिक दृष्ट्या कोल्हापूर नगरीला महत्त्व असले तरी धार्मिकदृष्ट्या वेगळेच महत्त्व आहे. महाराष्ट्रात जी काही प्राचीन धार्मिक स्थळे आहेत. विशेषत: देवीची, त्यापैकी करवीर नगरीच्या अंबाबाईचे स्थान वरचे आहे. एकतर साडेतीन शक्तीपीठांपैकी ते एक आहे. दुसरे म्हणजे येथील मंदिर इतर शक्तीपीठींच्या मंदिरापेक्षा वेगळे व प्राचीन आहे. तिसरे म्हणजे अंबाबाई समवेतच महाकाली आणि महासरस्वती यांच्या मूर्तीही येथे असल्यामुळे हा एक मंदिर समूहच झाला आहे. त्यामुळे येथील या तिन्ही देवतांचा समावेश असलेले मंदिर अर्थातच तीन गर्भगृहांचे आहे आणि त्यावर वेगळाली शिखरे असल्यामुळे याला त्रिकूट मानावे लागते.

तीर्थक्षेत्र म्हणून सुप्रसिद्ध असलेले अंबाबाई मंदिर कोल्हापूर शहराच्या मध्यवर्ती आहे. किंबहुना, आपण असे म्हणू शकतो की, कालांतराने अंबाबाई मंदिराभोवती वस्ती वाढल्याने हे मंदिर शहराच्या मध्यवर्ती आले. प्राचीन कोल्हापूर संबंधी विस्तृत माहिती देणारा एकमेव ग्रंथ म्हणजे 'करवीर माहात्म्य' ! कोल्हापूर आणि परिसरातील सर्व देवता व त्यांच्या स्थानांची माहिती या ग्रंथात मिळते. कोल्हापूरला 'कोल्हापूर' (मूळ नाव कोल्लापूर) हे नाव कशामुळे मिळाले याची कथा 'करवीर माहात्म्यात' पहायला मिळते. महालक्ष्मीने कोल्लासुराचा वध केला व त्याच्या प्रार्थनेवरून या क्षेत्राला 'कोल्लापूर' असे नाव प्राप्त झाले. इथे महालक्ष्मीचे स्थानिक नाव 'अंबाबाई' आहे. एकेकाळी हे क्षेत्र तीर्थयात्रेचे प्रमुख केंद्र होते आणि त्यामुळेच याला 'दक्षिण काशी' असे नाव प्राप्त झाले. कन्हर यादव राजाच्या इ.स. १२५७ च्या कोरीव लेखात कोल्हापूरचा दक्षिण वाराणसी असा उल्लेख येतो.

महालक्ष्मी मंदिर कोणी बांधले हा संशोधकांसमोर एक प्रश्नच आहे. इतिहास सांगतो की, कूर, सातवाहन, बदामीचे चालुक्य, राष्ट्र कुट, शिलाहार (कल्याणी चालुक्यांचे मांडलिक व नंतर स्वतंत्र राजवट घोषित) यादव, बहामनी, मराठेशाही यासारख्या सत्ता कोल्हापूरवर राज्य करून गेल्या पण बदामीचे चालुक्य ते देवगिरीच्या यादवांपर्यंतच्या कोणत्या राजवटीत महालक्ष्मी मंदिर बांधले हे नेमकेपणाने सांगता येत नाही.

डॉ. वा.वि. मिराशी जे शिलाहार राजवंशाच्या इतिहासाचे तज्ज्ञ मानले जातात, त्यांच्या मते, महालक्ष्मीचे मंदिर हे शिलाहार राजवटीच्याही आधीचे असून ते 'सिंद' राजवटीत बांधले गेले असावे (मिराशी, वा.वि. १९७४, शिलाहार राजवंशाचा इतिहास आणि कोरीव लेख, पृष्ठ. १४३-१४९). या सिंद राजांनी (करहाटपुरा - धीश्वर) कोल्हापूर-कराड या भागावर काही काळ राज्य केले आणि शिलाहारांनी या मंदिराचा जीर्णोद्धार केला असावा असे वा.वि.मिराशी व रा.चि. ढेरे यांचे मत आहे.

महालक्ष्मी मंदिर हे एककूट पद्धतीचे होते आणि महाकाली व महासरस्वती मंदिरे ही कालांतराने महालक्ष्मी मंदिराशी जोडून प्रासाद साकार करण्याचा प्रयत्न करण्यात आला. महालक्ष्मी मंदिराच्या जंघावरील रथिकांची शिखरे ही नागर-भूमिज व नागर-शेखरी शैलीमध्ये शिल्पांकित केली आहेत. तर महाकाली मंदिराच्या जंघांवरील रथिकांची शिखरे ही वेसर शैलीत आहे. कोल्हापूरातील मंदिराचे स्थापत्य हे मुख्य कर्णाट शैलीपासून अत्यंत वेगळे प्रतीत होते, कारण कोल्हापूरातील मंदिरे ही तत्कालीन शासनकर्त्यांनी उपलब्ध कलाकारांकरवी बांधून किंवा जीर्णोद्धार करवून घेतली व त्यात पुढे पुढे शैलीदृष्ट्या थोडेफार बदलही होत गेले.

## २) शिखर शिंगणापूर :

शिखर शिंगणापूर हे एक स्वयंभू शिवस्थान मानले जाते. हे क्षेत्र सातारा जिल्ह्यातील माण तालुक्यातील दहिवडीपासून सुमारे २० कि.मी. अंतरावर आहे. शंभू महादेव नावाच्या डोंगरावर येथील शिवमंदिर आहे. महादेवाचा हा डोंगर म्हणजे सह्याद्रीचा एक फाटाच होय. शिंगणापूर या डोंगराच्या पायथ्याशी आहे. हे गाव देवगिरीच्या सिंघण यादवाने वसवले व शिखरावरचे मंदिरही त्यानेच बांधले. शिवाजी महाराजांचे आजोबा मालोजी यांनी येथे एक तलाव बांधला. मंदिराकडे पोहोचायला ४०० पायऱ्या चढून जावे लागते. वाटेत शिवलिंग स्वामीची समाधी आहे. त्यापुढे खडकेश्वर मंदिर आहे. शिवमंदिराला दगडी तट असून, त्याला चार दरवाजे आहेत. मुख्य मंडपात पाच दगडी व नंदी आहेत. गाभाऱ्यात शिव-पार्वतीची दोन स्वयंभू लिंगे आहेत. येथील एक घंटा पोर्तुगीजांकडून मिळवलेली आहे.

मंदिराच्या पश्चिम दरवाज्याच्या बाहेर बालीमहादेवाचे यादवकालीन हेमाडपंथी मंदिर असून सांप्रत त्याला अम्हतेश्वर म्हणतात. महादेवाची रोज चार वेळा पूजा असते. दुपारची पूजा पंचामृताची

असते. सोमवार व अमावस्या हे दर्शनाचे महत्त्वाचे दिवस असतात. मोठ्या सणांना देवाची पालखी निघते. महाशिवरात्रीला येथे मोठी जत्रा भरते. चैत्र महिन्यात दहा दिवस देवाचा मोठा उत्सव असतो.

चैत्र शु. अष्टमीला शिव-पार्वतीच्या विवाहाचा सोहळा असतो. या विवाहासाठी पागोटे विणण्याचा मान ज्या कुटुंबाना मिळालेला असतो ती कुटुंबे वर्षभर ते काम करतात. पागोट्याची लांबी सुमारे ५५० फूट असते. त्याचे एक टोक अमृतेश्वराच्या आणि दुसरे शंभुमहादेवाच्या शिखराला बांधतात. शिखर शिंगणापूरला दक्षिण कैलास असे संबोधतात. पंढरपूर पासूनही शिखर शिंगणापूरला बसने जाता येते. या स्थानाचे पुरातन नाव सिंघणपूर आहे. कारण ते देवगिरीच्या सिंघण यादवाने वसवले. येथील शिखराला धवलाद्री किंवा स्वर्णाद्री म्हणतात. शिंगणापूरच्या आसपास गुप्तलिंग, बिल्वलिंग, बाणलिंग, उदितलिंग, भैरवलिंग, स्तम्बलिंग, गौरीहरलिंग आणि उदुम्बरलिंग असून यांना आवरण देवता मानतात. शिंगणापूर महादेवाची कृपा मालोजी भोसल्यावर झाली. तेव्हापासून भोसले कुळाचे तो दैवत बनला. शहाजी, संभाजी यांच्या प्रतीक समाधीही शिंगणापुरी स्थापन करण्यात आलेल्या आहेत. छत्रपती शिंगणापूर महादेवाला भक्तिभावाने पूजत असत.

### ३) **तुळजापूर :**

महाराष्ट्राच्या इतिहासात, परंपरेत आणि सांस्कृतिक जीवनामध्ये तुळजापूरच्या श्री तुळजाभवानीचे स्थान अद्वितीय आहे. हे एक प्रसिद्ध तीर्थक्षेत्र असून तुळजापूर तालुक्यात बालाघाट डोंगराच्या एका पठारावर वसले आहे. महाराष्ट्रात असलेल्या देवीच्या साडेतीन शक्तीपीठांपैकी तुळजापूरची श्री तुळजाभवानी माता एक पूर्णपीठ आहे. तुळजाभवानी देवी हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे कुलदैवत असल्यामुळे सर्व महाराष्ट्राची कुलस्वामिनी म्हणून ओळखली जाते. ही देवी बहुजनांचीही कुलदेवता असल्याने या संस्थानची कीर्ती सर्व भारतभर पसरली आहे. या मंदिराभोवती भव्य प्रांगण असून बाजूला प्रशस्त ओवऱ्या आहेत. प्रांगणात एक मोठे होमकुंड आहे. या होमकुंडासमोर दोन दीपमाळा आहेत. या दीपमाळा शिवाजी राजे यांनी बांधल्या असे सांगतात. मुख्य सभामंडप व मंदिराचा गाभारा हेमाडपंथी शैलीचा आहे. मुख्य गाभाऱ्यात अष्टभुजा भवानीची मूर्ती आहे.

महाराष्ट्राची कुलस्वामिनी असलेल्या या तुळजाभवानीच्या मूर्तीची दररोज चार वेळा पूजा होते. महाराष्ट्रात लोकप्रिय असलेले देवी भवानीचे एक रूप तुळजा असून तिला त्वरिता, त्वजा, तुरजा, तुकाई अशी नावे तुक्क म्हणजे शुक्र या द्रविड शब्दापासून बनलेले दिसतात. शुक्रवार हा देवीच्या उपासनेतील महत्त्वाचा वार आहे. 'शुक्रवारची देवी' या अर्थाने तुकाई हा शब्द साधलेला दिसतो.

शिवाजी महाराजांचे विरोधक असलेले जावळीचे मोरे घराणे यांची ही कुलदेवता होती. मोऱ्यांचा बिमोड केल्यावर शिवाजी महाराजांनी प्रतापगडावर या देवीची स्थापना केली. अफझलखानच्या वधानंतर या देवीचे मंदिर बांधले आणि नेपाळातून गंडकी शिळेची मूर्ती आणवून तिची नव्याने

प्रतिष्ठापना केली. तुळजापूरची भवानी व प्रतापगडची आदिशक्ती एकच आहेत अशी समर्थ रामदासाची भावना आहे. ही भावना रामदासाने 'तुळजापुरीची माता प्रतापीच प्रगटली' या चरणात व्यक्त केली आहे. शिवाजी महाराज व रामदास यांनी उपासलेली ही देवी महाराष्ट्रातील हजारो घराण्यांची कुलदेवता आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात एक प्रेरक शक्ती म्हणून ही तिचा महिमा गाजत आहे.

गुढीपाडवा, शिराळषष्ठी, ललितापंचमी, बलिप्रतिपदा, मकरसंक्रात आणि रथसप्तमी यादिवशी तिची महापूजा करतात. देवीच्या सर्व उत्सवात नवरात्रीचा उत्सव मोठा असतो, त्या नऊ दिवसात नित्य महापूजा होते. प्रत्येक रात्री वाहन बदलून देवीचा छबिना काढतात. आश्विन शुद्ध अष्टमी नवमीला चंडी होम होतो. या दिवशी बलिदानाचा कार्यक्रम असतो. रात्री पलंगाची व पालखीची मिरवणूक काढतात. ही पालखी दसऱ्याच्या दिवशी पहाटे देवीपुढे आणतात. त्यावेळी एक मानकरी तेली आपली करंगळी कापून देवीला रक्ताचा टिळा लावतो. मग देवी पालखीतून शिलंगणाला जाते. सीमोल्लंघनाहून परत आपल्यावर देवी शयन करते. कोजागिरीस ती पुनश्च जागृत होते.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३**

१) प्राचीन कोल्हापूर संबंधी माहिती कोणत्या ग्रंथातून मिळते ?

२) शिखर शिंगणापूर हे तीर्थक्षेत्र कोणत्या जिल्ह्यात आहे ?

३) साडे तीन शक्तीपीठांपैकी अर्धे शक्तीपीठ कोणते ?

४) तुळजाभवानीच्या मंदिराचा मुख्य सभा मंडप व गाभारा कोणत्या शैलीचा आहे ?

५) 'दक्षिण काशी' असे एकेकाळी कोणत्या तीर्थक्षेत्रास संबोधत असत ?

## ३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१) गावगाडा : ग्राम, मौजे, मोठी कसब्याची गावे, नगरे, खेड्यांची रचना, तेथील शेती व त्या खेडेगावातील लोकांचा सामाजिक, धार्मिक व प्रशासकीय व्यवहार म्हणजे गावगाडा होय.

२) हक्कलाजिमे : वतनदाराला गावच्या सेवाचाकरीबद्दल रयतेकडून अनेक हक्क व अधिकार मिळत तसेच इनामी जमीन व गावकऱ्यांकडून मानपान मिळे त्याला हक्कलाजिमे म्हणत. उदा. तेल्याकडून तेल, कुंभाराकडून रांजण.

| | | | |
|---|---|---|---|
| ३) | बलुता | : | बलुतेदारांना सुगीच्या दिवसात उदनिर्वाहासाठी दिलेला मोबदला किंवा वर्षभराच्या कामाचा मेहनताना/मोबदला. |
| ४) | मिरासदार | : | गावामध्ये ज्यांच्याकडे स्वत:च्या मालकीची जमीन असे व जे लोक जमिनीचा सारा सरकारमध्ये भरत असत त्यांना मिरासदार म्हणत. |
| ५) | उपरे | : | गावामध्ये स्वत:च्या मालकीची जमीन नसणारे व उदरनिर्वाहासाठी दुसऱ्याच्या शेतात राबणारे, कसणारे किंवा मोलमजूरी करणारे लोक असत, त्यांना उपरे असे म्हणत. |
| ६) | कुलदैवत | : | घराण्याचे मुख्य दैवत / आराध्यदैवत. |

## ३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १**

१) पाटील

२) बारा

३) कुलकर्णी

४) आलुतेदारास

५) शेटे

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २**

१) ज्ञानेश्वर

२) यात्रा, नियमित फेरी म्हणजे वारी.

३) संत एकनाथ

४) संत मुक्ताबाई

५) संत बहिणाबाई

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३**

१) करवीर माहात्म्य

२) सातारा

३) वणी सप्तशृंगी

४) हेमांडपंथी

५) कोल्हापूर

## ३.५ सारांश

प्रस्तुत प्रकरणात आपण ग्रामीण समाजरचना या अंतर्गत शिवकालीन खेडे अथवा गाव, शिवकालीन गावगाड्यातील चार सत्ता यांची चर्चा केली. तसेच शिवकालीन गावगाड्यातील वतनसंस्था व गावामध्ये असणारे वतनदारांचे योगदान अभ्यासले. पाटील, कुलकर्णी, चौगुला, शेटे-महाजन या वतनदारांनी गावात शांतता व सुव्यवस्था निर्माण करून गावच्या विकासात भर घातल्याचे दिसते. बलुतेदार व आलुतेदारांनी गावाला आर्थिक बाबतीत स्वावलंबी व स्वयंपूर्ण बनविण्याचे प्रयत्न केले. शिवाजी महाराजांनी वतनदारांकडून रयतेची होणारी आर्थिक पिळवणूक थांबवली व रोख वेतनाची सुरुवात केली व कल्याणकारी राज्याच्या हिताआड येणाऱ्या वतनदारांबाबत निश्चित धोरण स्वीकारले. याच काळात सामाजिक समतेची हाक देणारा वारकरी संप्रदाय वाढीस लागला. या संप्रदायाने समाजातील सर्वसामान्य जनता, स्त्रिया यांना सामावून घेतल्याने हा संप्रदाय आजही समाजामध्ये 'पंढरपूरची वारी' या माध्यमातून जिवंत असल्याचे दिसते. या काळात कोल्हापूर, तुळजापूर, शिखर शिंगणापूर ही तीर्थक्षेत्रे महत्त्वाची तीर्थक्षेत्रे म्हणून नावारूपास आली. त्यांचे महत्त्व आजही अबाधित आहे. लाखोंच्या संख्येने भाविक या तीर्थक्षेत्रास भेटी देतात व तेथील उत्सव मोठ्या आनंदाने साजरे करतात. म्हणजेच त्रि. ना. अत्रे यांनी म्हटल्याप्रमाणे कितीही राजवटी आल्या, गेल्या, राज्याच्या उलथापालथी झाल्या तरी ग्रामीण समाजाने आपले ठिकाण सोडले नाही असेच म्हणावे लागेल.

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

### अ) टिपा लिहा.

१) पाटील - कामे - हक्कलाजिमे

२) शेटे व महाजन

३) बलुतेदार

४) मिरासदार व उपरे

५) कोल्हापूर

६) शिखर शिंगणापूर

### ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१) शिवकालीन ग्रामीण समाजरचना स्पष्ट करा.

२) शिवाजी महाराजांचे वतनदारांसंबंधीचे धोरण स्पष्ट करा.

३) पंढरपूर चळवळी विषयी माहिती द्या.

४) कोल्हापूर तीर्थक्षेत्राची माहिती स्पष्ट करा.

## ३.७ अधिक माहितीसाठी संदर्भ ग्रंथ


१. डॉ. पवार जयसिंगराव, डॉ. पवार मंजुश्री, मराठ्यांची राज्यव्यवस्था, समाज व्यवस्था आणि अर्थव्यवस्था, फडके प्रकाशन, कोल्हापूर (बी.ए. १, सेमी. २).

२. डॉ. लोहार एम.ए., मराठेकालीन समाजजीवन, शिवाजी विद्यापीठ प्रकाशन, कोल्हापूर, २००७, पृष्ठ.क्र. ६०.

३. डॉ. कदम विकास, वारकरी संप्रदायाचा इतिहास आणि पंढरपूरातील सांप्रदायिक फड व मठांचे कार्य, अरूण प्रकाशन, लातूर, २०१४.

४. डॉ. चौधरी दत्ता, पंढरपूर नगरीचा इतिहास (प्राचीन ते इ.स. १९९०). मुक्ता पब्लिशिंग हाऊस, कोल्हापूर, २०१५.

५. राणे अमरसिंह, खणे बी. डी., राणिंगा उमाकांत, युगयुगीन करवीर इतिहास दर्शन, भारतीय इतिहास संकलन समिती, कोल्हापूर, महाराष्ट्र, २०१३.

६. शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद, निवडक शोधनिंबंध संग्रह, फेब्रु. २००९.

७. मराठी विश्वकोश, खंड-७, प्रकाशन वर्ष, १९७७.

८. भारतीय इतिहास संशोधक मंडळ, त्रैमासिक, ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड-६०१, १८७७, वर्ष ३६ वे, अंक १ ते ४, पृष्ठ क्रं. ५०.


❋❋❋

## सत्र २ : घटक ४

# छत्रपती शिवाजी महाराजांचे धोरण व योगदान


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ प्रशासन आणि व्यवस्थापनाचे धोरण व योगदान
- ४.२.२ व्यापार व शेतीसंबंधीचे धोरण व योगदान
- ४.२.३ धार्मिक धोरण

४.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.५ सारांश

४.६ सरावासाठी स्वाध्याय

४.७ अधिक माहितीसाठी पुस्तके आणि संदर्भ ग्रंथ


## ४.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील मुद्दे स्पष्ट करता येतील अथवा समजून घेण्यास मदत होईल.

- छत्रपती शिवाजी महाराजांची प्रशासन व्यवस्था कशी होती हे सांगता येईल.
- छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेची वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील.
- छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेचे व्यवस्थापन कसे होते हे स्पष्ट होईल.
- छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन, शेती, व्यापार संबंधी धोरण व योगदान स्पष्ट करता येईल.
- छत्रपती शिवाजी महाराजांच्या धार्मिक धोरणांची वैशिष्ट्ये सांगता येतील.

## ४.१ प्रास्ताविक

अखिल भारतीय समाजाचे प्रेरणास्थान व प्रेरणास्रोत म्हणून शिवाजी महाराजांचे नाव अग्रक्रमाने आपण घेतो. महाराष्ट्रीय समाज व संस्कृतीचे मूळ अधिष्ठान आपणास शिवाजी महाराजांनी स्थापन केलेल्या हिंदवी स्वराज्यात पहावयास मिळते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत मातृभूमीच्या स्वातंत्र्याचा ध्यास घेतला व मोठ्या पराक्रमाने आणि जिद्दीने स्वराज्याची उभारणी केली. त्यांच्या स्वराज्याचे स्वरूप लोककल्याणकारी व बहुजनवादी होते. रयतेच्या कल्याणासाठी स्वराज्याच्या प्रशासनात अंर्तभूत केलेले नवीन कायदे, नियम आणि दंडक आजही लोकशाही प्रणालीत प्रेरणादायी आणि आदर्शभूत आहेत. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची उभारणी करत असताना स्वीकारलेले धोरण, स्वरूप, उपयुक्तता तत्कालीन समाजात क्रांतिकारी व पुरोगामी होते व आजही आहे. शिवाजी महाराजांनी स्वीकारलेले अर्थिक, राजकीय, धार्मिक, प्रशासकीय धोरण व सुधारणा अभ्यासणे गरजेचे आहे. त्याच बरोबर शिवाजी महाराजांचा धर्मनिरपेक्ष, मानवतावादी दृष्टिकोण तरुण वर्गापुढे मांडणेही गरजेचे आहे. प्रस्तुत प्रकरणात शिवाजी महाराजांचे प्रशासन, व्यापार, शेती व धार्मिक धोरण आणि त्यांचे व्यवस्थापन यासंबंधीचा ऊहापोह केलेला आहे. प्रकरणाच्या स्वरूप रचनेमध्ये शिवाजी महाराजांची विविध धोरणे व व्यवस्थापन हे घटक केंद्र स्थानी असले तरी वेगवेगळे इतिहासकार व विचारवंतांचा शिवाजी महाराजांच्या धोरणा विषयीचा विचार व चिकित्सा तत्कालीन पत्राच्या आधारे येथे विशद करण्याचा प्रयत्न केला आहे.

शिवाजी महाराजांच्या जीवन चरित्राचा सूक्ष्मपणे अभ्यास केल्यानंतर त्यांच्या प्रशासन व्यवस्थेची काही ठळक वैशिष्ट्ये समोर येतात. नवस्थापित स्वराज्याला संघटित करणे, स्थैर्य प्राप्त करून देणे, आर्थिक दृष्ट्या सबल करणे इत्यादीवर त्यांनी विशेष लक्ष केंद्रीत केलेले दिसते. या संदर्भात डॉ. अ. रा. कुलकर्णी म्हणतात की, ''प्रदेश विस्तार करून साम्राज्य स्थापनेचे धोरण त्यांनी अंगीकारलेले नव्हते. मराठी मुलूख, मराठी भाषा आणि महाराष्ट्र धर्म यांच्या संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी त्यांनी महाराष्ट्र राज्याची स्थापना केली. साम्राज्य तृष्णेपेक्षा स्वराज्याच्या संरक्षणाचाच हेतू प्रामुख्याने होता''. शिवाजी महाराजांच्या स्वराज्य स्थापनेच्या उद्दिष्टासंबंधी प्रसिद्ध इतिहासकार जदुनाथ सरकार म्हणतात की, ''वैश्विक सहिष्णुता आणि समान न्याय आणि आपल्या सर्व प्रजेचे संरक्षण ही शिवाजी राजांच्या राजकीय धोरणाची प्रमुख सूत्रे होती''. शिवाजी महाराजांच्या राजनीतीचे मर्म जाणणारे, त्यांच्या प्रशासन व्यवस्थेत वाढलेले रामचंद्रपंत अमात्य, महाराजांच्या स्वराज्य स्थापनेबद्दल लिहितात की, ''देश दुर्गादि सैन्याचे तट नवेच निर्माण करून येकरूप अव्याहत शासन चालविले, केवळ नूतन सृष्टीच निर्माण केली. दिवगंत विख्यात कीर्ती संपादिली तेहे मराठी राज्य.''

## ४.१.१ प्रशासन आणि व्यवस्थापना संबंधीचे धोरण व योगदान

### अ) शिवकालीन प्रशासन व्यवस्थेचे स्वरूप :

शिवपूर्व काळखंडात महाराष्ट्रामध्ये सर्वत्र अराजकता आणि गोंधळाची परिस्थिती होती. प्रशासनातील ही अराजकता व गोंधळ दूर करण्यासाठी शिवाजी महाराजांनी केंद्रीय प्रशासनाची निर्मिती केली. केंद्रीय प्रशासनामध्ये स्वराज्याचा प्रदेश, मुलकी विभाग, अष्टप्रधान मंडळ व लष्करी विभागांचा समावेश होता. केंद्रीय प्रशासनाची प्रांतिक प्रशासनात विभागणी केलेली होती. यामध्ये सरसुभा (सरसुभेदार), सुभा (सुभेदार), परगणा (सरहवालदार), महाल (हवालदार), गट (कमावीसदार) व खेडे (पाटील) इत्यादीचा समावेश होता.

### ब) स्वराज्याचे प्रशासकीय विभाग :

१) उत्तर कोकणापासून साल्हेर ते पुण्यापर्यंतचा प्रदेश.

२) पुणे ते धारवाड-कोप्पल पर्यंतचा प्रदेश.

३) दक्षिण कोकण व कारवार बेदनूरपर्यंतची किनारपट्टी.

४) म्हैसूर व तामिळनाडू मधील प्रदेश. या चारही विभागावर महाराजांनी स्वतंत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली होती.

### क) हिंदवी स्वराज्याची संकल्पना :

हिंदवी म्हणजे हिंदूचे राज्य असा गैरसमज आहे. वास्तविक पाहता शिवाजी महाराजांना हिंदवी म्हणजे स्वराज्य हवे होते, अर्थात स्वकीयांचे राज्य. तत्कालीन भारताचा विचार करता बहुसंख्य शासक मुस्लिम होते. त्यामुळे स्वकीयांची सत्ता त्यांना अभिप्रेत होती. कारण ''हिंदवी हा शब्द धर्मवाचक ही आणि प्रदेश वाचकही आहे'' असे प्रा. सदाशिव आठवले म्हणतात. शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे ध्येय आपल्यापुढे ठेवले, त्यांनी स्वराज्याची स्थापना केली ज्यामध्ये संपूर्ण वातावरण न्याय, नीती आणि सहिष्णुतेने भरलेले होते. या संबंधी न्या. म. गो. रानडे म्हणतात की, ''मराठी राज्याची स्थापना ही शिवाजी महाराजांकडून झालेली या देशाची थोर सेवा होय.'' तर डॉ. अ. रा. कुलकर्णी म्हणतात की, ''केवळ राज्य स्थापून ते स्वस्थ राहीले नाहीत, तर ते नूतन मराठी राज्य सुजलाम सुफलाम कसे होईल, त्याचा आर्थिक पाया कसा बळकट होईल, हे राज्य कसे टिकून राहील याचाही त्यांनी विचार केला आणि हीच त्यांची देश सेवा होय.''

शिवाजी महाराजांच्या राज्य निर्मिती संदर्भात जदूनाथ सरकार आपल्या 'हाऊस ऑफ शिवाजी' या ग्रंथात म्हणतात की, ''आठ विविध भाषातून उपलब्ध असलेल्या सर्व साधनांचा अभ्यास केला असता शिवाजी राजाच्या इतिहासकाराला हे मान्य करावे लागेल की, शिवाजी हा केवळ मराठा-राष्ट्र निर्माता नव्हता तर मध्ययुगीन हिंदुस्थानातील तो एक श्रेष्ठ रचनात्मक कार्य करणारा अत्यंत बुद्धिमान

माणूस होता. राज्य नष्ठ होतात, साम्राज्याचे विघटन होते. राजघराणी लुप्त होतात परंतु काळातील ऐतिहासिक वारसा म्हणून, 'लोकनेता' राजा या नात्याने राजाचे स्मरण अखिल मानव जातीला दीर्घकाळ सचेतन करणारे, कल्पना शक्तीला चेतावणारे, बुध्दिला स्फुरण देणारे आणि उच्च पराक्रम करण्यास उद्युक्त करणारे राहील.''

**ड) छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासकीय व्यवस्थापनाची वैशिष्ट्ये :**

**१) नैतिक अधिष्ठान असलेली राज्य यंत्रणेची उभारणी :**

नैतिक अधिष्ठान असलेली स्वकीयांची सत्ता स्थापन करण्याचा शिवाजी महाराजांचा प्रामाणिक प्रयत्न होता. स्वकीयांच्या सत्तेचे राज्यात रूपांतर करण्यासाठी एक स्थिर आणि कार्यक्षम अशी शासन यंत्रणा निर्माण करणे गरजेचे होते. महाराज या संबंधी प्रारंभापासूनच जागरूक असलेले दिसतात. गरज भासेल त्याप्रमाणे मुलकी व लष्करी प्रशासनाची रचना व स्वरूप बदलत गेले, त्यांची कर्तव्य व कार्यक्षेत्रे निश्चित केली. कारभार चोख व न्यायबुद्धीने व्हावा यासाठी अनेक नियम घालून दिले आणि नैतिक अधिष्ठान असलेल्या राज्य यंत्रणेची उभारणी केली.

**२) शाश्वत अभिवचन देणारे प्रशासकीय धोरण :**

शिवाजी महाराजांच्या राजनीतीचा व धोरणांचा शाश्वत दृष्टिकोनातून विचार करताना त्यांनी इ.स. १६४६ मध्ये अस्तित्वात आणलेली त्यांची राजमुद्रा केंद्रस्थानी ठेवावी लागते. संस्कृत भाषेतील ही राजमुद्रा (प्रतिपचंद्र लेखेव वर्धिष्णु । विश्व वंदिता शाहसुनो शिव स्यैषा:॥ मुद्रा भद्राय राज ते ॥) एक प्रकारचा आशावाद आणि आश्वासन प्रतिपादित करते. प्रतिपदेच्या कोरीप्रमाणे हे शहाजीपुत्र शिवाजीचे राज्य दिवसेंदिवस वाढत जाणार आहे आणि त्याच्या राज्याची मुद्रा सर्वांच्या कल्याणासाठी आहे अशी ग्वाही देते.

**३) न्याय व्यवस्था :**

कोणत्याही राज्यतंत्राला रयतेची अनुकुलता प्राप्त करावयाची असेल तर त्यासाठी निर्दोष न्याय पद्धतीची आवश्यकता असते. शिवाजी महाराजांच्या न्याय पद्धतीमध्ये गाव पातळीवरील गोतसभा यांना महत्त्वाचे स्थान होते. सर्व जातींच्या लोकांच्या व्यवहाराचा निर्णय करण्याचा अधिकार गोतसभेला होता. गोतसभेच्या वरती देशकसभा होती. या दोन न्यायनिवाडा करणाऱ्या संस्थाशिवाय धर्मसभा होती की ज्याचा संबंध धर्म प्रकरणांशी होता. स्वराज्यांतर्गत लोकांना जीवित व अधिकाराचे संरक्षण मिळवून देऊन त्यांचे जीवन निश्चित करणे हे सूत्र महाराजांच्या न्याय पद्धतीचे होते.

### ४) प्रधान मंडळ व राज्यव्यवहाराची निर्मिती :

शिवाजी महाराजांनी सुरू केलेली राज्यव्यवहार पद्धती समकालीन अन्य राज्यात प्रचलित असलेल्या पद्धतीपेक्षा वेगळी होती. शिवकालीन राज्यव्यवहार पद्धतीचे स्वरूप लोककल्याणकारी व लोकशाहीवादी, विकेंद्रीत प्रशासकीय धोरण असे होते. महाराजांनी स्वराज्याच्या प्रशासकीय यंत्रणेत अष्टप्रधानांची रचना केलेली होती. त्यांच्या हाताखाली १८ कारखाने व १२ महालावरील अधिकारी होते. अष्टप्रधानात राज्य कारभाराच्या सर्व खात्याचे वाटप केलेले होते. अष्टप्रधानापैकी प्रत्येकाचे वेगळे कार्यालय होते व त्यांच्या अंकित अधिकारी असत, त्यांना छत्रपतीच्या खाजगी खात्याशी सहकार्य करावे लागे. अष्टप्रधानाच्या पैकी काहीच्या आधीन स्वराज्यातील प्रदेश होता. पंडितराव व न्यायाधीश वगळता सर्व प्रधानांना युद्ध मोहिमावर जावे लागे. त्यांच्या अनुपस्थितीत त्या प्रधानांचे काम मुतालिक करत. हे प्रतिनिधी प्रधानांचे प्रतिनिधी असले तरी त्यांची नियुक्ती राजाच्या अनुज्ञेत होत असे. शिवाजी महाराजांनी प्रधानांना इनामे, वतने व जहागिऱ्या बहाल केल्या नाहीत. राजकीय धनकोशातून त्यांना ठरल्याप्रमाणे रोख स्वरूपात वेतन देण्याची सुरुवात केली. त्यामुळे राज्याऐवजी वतने सांभाळण्याची प्रवृत्ती त्यांच्यामध्ये निर्माण झाली नाही.

### ५) राज्यव्यवहार कोशाची निर्मिती :

राज्य व्यवहार कोश 'लेखन प्रशस्ती' या ग्रंथाचे विद्वानाकडून लेखन करून घेतले. प्रशासकीय पत्र व्यवहारातील फारशी शब्दांचे स्थोम कमी करण्याचा शिवाजी महाराजांनी प्रयत्न केला.

### ६) अष्टावधानी सावधपणा :

शिवाजी महाराजांच्या लष्करी प्रशासन व मोहिमासाठी अष्टावधानी सावधानपणाचे धोरण होते. सिंहगड किल्ल्यावर फितुरी झाली तेव्हा मोरोपंत व निळोपंत यांना पत्र लिहून कोकणची स्वारी रद्द केलेली होती. अखंड सावधान असलेल्या महाराजांचे स्वराज्याच्या कानाकोपऱ्यात लक्ष होते. हे त्यांच्या प्रशासनव्यवस्थापनाचे वैशिष्ट्य होते.

### ७) राजनीती चातुर्य :

शिवाजी महाराजांची राजनीती बचावात्मक परंतु व्यवहारी स्वरूपाची होती. त्यांना समकालीन अनेक शत्रू होते. मात्र कोणत्या शत्रूबरोबर केव्हा चार हात करावयाचे याचे पुरते ज्ञान आणि उमग त्यांच्या अंगी होती. मुघल सत्तेविरूद्ध आपण एकत्र लढू असा विश्वास आदिलशहा व कुतुबशहाला दिलेला होता. उत्तर विरूद्ध दक्षिण असा प्रश्न निर्माण झाला, तर आपण सारे दक्षिणी आहोत असे म्हणत. कधी आदिलशहा तर कधी कुतुबशहा आणि या दोन्ही विरोधात गरज पडली तर मुघलांशी तहाच्या वाटाघाटी अशा स्वरूपाचे व्यवहारी राजनीती चातुर्य होते.

## ८) प्राप्त प्रदेशाची चोख व्यवस्था :

१७ व्या शतकात आक्रमणे करून प्रदेश प्राप्त करणे राजकारणाचा एक भाग होता. मात्र प्राप्त केलेला प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली ठेवणे आणि वर्चस्वाखाली आलेला प्रदेश दीर्घकाळ टिकेल अशी व्यवस्था निर्माण करणे, त्या प्रदेशातील लोकांना लोककल्याणकारी राज्य आहे याची जाणीव निर्माण करून देण्यासाठी प्राप्त प्रदेशाची चोख व्यवस्था लावलेली आढळते.

## इ) लष्करी धोरण व व्यवस्थापन :

शिवकालीन लष्करी धोरण व व्यवस्थापनाचा विचार करता स्वराज्यात जेवढे महत्त्व किल्ले व कोश बलाला होते तेवढेच महत्त्व लष्करी धोरणाला होते. वास्तविक पाहता कोश, दुर्ग व सैन्य ही परस्परपूरक बलस्थाने आहेत. कोशबल व सैन्यबल उत्तम असेल तर नवीन प्रदेश व किल्ले प्राप्त करता येतात. कोशबळाने सैन्याचा विस्तार करता येतो आणि सैन्यबल असेल तर कोश समृद्ध करणे फारसे अवघड नसते. नवीन प्रदेश जिंकणे, जिंकलेल्या प्रदेशाचे संरक्षण, संवर्धन व न्यायाने त्याचे पालन करणे ही राजतंत्राची अंगे रामचंद्रपंत अमात्यांनी  नमूद केलेली आहेत. प्रभावी सैन्याच्या अभावी यापैकी एकाही अंगाचा निर्वाह होत नाही. त्यामुळे राज्यतंत्राचा विचार केला तर सैन्याची अर्थात लष्कराची अपरिहार्यता सहज लक्षात येते. सैन्यावाचून राज्य, धन व पराक्रम यांना काही अर्थ नाही असे शुक्रनीतीमध्ये म्हटले आहे. शिवाजी महाराज ज्या प्राप्त परिस्थितीत जगातील बलिष्ठ समजल्या जाणाऱ्या शत्रूशी लढा देत होते, त्या परिस्थितीत त्यांना प्रभावी लष्कर उभारणे क्रमप्राप्त होते. त्यातच तत्कालीन प्रचलित मुस्लिम सैन्यपद्धतीत ज्या उणिवा होत्या त्या दूर करून नवीन पद्धतीने सैन्याची उभारणी करण्याचे आव्हान होते.

### १) राजसंरक्षक दल :

शिवाजी महाराजांच्या लष्करी धोरणाचा विचार करता राजसंरक्षक दलाला शिवाजी महाराजांनी प्राधान्य दिलेले दिसते. स्वराज्याच्या केंद्रस्थानी असलेल्या राजाच्या शरीराचे संरक्षण करणे व आपत्कालीन अथवा आणीबाणीच्या प्रसंगी राखीव सैन्य म्हणून याची उभारणी केलेली दिसते. यामध्ये स्वत: महाराजांनी पारखून घेतलेल्या धैर्यशाली, सुदृढ, आज्ञाधारक, विश्वासू व निष्ठावान अशा निवडक लोकांचा समावेश असे. राजाच्या शरीर संरक्षणाबरोबरच राजसभा व राजाच्या निवासस्थान व्यवस्थेची व संरक्षणाची जबाबदारी या सेनेकडे असे. या संबंधी आज्ञापत्रामध्ये अतिशय उद्बोधक लिखाण पहावयास मिळते. एका डच पत्रात महाराजांच्या संरक्षक दलाच्या शिस्तीचे व कौशल्यपूर्ण हालचालीचे वर्णन पहावयास मिळते, ''शिवाजी आणि सुलतान याप्रमाणे बोलत बसले असता थोड्याच वेळात ती सर्व जागा शिवाजी महाराजांच्या ६००० घोडेस्वारांनी वेढून टाकली. ते इतक्या हळूहळू आले की, एखाद्या माशीच्या उडण्याचा आवाज सुद्धा ऐकू आला असता''.

## २) घोडदळ :

शिवकालीन घोडदळाचे पागा (बारगीर) व शिलेदार हे दोन प्रमुख भाग होते. १२ व्या शतकातील चालुक्य राजा सोमेश्वराने आपल्या ग्रंथात 'ज्याचे अश्व त्याचे राज्य' असे म्हटले आहे. मध्ययुगीन युद्धपद्धतीचा विचार करता हे विधान खरेही आहे. मध्ययुगीन युद्धपद्धतीमध्ये घोडदळाला अनन्यसाधारण महत्त्व होते. शिवाजी महाराजांच्या लष्करी धोरणातसुद्धा हेच सूत्र पहावयास मिळते. आदिलशाही दरबारातील कवी नुसरती यांने आपल्या 'अलीनामा' या दख्खनी भाषेतील काव्यग्रंथात शिवाजी महाराजांच्या घोडदळाच्या धोरणासंबंधी म्हटले आहे की, ''मराठ्यांच्या घोड्यांना जणू पंख होते एकेक घोडा सैनिकापेक्षाही वरचढ होता. मराठ्यांची प्रत्येक घोडी म्हणजे परीच, ती चंद्राची सखी असते. मराठा वीर जेव्हा काव्याने लढू लागतो तेव्हा सारे विश्व नदीच्या भोवऱ्यात सापडल्यागत होते .....'' वरील विधानातील काव्यात्मक भाग सोडला तर शिवाजी महाराजांच्या घोडदळ विषयक शिस्त, प्रशिक्षण व धोरणाची प्रचिती येते. व्हिन्सेन्ट स्मिथ हा 'अकबर द ग्रेट मुघल' या ग्रंथात शिवाजी महाराजांच्या घोडदळाच्या धोरणा संबंधी लिहिताना म्हणतो की, ''अकबरला जर मराठ्यांच्या चपळ घोडदळाशी तोंड देण्याचा प्रसंग दुदैवाने आला असता तर त्याचा पणतू औरंगजेब याच्यावर पुढे जो प्रसंग ओढवळा त्याहून वेगळे काही घडले नसते'' शिवाजी महाराजांच्या घोडदळाच्या धोरणासंबंधी 'फॉरेन बायोग्राफी ऑफ शिवाजी' या ग्रंथात माहिती मिळते. ''जितके घोडे मिळतील तितके मिळवून तो आपल्या घोडदळाची वाढ करीत असे. तो घोडदळातील सैनिकास भरपूर वेतन देत असल्यामुळे त्याच्या घोडदळात येण्याकरिता अनेक लोक तयार असत. भरपूर वेतनासमवेत योग्य काम करणाऱ्यास शिवछत्रपती मोठमोठी पारितोषिके देत आणि योग्य कर्तृत्व दाखविणाऱ्या सैनिकांना तात्काळ श्रेणीची व वेतनाची वाढ मिळण्याची निश्चिती असल्यामुळे सैन्यात कर्तव्यनिष्ठा वाढे.''

## ३) पायदळ :

'भुजंगाप्रमाणे झडप घालणारे सैन्य'' असा उल्लेख महाभारतात आहे आणि अशाच सैन्याची प्रचिती आपणास शिवकालीन पायदळात येते. स्वत: शिवाजी महाराजांनी पायदळाच्या उभारणीमध्ये जातीने लक्ष दिलेले दिसते. स्वराज्यनिष्ठा हे मराठा पायदळाचे सामर्थ्य होते. या सामर्थ्यामुळेच विषम परिस्थितीत बलाढ्य सत्तांशी मुकाबला करण्याची हिम्मत मराठा लष्कराने केली. त्यांची ही हिम्मत, सामर्थ्य व बळ केवळ शस्त्रास्त्रे व साधन सामग्रीतून निर्माण झालेले नव्हते तर त्याची मूळ प्रेरणा खुद्द महाराज होते. 'सैतानाची भूतावळ म्हणणारा आदिलशाही दरबारातील कवी नुसरती म्हणतो की, 'मति कुंठित करणारा वेग आणि अक्कल गुंग करणारी चपळाई मराठा सैन्यात होती'. अंतर्गत व्यवस्थेच्या दृष्टीने आणि आपल्या पराक्रमामुळेही मराठा सैन्य समकालीन सैन्याहून वेगळे होते. शिवाजी महाराजांनी लष्करासाठी नेमून दिलेली शिस्त आणि आदर्श हे श्रेष्ठ दर्जाचे होते. या संबंधी जॉन फ्रायर लिहितो की,

''शिवाजीच्या सैनिकांना हाल अपेष्ठांची सवय होती. प्रवासात होणाऱ्या उपासमारीला ते सरावलेले होते व ते सुखासीन बनलेले नव्हते. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या साहसी आक्रमणाला ते अधिक लायक असत.''

शिवाजी महाराजांनी लष्करात व अधिकाऱ्यात समन्वय निर्माण करून आपुलकीचे नाते निर्माण केलेले होते. यासंबंधी ॲबे कॅरे लिहितो की, ''शिवाजीचे आपल्या अधिकाऱ्यावर प्रेम होते. तो त्यांना भावाप्रमाणे किंवा मित्राप्रमाणे वागवीत असे. त्यांच्याशी त्याची वागणूक घरोब्याची असे. त्यांच्या वैयक्तिक गरजाकडे तो लक्ष पुरवीत असे. त्यांच्याहून स्वत:साठी वेगळे असे तो काहीच घेत नसे. त्याच्या अंगची कर्तबगारी विलक्षण होती. तो नेहमी आपल्या सैन्याच्या पुढे असे. सुखासीनता कशी ती त्यास माहीत नव्हती'' ॲबे कॅरेचे वरील विधान शिवाजी महाराजांच्या उत्तम लष्करी व्यवस्थापनाचे गमक सांगून जाते.

शिवकालीन लष्करी व्यवस्थापनांचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे छ. शिवाजी महाराजांनी राबविलेली वेतन पद्धती. या संदर्भात 'फॉरेन बायोग्राफी ऑफ शिवाजी' या ग्रंथात महत्त्वाची माहिती मिळते. ''शिवाजी आपल्या शिपायांना नियमित वेतन देत असे व सैनिकास सैन्यात घेतेवेळी जे वेतन त्यास देण्याचे तो ठरवी, ते नियमाप्रमाणे प्रत्येक प्रतिपदेस तो आपल्या सैनिकास देत असे.''

## ४) गुप्तहेर :

शिवाजी महाराजांच्या सैन्य विभागातील महत्त्वाचा भाग म्हणजे गुप्तहेर होय. या विभागात त्यांच्या राजदूतांचाही समावेश होत असे. शत्रुराष्ट्राच्या अंत:स्थ कारभार, त्यांची सैन्य सिद्धता जाणून घेण्यासाठी गुप्तहेर खाते महत्त्वाचे होते. शिवाजी महाराजांनी अनेक युद्धात जे नेत्रदीपक विजय प्राप्त केले त्याचे श्रेय गुप्तहेरांना जाते. गुप्तहेरांच्या माध्यमातून शत्रूसैन्याची लष्करी ताकद, शत्रूच्या मर्म स्थानांची इत्यंभूत माहिती मिळत असे. गुप्तहेर विभागात स्वत: शिवाजी महाराज अतिशय सक्रिय होते असे 'फॉरेन बायोग्राफी ऑफ शिवाजी' या ग्रंथातील माहितीवरून लक्षात येते, ''वाटेल तो वेश धारण करून शिवाजी हेराचे काम करण्यास कचरत नसे. लाकडाच्या मोळ्या विकणाऱ्यांचा अथवा गवताचे भारे विकणाऱ्यांचा वेश घेऊन शत्रूच्या सैन्यात वार्ता काढण्याकरीता शिवाजी जात असे.'' शिवाजी महाराज वेषांतर करण्यात पटाईत होते तसे त्यांचे अधिकारीही होते, विशेषत: बहिर्जी नाईक. शिवाजी महाराजांच्या गुप्तहेरांच्या धोरणात एक समान दुवा पहावयास मिळतो, तो हा की, गुप्तहेरांना वेतन मोठ्या प्रमाणात देत असत. या संबंधी 'फॉरेन बायोग्राफीज ऑफ शिवाजी' या ग्रंथात महत्त्वाची माहिती मिळते. ''शिवाजी आपल्या हेरांना मुबलक द्रव्य देत असे व यामुळे हे हेर शिवाजीस नक्की बातमी देत असत व त्यांचे योगाने शिवाजीस यश प्राप्त होण्यास सुलभ जात असे.... द्रव्य देऊन मित्र कसे मिळवावे हे शिवाजी उत्तम प्रकारे जाणत होता. त्यांचेपाशी जमा द्रव्यांचा मोठा साठा होता. त्याप्रमाणे त्यांचे मित्रही अनेक होते आणि हे त्याचे मित्र त्याला प्रत्येक तासातासात माहिती पुरवीत असत'' गुप्तहेरांच्या नियुक्त्या करण्यासाठी

महाराजांनी वेगवेगळ्या क्लृप्त्या वापरलेल्या दिसतात. गुप्तहेरांचा धोरणासंबंधी सभासदकार म्हणतात की, ''पुढे जितकी शहरे मोंगलाईत होती ते जागा चारपाच माणसे वेषधारी करून पाळतीत ठेविली. पाळती घेऊन दोघे खबर सांगावयास यावे, दोघांनी तेथे हुशार राहावे. मग लष्कर पाठवून हवेलिया शहरे मारावी ही तजवीज केली.''

## ५) शिवाजी महाराजांच्या लष्करी सुधारणा, धोरण व योगदानाचे ठळक मुद्दे :

१. स्वराज्याचे सैन्य हे प्रत्यक्ष सरकारी सैन्य म्हणून प्रत्यक्ष मध्यवर्ती सरकारच्या व्यवस्थापनाखाली ठेवले. तत्कालीन मुस्लिम राजवटीत अशा प्रकारची व्यवस्था नव्हती.

२. जहागिरदाराच्या माध्यमातून भरती केली जाणारी सैन्य पद्धती बंद करून प्रत्यक्ष सरकारच्या माध्यमातून सैन्य उभारणी.

३. जहागिरदार व वतनदारांच्या सैन्याच्या ऐवजी सरकारी अर्थात राज सत्तेच्या नियंत्रणाखाली सैन्याची उभारणी.

४. चपळ व वेगवान हालचाली करणाऱ्या घोडदळाची निर्मिती

५. सैन्याला व्यसनापासून दूर ठेवले, विलासीपणा, गाणी, संगीत, नर्तकी व बायका यावर निर्बंध व नियमांचा भंग करणाऱ्यास कठोर शिक्षा.

६. स्त्रिया व मादक पदार्थांना सैन्यात प्रवेश न करू देणारे शिवाजी महाराज पहिले राजे. यासंबंधी सप्तप्रकरणात्मक बखरीमध्ये लिहिले आहे की, ''कैफी माणूस जाले म्हणजे बेखबरदार होऊन कार्यनाश होतो आणि मनस्वी पापाचार घडतो म्हणोन बहुत मर्यादा शिक्षा करणे असे करून ठेविले.''

७. डोंगराळ व दुर्गम प्रदेशात चपळ हालचाली करणाऱ्या पायदळाची शिस्तबध बांधणी.

८. सैनिक व अधिकाऱ्यांना त्यांच्या शौर्याबद्दल व पराक्रमाबद्दल मोठ-मोठ्या पदव्या व बक्षिसे दिली. मात्र जमीन तोडून दिली नाही. कारण वतनाच्या लोभाने निष्ठेला तडा जातो हे शिवाजी महाराज जाणून होते.

९. सैनिक अधिकाऱ्यांना जमीन इनाम देऊन त्याच्या करातून व उत्पन्नातून त्यांचा खर्च भागविण्याची मुस्लिम पद्धती बंद करून प्रत्यक्ष सरकारी तिजोरीतून पगार देण्याची व्यवस्था केली.

१०. दक्षतापूर्वक सैन्य मुलकी अधिकाऱ्यांच्या अधीन ठेवले. सैनिकी अधिकाऱ्याकडे प्रत्यक्ष राज्यप्रशासनाचा भाग न सोपविण्याची त्यांनी दक्षता घेतली. प्रशासन अधिकारी सैनिकी अधिकाऱ्याहून वेगळे असत. ज्यावेळी अष्टप्रधानातून कोणाला स्वारीवर पाठविण्यात येत असे त्यावेळी त्यांना स्वतंत्र सेनाधिकार देण्यात येत असत.

११. सैन्याच्या प्रत्येक तुकडीमध्ये हेरांचे जाळे निर्माण केलेले होते. सैन्यातील सर्व हालचालींवर बारकाईने लक्ष असे.

१२. सर्व जाती-धर्मातील लोकांचा सैन्यात भरणा करून समान संधी दिली.

१३. दारूगोळा व शस्त्रास्त्रात स्वयंपूर्ण होण्यासाठी स्वराज्यात स्वतंत्रपणे कारखाने सुरू केले.

१४. तत्कालीन राजकीय, भौगोलिक, लष्करी परिस्थितीचा विचार करून उघड युद्धपद्धती ऐवजी 'गनिमी कावा' (छुपी युद्ध पद्धती) पद्धतीचा अवलंब केला.

१५. लष्करी मोहिमा सामान्यत: पावसाळा वगळून काढाव्यात हे धोरण.

१६. शत्रूंच्या बायकामुलांना हात लावण्यात येऊ नये असा स्पष्ट संकेत होता.

१७. कोणीही लुटीची व्यवस्था स्वेच्छेने करू नये असा दंडक होता.

१८. नियमांचा भंग करणारे अथवा युद्धात भ्याडपणाचे वर्तन करणारे जे कोणी असतील त्यांना सैनिकी न्यायासनापुढे आणून अपराध सिद्ध झाल्यास योग्य ती शिक्षा देण्याची पद्धत.

### ६) किल्ला प्रशासन व व्यवस्थापनाचे धोरण : (राज्याचे सार ते दुर्ग)

प्राचीन भारतीय राजनीती शास्त्रज्ञांना दुर्गाचे महत्त्व इतके वाटत होते की, सप्तांगात्मक राज्य संस्थेचे एक अत्यंत महत्त्वाचे अंग म्हणून सेनेच्या बरोबरीने त्यांनी दुर्गाचा निर्देश केलेला आहे. राज्याच्या बलस्थानात दुर्गाचे महत्त्व अनन्य साधारण आहे, यासंबंधी शुक्राचार्यांनी म्हटले आहे की, ''दुर्गाच्या आश्रयाने एक सशस्त्र मनुष्य शंभर योध्द्याशी लढू शकतो व शंभर योद्धे दहा सहस्त्रांशी लढू शकतात. यास्तव राजाने दुर्गाचा आश्रय करावा'' गिरीदुर्ग, महीदुर्ग, जलदुर्ग आणि वनदुर्ग या किल्ल्यांच्या संकल्पना प्राचीन काळापासून आस्तित्वात आहेत. दुर्गांची महती लक्षात घेवूनच शिवाजी महाराजांनी स्वराज्याचे भौगोलिक क्षेत्र ज्या ठिकाणचे निवडले त्यावरून त्यांची दूरदृष्टी दिसून येते. सह्याद्रीच्या डोंगराळ प्रदेशांचे वैशिष्ट्ये पाहून दुर्गाचे दुर्गमत्व अधिकच साध्य करणारे नवीन किल्ले स्वराज्याचे आधारस्तंभ केले. ''थोरले महाराज यांनी हे राज्य गडावरून निर्माण केले' व 'गड होते म्हणून राज्य मात्र अवशिष्ठ राहिले'. ही दोन विधाने स्वराज्यांच्या निर्मितीचे गमक प्रस्तुत करतात. शिवाजी महाराजांनी एकानंतर एक गड घेऊन स्वराज्याची उभारणी केली.

किल्ल्याच्या निर्मितीपासून ते प्रशासनापर्यंत अत्यंत बारीक-सारीक गोष्टीची नोंद आपणास आज्ञापत्रात पहावयास मिळते. ''संपूर्ण राज्याचे सार ते दुर्ग. दुर्ग नसता मोकळा देश परचक्र येताच निराश्रय, प्रभाभग्न होऊन देश उध्वस होतो. देश उध्वस झाल्यावरी राज्य असे कोणास म्हणावे ? याकरिता पूर्वी जे-जे राजे झाले त्यांनी आधी देशामध्ये दुर्ग बांधून तो-तो देश शाश्वत करून घेतला आणि आले

परचक्र संकट दुर्गाश्रयी परिहार केले. हे राज्य तर तीर्थरूप थोरले कैसालवासी स्वामीनी (शिवाजी महाराज) गडावरून निर्माण केले. जो-जो देश स्वशासनवश न होय त्या-त्या देशी स्थल विशेष पाहून गड बांधिले.... ज्यापेक्षा राज्य संरक्षण करणे आहे त्यापेक्षा अधिकोत्तर साधनी स्वत: गड किल्ल्याची उपेक्षा न करता परम सावधपणे असतील त्या गड किल्ल्याची यशोक्त मजबुती करावी .... गडकोटाचा आश्रय नसता फौजे ज्याने परमुलखी टिकाव धरून राहावत नाही. फौजे विरहित परमुलखी प्रदेश होणेच नाही. इतक्याचे कारण ते गडकोट विरहित जे राज्य त्या राज्याची स्थिती म्हणजे अभ्रपटल न्याय आहे. याकरिता ज्यास राज्य पाहिजे त्यांजी गडकोट हेच राज्य, गडकोट म्हणजे राज्याचे मुळ, गडकोट म्हणजे खजीना, गडकोट म्हणजे सैन्याचे बळ, गडकोट म्हणजे राज्यलक्ष्मी, गडकोट म्हणजे आपली वसतिस्थळे, गडकोट म्हणजे सुखनिद्रागार, किंबहुना गडकोट म्हणजे आपले प्राण संरक्षण असे चित्तास आणून कोणाचे भरवशावर न राहता त्याचे संरक्षण करणे व नूतन बांधण्याचा हव्यास स्वत:च करावा कोणाचा विश्वासू मानू नये.''

वरील विधानावरून छ. शिवाजी महाराजांनी किल्ल्याचे महत्त्व किती अचूक ओळखलेले होते व किल्ल्यासंबंधी त्यांची धारणा व धोरण काय होते हे स्पष्ट होते. या संबंधी डॉ. बाळकृष्ण आपल्या ग्रंथात म्हणतात, ''शिवाजीचे वास्तव्य डोंगरी मुलखातच होते. असे डग्लस याने यथार्थ म्हटले आहे. त्यांचे सर्व सामर्थ्य डोंगरी प्रदेशाच्या भरवशावरच होते. तो खराखुरा दुर्गस्वामी होता. त्याचा जन्म दुर्गात झाला. त्याला जे वैभव प्राप्त झाले तेही सर्व दुर्गाच्यामुळे झाले व त्याच्या दुर्गांना जे सामर्थ्य प्राप्त झाले तेही त्याच्याच प्रयत्नाने झाले. त्याचे दुर्ग म्हणजे भारतातील त्याच्या शत्रूंना धाक होता. त्याच्या राष्ट्राची ती संवर्धन भूमी होती. त्याच्या विजयाचा तो पाया होता. त्याच्या वाढत्या महत्त्वकाक्षेचा तो जिना होता. दुर्ग हेच त्यांचे निवास्थान व तेथ त्याच्या आनंदाचे निधान होते. कित्येक दुर्ग त्याने स्वत: बांधले व जे आधी बांधलेले होते त्या सर्वांना त्याने बळकटी आणली.''

गडकोटाच्या मालिकेने स्वराज्याला स्थैर्य लाभले. तसेच आपत्काळी आत्मरक्षणाचे साधनही गडकोटांनी उपलब्ध करून दिले. किल्ले निर्मिती संबंधी शिवाजी महाराजांची दृष्टी विलक्षण, निष्णात शिल्पज्ञाची व स्थापत्य क्षेत्रातील सूक्ष्म अवलोकनाची होती. यासंबंधी समकालीन युरोपीयन म्हणतात की, ''सेनापतीचे कार्य व सैनिकाचे कार्य या विषयाचा शिवाजीने सूक्ष्म अभ्यास केलेला असून दुर्गाची पुनर्रचना करण्याची कला उत्कृष्ठ स्थापत्य विशारदापेक्षाही त्याला अधिक अवगत होती.''

शिवाजी महाराजांनी किल्ल्याच्या बांधकामासाठी मोठ्या प्रमाणात खर्च केला. हे किल्ले बांधणीचे धोरण राजकीय होते. याचे उत्तम उदाहरण आपणास शिवदिग्विजय मधील उताऱ्यावरून सहज ध्यानात येते. ''.... आपणास धर्मस्थापना करणे व राज्य संपादणे सर्वांना अन्न लावून, शत्रू प्रदेश न होय ते किल्ल्यामुळेच होते. सर्वांचा निर्वाह आणि दिल्लीद्रासारखा शत्रू उरावर आहे, तो आला तरी नवे जुने तीनशे साठ किल्ले हजरीस आहेत. एक-एक किल्ला वर्ष-वर्ष लढला तरी तीनशे साठ वर्षे पाहिजेत.'' यावरून शिवाजी महाराजांचा दुर्ग विषयक दृष्टिकोण सुस्पष्ट दिसतो. किल्ले प्रशासना संदर्भात एक महत्त्वाचे

धोरण त्यांनी अंगीकृत केलेले होते. ते म्हणजे प्रत्येक किल्ला प्रत्यक्ष मध्यवर्ती सत्तेच्या स्वामित्वाखाली ठेवला होता. कोणत्याही वतनदार अथवा जहागिरदारांना स्वतंत्र किल्ला अथवा साधी गढी बांधण्याचीही परवानगी नव्हती. प्रत्येक गडावर सरकारी सैन्य, प्रत्येक गडाच्या कारभाराची स्वतंत्र व्यवस्था त्यांनी कार्यान्वित केली होती. यासंबंधी आज्ञापत्र व सभासदांच्या लिखाणातून नोंद मिळते. हवालदार, सुभेदार, कारखानीस, सबनीस, तट सरनोबत इत्यादी अधिकाऱ्यांच्या जबाबदाऱ्या आणि कार्य वेगवेगळी होती.

मुस्लिम राजवटीतील वंशपरंपरेची वतनदारी पद्धत बंद करून किल्लेदार बलवान होणार नाही याची दक्षता घेतली. वतनदारांच्या राजनिष्ठेचे दुष्परिणाम लक्षात घेऊन गड-कोटाच्या प्रशासनात 'सवते-सुभे' तयार करून प्रत्येक किल्ल्याच्या अधिकाऱ्यास त्यांचे कार्यक्षेत्र मर्यादित करून ठेवले होते. कोणत्याही एका अधिकाऱ्याच्या हाती किल्ल्याची व्यवस्था अथवा अधिकार एकवटलेले नव्हते. त्यामुळे फंदफितुरीला लगाम बसला. त्याचबरोबर कोणत्याही एका अधिकाऱ्याची मिरासदारी उत्पन्न होऊ नये यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांच्या बदल्यांची व्यवस्था केलेली होती.

'दुर्ग हे संपूर्ण राज्याचे सार' त्यामुळे किल्ल्याच्या व्यवस्थापनात शिवाजी महाराजांनी कोणावरही विश्वास न टाकता किल्ल्याची व्यवस्था हा खास राजाच्या अधिकारकक्षेत येणारा विषय केला. यासंबंधी सभासद लिहितात की, ''जे-जे गड घेतले त्या गडावर राजियाने कारभारी बंदोबस्त ऐशी पद्धत घातली की, गडावरी हवालदार एक व कारखानीस एक व सबनीस एक असे तिघेजण एका प्रतीचे, जोर कारभार करणे तो तिघांनी एका प्रतीचा करावा. गडावरी गल्लाचे, सामानाचे अंबर करावे. त्यास कारखानीस म्हणून कारभारी केला. त्याचे विद्यमाने सर्व कारखाने यास जमाखर्च लिहावा. गड तोलदार आहे तेथे त्या गडाचा घेरा थोर, त्या जागा सात पाच तट सरनोबत ठेवावे .... लोकांत बंदुखी व इटेकरी व तिरंदाज व आड हत्यारी असे लोक मर्दाने चौकशीने आपण राजियांनी नजर गुजर करून एक-एक माणूस पाहून ठेवावे. गडावरी लोक हवालदार व सरनौबत मराठे जातिवंत ठेवावे. त्यास जामीन आपले हजुरातील लोक असतील त्यापैकी होऊन मग ठेवावे. सबनीस, ब्राह्मण हुजरातीचे ओळखीचे ठेवावे व कारखानीस प्रभू ठेवावे असे एकास एक प्रतिभेचे ठेवावे. एक हवालदाराचे हाती किल्ला नाही. हर एक फितवा फांदा यास किल्ला कोणाच्याने देववेना ये रीतीने बंदोबस्तीने गड कोटाचे मामले केले नवी पद्धत घातली'' वरील उताऱ्यावरून शिवाजी महाराजांचे किल्ले प्रशासनाचे धोरण व व्यवस्थापनाचे सूत्र परम उग्र होते असे दिसते, त्याला आज्ञापत्रकारही दुजोरा देतात.

### ७) आरमारी प्रशासन व व्यवस्थापनाचे धोरण :

शिवाजी महाराजांचे मुलकी व महसूली प्रशासनाचे धोरण व योगदान अभ्यासताना आरमारा संबंधीचे धोरण व योगदान नजरेआड करून चालत नाही. ''ज्याचे आरमार त्याचा समुद्र'' आज्ञापत्रातील हे वाक्य शिवाजी महाराजांचा सामुद्रीक राजकारणातील दृष्टिकोन व धोरण स्पष्ट करणारे आहे. विस्तारवादी व वासाहतिक सागर संस्कृतीचा पुरस्कार करणाऱ्या युरोपीय व इतर सागरी सत्ताधिशांना शह देण्यासाठी

आरमाराची गरज ओळखून त्याची पायाभरणी करणारा, असामान्य आरमारी दलाचे नेतृत्व करणारा राजा व भारतीय आरमाराचे जनक म्हणून शिवाजी महाराजांचा नामोल्लेख होतो. प्राचीन भारतीय सत्ताधिशांनी आरमारी परंपरेला प्रशासकीय व्यवस्थेतून अलग होऊ दिले नव्हते, मात्र मध्ययुगाचा काळ येता-येता भारतीय आरमारी परंपरा नामशेष झाली. व्यापारादी कारणासाठी दक्षिणेतील सत्ताधिशांनी नाविक सज्जता ठेवली होती, परंतु त्याचे रूपांतर सुसज्ज आरमारामध्ये होऊ शकले नाही. आरमार हे राज्याचे सामर्थ्य आहे हे त्यांच्या गळी उतरलेले नव्हते. पश्चिमात्य वसाहतवादी राष्ट्राप्रमाणे व्यापाराबरोबर राज्यविस्तार अथवा परकीय आरमारी शक्तीना प्रतिबंद करण्याच्या दृष्टिकोनातून 'आरमार' ही संकल्पना त्यांच्याकडे नव्हती. १५ व्या शतकापासून पुढे आलेल्या पोर्तुगीज, इंग्रज, डच, फ्रेंच व इतर साम्राज्यवादी धोरणाचा पुरस्कार करणाऱ्या सागरी सत्ताचा आरमारी धोका ओळखून शिवाजी महाराजांनी आरमाराची उभारणी केली. या संबंधी श्री रं कुलकर्णी म्हणतात, ''देशाच्या स्वातंत्र्यास समुद्रमार्गे लागलेले ग्रहण आणि परराष्ट्रीय आक्रमकांनी आपल्या हेतूच्या पूर्तीसाठी योजलेले आरमारी बळ या बाबी दिव्यदृष्टी असलेल्या राष्ट्र पुरुषांच्या ध्यानी आल्या नसत्या तरच नवलाचे वाटले असते. हिंदवी स्वराज्याचे स्वप्न साकार करण्यास बद्धपरिकर असलेल्या शिवाजी महाराजांनी स्वातंत्र्यास असलेला हा धोका स्पष्ट ओळखला होता. म्हणूनच अनुकूल काळ येताच त्यांनी स्वत:चे आरमार बांधण्याचा व त्याचा विस्तार करण्यास प्रारंभ केला. काही तात्कालिक कारणामुळे या कार्यास वेगाने चालना मिळाली असली तरी सागरी किनाऱ्याचे रक्षण ही धारणा शिवरायांच्या मनात दीर्घकाळ नांदत असावी.''

शिवाजी महाराजांचे आरमार निर्मितीचे धोरण आज्ञापत्रात प्रकर्षाने जाणवते. पारंपरिक चालीरिती व राजनीती शास्त्राला बगल देवून त्यांनी आरमाराची उभारणी केली. आज्ञापत्रकार म्हणतात, ''आरमार म्हणजे स्वतंत्र येक राज्यांगच आहे. जैसे ज्यास अश्वबल त्याची पृथ्वी प्रजा आहे. तद्ववतच ज्याजवळ आरमार त्याचा समुद्र याकरिता आरमार अवश्यमेव करावे'' यातून शिवाजी महाराजांचा जमिनीवरील व समुद्रावरील शत्रूच्या बंदोबस्ताचा विचार स्पष्ट दिसतो. आरमाराच्या संरक्षणासाठी शक्य तेवढी बंदरे व बेटे आपल्या वर्चस्वाखाली आणली. आरमाराच्या आश्रयासाठी त्यांनी सिंधुदुर्ग, पदमदुर्ग, विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग इत्यादी जलदुर्गाची बांधणी अथवा पुनर्बांधणी केली. जलदुर्ग बांधणीचे प्रमुख दोन उद्देश दिसतात.

१. स्वराज्याच्या प्रदेशाच्या समुद्राच्या दिशेने शत्रूकडून होणाऱ्या आक्रमणाचा प्रतिकार करणे.

२. आरमाराच्या आश्रयाची व संरक्षणासाठीची संरक्षित जागा निर्माण करणे.

महाराजांच्या आरमारी धोरणासंबंधी सभासद लिहितो की, ''ते स्थळ (राजापुरी) हस्तगत करावे म्हणून राजियांनी जागा-जागा डोंगर पाहून गड वसविले की, येणेकडून दर्या जेर आहे आणि पाणी यांतील राजे जेर होतील, असे जाणून कित्येक पाणियातील डोंगर बांधून दर्यामध्ये गड बसविले. पाणियांतील म्हणजे केवळ जंजिरे असे करून गड-जहाजे मेळवून दर्यास पालाण राजियानी घातले ये रीतीने सातशे जहाजे पाणियातील जाली .... समुद्रामध्येही एक लष्कर जाले.''

शिवाजी महाराजांच्या आरमारी धोरणामुळे खालील गोष्टी साध्य झाल्या.

१. कोकण किनाऱ्यावरील सागरी व्यापारी मालाचे युरोपीय, मुघल व सिद्दीच्या आक्रमणापासून संरक्षण करणे शक्य झाले.

२. युरोपीय व इतर सागरी वसाहतिक सत्ताधिशांच्या आक्रमणांना व साम्राज्यवादाला पायबंद बसला.

३. स्वराज्यातील समुद्रावर आपला अधिकार प्रस्थापित करण्यात यशस्वी झाले.

४. कोकण किनारपट्टीवर येणाऱ्या व्यापारी जहाजावर नियंत्रण ठेवण्याची संधी मिळाली.

५. युरोपीय सागरी सत्तांचा सागरी परवाना (कार्ताज) घेऊन समुद्रसंचार करण्याचे पारतंत्र्य त्यांनी नष्ट केले.

६. पोर्तुगीजांच्या आरमारी शक्तीचे खच्चीकरण केले.

७. इंग्रज व सिद्दीच्या आरमारी शक्तीला आव्हान निर्माण केले.

८. आरमाराच्या उभारणीमुळे दुर्गमस्थानी जाण्याची व आवश्यक त्यावेळी युद्ध साहित्य मिळविण्याची सोय केली.

९. आरमार उद्योगामुळे रोजगार निर्मिती झाली.

१०. आरमाराच्या माध्यमातून त्यांनी राष्ट्रीय भावना निर्माण केली.

११. आरमारी युद्धतंत्रात त्यांनी क्रांती घडवत राज्य विस्तारासाठी आरमाराचा उपयोग होऊ शकतो हे सिद्ध केले.

**(अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. हाऊस ऑफ शिवाजी हा ग्रंथ कोणी लिहिला आहे ?

२. आज्ञापत्र या ग्रंथाचा कर्ता कोण ?

३. शिवाजी महाराजांची राजमुद्रा कोणत्या भाषेत आहे ?

४. आदिलशाही कवी नुसरती याने कोणता काव्य ग्रंथ लिहिला आहे.

५. 'दुर्ग' हे संपूर्ण राज्याचे सार' हे विधान कोणत्या ग्रंथातील आहे.

### ४.२.२ शिवाजी महाराजांचे व्यापार व शेती संबंधीचे धोरण व योगदान

#### अ) व्यापार :

स्वराज्याची आर्थिक स्थिती सुधारण्याचा उत्तम पर्याय म्हणून शिवाजी महाराजांनी उद्योग व्यापाराकडे पाहिलेले दिसते. उद्योग व व्यापाराची जर भरभराट व्हायची असेल तर राज्यात शांतता व सुव्यवस्था पाहिजे हेही महाराज जाणून होते. कारण व्यापार वाढतो तो सामाजिक सुरक्षिततेतून, ज्यासाठी सरकारचे धोरण व प्रोत्साहन महत्त्वाचे असते.

#### १) सावकारासंबंधीचे (व्यापारी) धोरण :

राज्याचे वैभव सावकारावर (व्यापारी) अवलंबून असल्यामुळे त्यांच्या पुरस्काराचे धोरण शिवाजी महाराजांनी अवलंबलेले दिसते. महाराजांच्या या धोरणासंबंधी आज्ञापत्रकार म्हणतात की, ''साहुकार म्हणजे राज्याची व राजश्रीची शोभा. साहुकाराच्या योगाने राज्य आबादान होते. न मिळे त्या वस्तुजात राज्यात येतात. ते राज्य श्रीमंत होते. पडले संकट प्रसंगी पाहिजे ते कर्जवाम मिळते. तेणे करून आले संकट परिहाररिजेते. साहुकाराचे संरक्षणामध्ये बहुत फायदा आहे. याकरिता साहुकाराचा बहुमान चालवावा. कोणाविषयी त्याजवर जलाल अथवा त्याचा अपमान होऊ न द्यावा. पेठापेठात दुकाने, वखारी चालवून हत्ती, घोडे, जरमिना, जरबाब, पशमी आदिकरून अशेष वस्तुजात यांचा उदाम चालवावा. हुजूर बाजारामध्येही थोर थोर साहुकार आणून ठेवावे. वर्षसंबंधे तसेच लग्नादि महोत्सवी त्यांचे त्यांचे योग्यतेनुरूप प्रतिष्ठेने बोलावून आणून वस्त्रपात्र देऊन समाधान करीत जावे. परमुलुखी जे जे साहुकार असतील त्यांची समाधाने करूण आणावे. त्यास अनुकूल न पडेच तर असतील तेथेच त्यांचे समाधान रक्षून आपली माया लावून त्यांचे मुतालिक आणून त्यांस अनुकुल जागा, दुकाने देऊन ठेवावे. तसेच दर्यावर्दी साहुकार यासही बंदरोबंदरी कौल पाठवून अमदारफ्ती करावी''. स्वराज्यात साहुकार अर्थात व्यापारी यांच्या योगाने स्वराज्याच्या अडचणीच्या काळात पैसा उभा करण्यास या वर्गाचा शिवाजी महाराजांना उपयोग होत असे. लोकहिताच्या दृष्टिकोनातून व्यापारवृद्धी जेवढी महत्त्वाची होती तेवढीच स्वराज्याची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी ही महत्त्वाची होती. राजव्यवहारात व्यापाराचे महत्त्व लक्षात घेऊन शत्रूप्रदेशातील वरकड लोकास मिळणारी वागणूक व शत्रूप्रदेशातील व्यापारी या संबंधीच्या धोरणात फरक असावा असे आज्ञापत्रात म्हटले आहे.

#### २) सागरी व्यापार :

स्वराज्याच्या संरक्षणासाठी आरमाराची उभारणी केल्यानंतर शिवाजी महाराजांनी सागरी व्यापारावर लक्ष केंद्रीत केलेले दिसते. त्यासाठी त्यांनी मालवाहू जहाजेही बांधलेली होती. या व्यापारामध्ये मीठाची आयात हा महत्त्वाचा भाग होता. मुघल सत्तेशी राजकारण करून मस्कत व अन्य देशांमध्ये शिवाजी महाराजांचा व्यापार सुरू होता. सागरी व्यापारासंबंधी अमात्य म्हणतात की, ''दर्यावर्दी सावकार यासही

बंदरोबंदरी कौल पाठवून आमदरफ्ती करवावी'' शत्रूप्रदेशातील व्यापाऱ्याच्या जहाजास व मालास 'तसनस' न करता त्यांचे जहाज थेट बंदरात घेऊन यावे व तेथे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यासंबंधी न्यायनिवाडा करावा असे धोरण होते. कारण सागरी किनाऱ्यावरील व्यापार व राज्याबाहेरील मालाची आयात हे स्वराज्याच्या महसूली उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन होते.

## ३) परकीय व्यापाऱ्यासंबंधीचे धोरण :

शिवाजी महाराजांचे परदेशी व्यापाऱ्यासंबंधीचे धोरण काळाच्या पुढचे व सावधगिरीचे होते. परकीय व्यापाऱ्यांच्या नीतिमत्तेची व स्वभाव वैशिष्ट्याची पक्कीजाण महाराजांना आलेली होती. त्यासंबंधी आज्ञापत्रातील खालील उद्‌गार फारच उद्‌बोधक आहे. ''सावकारामध्ये फिरंगी, इंग्रज, फरांसिस, डिंगमारादि टोपीकर हेही लोक सावकारी (व्यापार) करितात. परंतु ते वरकड सावकारा सारिखे नव्हेत, त्यांचे खावंद प्रत्यक राज्यच करितात. त्यांचे हुकमाने त्यांचे होत्साते हे लोक या प्रांती सावकारीस येतात. राज्य करणारास स्थळलोभ नाही यैसे काय घडो पाहते ? तथापि, टोपीकरांचा या प्रांते प्रदेश करावा, राज्य वाढवावे स्वमत प्रतिष्ठावे हा पूर्ण अभिमान... तदनुरूप स्थळोस्थळी कृतकार्यहि जाले आहेत. त्याहिवरी हट्टी जात हातास आले स्थळे मेलियाने सोडावयाचे नव्हेत. यांची आमदरफ्ती आले-गेले यैसीच असो दयावी. त्यांसी केवळ नेहमी जागा देऊ नये. जंजिरेया समीप या लोकांचे येणे-जाणे सहसा होऊ देऊ नये. कदाचित वखारीस जागा देणे जालेस तर खाडीचे शेजारी समुद्रातीरी न द्यावा तैसे ठाईजागा दिधलियावरी आपले मर्यादेने आहेत तोवर आहेत. नाही ते समयी आरमार दारूगोळा हेच त्यांचे बळ. आरमार पाठीशी घेऊन त्याचे बळ त्या बंदरी नूतन किल्लाच निर्माण करणार. तेव्हा तितके स्थळ राज्यातून गेलेल याकरिता जागा देणेच तरी खाडी लांब गाव दोन गाव राजपूरसारखी असेल तेथे फरांसियास जागा दिल्हा होता, त्या न्याये दोन-च्यार नामांकित शहरे असतील त्यांमध्ये जागा द्यावा. तेहि नीच जागा, शहराचे आहारी, शहराचा उपद्रव चूकऊन नेमून देऊन वखारा घालवाव्या त्यासहि इमारतीचे घर बांधो देऊ नये. या प्रकारे राहिले तरी बरे, नाहीतरी याविनाही प्रयोजन नाही. आले गेले असोत त्यांचे वाटे आपण न वजावे. आपले वाटे त्यांणी न वजावे इतकेच पुरे''. शिवाजी महाराजांच्या व्यापारी धोरणासंबंधी डॉ. अ. रा. कुलकर्णी म्हणतात की, ''शिवाजी महाराजांनी काळाची पावले ओळखली होती, काळाच्या पुढे जाणारा तो एक द्रष्टा महापुरुष होता. म्हणूनच इंग्रजांनी या राजाचे वर्णन 'The greatest diplomat of eastern parts' असे केले आहे.''

## ४) संरक्षणात्मक व्यापारी नीतीचा प्रारंभ :

१८ व्या शतकात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती झाली आणि उद्योगधंद्याच्या उत्पादनाच्या बाबतीत इंग्लंडचे वर्चस्व वाढले. इंग्लंडशी स्पर्धा करणे युरोपमधील इतर औद्योगिकदृष्ट्या अप्रगत राष्ट्राना शक्य नव्हते. स्वत:च्या फायद्यासाठी विशेषत: कच्च्या मालाचा पुरवठा व पक्या मालाचे वाटप या बाबी आयात-निर्यातीवरील जकाती शिवाय व्हाव्यात म्हणून इंग्लंडने खुल्या व्यापाराच्या धोरणाचा पुरस्कार

केला. यामुळे त्यांच्या पक्या मालाशी स्पर्धा करणे कठीण असल्याने त्याला बाजारपेठ ही मिळू लागली. या खुल्या धोरणाला जर्मन अर्थशास्त्रज्ञ फेडरिश लिस्ट यांने १९ व्या शतकात विरोध करून संरक्षण धोरणाच्या जोरदार पुरस्कार केला. परिणामी जर्मनीत अभूतपूर्व औद्योगिक क्रांती घडून आली. मात्र या अगोदर शिवाजी महाराजांनी या धोरणाचा अवलंब १७ व्या शतकात सुरू केलेला होता. सन १६७२ मध्ये कुडाळच्या सर सुभेदार नरहरी आनंदराऊ यास मीठावरील करासंबंधी जे पत्र लिहिले आहे त्यावरून मीठाच्या धंद्याला प्रोत्साहन कसे देता येईल यासंबंधीचे त्यांचे विचार म्हणजे अप्रत्यक्षरीत्या संरक्षण धोरणच होते.

प्रभावळीपासून कल्याण-भिवंडी पर्यंत मीठावरील जकातीचे दर कसे असावेत या संबंधीचा एक ठराव केला आणि त्याची माहिती संबंधित अधिकाऱ्यांना दिली. कारण कोकणातील मिठागारात मिठाचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत होते. समुद्र किनाऱ्यावरील रयतेच्या उदरनिर्वाहाचे ते प्रमुख साधन होते. हे मीठ स्वराज्यात सर्वत्र पाठवले जात असे. मात्र गोव्यातील बारदेश भागातून तयार होणाऱ्या मिठाची आवक होऊन ते स्वस्तात मिळू लागल्यामुळे कोकणातील मीठाची विक्री व उठाव होईनासा झाला, ते मीठ पडून राहू लागले, मिठागरे ओस पडू लागली. महाराजांच्या ही बाब निदर्शनास आल्यानंतर बारदेशातील मिठावर जबर जकात कर आकारायला सुरुवात केली. परिणामी बारदेशामधील मीठ महाग पडू लागले. स्वराज्यातील मीठाचा खप वाढला. हे प्रकरण 'मीठाचा मामला' म्हणून प्रसिद्ध आहे.

### ५) परकीय चलन विषयक धोरण :

परकीय व्यापारी व त्यांच्या अर्थनीतीबाबत शिवाजी महाराजांचे धोरण फारच सावधगिरीचे होते. ईस्ट इंडिया कंपनीने महाराजांना मराठी मुलखात त्यांच्या चलनास मुक्तपणे वापर करू देण्यास विनंती व सवलत मागितलेली होती. तेव्हा महाराजांनी ठणकावून सांगितले की, 'मराठी राज्यात सर्व परकीय चलनांना समान वागणूक मिळेल. मराठी बाजारात आपले चलन राहावे म्हणून तुम्हाला योग्य ते प्रयत्न करावे लागतील, कसलीही सवलत मिळणार नाही. यावरून महाराजांचे देशी चलनाच्या संरक्षणाचे धोरण स्पष्ट होते.

## ब) शिवाजी महाराजांचे शेतीसंबंधीचे धोरण व योगदान :

शेती हा स्वराज्याचा कणा असून शेतीचा विकास म्हणजे स्वराज्याचा विकास हे सूत्र शिवाजी महाराजांनी जाणलेले होते. आपले प्रशासन रयतेच्या सुख समृद्धीसाठी बांधील असले पाहिजे. आपल्या अधिकाऱ्यांनी रयतेच्या काडीलाही हात लावता कामा नये असा दंडक त्यांनी घालून दिला होता. शेतकऱ्यांना व्याजरहित कर्ज दणे, सारा भरण्याबाबत सवलती देणे, अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांना त्रास न देणे आणि त्यांच्या पासून कसलीही अपेक्षा न करणे या संदर्भात १६७६ मध्ये शिवाजी महाराजांनी

प्रभानवल्ली (सध्याच्या संगमेश्वर तालुक्यातील गाव) येथील सुभेदाराला लिहिलेले पत्र महाराजांचे शेती व शेतकरी विषयक धोरण स्पष्ट करणारे आहे. रामाजी अनंत सुभेदाराला लिहिलेल्या या पत्रात महाराज फर्मावतात, ''चोरी न करावी, इमाने-इतबारे साहेब काम करावे, येसी तू क्रियाय केलीच आहेस. त्येणेप्रमाणे येक भाजीच्या देठास तेही मन न दाखविता रास (रास्त) व दुरूस्त वर्तणे. याउपरि कमाविस कारभारास लावणी संचणी उगवणी जेसी जेसी जे-जे वेलेस जे करू ये ते-ते करीत जाणे. हर भातेने (तऱ्हेने) साहेबाचा वतु (उत्पन्न) होये ते करीत जाणे. मुलकात बटाईचा तह (अधेलीचा करार) चालत आहे; परंतु रयेतीवर जाल (जुलुम) रयतेचा वाटा रयतीस पावे आणि राजभाग आपणास येई ते करणे, रयेतीवर काडीचे जाल व गैर केलिया साहेब तुजवर राजी नाहीत येसे बरे समजणे'' या संबंधी डॉ. अ. रा. कुलकर्णी म्हणतात की, शेतकऱ्यांचे हित साधण्याचा मन:पूर्वक प्रयत्न महाराजांनी केला होता हे या पत्रावरून स्पष्ट होते. शिवाजीराजे हे खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांचे राजे होते. 'इडापिडा टळो आणि बळीचे राज्य येवो' अशी सतत प्रार्थना करणाऱ्या शेतकऱ्यांना दिलासा देणारे हे 'बळीचे राज्य' सतराव्या शतकात महाराष्ट्रात शिवाजीराजाच्या रूपाने निर्माण झाले होते.

शिवाजी महाराजांची भूमिका लोककल्याणकारी होती. शेतकऱ्यांनी लावलेल्या झाडालाही हात लावू नये अशी महाराजांची सक्त सूचना होती. या संबंधी आज्ञापत्रकार म्हणतात की, ''....... स्वराज्यातील आंबे, फणस आदि करून हेही लाकडे आरमाराचे प्रयोजनाची परंतु त्यास हात काय म्हणोन की, ही झाडे वर्षा दो वर्षांनी होतात यैसे नाही. रयतेने ही झाडे लाऊन लेकरासारखी बहुत काळ जतन करून वाढविली ती झाडे तोडलियावरी त्यांचे दु:खास पारावार काये, येकास दु:ख घेऊन जे कार्य करीन म्हणेल ते कार्य करणारासहित अल्प कालच बुडोन नाहीसे होते. किंबहुना धण्याचेच पदरी प्रजा पडिनाचा दोष पडतो. या वृक्षाच्या अभावी हानीही होते. याकरिता हे गोष्ट सर्वथा होऊ न द्यावी. कदाचित यखादे झाड जे बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असेल, तरी त्याचे धण्यास राजी करून त्याचे संतोषे तोडून न्यावे. बलात्कार सर्वथा न करावा'' यावरून शिवाजी महाराजांचे पर्यावरण विषयक व शेतकऱ्या विषयक धोरण आणि कळवळा दिसतो.

## १) जमिनीची मोजणी करून मर्यादा घालून दिली :

शिवाजी महाराजांनी कृषी व्यवस्थेत जे बदल व सुधारणा केल्या त्या तत्कालीन परिस्थितीचा विचार करता आमूलाग्र व क्रांतिकारी होत्या. या संबंधी ग्रँट डफ म्हणतो की, ''कित्येक मुसलमान लेखकांनी व एका समकालीन इंग्रज लेखकानेही असे लिहिले आहे की ही अत्यंत विपन्न स्थिति शिवाजीच्या राज्यात वसत होती. मुसलमान लेखकांनी शिवाजीला अत्यंत जुलमी सत्ताधीश म्हणून उल्लेखिले आहे. पण जे प्रदेश शिवाजी महाराजांनी सत्तेपासून काबीज केलेले होते, तेथे पूर्वी ही वस्तुस्थिति होती व शिवाजीकडे हे प्रदेश आल्यानंतर तेथील परिस्थिती बदलली'' प्रिगेल केनेडी यॉने ही आपल्या ''हिस्ट्री ऑफ द ग्रेट मुघलस' या ग्रंथात ग्रँट डफच्या विधानाला दुजोरा देत लिहिले आहे की, 'आपल्याला सारा दिला पाहिजे याची शेतकऱ्यास जाणीव होती व जुलूम जबरदस्ती न करताही तो सारा देऊ शकत असे

दिसते.'' याचे सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील जमिनीची मोजणी करून, त्याची प्रतवारी केलेली होती व सारा वसुलीची मर्यादा घालून दिलेली होती. स्वराज्यातील जमिनीची मोजणी करण्यापूर्वी उत्पन्नाचा अर्धा भाग सरकारला द्यावा लागत होता. हा रयतेच्या पिळवणूकीचा खूप मोठा प्रकार होता. शिवाजी महाराजांनी जमिनीची नव्याने मोजणी केली. ब्राह्मण व प्रभू कारकून कडून न करता देशमुख, देशकुलर्णी इत्यादी शेतकऱ्यांशी निगडीत असलेल्या लोकांकडून करून घेतली.

## २) जमीन महसूल सुधारणा :

लोककल्याण हे स्वराज्याचे केवळ घोषित ध्येय नव्हते. समग्र राज्य व्यवस्था ज्या ध्येयानुसार घडविण्यात आलेली होती हे जमीन महसुलासंबंधी शिवाजी महाराजांनी केलेल्या व्यवस्थेवरून लक्षात येते. समाजाच्या अगदी खालच्या स्तरापर्यंत स्वराज्याचा लाभ पोहचावा या हेतूने स्वराज्यातील कारभार सुरू केला. राजसत्ता आणि रयत यांच्यामधील मध्यस्थास महाराजांनी पूर्णपणे निष्प्रभ करून टाकले, यासंबंधी श्री. रं. कुलकर्णी म्हणतात की, 'सरंजामशाहीच्या जाचातून जनता मुक्त करणारी मध्ययुगातील एकमेव राजवट असे. शिवकालीन राज्य व्यवहार पद्धतीचे यथार्थ वर्णन करता येईल'' लोककल्याणात सरंजामशाहीचे वावडे असे मात्र मध्यकालीन भारतात सर्वत्र हीच व्यवस्था होती. सरंजामशाहीला आळा घालण्याचा पहिला प्रयत्न शिवाजी महाराजांनी केला. जमीन महसूल जमा करताना राजा व शेतकरी यांच्यात मध्यस्थ नसावा याची दक्षता घेतली. सरंजमशाहीचा बंदोबस्त करण्यासाठी नवीन वतने दिली नाहीत. जे मिरासदार शिल्लक होते त्यांना 'देशाधिकाऱ्यांच्या आज्ञेत वर्तावे' असा नवीन नियम घालून दिला. परिणामी जमीन महसूलाचा सर्व जमा भाग सरकारात जमा होऊ लागला.

## ३) शेतकऱ्यांना सहाय्य :

शिवाजी महाराजांचा राज्यकारभार शेतकऱ्यांचे कल्याण करणारा होता हे स्पष्ट करताना न. रा. फाटक म्हणतात की, ''रयतेला कशी मदत करावयाची त्याबाबत महाराजांची आपल्या अधिकाऱ्यांना सक्त ताकीद होती. विभागीय सुभेदाराने कष्ट घेऊन, प्रत्येक गावोगाव फिरून तेथील कुणबी जेवढे आहेत ते गोळा करावेत. कोणाकडे काय आहे, काय नाही याची चौफेर वस्तपुस्त करावी. कुणब्याकडे कोणत्या प्रकारची शेतजमीन आहे, माणूस बळ आहे पण बी-बीयाणे नाही, बैल आहे पण औजारे नाही, खते नाही अशा कुणब्यास त्याच्या ताकदीनुसार रोख रूपाने, माल रूपाने कर्ज तात्काळ देण्यात यावे. परंतु स्वराज्याकडून शेतकऱ्यास दिलेले कर्ज वाढी विढीच्या रूपाने वसूल करू नये. शेती उत्पन्न आल्यावर शेतकऱ्यांच्या ताकदीनुसार हप्त्या-हप्त्याने वसूल करावे. त्याचप्रमाणे ज्या शेतकऱ्यावर स्वराज्याची मागील बाकी आहे, पण त्याला नैसर्गिक आपत्तीमुळे काही उत्पन्न लाभले नाही अशा शेतकऱ्यास त्याचे देणे माफ करण्याबाबत कळवावे.''

## ४) स्वराज्यातील शेतीमालास रास्तभाव :

शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील शेतकऱ्यांच्या मालास रास्त भाव मिळेल यासंबंधी धोरण ठरवलेले होते. अतिरिक्त शेतीमाल योग्य मोबदला देऊन खरेदी करत. तो माल परमुलखात नेऊन विकण्याची सोय केली. महाराजांच्या शेती विषयक धोरणाची प्रचिती खालील उताऱ्यावरून येते. ''जिन्नसच वसूल घेऊन जमा करीत जाणे आणि मग वेळच्या वेळी विकत जाणे. महाग विकेल आणि फायदा होईल ते करीत जाणे. वसूल हंगामशीर घ्यावा आणि साठवण करून विक्री अशी करावी की, कोणत्या वेळेस कोणता जिन्नस विकायचा, माल तर पडून राहता कामा नये आणि विक्री महाग झाली पाहिजी. दहा बाजार केले तरी चालतील पण मालाला भाव मिळाला पाहिजे त्याचा फायदा होईल.''

## ५) रयतेचे संरक्षण :

रयतेच्या जीविताचे आणि वित्ताचे संरक्षण करणे हे स्वराज्याचे ध्येय होते. परकीय शत्रू बरोबरच स्वयकीयांच्या पासून देखील रयतेच्या संरक्षणाला शिवाजी महाराजांनी प्राधान्य दिलेले होते. आपल्या सैन्याकडून रयतेला त्रास होऊ नये म्हणून १६७३ मध्ये चिपळून येथील छावणीस पाठविलेल्या पत्रात महाराज म्हणतात की, 'तुम्ही जर आपल्याच स्वराज्यातील प्रजेस दाणा-वैरणीसाठी त्रास देऊ लागलात तर प्रजेस वाटेल मुघल मुलुकात आले त्याहूनही अधिक तुम्ही'. या आज्ञापत्रा वरून रयतेच्या संबंधीचा महाराजांचा दृष्टिकोन व कळवळा ध्यानात येतो. या प्रकारे शिवाजी महाराजांनी स्वकीय अथवा सैन्याकडून रयतेची पिळवणूक आणि त्रास होणार नाही याची काळजी घेतली. त्याचबरोबर शत्रूच्या आक्रमणाच्या वेळी आपल्या अधिकाऱ्यांनी कशा प्रकारे दक्षता घ्यावी यांचे उत्तम उदाहरण म्हणून रोहिडा खोऱ्यातील सर्जेराव देशमुखास लिहिलेल्या पत्रात महाराज म्हणतात, ''मुघल प्रस्तुत तुमच्या तपियात धावणीस येतानी म्हणौन जासुदांनी समाचार अणिला आहे. तरी तुम्हास रोखा अहडताच (आज्ञापत्र पोहोचताच) तुम्ही तमाम आपले तपियात (खोऱ्यात) गावचा गाव ताकिदी करून माणसे लेकरेबाले समवेत तमात रयती लोकास घाटाखाले बाका जागा असेल तेथे पाठविणे. जेथे गणिमाचा आजार (त्रास) पहुचेना ऐशा जागीयाशी त्यासी पाठविणे. ये कामात हैगे न करणे लिहिल्याप्रमाणे अंमल करणे. ऐसियासी तुम्हापासून अंतर पडलियावरी मुघल जो बांद (मनुष्ये) धरून नेतील त्याचे पाप तुमच्या माथा बैसेल ऐसे समजोन गावचा गाव हिंडोनु रातीचा दिवस करून लोकांची माणसे घाटाखाले जागा असेल तेथे पाठवणे. या कामास एका घडीचा दिरंग न करणे''. या पत्रावरून शिवाजी महाराज रयतेच्या संरक्षणाची किती खबरदारी घेत होते आणि आपल्या अधिकाऱ्यांची जबाबदारी काय असावी या संबंधीचा विशाल दृष्टिकोन दृष्टिपथास येतो.

**शेतीसंबंधी प्रमुख सुधारणा :**

१. वतनदारी पद्धती कमी केली आणि जमीनदारी पद्धती ऐवजी रयतवारी पद्धत चालू केली.

२. जमीन मालक शेतकऱ्यांकडून जमीन महसूल जमा करण्याचे व त्यांच्यावर राजकीय वर्चस्व गाजविण्याचे जे अधिकार होते ते नष्ट करून जमीनदारी पद्धतीच्या आचरणाला मूठमाती दिली.

३. लागवडी योग्य नसलेल्या जमिनी लागवडीखाली आणणाऱ्या शेतकऱ्यांना जमीन महसूलात माफी दिली.

४. शेतकऱ्यांना तगाई कर्जे देण्याची व्यवस्था केली.

५. खेड्यात नवीन वस्ती करणाऱ्या शेतकऱ्यांना धान्य बी-बियाणे, पैसा व अन्य साधने पुरवून उत्तेजन दिले.

६. कर्जाच्या परत फेडीसाठी आवश्यक ती मुदतवाढ देऊ केली.

७. दुष्काळ, नापिकी व सैन्याद्वारे होणाऱ्या पिकांच्या नुकसानीस शेतकऱ्यांना सहाय्य करण्याची व्यवस्था केली.

८. नवीन लागवडीखाली येणाऱ्या जमिनीवर 'इस्तावा' पद्धतीने महसूलात चढत्या पद्धतीने वाढ केली.

**(ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. आज्ञापत्रात व्यापाऱ्यासाठी कोणता शब्द वापरला आहे ?

२. दस्तक म्हणजे काय ?

३. शिवाजी महाराजांनी कोणत्या व्यापारी धोरणाचा स्वीकार केला ?

४. शिवाजी महाराजांनी बारदेशमधील कोणत्या वस्तूवर जबर कर बसविले ?

५. शिवकाळात जमिनीची मोजणी किती वेळा झाली ?

### ४.२.३ शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण

छत्रपती शिवाजी महाराजांच्या एकूणच राज्यव्यवस्था व राज्यकारभाराच्या धोरणांचा जेव्हा चिकित्सकपणे विचार केला जातो, तेव्हा त्यांच्या धोरणांचे अनेक पदर अथवा ठळक वैशिष्ट्ये समोर येतात. ही वैशिष्ट्ये केवळ राजकीय कारणासाठी लक्षात घेऊन चालणार नाही तर त्यामागील नीतीतत्वेही

पाहिली पाहिजेत. स्वराज्याची निर्मिती ज्या काळात आणि ज्या पार्श्वभूमीवर झाली, तेव्हा जगातील बहुतेक सत्ताधीश धर्माचा वापर राजसत्तेसाठी आणि राजसत्तेचा वापर धर्मकारणासाठी करत होते. त्यावेळी शिवाजी महाराजांनी राजसत्तेचा वापर धर्मकारणासाठी न करता धर्मकारणाच्या माध्यमातून उदारता, सहिष्णुता, बंधुता व समानता या नीतीतत्वाची पायाभरणी केली, त्याची अमलबजावणी केली. इस्लामिक आक्रमकांनी आपल्या राज्यसत्तेच्या माध्यमातून जो धार्मिक अनाचार व अत्याचार पसरवलेला होता, त्या परिस्थितीत स्वराज्यातील मूर्च्छित आणि निपचित पडलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या मनात स्वधर्म, स्वसंस्कृती, स्वराज्य आणि स्वदेशाच्या संरक्षणासाठी लढण्याची प्रसंगी बलिदान देण्याचे मनोधैर्य व आत्मभान निर्माण करण्याचे महत कार्य केले. तत्कालीन राजकीय परिस्थितीचा विचार करता स्वराज्याच्या भोवती सर्वत्र इस्लामिक व इतर सत्ता पसरलेल्या होत्या. साहजिकच त्यांचा या सत्तांशी राजकीय संघर्ष होणे अटळ होते. मात्र त्यांचे स्वरूप इस्लाम विरूद्ध हिंदू अथवा हिंदू विरूद्ध ख्रिश्चन असे नव्हते, याचा वाचकांनी विचार केला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजकारणात आणि धर्मकारणात खालील तत्त्वाचा समावेश होता. (१) परराज्यात असलेल्या आपल्या धर्माच्या लोकांना तेथील लोकांच्या व राजसत्तेच्या अत्याचारापासून संरक्षण देणे व त्यांना त्यांच्या धर्माप्रमाणे स्वाभिमानपूर्वक वागण्याचे स्वातंत्र्य प्राप्त करून देणे. (२) आपल्या राज्यातील असलेल्या परधर्मीयांशी वागावयाचे धोरण (संहिष्णूवृत्ती). (३) आपल्या राज्यातील स्वधर्म परिपोष व देश कालपरिस्थित्यनुरूप सुधारणा व (५) स्वत:चे व्यक्तिगत जीवन.

**शिवाजी महाराजांच्या धार्मिक धोरणाची वैशिष्ट्ये :**

**१) धर्मसहिष्णुता :**

शिवाजी महाराज स्वधर्माविषयी जेवढे जागरूक होते तेवढे अन्य धर्माच्या बाबतीतही त्यांचे धोरण सहिष्णू वृत्तीचे होते. मुस्लिम राजवटीतील प्रदेशात हिंदू धर्मीयांना सामाजिक व धार्मिक सुरक्षितता नव्हती. मात्र स्वराज्यात सर्व धर्मीयांना सामाजिक व धार्मिक सुरक्षितता होती. शिवाजी महाराजांना शिव्याशाप देणारा मुस्लिम लेखक खाफीखान लिहितो की, ''त्याने आपल्या सैनिकाकरिता असा सक्त नियम केला होता की, सैनिक ज्या-ज्या ठिकाणी युद्धास जातील तेथे त्यांनी मशिदीस, कुराण ग्रंथास अथवा कोणत्याही परधर्मीय स्त्रीस तोशीस अगर त्रास देऊ नये. जर एखादा कुराणाचा ग्रंथ हाती आला तर त्याजबद्दल पूज्यभाव दाखवून तो आपले मुसलमान नोकरांचे स्वाधीन करीत असे. केव्हाही हिंदू अगर मुस्लमान स्त्रिया त्यांच्या हाती सापडल्यास व त्यांचे रक्षण करणारा कोणी संबंधी त्यांच्या जवळ नसल्यास त्यांचे नातेवाईक त्यांची सुटका करण्यास येईतोपावेतो शिवाजी स्वत: त्यांची चांगली काळजी घेत असे.'' वरील विधान हे एका मुस्लिम राजवटीतील दरबारी लेखकाचे आहे. त्यामुळे शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरणाचे तत्व काय होते याची प्रचिती येते. राजकीय विरोधक असलेल्या अफझल खानाचा जीव घेण्यास शिवाजी महाराज विसरले नाहीत, हे जरी खरे असले तरी तो केवळ एक मुस्लिम

होता म्हणून त्याला मारले असे जर कोणी म्हणत असेल तर ते योग्य होणार नाही. कारण अफझलखान मारला गेल्यानंतर महाराजांनी मुस्लिम धर्माप्रमाणे त्याचा दफन विधी प्रतापगडाच्या पायथ्याशी केलेला होता. एवढेच नव्हे तर त्याची कबर बांधून खर्चासाठी वार्षिक उत्पन्न लावून दिलेले होते. महाराजांच्या धर्मसहिष्णू धोरणाचे हे उत्तम उदाहरण म्हणून पाहता येईल.

### २) सर्व जाती धर्मीयांना नोकरीत स्थान :

शिवाजी महाराजांनी स्वराज्य उभारणीच्या कामी समाजातील सर्व जाती धर्मातील लोकांची भरती केलेली दिसते, त्याला मुस्लिम ही अपवाद नव्हते. शिवाजी महाराजांच्या धार्मिक धोरणाचे हे व्यव छेदक लक्षण म्हणावे लागेल. महाराजांनी राजकीय सूडभावनेपोटी कोणत्याही परधर्मीयावर अन्याय, अत्याचार केला नाही किंवा परधर्मीय म्हणून कोणाचा उदोउदोही केला नाही. स्वधर्मीय म्हणून आपल्याच धर्मबांधवाचा तेजोभंग करण्याची आत्मघातक व भोंगळ उदारता त्यांनी कधी दाखविली नाही. त्यांची स्वधर्मनिष्ठा जाज्वल्य होती.

आग्रा भेटीच्या वेळी आपले प्राण संकटात घालून सेवा करणारा निष्ठावंत सेवक असलेल्या फरास मदारशहाची (मदारी मेहतर) कबर रायगडावर बांधली. निष्ठावंत मुस्लिम सेवकांच्या प्रति शिवाजी महाराजांचे धोरण काय होते हे यावरून स्पष्ट होते. यासारखी खूप उदाहरणे सांगता येतील. उदा. अफझलखान भेटी प्रसंगी शिवाजी महाराजांनी जे १० विश्वासपात्र सैनिक आपल्या सोबत घेतले होते त्यामध्ये सिद्दी इब्राहिम हा मुस्लिम सेवक होता. शिवाजी महाराजांचा खाजगी सचिव मुनशीकाजी हैदर हा होता. आरमारी अधिकारी दौलतखान, महाराजांच्या लष्करातील इमारखान बेग (शिलेदार), नूरखान बेग (सरनौबत), इब्राहीमखान (सरदार) इत्यादीचा नामोल्लेख होतो. शिवाजी महाराजांच्या या धोरणा संबंधी पंडित नेहरू आपल्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या ग्रंथात म्हणतात की, '' १७ व्या शतकात जगातील बलाढ्य साम्राज्याचे तुकडे होत असताना जो-तो स्वार्था पलीकडे पाहण्यास तयार नव्हता. अशावेळी मराठ्यांची दृष्टी अधिक विशाल होती. सत्ता वाढी बरोबरच त्यांची दृष्टीही व्यापक होती. त्यांच्यामध्ये आपापसात लोकशाही असून त्यामुळेच ते बलवान आणि समर्थ झाले. औरंगजेबाशी लढा असूनही शिवाजीने नि:शंकपणे मुसलमानास आपल्या नोकरीत ठेवले होते.''

### ३) धार्मिक उदारता :

शिवाजी महाराजांचे धार्मिक धोरण सर्वधर्मसमभाव जोपासणारे होते. महाराजांच्या सैन्यात आणि प्रशासनात सर्व धर्माच्या आणि जाती पंथाच्या लोकांचा समावेश होता, त्यांनी कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना समानतेची आणि न्याय्य वागणूक दिली. कोणत्याही धर्माचा द्वेष न करता सर्व धर्मसमान आहेत अशी त्यांची धारणा होती. सर्व धर्मीयांचा ईश्वर समान आहे. सर्व धर्मात समानतेची व उत्तम नीत्तीतत्वे असतात असा विशाल दृष्टिकोन होता. जिझिया कराला विरोध करण्यासाठी औरंगजेबाला जे पत्र लिहिले होते त्यामध्ये धर्मवेडाने राज्य मोठे होत नाही याची जाणीव करून देताना महाराज

म्हणतात की, ''..... आम्ही (शिवाजी) इकडे आल्यावर पादशाई खजिना रिकामा जाहाला व सारे द्रव्य खर्च जाहाले, याकरिता हिंदु लोकांपासून जेजिया पट्टीचे द्रव्य उत्पन्न करून पादशाईचा क्रम चालविला आहे. असे ऐकण्यात आले. त्यास पूर्वी अकबर पादशाहा याणी बावत वर्षे पातशाही केली. यामुळे एकंदर हिंदु वगैरे लोकांचे धर्म चांगले चालले व ते धर्मस्थापनेविसी मदत ठेवित होते. सबब 'जगदगुरू' असी त्याची कीर्ति जाहाली व त्यास हरएक स्थळी यश येत होते. पुढे नरिद्दिन झ्यांगीर पादशाहा याणी बेवीस वर्षे ईश्वरी लक्ष ठेऊन पादशाई केली नंतर स्वर्गास पोहोचले. उपरात शहाजहान साहेबकिरान पादशाही याणी बत्तीस वर्षे पादशाहाई करून कीर्ति मिळविली. जो पुरूष जिवंत असता लौकिकवान व माघे त्याची कीर्ति त्याजला अचल लक्ष्मी प्राप्त जाहाली असे आहे. तेव्हा पादशाहा याणी जेजियापट्टी घेण्यास ते समर्थ होते, परंतु 'सारे लहान मोठे जन ईश्वराचे आहेत' असे जाणोत त्याणी कोणावर जुलूम केला नाही. याजकरिता सर्वांचे मुखी त्यांची स्तूति आहे. ज्याची जसी नेत तसी त्यास बरकत. त्या पादशाहा याची दृष्ट प्रजेचे कल्याणावर होती व आपले कारकीर्दीस किती एक किले व मुलुख गेले. बाकी राहिले तेहि जातात. रयत लोक खराब आहेत व सौदागर पुकारा करितात की हरएक महालाचे उत्पन्न लाखास एक हजार येणे कठिण जाहले आहे. पादशहाचे घरी दरिद्राचा वास जाहला, तेव्हा पदरचे मंडळीची अवस्था कळतच आहे की कितीएक लोकांस पोटास मिळत नाही. त्याजवर जेजिया पट्टी म्हणोन हिंदु लोकावर आपण कर बसविला तो मुलगा जाहला म्हणजे दहा रूपये व मुलगी जाहली म्हणजे पांच रूपये असा चक (हुकुमनामा) बसविला. या प्रकारचे करण्यांतच पुरूषार्थ पादशाहा समजतात व तैमूर पादशाहाचे नांव बुडवितात असे जाहले आहे व कुराणांत ईश्वर जगाचा व मुस्लमानाचाच आहे येविसी वाईट अगर चांगले हे दोनी ईश्वराने निर्माण केले आहे हे रद्द करून महेजतीत (मशिदीत) यवन लोक बाग देतात व देवालयात हिंदु लोक घंटा वाजवितात याजकरिता कोणाचे धर्मावर दोष ठेविल्यास ईश्वराने लिहिले ते रद्द केल्यासारिखे होते. न्यायाचे मार्गाने जेजिया पट्टीचा फायदा केवळ गैर. ज्यावर जुलुम जाहला, त्याणे खेद करोन 'हाय हाय' म्हणोत मुखाने धूर काढिल्यास त्या धुराने जितके लौकर जळल तितके अग्नी जलदीने जळता इसदास जाळणार नाही, ऐसे आहे. याजवर हिंदु लोकास पीडा करण्यातच धर्म आहे असे मनांत आले असल्यास राजा राजसिंग याजपासून नेजिया पट्टी अगोदर घ्यावी. मग इकडून देण्यास कठीण नाही. परंतु गरीब मुंग्या चिलटासारखे आहेत त्यास उपद्रव करण्यात मोठेपण नाही. पदरची मंडळी अग्नी गवताने झाकितात हे आश्चर्य वाटते. राज्याचा सुर्य प्रतापाचा उदय चळापासून तेजस्वी असो'' या पत्रामधून शिवाजी महाराजांनी धर्माच्या व अल्लाहाच्या मान्यतेप्रमाणे राज्यकारभार चालविण्याचा डांगोरा पिटणाऱ्या औरंगजेबाची बेगडी धर्मनिष्ठा उघडी केली आहे. औरंगजेबाला धर्माचे खरे ज्ञान व सहिष्णू वृत्ती या बद्दलचा पाठ देखील याद्वारे दिला आहे. आर्थिक व राजकीय स्वार्थासाठी धर्माचा गैरवापर करण्यापासून औरंगजेबाला परावृत्त करण्याचा एक द्रष्टा प्रयत्न महाराजांनी केलेला दिसतो. धर्माच्या व ईश्वराच्या नावावर समाजात फूट पाडणे अन्यायकारक असून हिंदू व मुस्लमानांचा परमेश्वर एकच असल्याचा उदात्त व मानवतावादी दृष्टिकोन यामधून दिसतो.

## ४) समानतेचे तत्व :

शिवाजी महाराजांनी प्रशासन व्यवस्थेमध्ये हिंदू-मुस्लिम असा भेद केला नाही. सर्व जाती धर्माच्या लोकांचा व साधू संताचा आदर केला, यासाठी खूप उदाहरणे देता येतील. शिवाजी महाराजांच्या या तत्वाविषयी सर जदुनाथ सरकार म्हणतात की, शिवाजी राजाचे धार्मिक सहिष्णुतेचे धोरण म्हणजे त्या काळातील एक आश्चर्यच होते. सर्वांना समान हक्क आणि १७८९ च्या फ्रेंच राज्यक्रांतीचे घोषित केलेल्या 'सर्वांना समान संधी' या तत्वाप्रमाणे सर्व क्षेत्रात कसलाही भेदभाव न करणे या धोरणाचा अवलंब केल्यास भारताचे राष्ट्रीयत्व चिरकाल अबाधित राहील. आधुनिक राष्ट्राच्या स्थैर्याचे हे सर्वश्रेष्ठ तत्व शिवाजी राजाने तत्पूर्वी १५० वर्षांपूर्वी ओळखले होते.''

## ५) धर्मांतर आणि शुद्धीकरणासंबंधी धोरण :

शिवाजी महाराजांच्या धार्मिक धोरणाची चर्चा करताना त्यांच्या शुद्धीकरण धोरणाचाही विचार करणे महत्त्वाचे आहे. महाराजांच्या धार्मिक धोरणाचा हा एक वैशिष्ट्यपूर्ण पैलू आहे. नेताजी पालकर, पिलाजी प्रभू व इतर काही लोकांचे शुद्धीकरण केल्याची उदाहरणे देता येतील. शिवाजी महाराजांचा शुद्धीकरणाचा हा प्रयत्न केवळ धार्मिक नसून तत्कालीन परिस्थितीचा विचार करता पुरोगामी, समाजक्रांतीकारक व सुधारणावादी आहे. कारण तीन-साडेतीनशे वर्षांपूर्वी संपूर्ण समाज वर्णाश्रम पद्धतीने बद्ध झालेला असताना बाटलेल्या हिंदूना परत धर्मात घेणे ही काही सामान्य घटना अथवा गोष्ट नव्हती.

## (क) एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. शिवाजी महाराजांनी धार्मिक धोरणात कोणत्या तत्वाचा स्वीकार केला ?

२. शिवाजी महाराजांच्या धार्मिक धोरणाची स्तुती कोणत्या मुस्लिम लेखकाने केली आहे ?

३. आग्राभेटी प्रसंगी शिवाजी महाराजांच्या सोबत कोणता मुस्लिम सेवक होता ?

४. शिवाजी महाराजांच्या मुस्लिम वकीलाचे नाव काय ?

५. जिझिया कर कोणी लावला ?

## ४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कोश | : | पैसा |
| २. | पागा | : | पागा म्हणजे घोड्यांना ठेवण्याचे ठिकाण, बारगीर म्हणजे सरकारी नोकरीतील घोडेस्वार |
| ३. | शिलेदार | : | स्वत:चे घोडे व स्वत:चे हत्यार घेऊन सरकारी चाकरी करणारा घोडेस्वार. |
| ४. | दुर्ग | : | किल्ला |
| ५. | सवते-सुभे | : | स्वतंत्र कारभार |
| ६. | फितवा | : | फित्तुरी |
| ७. | तसनस | : | हात न लावणे |
| ८. | खावंद | : | प्रतिनिधी |

## ४.४ स्वयं अध्ययन प्रश्नाची उत्तरे

(अ) (१) सर जदुनाथ सरकार (२) रामचंद्रपंत अमात्य
(३) संस्कृत (४) अलीनामा
(५) आज्ञापत्र

(ब) (१) साहुकार (२) व्यापारी परवाना
(३) संरक्षणात्मक व्यापार (४) मीठ
(५) तीन

(क) (१) संहिष्णुता, बंधूता व समानता (२) काफीखान
(३) मदारी मेहतर (४) काझी हैदर
(५) औरंगजेब

## ४.५ सारांश

प्रस्तुत प्रकरणात आपण शिवाजी महाराजांच्या कारकीर्दीतील प्रशासकीय, व्यापारी, शेती व धार्मिक धोरण व व्यवस्थापनाची चर्चा केली. त्याच बरोबर त्यांचे या क्षेत्रातील योगदान काय आहे यावरही प्रकाश टाकला आहे. शिवाजी महाराजांनी स्वराज्याची जी उभारणी केली त्याचे स्वरूप हे बहुजनवादी, समतावादी, समानतावादी, बंधूता आणि सहिष्णुत्तेवर आधारीत होते. त्यांनी प्रशासन व्यवस्थेत अठरा पगड-जाती धर्मातील लोकांना स्थान दिले, त्यामुळेच सर्व जाती-धर्मातील लोक एकदिलाने स्वराज्य निर्मितीमध्ये एकरूप झाले, त्याच प्रमाणे त्यांना वेळोवेळी संधीही दिल्या. मुलकी व लष्करी प्रशासनात कठोर शिस्त आणली व नियमांची शिस्त घालून दिली. व्यापार व शेती हा स्वराज्याचा आर्थिक कणा आहे, तो मजबूत झाल्याशिवाय स्वराज्यात सुबत्ता येणार नाही, याकरिता जाणीवपूर्वक व्यापार व शेती सुधारणेकडे लक्ष दिले. शेतकऱ्यावर अन्याय होणार नाही याची दक्षता घेतली व वतनदारी सारखी जुलमी पद्धती बंद करून रयतेची त्यांच्या जाचातून मुक्तता केली. समाजात जातीय व धार्मिक एकोपा निर्माण झाला पाहिजे याकरिता आपल्या धार्मिक धोरणात सहिष्णूवृत्ती ठेवली आणि त्याची कठोर अमंलबजावणी केली. स्वधर्मियाप्रमाणे परधर्मियांना स्वधर्माचे पालन करण्याची मुभा देऊन, समता, बंधूता व एकतेचा संदेश दिला. हेच त्यांच्या यशस्वितेचे सूत्र होते.

## ४.६ सरावासाठी प्रश्न

### (अ) टिपा लिहा.

१. शिवाजी महाराजांच्या प्रशासनाची वैशिष्ट्ये

२. शेती सुधारणा

३. मीठाचा मामला

४. आरमारी धोरण

५. किल्ले व्यवस्थापन

६. गुप्तहेर खाते

### (ब) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१. शिवाजी महाराजांचे लष्करी धोरण व व्यवस्थापन स्पष्ट करा.

२. शिवाजी महाराजांचे व्यापारी धोरण स्पष्ट करा.

३. शिवाजी महाराजांचे शेती सुधारणेविषयी धोरण सांगा.

४. शिवाजी महाराजांच्या धार्मिक धोरणाची चर्चा करा.

## ४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके व संदर्भ ग्रंथ


१. डॉ. अ. रा. कुलकर्णी, ग. ह. खरे (संपा.), मराठ्यांचा इतिहास, खंड १ व २.

२. बाळशास्त्री हरदास, पुण्यश्लोक छत्रपती शिवाजी, खंड ४, यशवंत मुद्रणालय.

३. सदाशिव आठवले, शिवाजी आणि शिवयुग, मेहता प्रकाशन, पुणे, १९९२.

४. चंद्रशेखर शिखरे, प्रतिइतिहास, जिजाई प्रकाशन, पुणे.

५. डॉ. जयसिंगराव पवार (संपा.), छत्रपती शिवाजी महाराज स्मृतिग्रंथ, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ.

६. श्री. रं. कुलकर्णी, शिवकालीन राजनीती आणि रणनीती, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.


❋❋❋